प्रकरण ८ वे

# वर्णांची संख्या तीन की चार?

१

हिंदूंच्या सर्व वर्गातील लोक त्याचप्रमाणे युरोपियन ग्रंथकार असे सर्रासपणे मानीत आलेले आहेत की, हिंदी-आर्य समाजात अगदी प्रथमपासून चार वर्ण होते. शूद्र हे क्षत्रिय होते हा सिद्धांत मागील प्रकरणात मांडलेला आहे. तो सिद्धांत जर मान्य केला तर असा निष्कर्ष काढावा लागतो की चार वर्णांबद्दलचा सिद्धांत चुकीचा ठरतो. कारण हिंदी-आर्य समाजात एकेकाळी ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य असे फक्त तीन वर्ण अस्तित्वात होते. एवच चार वर्णांचा सिद्धांत एक प्रश्न सोडवितो, त्याचप्रमाणे तो दुसराही प्रश्न उपस्थित करतो. चार वर्णांच्या सिद्धांताचे महत्त्व कोणाला कळून येवो अगर न येवो, तो सिद्धांत अत्यंत महत्त्वाचा आहे, असे मला वाटते. हिंदी-आर्य समाजात फक्त तीन वर्ण अस्तित्वात होते, हा सिद्धांत मी यशस्वी रीतीने सिद्ध करून दाखविला नाही, तर शूद्र हे क्षत्रिय होते हा जो मी सिद्धांत मांडलेला आहे तो मी निःसंशययपणे सिद्ध केलेला आहे, असे म्हणता येणार नाही. म्हणून फक्त तीन वर्ण अस्तित्वात होते हा सिद्धांत स्पष्ट करणे आवश्यक आहे, याची मला पुरी जाणीव आहे.

शूद्र हे क्षत्रिय होते हा सिद्धांत मांडून मी एक नवे संकट उत्पन्न केलेले आहे. कारण त्या सिद्धांताच्या जोरावर मी मुख्य प्रश्न सोडविण्याची अनुकूल परिस्थिती उत्पन्न केली खरी, पण त्या सिद्धांतामुळे वर्ण तीन होते की चार होते असा वर्णाबद्दलचा एक नवा प्रश्न उपस्थित होतो. ही सारी घटना दुर्दैवाची वाटते. तरी पण सुदैवाची अशी एक गोष्ट आहे की, हिंदी आर्य समाजात फक्त तीन वर्ण अस्तित्वात होते, हे सिद्ध करण्यास भरभक्कम व मुद्देसूद पुरावा उपलब्ध आहे.

या बाबतीत मला विश्वसनीय वाटणारा पहिला पुरावा खुद्द ऋग्वेदात सापडतो. ऋग्वेदाच्या काळात वर्णव्यवस्था अस्तित्वात नव्हती, असे काही विद्वानांचे म्हणणे आहे. ऋग्वेद लिहून झाल्यानंतर पुष्कळ काळाने ऋग्वेदात पुरुषसूक्त घुसडण्यात आले, या मतावर सदर विद्वानांची सारी भिस्त असल्यामुळे वर्णव्यवस्था अस्तित्वात नव्हती असे त्यांनी आपले मत बनविलेले आहे. पुरुषसूक्त हे ऋग्वेदात बऱ्याच काळानंतर घुसडण्यात आले, हे मत जरी मान्य केले तरी ऋग्वेदाच्या काळात वर्णव्यवस्था नव्हती, हे मत मान्य करणे शक्य नाही. वर्णव्यवस्था ऋग्वेदाच्या काळात नव्हती या मताला ऋग्वेदातच मुळी आधार मिळत नाही. कारण, पुरुषसूक्ताचा विचार क्षणभर बाजूला सोडून जर ऋग्वेदाकडे आपण दृष्टी फेकली तर ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांच्याबद्दल एकदा नव्हे तर अनेकदा ऋग्वेदात उल्लेख

आलेला आहे असे आपणास दिसून येईल. ब्राह्मण हा एक निराळा वर्ण आहे, अशा अर्थाने ब्राह्मण हा शब्द ऋग्वेदात पंधरा वेळा वापरलेला आढळतो. क्षत्रिय हा एक निराळा वर्ण आहे, या अर्थाने क्षत्रिय हा शब्द ऋग्वेदात नऊ वेळा वापरलेला आढळतो. परंतु शूद्र हा एक निराळा वर्ण आहे, असा ऋग्वेदात एकदाही उल्लेख केलेला आढळत नाही, हे विशेष महत्त्वाचे आहे. शूद्र हा जरा निराळा वर्ण अस्तित्वात असता तर त्याचा उल्लेख करण्यात ऋग्वेदाला कोणतीही आडकाठी नव्हती. या सर्व गोष्टी लक्षात घेऊन ऋग्वेदापासून या बाबतीत खरा निष्कर्ष काढावयाचा तर ऋग्वेदाच्या काळात वर्णव्यवस्था अस्तित्वात नव्हती हा तो निष्कर्ष आहे; तर त्याकाळी फक्त तीन वर्ण म्हणून समजण्यात येत नसे असा तो खरा निष्कर्ष काढता येईल.

मला या बाबतीत विश्वसनीय वाटणारा दुसरा पुरावा शतपथ ब्राह्मण व तैत्तिरीय ब्राह्मण या दोन ब्राह्मण ग्रंथांत सापडतो. फक्त तीन वर्णांची उत्पत्ती कशी झाली याची माहिती या दोन्ही ग्रंथांत सापडते. शूद्र हा चवथा वर्ण कसा उत्पन्न झाला याची त्या ग्रंथात माहिती नाही.

शतपथ ब्राह्मणात खालीलप्रमाणे म्हटलेले आहे (Muir, Vol. I, p.17) –

**(२) १–४–११ –** 'भूः' असा उद्गार काढून प्रजापतीने पृथ्वी उत्पन्न केली. 'स्वः' असे उद्गार काढून त्याने आकाश उत्पन्न केले. ही सृष्टी म्हणजे वर सांगितलेली जगे होत. या सर्वांबरोबर अग्नी ठेवण्यात येतो. 'भूः' असे म्हणून प्रजापतीने ब्राह्मण उत्पन्न केला. 'भुवः' म्हणून त्याने क्षत्रिय उत्पन्न केला आणि 'स्वः' म्हणून त्याने वैश्य उत्पन्न केला. या सर्वांबरोबर अग्नी ठेवण्यात आला. 'भूः' म्हणून प्रजापतीने स्वतःला उत्पन्न केले. 'भुवः' म्हणून त्याने संतती उत्पन्न केली. 'स्वः' म्हणून त्याने जनावरे उत्पन्न केली. हे जग प्रजापती, संतती व जनावरे यांचे मिळून झालेले आहे. या सर्वांबरोबर अग्नी ठेवण्यात आला.

तैत्तिरीय ब्राह्मणात खालीलप्रमाणे म्हटलेले आहे (Quoted by Muir, Vol. I, p.17) –

**(३) १२–९–२ –** "हे सर्व जग ब्रह्मदेवाने उत्पन्न केलेले आहे. वैश्य वर्गाला ऋक् श्लोकापासून उत्पन्न केले असे लोक म्हणतात. यजुर्वेद हे गर्भाशय आहे व त्यातून क्षत्रियाला निर्माण केले असे ते म्हणतात. ब्राह्मणाचे उत्पत्तिस्थान तोच वेद होय. प्राचीन काळच्या लोकांनी ही गोष्ट प्राचीन काळच्या लोकांना सांगितली."

हा घ्या माझा पुरावा. ऋग्वेदापासून काढलेले सार आणि ब्राह्मण ग्रंथांपासून घेतलेले उतारे यांना एकत्र करून माझा पुरावा तयार झालेला आहे. येथे हे स्पष्ट केले पाहिजे की ब्राह्मण ग्रंथ हे वेदांइतकेच प्रमाणभूत ग्रंथ समजले जातात. ऋग्वेद, शतपथ ब्राह्मण व तैत्तिरीय ब्रह्मण यात असे स्पष्ट व स्वच्छ म्हटलेले आहे की, फक्त तीन वर्ण अस्तित्वात होते. शूद्र हा निराळा व स्वतंत्र वर्ण उत्पन्न झालेला नव्हता आणि त्याला चवथा वर्ण म्हणून समजावे ही कल्पना सुद्धा कोणाला सुचलेली नव्हती, असे या तीन ग्रंथांवरून स्पष्ट होते. प्रथमतः तीन वर्ण अस्तित्वात होते आणि शूद्र हा दुसऱ्या वर्णाचा (क्षत्रिय) केवळ एक भाग

होता असे जे माझे म्हणणे आहे, त्याला पुष्टी देणारा दुसरा उत्तम पुरावा मी वर मांडलेल्या पुराव्याशिवाय कोठे सापडणे शक्य वाटत नाही.

२

माझ्या म्हणण्याला टेकू देणारा दुसरा पुरावा कोणत्या प्रकारचा आहे, हे मी वर स्पष्ट केलेले आहे. या बाबतीत विरुद्ध पुरावा काय आहे हो पाहू या. प्रथमपासून चार वर्ण अस्तित्वात होते, असे ऋग्वेदातील पुरुषसूक्तात म्हटलेले आहे. मी मांडलेला पुरावा व पुरुषसूक्ताचा पुरावा यांपैकी कोणता पुरावा बरोबर व ग्राह्य समजावा व वर्ण तीन होते की चार होते हा प्रश्न कसा सोडवावा हे आता पाहू. मीमांसेचे नियम लागू करून हा प्रश्न सोडविता येणार नाही. मीमांसेच्या नियमांच्या आधारे जर आपण या प्रश्नाकडे पाहू लागलो तर चार वर्ण अस्तित्वात होते हे पुरुषसूक्ताचे म्हणणे व तीन वर्ण अस्तित्वात होते हे शतपथ ब्राह्मण व तैत्तिरीय ब्राह्मण यांचे म्हणणे ही दोन्ही म्हणणी खरी धरावी लागतील, अशी ही चमत्कारिक परिस्थिती आहे. काळवेळ, सचोटीची दृष्टी इत्यादी गोष्टींवर भर देऊन आपणाला हा प्रश्न ऐतिहासिक दृष्टीने सोडवावा लागेल. येथे विचार करण्यासारखाप्रमुख प्रश्न असा उत्पन्न हातो की, पुरुषसूक्त हा मूळच्या ऋग्वेदात घुसडून दिलेला भाग आहे की काय? एकंदर ऋग्वेदातील भाषा व पुरुषसूक्ताची भाषा यातील फरक लक्षात घेतला तर सूक्त ऋग्वेदात घुसडलेला भाग आहे असे वाटते. सूक्त हे बरेच अलीकडे रचलेले असावे असे वर्ण विद्वानांचे मत आहे. या बाबतीत कोलब्रुक खालीलप्रमाणे म्हणतो, (Quoted by Muir, Vol. I. p. 13) –

"ते वैशिष्ट्यपूर्ण असलेले स्तवन (पुरुषसूक्त) भाषा, वृत्त व शैली या दृष्टीने ते ज्या इतर प्रार्थनामय भागांशी संलग्न झालेले आहे त्या भागापासून फार निराळ्या स्वरूपाचे आहे. त्याचा सारा नूर आधुनिक पद्धतीचा आहे, हे नक्की; संस्कृत भाषेची चांगली वाढ झाल्यानंतर आणि त्या भाषेचे व्याकरण व नादमाधुर्य ही आपापल्या उत्कर्ष बिंदूला पोहोचली त्यानंतर ते स्तवन रचण्यात आलेले असावे. संस्कृत भाषा जेव्हा वन्य व गावठी होती तेव्हा वेदातील असंख्य स्तवने व प्रार्थना त्या भाषेत रचल्या गेल्या. ती भाषा सुधारत सुधारत शेवटी ती अत्यंत मनोवेधक, नादमधुर झाली तेव्हा अशा सुधारलेल्या पवित्र व शिष्ट पौराणिक कविता (पुराणे व काव्ये) रचल्या गेल्या. संस्कृत भाषेची इतकी समृद्ध व उन्नत अवस्था झाल्यनंतर वेद जे आजच्या स्थितीत दिसतात त्या स्थितीत त्यांची जुळणी करण्यात आली. पुरुषसूक्ताचे अंतरंग पाहिले तर वरील परिस्थिती खरी आहे, असे वाटू लागते."

या बाबतीत प्रो. मॅक्स मुल्लर यांचे मत खालीलप्रमाणे होते (Quoted in Muir, Vol. I, p. 13) –

"उदाहरणार्थ, १० व्या मंडलातील ९० वी ऋचा ही नादमाधुर्य व एकंदर स्वरूप यांच्या दृष्टीने आधुनिक आहे याबद्दल थोडासासुद्धा संशय नाही. तीन यज्ञसमारंभाबद्दलचे खूप उल्लेख आहेत. तीत तत्त्वज्ञानविषयक पारिभाषिक शब्द वापरलेले आहेत. वसंत, ग्रीष्म,

शरद अशा क्रमाने ऋतूंचा तीत नामनिर्देश केलेला आहे. चार जातींचे मोजमाप ज्यात केलेले आहे असा ऋग्वेदात तेवढा एकच भाग आहे. तिची भाषा लक्षात घेतली तर तीवरून असे नक्की वाटते की ती ऋचा अगदी आधुनिक काळात लिहिली गेली असेल. याचे दुसरे उदाहरण असे की, या ऋचेत ग्रीष्म म्हणजे उन्हाळा या ऋतूचा नामानिर्देश केलेला आहे. या ऋतूचा नामनिर्देश ऋग्वेदाच्या ...कोणत्याही इतर ऋचांत आढळून येत नाही. वसंत हा शब्दसुद्धा प्राचीन वैदिक कवींच्या शब्दकोषात आढळून येत नाही. हा शब्द ऋग्वेदात पुनः एका ठिकाणी आढळतो. ते ठिकाण म्हणजे १०-१६१-४ या ऋचात शरद, हेमंत व वसंत अशा क्रमाने ऋतूंचा नामनिर्देश केलेला आहे.'

या बाबतीत प्रो. वेबर यांचे मत खालीलप्रमाणे आहे. (Quoted in Muir, Vol. I, p. 14)-

"पुरुषसूक्त ही ऋग्वेदातील एक ऋचा मानली जाते. पुरुषसूक्तात सांगितलेल्या गोष्टी लक्षात घेतल्यानंतर असे स्पष्ट कळून येते की, ऋग्वेदात जे भाग घुसडून देण्यात आलेले आहेत त्यापैकी तो एक भाग होय. पुरुषसूक्तात जे श्लोक आहेत त्यातील एकही श्लोक सामसंहितेने आपल्यात घेतलेला नाही, ही बरीच महत्त्वाची गोष्ट आहे. नैगेय म्हणून जो पंथ आहे त्यातील लोकांनी सूक्तातील पहिल्या अर्चिकमधील सातव्या प्रपाढकातील पहिले पाच श्लोक निवडून काढलेले आहेत. ते आधुनिक काळी रचलेले श्लोक आहेत असे त्यांचे मत आहे." (याबद्दलही त्याची नक्की खात्री नाही.)

## ३

पुरुषसूक्त हे फार प्राचीन काळी रचले गेले की अगदी अलीकडच्या काळात रचले गेले, हे सिद्ध करण्याचा एक मार्ग वर सांगितला आहे. याचा दुसरा एक मार्ग आहे तो आपण आता पाहू या. वेदाच्या ज्या अनेक संहिता आहेत त्यातील किती संहितांनी पुरुषसूक्ताचा अंगीकार केलेला आहे हे शोधून काढणे जरूर आहे. निरनिराळे वेद, संहिता यांचे या बाबतीत परीक्षण केल्यानंतर आपणाला पुढीलप्रमाणे परिस्थिती आढळून येते-

सामवेदाने पुरुषसूक्तातील श्लोकांपैकी फक्त ५ श्लोक आपल्यात अंतर्गत केलेले आहेत. शुक्ल यजुर्वेदाकडे पाहिले तर असे दिसून येते की, वाजसनेयी संहितेत पुरुषसूक्ताचा समावेश करण्यात आलेला आहे. तरीपण सामवेदातील पुरुषसूक्ताचा समावेश आणि त्याचा शुक्ल यजुर्वेदातील (वाजसनेयी संहिता) समावेश यांच्यात मोठा फरक आहे. पुरुषसूक्त ऋग्वेदात जसे सापडते तशा स्थितीत त्याचे १६ श्लोक आहेत. परंतु वाजसनेयी संहितेत जे पुरुषसूक्त आहे त्याचे २२ श्लोक आहेत. कृष्ण यजुर्वेदाच्या फक्त तीन संहिता सध्या उपलब्ध आहेत. त्या म्हणजे तैत्तिरीय, कथाक व मैत्रायणी. यांपैकी एकाही संहितेने पुरुषसूक्ताला आपल्यात अंतर्गत करून घेतलेले नाही. ऋग्वेदाच्या पुरुषसूक्ताचा काहीसा बरोबर उतारा आपल्यात अंतर्गत करणारा सर्व वेदात कोणता वेद असेल तर तो अथर्ववेद होय.

निरनिराळ्या वेदांतच जे पुरुषसूक्त आढळते त्याचा मजकूर एकाच स्वरूपाचा नाही.

वाजसनेयी संहितेतील सूक्तात सहा जास्त श्लोक आढळतात ते त्या संहितेचेच होत. ऋग्वेद, सामवेद व अथर्ववेद यातील सूक्तांचा जो मजकूर आहे त्यात हे सहा श्लोक आढळत नाहीत. ऋग्वेदातील १६ व्या श्लोकासंबंधी आणखी एक फरक दिसून येतो. हा श्लोक अथर्ववेद, सामवेद किंवा यजुर्वेद यापैकी कोणत्याही वेदांत सापडत नाही. बाकीचे १५ श्लोक तिन्ही वेदांत सापडतात, परंतु त्यांचा मजकूर एकाच प्रकारचा नाही. एवढेच नव्हे, तर ते श्लोक तिन्ही वेदांत सारख्याच क्रमाने वापरलेले नाहीत हे खालील कोष्टकावरून कळून येईल –

| यजुर्वेद | ऋग्वेद | सामवेद | अथर्ववेद |
|---|---|---|---|
| १ | १ | ३ | १ |
| २ | २ | ५ | ४ |
| ३ | ३ | ६ | ३ |
| ४ | ४ | ४ | २ |
| ५ | ५ | ७ | ९ |
| ६ | ८ | + | १० |
| ७ | ९ | + | ११ |
| ८ | १० | + | १४ |
| ९ | ७ | + | १३ |
| १० | ११ | + | १२ |
| ११ | १२ | + | ५ |
| १२ | १३ | + | ६ |
| १३ | १४ | + | ७ |
| १४ | ६ | + | ८ |
| १५ | १५ | + | १५ |
| १६* | १६ | + | १६* |
| १७ | + | + | + |
| १८ | + | + | + |
| १९ | + | + | + |
| २० | + | + | + |
| २१ | + | + | + |
| २२ | + | + | + |

+ हे श्लोक मिळत नाहीत. * हे श्लोक समस्वरूपी नाहीत.

जर पुरुषसूक्त अत्यंत जुन्या काळी रचलेले होते आणि त्याला परंपरेने पावित्र्य प्राप्त झालेले होते, तर स्वतःच्या अंतरंगात त्याला प्रविष्ट करून घेण्याचे इतर वेदाना कसे धैर्य

झाले? त्याचे मूळचे स्वरूप बदलून व त्यात छाटाछाटी करून त्याला इतर वेदांनी निरनिराळी स्वरूपे दिलेली आहेत, असे करण्याचा धीर त्यांना कसा झाला असावा? वरील कोष्टकाकडे पाहिले तर असले प्रश्न डोळ्यांपुढे उभे राहतात.

निरनिराळ्या वेदांतील श्लोकांत पुरुषसूक्ताला जी स्थळे देण्यात आलेली आहेत तीही फार महत्त्वाची आहेत. ऋग्वेदाच्या संकीर्ण भागात त्याला स्थळ दिलेले आहे. अथर्ववेदाच्या पुरवणीदाखल म्हणून तो भाग आहे, पुरुषसूक्त हा ऋग्वेदातील भाग जर फार प्राचीन काळी रचण्यात आलेला होता, तर त्याला वेदांतील असल्या बिनमहत्त्वाच्या ठिकाणी का घालण्यात आले असावे? हे वरील प्रश्न काय सुचवितात? ते हे सुचवितात की, –

(१) कृष्ण यजुर्वेदाच्या तैत्तिरीय कथाक व मैत्रयाणी संहिता यांच्यात जर पुरुषसूक्त घुसडून दिलेले नाही असे मानले, तर यावरून असा निष्कर्ष निघतो की, उपरिनिर्दिष्ट ग्रंथ लिहून तयार झाल्यानंतर पुरुषसूक्त ऋग्वेदात घुसडण्यात आले असावे.

(२) वेदांचे संकीर्ण व पुरवणीदाखल जे भाग आहेत त्यात पुरुषसूक्ताला स्थान देण्यात आले ही गोष्ट हेच सुचविते की, सूक्त अलीकडच्या काळात रचलेले असावे.

(३) निरनिराळ्या संहितांच्या कर्त्यांनी संहितेत पुरुषसूक्तातील श्लोक ग्रथित करताना त्या श्लोकांत स्वतःची भर टाकण्यात, त्यात श्लोकांतील काही भाग व शब्द वगळण्यात आणि त्या श्लोकांच्या नक्कली करण्यात इतके स्वातंत्र्य उपभोगले की, त्यावरून असे दिसते की ते ग्रंथकार पुरुषसूक्ताला अगदी जुन्या काळचे कवन म्हणून मान देत नसावेत. पुरुषसूक्त हे अगदी जुन्या काळचे काव्य आहे अशी जर संहिताकारांची भावना असती, तर त्यांनी ते सूक्त आपापल्या संहितेत जसेच्या तसे ग्रथित केले असते.

पुरुषसूक्त हे ऋग्वेदात अलीकडच्या काळात घुसडून दिलेला भाग आहे, असे जे प्रो. मॅक्स मुल्लर व इतर विद्वान् यांचे मत आहे, त्याला वरील मुद्दे निर्णायक पाठिंबा देतात.

४

पुरुषसूक्तातील भागही निरनिराळ्या आकाराचे आहेत हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. जो कोणी पुरुषसूक्त वाचेल त्याला हे दिसून येईल की, फक्त ११ व १२ हे श्लोक वगळले तर इतर सर्व श्लोक वर्णनात्मक स्वरूपाचे आहेत. ११ व १२ हे श्लोक चार वर्णांची उत्पत्ती कशी झाली, याचे स्पष्टीकरण करतात. हे श्लोक प्रश्नोत्तराच्या स्वरूपात रचलेले आहेत. येथे असा प्रश्न उद्‌भवतो की, पूर्वीच्या श्लोकाचे वर्णनात्मक स्वरूप असताना ते स्वरूप बाजूला करून ११ व १२ हे श्लोक निराळ्या स्वरुपात प्रश्नोत्तर–स्वरूपात का रचले असावेत? याचे असे एक स्पष्टीकरण दिसते की, सूक्तकाराला या श्लोकात ठसठशीत रीतीने नवीन विषय आणावयाचा होता. याचा अर्थ असा की, पुरुषसूक्त हे अलीकडे रचण्यात आलेले आहे. एवढेच नव्हे तर त्यातील ११ व १२ हे श्लोक पुरुषसूक्तात पुष्कळ काळ लोटल्यानंतर घुसडून देण्यात आलेले असावेत. या बाबतीत काही टीकाकारांनी इथपर्यंत मजल मारलेली आहे की, आपल्या जातीचे श्रेष्ठत्व प्रस्थापित करण्यासाठी ब्राह्मणांनी ११ व १२ हे दोन

श्लोक अगदी अलीकडे रचले व ते त्यांनी ऋग्वेदातील पुरुषसूक्तात घुसडून दिले. पुरोहितांनी अशाप्रकारच्या अनेक घालघुसडी धार्मिक ग्रंथात केलेल्या आहेत, हे महशूर आहे. डोनेशन्स ऑफ कान्स्टंइटान स्युडोइसिडोर डिक्रीटलस् ही युरोपियन पुरोहितांनी केलेली घालघुसडीची प्रसिद्ध उदाहरणे होत. अशाप्रकारचे डावपेच खेळण्याचे हिंदुस्थानातील ब्राह्मणांना वावडे नाही. विधवा स्त्रियांनी सती जावे असा ब्राह्मणांनी हेका धरला व या गोष्टीला ऋग्वेदातून आधार काढण्यासाठी ऋग्वेदातील 'अग्रे' शब्दाला 'अग्ने' असे रूप ब्राह्मणांनी दिले. ही हकिगत प्रो. मॅक्स मुल्लर यांनी स्पष्टपणे सांगितलेली आहे. ईस्ट इंडिया कंपनीच्या अमदानीत एक खटला चालू होता. त्यातील वादीची बाजू खोटी असताही तिला खरी करण्याच्या हेतूने आणि वादीच्या बाजूला उपयोगी पडेल असे पुरावे तयार करण्यासाठी ब्राह्मणांनी एक नवी स्मृती संस्कृत भाषेत तयार केली होती हे महशूर आहेच. ही उदाहरणे लक्षात घेतली तर चातुर्वर्ण्याच्या व्यवस्थेला खुद्द वेदाचा आधार प्राप्त व्हावा या हेतून ब्राह्मणांनी चवथा वर्ण अस्तित्वात आल्यानंतर बऱ्याच काळाने पुरुषसूक्ताला जरी नाही तरी त्यातील ११ व १२ या श्लोकांना रचले असे म्हटले, तर त्यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही.

५

ब्राह्मण ग्रंथापूर्वी पुरुषसूक्त रचण्यात आलेले आहे काय, हा प्रश्न पहिल्या प्रश्नापासून स्वतंत्र व वेगळा आहे. ऋग्वेद ज्या काळात रचण्यात येत होता त्या काळच्या शेवटच्या भागात पुरुषसूक्त कदाचित् रचण्यात आले असेल. तरीपण जर ब्राह्मण ग्रंथाच्या अगोदर सर्व ऋग्वेद ग्रंथ तयार करण्यात आलेला असेल तर पुरुषसूक्त ब्राह्मण ग्रंथाच्या अगोदर रचण्यात आलेले असावे हे सिद्ध होते. अशी परिस्थिती असल्यामुळे या प्रश्नाचा स्वतंत्रपणे विचार केला पाहिजे. वैदिक वाङ्मय कोणत्या क्रमाने रचण्यात आले याबद्दल प्रो. मॅक्स मुल्लर यांचे असे मत आहे की, प्रथम वेद, नंतर ब्राह्मण ग्रंथ व त्यानंतर सूत्रे ही रचण्यात आली. हा क्रम जर मान्य केला तर असे ठरते की पुरुषसूक्त ब्राह्मण ग्रंथाच्या अगोदर रचण्यात आलेले असले पाहिजे. पण प्रश्न असा उद्भवतो की, प्रो. मॅक्स मुल्लर यांचे वरील मत हे सर्वस्वी प्रमाणभूत म्हणून ग्राह्य मानले पाहिजे की काय? ते तसे जर मानले तर त्यापासून पुढील दोन निष्कर्ष निघतात –

(१) ऋग्वेदाच्या काळात चार वर्ण अस्तित्वात होते आणि शतपथ ब्राह्मण ग्रंथाच्या वेळी ते वर्ण तीन झाले; किंवा

(२) शतपथ ब्राह्मणामध्ये वर्णाबद्दलची संपूर्ण परंपरा व्यवस्थितपणे मांडलेली नाही.

वरील दोन्ही निष्कर्ष मूर्खपणाचे आहेत व ते त्याज्य मानले पाहिजेत, हे उघड आहे. वरवर पाहिला तरी पहिला निष्कर्ष मूर्खपणाचा वाटतो. दुसरा निष्कर्ष मुळातच ठिसूळ आहे. याचे कारण असे की, वर्णांच्या उत्क्रांतीचा जो सिद्धांत दोन ब्राह्मण ग्रंथांनी मांडलेला आहे तो पुरुषसूक्तात मांडलेल्या सिद्धांतापेक्षा निराळा आहे. पुरुषसूक्तातील वर्णांच्या उत्क्रांतीचा सिद्धांत आपल्या परीने परिपूर्ण आहे. प्रो. मॅक्स मुल्लर यांचे उपनिनिर्दिष्ट मत जर

सर्वस्वी प्रमाणभूत मानले तर वरील प्रकारचे बाष्कळ निष्कर्ष आपल्या हाती लागतात. प्रो. मॅक्स मुल्लर यांचे मत जरी आपण सर्वस्वी प्रमाणभूत मानले तरी त्याचा अर्थ असा होत नाही की, सर्व संहिता रचून तयार होण्याच्या अगोदर एकही ब्राह्मण ग्रंथ रचण्यात आला नाही. उलटअंशी प्रो. बेलवलकर व प्रो. रानडे यांनी दाखविल्याप्रमाणे अशीही परिस्थिती असण्याची पूर्ण शक्यता आहे की, वैदिक वाङ्मयातील बरेच भाग एकमेकांशी संलग्न आहेत व म्हणून वेदांचा एखादा भाग प्रथम रचण्यात आला असावा व दुसरे भाग त्यानंतर रचण्यात आले असावेत अणि ब्राह्मण ग्रंथाचा एखादा भाग वेदांच्या काही भागाच्या अगोदर रचण्यात आला असावा. वर सांगितलेली विचारसरणी बरोबर धरली तर एकेकाळी तीन वर्ण अस्तित्वात होते असा उल्लेख करणारा शतपथ ब्राह्मणातील व तैत्तिरीय ब्राह्मणातील भाग ऋग्वेदातील पुरुषसूक्ताच्या अगोदर रचण्यात आलेला होता, असे मानण्यास वास्तविकपणे कोणताही अडथळा वाटत नाही.

पुरुषसूक्ताची इतकी छाननी करून आपण कोणता निष्कर्ष काढू शकतो? तो निष्कर्ष हा की, पुरुषसूक्त ऋग्वेदात अगदी अलीकडच्या काळात घुसडून दिलेला भाग आहे आणि अशी वस्तुस्थिती असल्यामुळे आर्य समाजात अगदी प्रथमपासून चार वर्ण अस्तित्वात होते. या सिद्धांताला त्या पुरुषसूक्तातील मजकूर पुरावा म्हणून धरता येत नाही.

वर दिलेली विचारसरणी लक्षात घेतली तर कोणालाही असे दिसून येईल की, शूद्रोत्पत्तीसंबंधी मी जे सिद्धांत मांडीत आहे त्यामुळे या प्रकरणाच्या प्रारंभी सांगितल्याप्रमाणे कोणतेही वादग्रस्त प्रश्न उत्पन्न होत नाहीत. असे काही वादग्रस्त प्रश्न उत्पन्न होत असतील तर ते पुरुषसूक्तात जे काही सांगितलेले आहेत, ते सत्य व विश्वसनीय आहे अशी समजूत करून घेतल्यामुळे. परंतु अशाप्रकारची समजूत करून घेणे हेच मुळी निरर्थक आहे. म्हणून असा निष्कर्ष काढावयास मला मुळीच प्रत्यवाय दिसत नाही की, एकेकाळी आर्य समाजात तीन वर्ण अस्तित्वात होते आणि शूद्र दुसऱ्या वर्णाचे म्हणजे क्षत्रिय वर्णाचे होते.

ooo

प्रकरण ९ वे

# ब्राह्मण व शूद्र यांचा झगडा

शूद्र हे क्षत्रिय होते व ते चवथा वर्ण म्हणून जे झाले ते आपोआप नाही, तर त्या अवस्थेला त्यांना दुसऱ्यांकडून नेण्यात आले हे मी जे प्रमेय मांडलेले आहे त्यावरून शूद्रांचा एकंदर प्रश्न सर्वस्वीपणे सोडविता येत नाही. त्या प्रमेयावरून दुसरा प्रश्न उपस्थित होतो. शूद्रांना अवनत अवस्थेत कोणी पोहोचविले व का, हा तो दुसरा प्रश्न होय.

हा प्रश्न नवीन आहे. तो पूर्वी कधीही उपस्थित करण्यात आलेला नव्हता. म्हणून या विषयावर जे वाङ्मय अस्तित्वात आहे त्यात या प्रश्नाचे उत्तर मिळेल अशी अपेक्षा करणे शक्य नाही. हा प्रश्न मी पहिल्यांदा उपस्थित करीत आहे.

शूद्रासंबंधी मी जे प्रमेय मांडलेले आहे ते प्रमेय सर्वस्वी या प्रश्नावर उभारलेले आहे. म्हणून या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर देण्याची जबाबदारी माझी आहे. मी या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर देऊ शकेन असा मला विश्वास आहे. ब्राह्मण व शूद्र यांचा प्राणांतिक झगडा पूर्वी झालेला होता. शूद्रांना जी अवनत दशा प्राप्त झाली ती त्या झगड्यामुळेच होय, असे माझे या प्रश्नाला उत्तर आहे.

१

शूद्र राजा सुदास आणि ब्राह्मण ऋषी वसिष्ठ यांच्यात प्राणांतिक झगडा झाले होता, याचा स्पष्ट पुरावा अस्तित्वात आहे. परंतु या झगड्यासंबंधीच्या सर्व गोष्टींची हकिकत अत्यंत धरसोडपणाने सांगण्यात आलेली आहे. या गोष्टी सरळ व सुसंगत पद्धतीने यापुढील भागात सांगण्याचा मी प्रयत्न केलेला आहे.

वसिष्ठ व विश्वमित्र यांच्यामध्ये कोणत्या प्रकारचे संबंध होते हे प्रथम समजावून घेतले तर ब्राह्मण व शूद्र यांच्यात जो प्राणांतिक झगडा झाला होता त्याचे स्वरूप आपल्या लक्षात येईल.

वसिष्ठ व विश्वमित्र हे एकमेकांचे हाडवैरी होते. त्या दोघांच्या आयुष्यात अशी एकही गोष्ट दिसून येत नाही की, जिच्याबद्दल परस्परविरोधी टोकाला उभे राहून ते भांडले झगडले नाहीत. त्यांच्या शत्रुत्वाचे अस्तित्व सिद्ध करणाऱ्या काही गोष्टी मी येथे सांगतो. सत्यव्रत ऊर्फ त्रिशंकू याची जी कथा आहे ती या गोष्टींपैकी एक आहे. ती हरिवंशात खालीलप्रमाणे सांगितलेली आहे. (Quoted by Muir, Vol. I, p.377-378)

"सत्यव्रताचा बाप राज्य करीत असता त्याचा धर्मगुरू वसिष्ठ हा एकदा राजाच्या गैरहजेरीत अयोध्या नगरीचे व देशाचे राज्य चालवू लागला. राजाच्या अंतःपुरावर सुद्धा

वसिष्ठांची हुकुमत चालू झाली. सत्यव्रताला हा प्रकार पहावेना. त्याच्या मूर्खपणामुळे म्हणा, सत्यव्रत वसिष्ठाबद्दल मनात दिवसेंदिवस जळफळू लागला. त्याच्या बापाने वसिष्ठाच्या हातात राज्यसूत्रे दिली तेव्हा उघडपणे याबद्दल विरोध करण्याची हिंमत सत्यव्रताला झाली नाही; त्याला तसेच सबळ कारण होते. सत्यव्रत मनात म्हणाला, 'लग्नविधीतील सप्तपदीविधी पुरा झाला तरच लग्नविधी बंधनकारक होतो. मी माझ्या त्या स्त्रीचा हात धरला तेव्हा सप्तपदीविधीचा सोहळा केलेला नव्हता. सर्व धर्मविधींची पुरी माहितीअसूनसुद्धा वसिष्ठाने मला माझी ती स्त्री मिळण्याच्या बाबतीत सहाय्य केले नाही.' हा विचार सत्यव्रताच्या मनात एकसारखा घोळत होता. त्यामुळे तो वसिष्ठाच्या विरुद्ध मनात एकसारखा जळफळत होता. तथापि त्या बाबतीत वसिष्ठाने योग्य तेच केलेले होते. सत्यव्रताच्या बापाने त्याच्यावर मौनतपाची शिक्षा लादलेली होती, तरीपण त्या शिक्षेचा मथितार्थ त्याच्या लक्षात आलेला नव्हता. त्याच्या बापाला असे वाटले होते की ही शिक्षा मुलावर लादली तर आपल्या कुटुंबाची इज्जत आपण राखल्यासारखे होईल. असे सांगण्यात येते की, सत्यव्रताला गादीवर येऊ न द्यावे असे त्याच्या बापाने ठरविले तेव्हा वसिष्ठाने बापाला तसे न करण्याची आज्ञा केली नाही, हे खरे नाही. उलटअंशी, सत्यव्रताला गादीवर बसविण्याचा परमपूज्य मुनी वसिष्ठ यांचा ठाम विचार ठरलेला होता. शक्तिमान् युवराज सत्यव्रताने बारा वर्षे मौनतप केले. तप संपल्यानंतर तो परत घरी येऊ लागला. वसिष्ठामुळे आपली ही विपन्नावस्था झाली ही भावना जागृत होताच वसिष्ठाबद्दलचा त्याचा क्रोधाग्नी भडकला. दुःखाने व संतापाने त्याचे मन भडकले. तो देहभान विसरला. त्याच्या जवळ खायला मांस नव्हते. त्याला वसिष्ठाची कामधेनू समोर दिसली. तो आपली दशकर्तव्ये विसरला व त्याने कामधेनूला ठार मारले. त्याने तिचे मांस स्वतः खाल्ले व विश्वमित्राच्या मुलांना खायला दिले. या हकिगतीचा वृत्तांत वसिष्ठाने ऐकला तेव्हा त्याला मनस्वी संताप आला व त्याने सत्यव्रताला 'तू त्रिशंकू हो' असा शाप दिला. सत्यव्रताने तीन पापे केली होती, म्हणून त्याला वसिष्ठाने त्रिशंकू हे नाव दिले. विश्वामित्र तप संपवून घरी आल्यानंतर त्याला समजले की त्रिशंकूने आपले कुटुंब पोसले. तेव्हा तो त्रिशंकूवर खुष झाला व त्याने त्याला वर मागण्यास सांगितले. तेव्हा त्रिशंकूने असा वर मागितला की, आपण सदेह स्वर्गात जावे. बारा वर्षे पाऊस न पडल्यामुळे आलेल्या दुष्काळामुळे जी चिंता उत्पन्न झाली होती ती दूर झाली. मग मुनी विश्वामित्राने त्रिशंकूला गादीवर बसविले व त्याच्यासाठी एक यज्ञ केला. त्यानंतर देव व वसिष्ठ यांनी पुष्कळ विरोध केला तरी बलाढ्य कौशिकाने राजाला सदेह स्वर्गात नेले.''

''काही दुष्कृत्ये केली गेली म्हणून इंद्राने बारा वर्षे पाऊस पडू दिला नाही. अशा वेळी आपली बायको व मुले यांना मागे ठेवून विश्वामित्र समुद्राच्या काठी घोर तपश्चर्या करण्यासाठी गेला. घरातील सर्व चीजवस्तू संपल्यानंतर खायला धान्य विकत घेण्यास तिच्याजवळ काही राहिले नाही. म्हणून १०० गाईला आपला एक मुलगा विकावा व त्या १०० गाईंवर इतर मुलांची जोपासना करावी असा तिने विचार केला व त्याप्रमाणे तिने एक मुलगा विकण्याचा करार केला. परंतु ही हकिगत सत्यव्रताला समजली तेवहा त्याने तो करार

रद्द करविला व विश्वामित्राची पत्नी व मुले यांची तो जोपासना करू लागला. त्यांच्यासाठी जंगली जनावरांच्या मांसाचा साठा दिला व तो नंतर आपल्या पित्याच्या आज्ञेप्रमाणे बारा वर्षे मौनतप करण्यासाठी निघून गेला.''

(हरिवंशात दुसऱ्या ठिकाणी असा उल्लेख आहे की, काममदाने मोहित होऊन त्रिशंकूने एका गृहस्थाच्या तरुण पत्नीला पळवून नेले, म्हणून त्याच्या बापाने त्याला घरातून हाकलून लावले अशा वेळी वसिष्ठाने मध्यस्थी करून त्रिशंकूची शिक्षा रद्द करवली नाही. वरील मजकूर या कथेला उद्देशून आहे.)

वसिष्ठ व विश्वामित्र परस्परविरोधी टोकाला उभे राहून भांडले, झगडले, हे सिद्ध करणारी दुसरी कथा त्रिशंकूचा मुलगा हरिश्चंद्र याची आहे. या कथेची हकिगत पुढीलप्रमाणे आहे –

''एकदा राजा शिकारीस गेला असता त्याला एका स्त्रीच्या रडण्याचे करुण आवाज ऐकू आले. पूर्वी कोणीही त्याच्यावर इतके कडक वर्चस्व स्थापन केलेले नव्हते तितके जहाल वर्चस्व तपसामर्थ्यात अद्वितीय, निष्ठावंत असलेल्या विश्वामित्र ऋषीने त्या विद्याशास्त्रांवर बसविलेले होते; म्हणून ती विद्याशास्त्रे त्याच्या सामर्थ्याला भिऊन रडत होती. त्यांचे रडण्याचे सूर म्हणजे एखाद्या स्त्रीच्या रडण्याचे करुण आवाज वाटत होते. ते आवाज राजाने ऐकले. दुर्बलांचे रक्षण करणे हे क्षत्रियाचे कर्तव्यकर्म आहे व ते आपण केले पाहिजे असा विचार त्याच्या मनात आला. तेव्हा गणेश देवाने त्याच्या अंतःकरणात प्रवेश करून त्याला उत्तेजित केले. तेव्हा राजाने मोठ्यांदा म्हटले, 'शक्ती व तेजस्वी उत्साह यांनी समृद्ध असा मी या देशातील सर्वांचा राजा हा येथे उभा असता आपल्या वस्त्राच्या टोकात अग्नीला बांधणारा असा हा कोण आहे? माझ्या धनुष्यातून सुटणारे बाण आपल्या प्रकाशाने दशदिशा चकाकित करीत धावत सुटतील व त्या पाप्याच्या अंगातील सर्व अवयवांना छिन्नविछिन्न करून त्याला आज यमसदनाला पाठवतील.' हरिश्चंद्राचे हे उद्गार ऐकून विश्वामित्र खवळून गेला. त्याच्या क्रोधाग्नीत विद्याशास्त्रे एकदम भस्मसात झाली आणि अश्वत्थ झाडाच्या पानाप्रमाणे थरथर कापत तो विश्वामित्रापुढे येऊन हात जोडून अत्यंत लीनपणाने त्याला म्हणाला की, श्रेष्ठ ब्राह्मण व दरिद्री लोक यांना दान देणे, दुर्बलांचे रक्षण करणे आणि शत्रूविरुद्ध लढाई करणे ही जी राजाची कर्तव्ये आहेत तीच मी करीत आहे. तेव्हा विश्वामित्र राजाला म्हणाला की, मी ब्राह्मण आहे व मला दान दे. धनसंपत्ती, स्वतःचा मुलगा, पत्नी, स्वतःचे शरीर व आयुष्य, राज्य व भाग्य यांपैकी काहीही विश्वमित्राने मागितले तरी ते देण्यास हरिश्चंद्र तयार झाला. राजसूय यज्ञ करण्यासाठी प्रथम काही दान ऋषीने मागितले ते राजाने दिले व आणखी जास्त दान केले. त्यानंतर हरिश्चंद्र, त्याची बायको व मुलगा आणि त्यांचे सद्गुण ही वगळून बाकी सर्व पृथ्वीचे साम्राज्य ऋषीने मागितले व ते दान देण्याचे हरिश्चंद्राने कबूल केले. नंतर विश्वमित्राने हरिश्चंद्राला अंगावरची वस्त्रे टाकून देऊन वल्कले परिधान करावयास लावले आणि त्याची बायको शैव्या, मुलगा यांना बरोबर घेऊन त्याला राज्याबाहेर जाण्यास सांगितले. हरिश्चंद्राने राज्याबाहेर जाण्याची तयारी केली व तो जाऊ

लागला. तेव्हा विश्वामित्राने त्याला अडवून म्हटले की, राजसूय यज्ञाच्या दानाची बाकी राहिलेली प्रथम तू दे, मग पुढे जा. मी स्वतः, बायको व मुलगा याशिवाय जगाता माझ्या मालकीचे आता काही राहिलेले नाही, असे राजा विश्वामित्राला म्हणाला. त्यावर विश्वामित्र म्हणाला की ते काही असो, ती बाकी तू दिलीच पाहिजेस. ब्राह्मणांना दान देण्याचे वचन देऊन ते वचन अपूर्ण ठेवले तर त्यामुळे वचन देणाराचा सत्यानाश होतो. तू ती बाकी दिली नाहीस तर मी तुला शाप देईन. हे शब्द ऐकून त्या दुर्दैवी राजाने ती बाकी एका महिन्यात आणून देतो असे विश्वामित्राला वचन दिले व तो प्रवासाच्या मार्गाला लागला. प्रवासातील खडतर संकटांची काही जाणीव नसलेल्या बायकोला बरोबर घेऊन तो प्रवासाच्या मार्गाला लागला. तेव्हा त्याचे सर्व प्रजाजन दुःखाने व्याकुळ होऊन रडू लागले. तू आपली प्रजा व राज्य सोडून जातोस हे बरे नाही, अशाप्रकारची विनंतीवजा आर्जवे त्याची प्रजा करीत होती व ते ऐकत हरिश्चंद्र थबकत थबकत प्रवासाचा मार्ग चालू लागला. राजा प्रवासाला जाण्याचे मुद्दाम लांबणीवर टाकीत आहे, असा समज करून घेऊन विश्वामित्र क्रुद्धावस्थेत उपस्थित झाला व त्याने राणीला एक सोटा हाणला. तो सोटा हाणीत असता राजा राणीचा हात धरून तिला प्रवासाच्या मार्गाला ओढीत नेत होता. काशी हे शिवाचे पवित्र क्षेत्र आहे व त्यावर कोणाचा ताबा नाही असा मनात विचार करून हरिश्चंद्राने पत्नीला व मुलाला बरोबर घेऊन काशीचा मार्ग धरला. हरिश्चंद्र काशीला जाऊन पाहोचतो न पोहोचतो तोच निर्दय विश्वामित्र त्याच्यापुढे दत्त म्हणून उभा राहिला आणि एक महिना संपला नव्हता तरी दानाची राहिलेली बाकी तो हरिश्चंद्राकडे मागू लागला. हे नवे संकट पाहून शैव्या राणीने राजाला आपल्या रडक्या आवाजाने सुचविले की, त्याने तिला बाजारात विकावे व बाकीची भरपाई करून टाकावी. ही सूचना ऐकताच हरिश्चंद्र मूर्च्छा येऊन खाली पडला. तो शुद्धीवर आला तेव्हा हृदयद्रावक रीतीने शोक करू लागला. त्याला पुनः मूर्च्छना आली. त्याची ही दुःखद स्थिती पाहून त्याची बायकोसुद्धा मूर्च्छना येऊन खाली पडली. ते अशा बेशुद्ध अवस्थेत पडलेले असता भुकेने व्याकुळ झालेला त्यांचा मुलगा दुःखातिशयाने ओरडू लागला की, 'अहो बाबा! बाबा!! मला भाकर द्या! हे आई! आई!! मला खायला दे. भुकेने माझा जीव कासावीस झाला आहे!' याच क्षणी विश्वामित्र प्रगट झाला व त्याने हरिश्चंद्राच्या तोंडावर पाणी शिंपडून त्याला शुद्धीवर आणले व तो त्याला दानाची बाकी आताच्या आता दे असे म्हणू लागला. हरिश्चंद्राला पुनः मूर्च्छना आली. विश्वामित्राने त्याला पुनः शुद्धीवर आणले. सूर्यास्ताच्या आत तू जर वचन पुरे केले नाहीस तर मी तुला शाप देईन, अशी विश्वामित्राने हरिश्चंद्राला धमकी दिली. राणीने फार आग्रह केल्यावरून राजा तिला विकण्यास तयार झाला. तरीपण तो तिला म्हणाला, ''असे अभद्र शब्द जर माझ्या तोंडातून निघतील तर जगातील नीचातील नीच माणूस जे करणार नाही ते मी करेन.' त्यानंतर राजा शहरात गेला व स्वतःची जेवढ्या शब्दांनी निर्भर्त्सना करता येईल तेवढी करून त्याने आपल्या पत्नीला गुलाम म्हणून विकण्याचे जाहीर केले. आपल्या घरात मोलकरीण म्हणून काम करण्यासाठी एका श्रीमंत ब्राह्मणाने राणीला विकत घेतले. तिला जी योग्य किंमत येईल ती

त्या ब्राह्मणाने दिली. आपल्या आईला कोणी ओढून नेत आहे असे पाहून तिचा मुलगा तिच्याकडे धावत आला. त्याचे डोळे अश्रूंनी डबडबलेले होते. 'आई' अशी त्याने हाक मारली. मुलगा आईजवळ आला तेव्हा त्या ब्राह्मणाने मुलाला लाथ मारली. परंतु तो मुलगा 'आई, आई' असे ओरडत आईच्या कमरेला मिठी मारून तिला बिलगून तसाच राहिला. तो आपल्या आईला जाऊ देईना, तेव्हा राणी म्हणाली, 'धनी महाराज! माझ्यावर दया करा आणि या मुलालासुद्धा तुम्ही विकत घ्या. कारण हा मुलगा मजजवळ नसला तर तुमच्या घरातील कामधंदा व्यवस्थितपणे माझ्या हातून होणार नाही व मग मी तुमच्या घरात खायला काळ व भुईला भार अशी होईन– म्हणून गाईला जसे वासरू भेटते तसे माझे मूल तुम्ही मला भेटवा.' ब्राह्मण कबूल झाला. 'ही घे मुलाची किंमत व तो मला दे,' असे म्हणून हरिश्चंद्राच्या बायकोला व मुलाला घेऊन ब्राह्मण गेला व दिसेनासा झाला. तेव्हा विश्वामित्र तेथे पुन: प्रगट झाला व दानाची बाकी दे म्हणून त्याने हरिश्चंद्राला तगादा लावला. बायको व मुलगा विकून जी अल्प रक्कम त्याला मिळाली होती ती व्यवस्थित हरिश्चंद्राने विश्वामित्राच्या हातावर जेव्हा ठेवली तेव्हा विश्वामित्र तेथे रागाने म्हणाला, हे क्षुद्र क्षत्रिया! माझ्या श्रेष्ठ तपाला शोभेल अशी ही तुझी देणगी आहे असा जर तुझा समज असेल तर मी आतापर्यंत जे पवित्र भावनेने तपश्चरण केलेले आहे व तपोनिष्ठतेमुळे माझ्या अंगात जी देदीप्यमान शक्ती आलेली आहे, त्या शक्तीच्या प्रभावाने मी तुला आता चांगला धडा शिकविणार आहे, हे तू पाहशील! हे विश्वामित्राचे मर्मभेदक शब्द ऐकून हरिश्चंद्राने आणखी देणगीदाखल जास्त रक्कम देण्याचे वचन दिले. ते वचन स्वीकारले पण ते सूर्यास्ताच्या आत पुरे केले पाहिजे, असे हरिश्चंद्राला त्याने बजावले. हे वचन पूर्ण करावयाचे तर आता स्वत:ला विकून घेणे याशिवाय दुसरा मार्गच नाही, असा विचार करून विश्वामित्राची क्रूर मागणी पुरी करण्यासाठी हरिश्रंद्राने स्वत:ला विकून घ्यावयाचे ठरविले. हा त्याचा विचार त्याच्या मनात ठाम झाल्याबरोबर सत्यधर्म चांडाळाचे विद्रूप रूप धारण करून हरिश्चंद्रापुढे पुन: प्रगट झाला व त्याला विकत घेण्याचे त्याने हरिश्चंद्राला सांगितले. परंतु विक्रीची रक्कम ठरविण्याचा पूर्ण अधिकार आपला आहे अशी अट सत्यधर्माने हरिश्चंद्राला सांगितली. चांडाळाच्या घरी नोकर म्हणून आयुष्य घालविणे म्हणजे अधोगतीची परमावधी झाली; म्हणून असले हीन आयुष्य जगण्यापेक्षा राक्षसी छळ करणाऱ्या विश्वामित्राच्या शापाग्नीने आपण भस्मसात होणे बरे; असे हरिश्चंद्राला वाटले. तेव्हा त्याने चांडाळाला सांगितले की, तू मला विकत घेऊ नकोस. हे उद्गार हरिश्चंद्राच्या तोंडून बाहेर पडताच विश्वामित्र पुन: तेथे प्रगट झाला व चांडाळ जी रक्कम देईल ती स्वीकारून तू स्वत:ला का विकून घेत नाहीस, असे हरिश्चंद्राला त्याने रागाने विचारले. तेव्हा हरिश्चंद्र म्हणाला की, मी सूर्यवंशात जन्मलो आहे. तर मी चांडाळाच्या घरी नोकर होऊन माझा वंश नकात कसा टाकू? चांडाळ देईल ती रक्कम घे व ती रक्कम मला देऊन आपले वचन पुरे कर, नाहीतर मी शाप देऊन तुझा सत्यानाश करीन असे बोलून विश्वामित्राने हरिश्चंद्राला तंबी दिली. यावर हरिश्चंद्र काकुळतीला येऊन विश्वामित्राला म्हणाला की, चांडाळाच्या घरी राबून मी माझी हीन अवस्था करून घेण्यापेक्षा मी तुमचा दास होतो

व देणगीची सर्व रक्कम फिटेपर्यंत तुमची नोकरी करीत राहतो. तरी तुम्ही मला चांडाळाच्या घरी जाण्याचा आग्रह करू नका, ही एवढी भीक मला घाला. यावर विश्वामित्राने उत्तर दिले की, तू जर माझा गुलाम झालास तर चांडाळाकडून अलोट पैसा घेऊन मी तुला चांडाळाला विकेन. हे ऋषीचे उद्गार ऐकून चांडाळाला आनंदाची उकळी फुटली; पण हरिश्चंद्राचे सर्व उपाय हरल्यामुळे तो गलित धैर्य झाला. चांडाळाने पैसे दिले व हरिश्चंद्राला दोरीने बांधून तो आपला गुलाम म्हणून रस्त्याने मारीत पिटीत त्याला घरी घेऊन गेला.

गोंधळलेल्या व दुःखातिशयाने बेभान झालेल्या मनःस्थितीत हरिश्चंद्र चांडाळाच्या घरी आला. स्मशानातील प्रेतावरची कापडे चोरून आणण्याचे काम चांडाळाने त्याला दिले. अशा रीतीने चोरलेल्या कापडांची जी किंमत येईल तीतून दोन तृतीयांश भाग चांडाळाला, एक षष्ठांश भाग हरिश्चंद्राला व एक षष्ठांश भाग राजाला द्यावयाचे चांडाळाने ठरविले. भयानक स्मशानात अशाप्रकारचा हीन धंदा हरिश्चंद्राने एक वर्षभर केला. हे त्याचे वर्ष इतक्या दुःखात गेले की, त्याला वाटले आपण शंभर वर्षे अशा स्थितीत घालविली. थकून भागून तो जेव्हा स्मशानभूमीत झोपून जाई तेव्हा त्याला आपल्या दुःखद व कष्टप्रद आयुष्यातील अनेक प्रसंगांबद्दलची भयानक स्वप्ने पडत. ती एकदा झोपेतून जागा झाला तेव्हा त्याने आपली पत्नी स्मशानभूमीत उभी असलेली पाहिली. ती आपल्या मृत मुलाचे प्रेतसंस्कार करीत होती. मुलगा सर्पदंशाने मेलेला होता. दोघांची दृष्टादृष्ट झाली तेव्हा पतिपत्नीने एकमेकास ओळखले नाही. कारण दुर्दैवाच्या तडाख्यात सापडल्यापासून त्यांच्यावर अनेक दुःखाचे व कष्टाचे जे प्रहार झालेले होते त्यामुळे त्यांच्या एकंदर स्वरूपात आमूलाग्र बदल झालेला होता. परंतु राणी आपल्या मुलाबद्दल जेव्हा दुःखावेगात जोरजोराने ओरडून शोक करू लागली तेव्हा तिच्या आवाजावरून हरिश्चंद्राने ओळखले की तो आवाज आपल्या पत्नीचा आहे. दुःखावेगाने त्याला मूर्च्छना आली व तो खाली पडला मूर्च्छित अवस्थेत राजा बडबड करू लागला. तेव्हा त्याचा आवाज ऐकून तिने ओळखले की, हाच आपला पती. त्याची ती विपन्नावस्था पाहून तिला मूर्च्छना आली. दोघांना जेव्हा शुद्धी आली तेव्हा ती दुःखातिशयाने जोरजोराने शोक करू लागली. मुलगा मेला म्हणून हरिश्चंद्र शोक करू लागला आणि पतीची हृदयद्रावक अवस्था पाहून राणी शोक करू लागली. त्याच्या खांद्यावर आपले मस्तक ठेवून तिने त्याला घट्ट आलिंगन दिले व नंतर ती म्हणाली, 'मी अगदी भांबावून गेली आहे. मी हे काय पहात आहे? स्वप्न की वस्तुस्थिती? जर वस्तस्थिती मी पहात असेन तर मला असेच म्हणावे लागते की, दुनिया खऱ्याची नाही; कारण सत्याने चालणाऱ्याला जगात काही किंमत रहात नाही. मुलाची तयार केलेली चिता जळत असलेली पाहून हरिश्चंदाच्या अंतःकरणाचा भडका झाला व आपला धनी जो चांडाळ त्याची परवानगी न घेता आपण जीव द्यावा की काय असा त्याच्या डोक्यात विचार चालू झाला. धन्याची संमती न घेता आपण जीव दिला तर जे काही भलेबुरे परिणाम भोगावयाचे असतील ते भोगावेत असे त्याला वाटू लागले. या बाबतीत तो आपल्या मनाची व पत्नीची अशी समजूत घालू लागला की, 'मी जर सद्भावनेने दानधर्म केला असेल, यज्ञयाग केले असतील व माझे

धर्मगुरू व पुरोहित यांचा योग्य आदरसत्कार करून त्यांना मी जर संतुष्ट केले असेल तर माझा, पत्नीचा व मुलाचा परलोकात संयोग होवो!' आपल्या पतीप्रमाणे आपणही जीव द्यावा असे राणीने ठरविले. हरिश्चंद्राने आपल्या मृत मुलाला पेटलेल्या चितेवर उचलून ठेवले व तो प्रभू हरी नारायण कृष्ण याची मनात प्रार्थना करू लागला. तेव्हा आदिदेवता, सर्व देव, सत्यधर्म व विश्वामित्र हे त्या ठिकाणी प्रगट झाले. आत्महत्या करू नकोस, अशी सत्यधर्माने हरिश्चंद्राला विनंती केली. तू, तुझी पत्नी व मुलगा यांनी आपल्या सत्कर्मांनी स्वर्ग जिंकला आहे, असे इंद्राने हरिश्चंद्राला सांगितले. हरिश्चंद्र, राणी व त्यांचा मुलगा यांच्यावर देवांनी अमृत, अमरत्व आणि फुले यांचा आकाशातून वर्षाव केला. मग राजपुत्राला जिवंत केले व त्याला तारुण्याचा बहर दिला. हरिश्चंद्राला स्वर्गीय कपड्याचा पोषाक केला. त्याने व राणीने राजपुत्राला आलिंगन दिले. देव हरिश्चंद्राला स्वर्गात नेऊ लागले तेव्हा तो त्यांना म्हणाला की, माझा धनी जो चांडाळ त्याची संमती घेतल्याशिवाय व त्याची नुकसानभरपाई केल्याशिवाय मला स्वर्गाला जाता येत नाही. तेव्हा धर्म म्हणाला की, मीच दैवी शक्तीच्या चांडाळाचे रूप धारण केले होते. हरिश्चंद्र म्हणाला की, माझी प्रजा माझ्या पुण्यमय कर्मांची सहभागी आहे म्हणून तिला निदान एक दिवस तरी माझ्याबरोबर स्वर्गात ठेवून घेतल्याशिवाय मला स्वर्गात प्रवेश करता येत नाही. इंद्राने ही विनंती मान्य केली. विश्वामित्राने राजाचा पुत्र रोहिताश्व याला हरिश्चंद्राच्या मागून गादीवर बसवावे असा विधी केला व त्यानंतर हरिश्चंद्र, त्याचे मित्र, अनुयायी, प्रजा वगैरे सर्व मिळून स्वर्गाचा मार्ग आक्रमू लागले. हरिश्चंद्राचा कुलपुरोहित वसिष हा गंगा नदीच्या पाण्यात बारा वर्षे राहून तपश्चर्या करीत होता. ती तपश्चर्या संपली तेव्हा विश्वामित्राने हरिश्चंद्राला क्षुद्र भावनेने अवमानित स्थितीत वागवून व हाल हाल करून त्याला कसे दे माय धरणी ठाय करून टाकले याचा तपशीलवार वृत्तांत वसिष्ठाच्या कानावर गेला. तेव्हा तो मनस्वी रागावला. तो म्हणाला की, देव व ब्राह्मण यांना पूज्य मानणारा, धर्मनिष्ठ व सात्त्विक वर्तन करणारा व सर्वोत्कृष्ट असा राजा हरिश्चंद्र, त्याला हीनपणाने विश्वामित्राने वागविलेले ऐकून माझा राग इतका अनावर झाला की, विश्वामित्राने माझे शंभर मुलगे मारल्याचा वृतांत माझ्या कानी पडला तेव्हाही माझा राग इतका अनावर झालेला नव्हता असे उद्गार काढून वसिष्ठ म्हणाला, हे दुष्ट माणसा! ब्राह्मणद्वेष्ट्या!! हा घे माझा शाप तुला! बुद्धिमान लोकांच्या संगतीतून तुझी हकालपट्टी होईल. तुझी सारासार विचारशक्ती नष्ट होईल आणि तू बगळा होशील.' त्यानंतर विश्वामित्राने वसिष्ठाला उलट शाप दिला व त्याला अरी पक्षी केले. अरीची उंची दोन हजार योजने म्हणजे अठरा हजार मैल होती. तुंबळ युद्ध जुंपले. प्रथम दोघांनी पंखांनी एकमेकांवर प्रहार केला. नंतर बकाने आपल्या प्रतिस्पर्ध्यावर एकसारखा पंखांचा मारा केला. अरीने आपल्या पायाच्या नखांनी बकाला खूप मारले. त्यांच्या प्रचंड युद्धामुळे व पंखांच्या उघडझापीमुळे जो वारा उत्पन्न झाला त्यामुळे पर्वत कोसळून पडले, पृथ्वी थरथर कापू लागली. महासागराचे पाणी समुद्र सोडून बाहेर उसळून आले आणि खुद्द पृथ्वीचा पाया डळमळीत झाल्यामुळे ती खाली पाताळाकडे सरळ बुडत चालली. दोघांच्या लढाईमुळे सर्व जगात जी उलथापालथ

झाली तीमुळे पुष्कळ प्राणी नाश पावले. हा भयंकर संहार पाहून सर्व देवांना बरोबर घेऊन ब्रह्मदेव लढाईच्या ठिकाणी आला व त्याने बक व अरी यांना लढण्याचे एकदम बंद करा अशी आज्ञा केली. परंतु ते दोघे लढण्यात इतके गुंग झालेले होते की त्यांना ब्रह्मदेवाची आज्ञा मान्य करण्याचे भानही राहिलेले नव्हते. परंतु ब्रह्मदेवाने दोघांनाही पूर्वीचे स्वरूप प्राप्त करून दिले व त्यानंतर ते लढण्याचे थांबले. परस्परात समझोता करून घ्या व दोघेही मित्रत्वाने वागा, असा सल्ला ब्रह्मदेवाने दोघांना दिला.

वसिष्ठ व विश्वामित्र हे परस्परांचे वैरी होते हे दाखविणारी आणखी दुसरी कथा अयोध्येचा राजा अंबरीष याची आहे. ती खाली देत आहे.

"अंबरीष यज्ञ करण्यात चूर झाला असता इंद्राने यज्ञाचा पशू पळवून नेला. यावर पुरोहित म्हणाला की, अशुभ शकुन जो झालेला आहे, तो राजाच्या वाईट राज्यकारभारामुळे होय. नरबली दिल्याशिवाय हा अशुभ शकुन पार धुतला जाणार नाही. असे केले नाही तर यापेक्षा फार मोठे प्रायश्चित्त घ्यावे लागेल. नरबली मिळविण्यासाठी महर्षी अंबरीष याने फार प्रयत्न केला, पण तो त्याला मिळाला नाही. फिरत फिरत शेवटी तो महर्षी ऋचिक याला भेटला व तुमच्या अनेक पुत्रांपैकी एक पुत्र मला नरबली म्हणून एक लक्ष गाई घेऊन विकत द्या असे तो ब्रह्मर्षीला म्हणाला. ऋचिकाने उत्तर दिले की, मी पहिला मुलगा विकणार नाही व त्याची पत्नी म्हणाली मी सर्वात लहान मुलग्याला विकणार नाही, कारण सर्वसाधारणपणे सर्वात लहान मुलगा मातेचा आवडता मुलगा असतो. हे संभाषण ऐकून दुसऱ्या नंबरचा मुलगा शुनःशेप म्हणाला की, ही पाळी माझ्यावर येते असे मी समजतो व हे खरे मानले तर माझी अशी इच्छा आहे की, राजाने मला विकत घ्यावे. राजाने एक लक्ष गाई, दहा कोटी सोन्याची नाणी व रत्नांच्या राशी देऊन शुनःशेपाला नेले. अंबरीष व शुनःशेप हे पुष्कर या गावामधून चालले असता शुनःशेपाने आपला मामा विश्वामित्र याला पाहिले. विश्मामित्र तेथे इतर ऋषींबरोबर तपश्चर्या करण्यात गुंतलेला होता, असे शुनःशेपाला दिसले. शुनःशेपाने विश्वामित्राच्या बाहूत आपले अंग टाकून दिले व स्वतःची करुणा भाकली. विश्वामित्राने शुनःशेपाचे सांत्वन केले. त्यानंतर शुनःशेपाच्या ऐवजी तुम्ही कोणी एकजण बळी म्हणून जा, असे त्याने स्वतःच्या मुलांना परोपरीने सांगितले. यावर ब्रह्मर्षीचा मुलगा मधुश्यंद व इतर मुलगे यांनी या गोष्टीला स्पष्ट नकार दिला. ते उद्धटपणे व तिरस्कारपूर्वक शब्दात वडिलांना म्हणाले की, 'दुसऱ्यांच्या मुलाचे प्राण वाचविण्याची धडपड तुम्ही करता, पण स्वतःच्या मुलांचे प्राण तुम्ही देता, हे कसे काय? तुमचे हे कृत्य चुकीचे आहे. असे आमचे स्पष्ट मत आहे. तुमचे हे कृत्य म्हणजे स्वतःचे मांस स्वतः खाण्यासारखे आहे."
आपल्या मुलांनी आपल्या आज्ञेचा अव्हेर केलेला पाहून विश्वामित्राला अतिशय राग आला आणि वसिष्ठांच्या मुलांप्रमाणे तुम्ही सर्वजण अत्यंत नीच वर्गात जन्म घ्याल व एक हजार वर्षे कुत्र्यांचे मांस खाल, असा त्याने मुलांना शाप दिला. नंतर तो शुनःशेपाला म्हणाला, 'तुझ्या गळ्यात तांबड्या फुलांची माळ घालून तुझ्या अंगाला निरनिराळी माखणे चोपडण्यात येतील आणि तुला दोरांनी विष्णूच्या यज्ञयूपाला बांधण्यात येईल तेव्हा तू अंबरीषाच्या

यज्ञात अग्नीला उद्देशून या दोन पवित्र गाथा गायिल्यानंतर तुझ्या सर्व कामना सफल होतील.' दोन गाथा विश्वामित्राकडून मिळाल्याबरोबर शुनःशेप अंबरीषाला म्हणाला की, आपण इष्ट स्थळी जाण्याच्या मार्गाला ताबडतोब लागू या. त्याचप्रमाणे ते मार्गाला लागले. तांबडे वस्त्र त्याच्या अंगावर घातल्यानंतर शुनःशेपाला यज्ञयूपाजवळच्या मेखेला बांधले. तेव्हा इंद्र व त्याचा धाकटा भाऊ विष्णू यांना उद्देशून शुनःशेपाने ते उत्कृष्ट श्लोक म्हटले. गुप्तविद्येने अलंकृत असे ते श्लोक ऐकून सहस्र डोळ्यांच्या इंद्राला आनंद झाला व इंद्राने शुनःशेपाला दीर्घायुषी केले.''

वसिष्ठ व विश्वामित्र हे प्रत्येक बाबतीत परस्परांचे विरोधी होते हे दाखविणारी शेवटची कथा राजा कालमाषपद याच्या संबंधीची आहे. ती कथा महाभारताच्या आदिपर्वात सांगितलेली आहे.

''कालमाषपद हा इक्ष्वाकू वंशाचा राजा होता. त्याने आपणाला राजपुरोहित म्हणून नेमावे अशी विश्वामित्राची इच्छा होती. परंतु या जागेसाठी राजाने वसिष्ठाला पसंत केले. परंतु एकदा असे झाले की, राजा शिकारीला गेला असता पुष्कळ  जनावरांची शिकार केल्यानंतर तो थकला व त्याला भूक-तहानही लागली. रस्त्याने चालत असता त्याला वसिष्ठाच्या शंभर मुलांतील थोरला मुलगा शक्ती हा भेटला, तेव्हा राजाने त्याला रस्त्यातून बाजूला जाण्यास आज्ञा केली. त्या पुरोहिताने नम्रतेने उत्तर  दिले, हे राजा! हा रस्ता माझा आहे. या रस्त्यावर माझी वहिवाट अत्यंत जुन्या काळापासून आहे, सर्व बाबतीत राजाने ब्राह्मणापुढे नमते घेतले पाहिजे. राजा व मुनी यातून कोणी नमते घेईना व रस्ता सोडून बाजूला होईना. त्यामुळे त्यांची तेढ फार तीव्र झाली. राजाने मुनीला चाबूक मारला. संत्रस्त ऋषी त्रास देणाऱ्याला शाप देतात ही जुनीपुराणी वहिवाट आहे. तिला अनुसरून 'तू मनुष्यभक्षक होशील', असा मुनीने राजाला शाप दिला. त्यानंतर असे झाले की, कालमाषपद राजाचा पुरोहित होण्याच्या बाबतीमुळे वसिष्ठ व विश्वामित्र यांच्यात वैर उत्पन्न झालेले होते. राजा शिकारीला गेला तेव्हा विश्वामित्र त्याच्या पाठोपाठ गेला होता. राजा शक्तीबरोबर वाद करीत असता विश्वामित्र तेथे आला. आपला प्रतिस्पर्धी वसिष्ठ याच्या मुलाशी राजाचा वाद चाललेला पाहून विश्वामित्राने स्वतःला अदृश्य करून घेतले व तो पुढे निघून जाऊ लागला. राजा शक्तीची दया याचीत आहे, असे पाून विश्वामित्राने आपले रूप प्रगट केले व नरमांसभक्षक राक्षसाला राजाच्या अंगात प्रवेश करावयाला लावून शक्तीची जुळते घेता येऊ नये अशी त्याच्या मनाची स्थिती उत्पन्न केली. ब्रह्मर्षीचा शाप व विश्वामित्राची आज्ञा अशा दुहेरी गोष्टीमुळे राक्षसाने विश्वामित्राची आज्ञा पाळली. आपला हेतू साध्य होत आहे असे वाटल्यावरून व बाकीच्या गोष्टी आपोआप येथे घडत जातील असे समजून विश्वामित्राने देशत्याग केला.  एकदा राजाला भुकेने व्याकुळ झालेला ब्राह्मण भेटला होता. पण त्याला खावयाला द्यायला जवळ काही नसल्यामुळे राजाने आपल्या स्वयंपाक्याच्या हस्ते माणसाचे मांस ब्राह्मणाकडे पाठवून दिले होते. तेव्हा तो ब्राह्मण क्रुद्ध झाला व 'तू मनुष्याचे मांस भक्षण करणारा हो' असा त्याने राजाला शाप दिला होता. तोच शाप शक्तीने राजाला

दिला. दोन्ही शापांची शक्ती एकत्र झाली व ते शाप तत्काळ सफल झाले. राजा मनुष्यमांस भक्षक झाला व त्याच्यापुढे शक्ती उभा असल्यामुळे राजाचा तोच पहिला बळी झाला. विश्वामित्राच्या प्रोत्साहनामुळे वसिष्ठाचे सर्व इतर मुलगे राजाचे बळी झाले. शक्ती मरण पावलेला पाहून विश्वामित्राने वसिष्ठाच्या मुलांच्या विरुद्ध राक्षसाला चिडवून दिले. त्यामुळे सिंह जंगलातील पशूंना जसा चावून खातो, त्याप्रमाणे क्रोधाविष्ट राक्षसाने शक्तीपेक्षा जे मुलगे लहान होते त्यांना गिळंकृत केले. विश्वामित्राने आपले सर्व मुलगे ठार केले हे वर्तमान ऐकले तेव्हा वसिष्ठाला भयंकर दुःख झाले. परंतु महापर्वत जसा पृथ्वीला धारण करतो त्याप्रमाणे वसिष्ठाने आपले दुःख अंतःकरणात धारण केले. आपले नुकसान किती झाले आहे, याबद्दल त्याने खूप विचार केला. परंतु आपण कौशिकाचा सत्यानाश करावा असा विचार त्याच्या मनाला शिवला नाही. दुःखाने व्याकुळ झालेल्या या पवित्र साधूने मेरुपर्वताच्या शिखरावरून खाली उडी टाकली. परंतु कापसाच्या ढिगावर पडावे तसा तो पर्वताच्या तळाजवळील दगडांवर पडला. पर्ततावरून उडी मारली तरी आपण वाचलो हे पाहून त्याने भयंकर पेटलेल्या वणव्यात प्रवेश केला. अग्नीच्या ज्वाला प्रदीप्त होऊन चोहोकडे पसरत, होत्या. तरी त्यांनी त्याच्या शरीराला काहीच इजा केली नाही. उलटअंशी त्या त्याच्या शरीराला अगदी थंड वाटल्या. त्यानंतर त्याने गळ्यात मोठा दगड बांधून समुद्रात उडी मारली; परंतु समुद्राच्या लाटांनी त्याला वरच्यावर झेलून कोरड्या ज मिनीवर नेऊन ठेवले. यानंतर तो आश्रमाला, आपल्या घरी गेला. परंतु घर एकाकी व सुने पाहून पुनः दुखाचा उमाळा आला व तो घराबाहेर पडला आणि नुकत्याच पडलेल्या पावसामुळे विपाशा नदीला तुडुंब पूर आलेला त्याला दिसला. पुरामुळे नदीतीरावरील पुष्कळ झाडे उन्मळून पडून पुरात वाहत चाललेली पाहून त्या पुरात उडी टाकून प्राण द्यावा असा त्याने संकल्प केला. त्याप्रमाणे त्याने स्वतःला दोऱ्यांनी घट्ट बांधून घेतले व मग पुरात उडी मारली. परंतु त्याच्या शरीराभोवती असलेल्या दोऱ्या पाहून नदीने त्या सोडल्या व त्याला कोरड्या जमिनीवर नेऊन ठेवले. म्हणून यानदीला त्या साधूने विपाशा हे नाव दिले व ते नाव तेव्हापासून रूढ झाले. त्यानंतर त्याने भयंकर शतद्रू नदी पाहिली. तीत सुसरी इत्यादी भयंकर प्राणी होते. प्राण देण्याच्या उद्देशाने त्याने नदीत उडी मारली, पण त्या ब्राह्मणाचा अग्नीप्रमाणे तेजःपुंज देह पाहून ती नदी तो आपल्या पात्रात पडू नये म्हणून शंभर दिशांना धावली. यावरूनच या नदीला शंभर दिशांना धावणारी (शतंद्रू–सतलज) हे नाव मिळाले. प्राण देण्याचा त्याचा हा आणखी एक डाव फसला. आत्महत्या करण्याचे काही जुळत नाही, हे पाहून तो आपल्या आश्रमाला परतला.''

परस्परांना विरोध करण्यासाठी वसिष्ठा व विश्वामित्र हे विरुद्ध बाजूला उभे राहिले, असे दर्शविणारी ही विशिष्ट उदाहरणे आहेत. पण त्यांच्यात अशाप्रकारचा वेळोवेळी जो झगडा झाला त्यापेक्षा आणखी काही विशेष आहे. त्या दोघांत सर्वसाधारणपणे शत्रुत्व होते. त्यांच्यातील सर्वसाधारण शत्रुत्व हे इतके मानवी स्वरूपाचे होते की, वसिष्ठाला ठार मारावेअशी विश्वामित्राला इच्छा झालेली होती. ही गोष्ट महाभारताच्या शल्यपर्वावरून

दिसून येईल. महाभारताचा कर्ता खालीलप्रमाणे म्हणतो, (Quoted by Muir, Vol. I. pp. 420-422) -

विश्वामित्र व ब्राह्मण ऋषी वसिष्ठ यांच्यात तपाचरणाच्या श्रेष्ठत्वाबद्दल स्पर्धा उत्पन्न झाली व त्यानंतर त्यांच्यात मोठे वैर उत्पन्न झाले. स्वानुतीर्थ येथे वसिष्ठाचा फार विस्तीर्ण आश्रम होता. आपापल्या तपाचरणाचे श्रेष्ठत्व सिद्ध करण्याचे ते दोघेजण दररोज उघड रीतीने प्रयत्न करीत; परंतु वसिष्ठाचे तपोबल पाहून विश्वामित्र फार निरुत्साही झाला. तो या बाबतीत खोल विचार करू लागला. आपल्या तपश्चरणात कधीही लवमात्र खंड न पडू देणाऱ्या या साधूचे विचारतरंग पुढीलप्रमाणे होते – 'परमेश्वराची प्रार्थना करण्यामध्ये अत्यंत उत्कृष्ट व तपोनिष्ठ वसिष्ठ याला ही सरस्वती नदी आपल्या प्रवाहात वाहात वाहात माझ्याकडे आणील. तो अत्यंत उत्कृष्ट ब्राह्मण तेथे येऊन पोहोचला म्हणजे मी त्याला अगदी खात्रीने ठार करीन.' हा विचार त्याने मनाने नक्की केला. तेव्हा त्याचे डोळे रागाने तांबडे झाले होते. नद्यांतील जी श्रेष्ठ नदी तिला त्याने मनात आणले व मनातच बोलावले. विश्वामित्र हा फार बलवान व हेकट ऋषी होता हे नदीला माहीत होते. आपल्यावर त्याची दृष्टी का वळली हे तिला समजेना. ती फार काळजीत पडली. ज्या स्त्रीचा नवरा ठार केलेला आहे ती स्त्री ज्याप्रमाणे विनम्र अवस्थेत उभी राहते, त्याप्रमाणे सरस्वती नदी दोन्ही हात जोडून थरथर कापत व घशाला कोरड पडलेली आहे अशा अवस्थेत मुनिश्रेष्ठापुढे येऊन उभी राहिली. ती फार भ्याली होती. ती त्याला म्हणाली, 'मी काय करावे?' तो क्रुद्ध मुनी उत्तरला, "मी वसिष्ठाला ठार मारणार आहे. तर तू त्याला तेथे लौकर घेऊन ये." वाऱ्याने गदगदा हलविलेली लता जशी रडत रडत थरथर कापते त्याप्रमाणे ती कमलनयना देवता दोन्ही हात जोडून मोठ्या भीतीने थरथर कापू लागली. तिची स्थिती विश्वामित्राच्या लक्षात जरी आली तरी त्याने आपली आज्ञा तिला पुनः सांगितली. विश्वामित्राची इच्छा किती पापमय आहे व वसिष्ठाचे बळ अद्वितीय आहे, हे सरस्वतीला माहीत होते. तरी ती थरथर कापत वसिष्ठाकडे गेली. दोघेही ऋषी काय शाप देतील याची तिला धास्ती वाटू लागली. विश्वामित्राने जे तिला सांगितले ते तिने वसिष्ठाला निवेदन केले. भीतीने खंगून गेलेली, निःस्त्राण झालेली व पुढे काय होईल याची जबरदस्त धास्ती लागलेली अशा सरस्वतीला पाहून वसिष्ठ म्हणाला, हे नदीश्रेष्ठी, तू घाबरू नकोस. मागेपुढे न पाहता तू मला विश्वामित्राकडे वाहून ने. तू तसे केले नाहीस तर तो तुला शाप देईल. त्या दयार्द्र मुनीचे हे शब्द ऐकून आपण ही गोष्ट अगदी उत्तम रीतीने कशी करावी याचा ती विचार करू लागली. ती मनात म्हणाली, वसिष्ठाने मला नेहमी दयाळूपणाने वागविलेले आहे. मी त्याचे सुखसमाधान साधले पाहिजे. एके दिवशी कौशिक ऋषी नदीच्या तीरावर प्रार्थना करीत व अर्घ्य देत होता. त्याला पाहिले तेव्हा नदीला वाटले की, हीच संधी आपला कार्यभाग उरकण्यास बरी आहे. तिने आपल्याप्रवाहाचा लोंढा किनाऱ्यावर जोरात सोडला. मित्र व वरुण यांचा मुलगा जो वसिष्ठ तो नदीच्या पाण्यात लोटला गेला. पाण्यात वाहात चालला असता तो नदीची स्तुती करू लागला. हे सरस्वती, तू ब्रह्मतळ्यांपासून उत्पन्न झालीस, तू तुझ्या उत्कृष्ट प्रवाहानी सर्व

जगात वावरतेस. तू आकाशात राहून ढगांमध्ये पाणी भरतेस, तूच एक सर्व पाणी आहेस. तुझ्याजवळ बसून आम्ही विद्याभ्यास करतो. पोषण, क्रांती, पूर्णता, बुद्धी व प्रकाश ही सर्व तू आहेत. तू वाया आहेस. तू स्वह आहेस. हे जग तुझ्या अधीन आहे. याप्रमाणे चतुर्विध रूपांनी तू सर्व प्राणिमात्रांमध्ये राहतेस. सरस्वती नदी वसिष्ठाला आपल्याकडे वाहून आणीत आहे हे पाहिल्यानंतर त्याचा अंत करण्यासाठी विश्वामित्र शस्त्र शोधू लागला. विश्वामित्र रागाने लाल झाला होता हे सरस्वतीने ओळखले. आपल्यासमोर ब्राह्मणहत्या होणार हे बरे नव्हे, असा विचार करून तिने वसिष्ठाला आपल्या प्रवाहाने झटकन् वाहून पूर्व दिशेला नेले, ते अशा रीतीने की विश्वामित्राला वसिष्ठाच्या शरीराला हात लावता आला नाही. येणेप्रमाणे नदीने दोन्ही ऋषींच्या आज्ञा पाळल्या. अशा रीतीने वसिष्ठाला दूर वाहून नेलेले पाहून विश्वामित्राला मनस्वी राग आला व तो फर चिडून नदीला म्हणाला, हे नदीश्रेष्ठी! ज्या अर्थी तू मला फसविलेस व दूर पळून गेलीस त्या अर्थी राक्षसांच्या राजाला आवडणाऱ्या अशा रक्ताच्या लाटा तुझ्या प्रवाहात उत्पन्न होवोत व तू अशा प्रवाहाने वहात जा, असा शाप सरस्वतीला मिळाला. म्हणून ती एक वर्षभर रक्तमिश्रित प्रवाहाने वहात होती. ज्या ठिकाणाहून वसिष्ठाला वहावून नेले तेथे राक्षस यात्रा करू लागले. ते नदीचे रक्तमिश्रित पाणी यथेच्छ पिऊन आनंदाने बेहोश होऊन नाचू लागले व हसू लागले. जणू काही त्यांना स्वर्ग मिळाला होता. काही दिवसांनी त्या ठिकाणी काही ऋषी झाले. रक्तमिश्रित पाणी पाहून त्यांना जबरदस्त धक्का बसला. राक्षस ते पाणी मनमुग्धपणे पीत असल्यामुळे नदीचे पात्र कोरडे पडू लागले. राक्षसांच्या तावडीतून नदीची सुटका करण्याचे ऋषींनी प्रयत्न केले.''

वसिष्ठ व विश्वामित्र यांच्यात जे वैर होते ते दोन्ही पुरोहितांमध्ये असलेले वैर नव्हते. ब्राह्मण पुरोहित व क्षत्रिय पुरोहित यांच्यामध्ये असलेले ते वैर होते. विश्वामित्र क्षत्रिय होता. तो राजघराण्यात जन्मलेला क्षत्रिय होता. 'कौशिकाचा मुलगा' असा ऋग्वेदात (३-३३-११) विश्वामित्राचा उल्लेख केलेला आहे. विश्वामित्राबद्दल जास्त तपशीलवार माहिती विष्णुपुराणात दिलेली आहे. (Quoted in Muir, Vol. I. p. 349) पुरुरव राजाच्या वंशात जन्मलेली गधी याचा मुलगा विश्वामित्र अशी ती माहिती आहे. हरिवंशात या माहितीचा आधार मिळतो. (Quoted in Muir, Vol. I. p. 353) पिढ्यान् पिढ्यांनी जो अग्नी चेतविलेला होता त्याला विश्वामित्राच्या कुटुंबाने जपून ठेवले होते अशी माहिती आपणाला ऋग्वेदात (३-१-२१) मिळते. (Quoted in Muir, Vol. I, p. 316) ऋग्वेदावरून आपणाला अशीही माहिती मिळते की, त्या वेदातील बऱ्याच ऋचा विश्वामित्राने रचलेल्या होत्या व त्याला राजर्षिपद अर्पण करण्यात आलेले होते. सर्व वेदांतील ऋचांमध्ये अत्यंत पवित्र मानलेली अशी जी ऋचा आहे ती ऋग्वेदातील गायत्री मंत्राची ऋचा (३-६२-१०) विश्वामित्राने रचलेली होती. विश्वामित्रासंबंधी आपणाला दुसरी जी महत्त्वाची गोष्ट माहीत आहे ती ही की, तो क्षत्रिय होता व त्याचे कुटुंब भारताच्या वंशाचे होते. (Quoted in Muir, Vol. I. p. 354)

ब्राह्मण व क्षत्रिय लोकांमध्ये या काळाच्या सुमारास खालील गोष्टीसंबंधी झगडा चाललेला होता असे दिसते -

(१) दान स्वीकारण्याचा हक्क. दान म्हणजे ज्याला दान द्यावयाचे त्याने काही काम? न केले तरी त्याला दात्याने पैसे अगर इतर वस्तू देणे, ब्राह्मणाशिवाय इतर कोणालाही दान स्वीकारण्याचा हक्क नाही असे ब्राह्मणांचे म्हणणे होते. दान स्वीकारणे हा फक्त ब्राह्मणांचाच हक्क आहे असे ते म्हणत. (म्हणूनच मनूने असे म्हटलेले आहे की, "शूद्राला दान करण्याची राज्याला इच्छा झाली तर त्याने शूद्राला काम करावयास लावावे.")

(२) वेद शिकविण्याचा अधिकार फक्त वेदाभ्यास करण्याचा हक्क क्षत्रियाला आहे, असे ब्राह्मण म्हणत. वेद शिकविण्याचा अधिकार त्याला नाही. तो अधिकार फक्त ब्राह्मणाला आहे.

(३) यज्ञात पुरोहितपणा करणे. यज्ञयाग करण्याचा अधिकार क्षत्रियाला आहे, परंतु यज्ञात पुरोहितपणा करण्याचा अधिकार क्षत्रियाला नाही असे ब्राह्मणांचे म्हणणे होते. पुरोहितपणा करणे हा फक्त ब्राह्मणांचा अधिकार आहे असे ते म्हणत.

येथे विशेष लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट ही की, वर सांगितलेल्या मुद्द्यांसंबंधी आणि विशेषतः तिसऱ्या मुद्द्यासंबंधी झगडे लढविण्यास व परस्परांचे विरोधी म्हणून उभे राहण्यास ब्राह्मण व क्षत्रिय यांनी मागेपुढे पाहिले नाही. रामायणात त्रिशंकूची जी कथा दिलेली आहे ती या म्हणण्यास पाठिंबा देते. ती कथा खाली दिली आहे. (Quoted by Muir, Vol. I. pp. 401-404)-

"इक्ष्वाकूंचा वंशज राजा त्रिशंकू याने आपण जेणेकरून सदेह स्वर्गाला जाऊ असा यज्ञ करण्याचे योजिले. या बाबतीत त्याने वसिष्ठाला आमंत्रण देऊन बोलाविले व त्याला आपला हेतू त्याने सांगितला. तेव्हा वसिष्ठ म्हणाला की, हे अशक्य आहे. त्रिशंकू दक्षिण दिशेला प्रवास करीत गेला तेव्हा वसिष्ठाचे शंभर मुलगे घोर तपश्चर्या करण्यात दंग झालेले आढळले. तेव्हा त्याच्या वडिलाने करण्याचे जे नाकारले होते ते करण्यास त्रिशंकूने त्या मुलांना विनविले. त्याने त्या मुलांना अत्यंत पूज्य भावनेने व नम्रतेने विनंती केली व तो त्यांना म्हणाला, "संकटकाळात योग्य सल्लामसलत देणारे म्हणून इक्ष्वाकू आपल्या कुलपुरोहितांना मानत आलेले आहेत. मी स्वतः तुमच्या वडिलांच्या खालोखाल तुम्हाला मान देतो. तुम्ही आमचे कुलदैवत होत, असे समजतो." इतकया नम्रतेने जरी भाषण केले तरी ते मुलगे उद्धटपणाने त्याच्या बडेजावीबद्दल टोचून बोलले. 'मूर्खा! सत्यवचनी असा जो तुझा धर्मगुरू त्याने तुला नकार दिलेला आहे. त्याची आज्ञा उल्लंघन करून तू दुसऱ्यांची याचना करीत फिरत आहेस, हे कसे काय? कुलपुरोहित म्हणजे सर्व इक्ष्वाकूंची सर्वश्रेष्ठ देवता होय, असे आतापर्यंत समजले जाते. त्या सत्यप्रिय साधूच्या आज्ञेची अवहेलना करणे शक्य नाही. देविर्षि वसिष्ठ यांनी म्हटलेले आहे की, ती गोष्ट करता येणे शक्य नाही. असे असता तुझा

यज्ञ करण्याचे कार्य आम्ही कसे स्वीकारू? राजा! तू मूर्ख दिसतोस. तू आपल्या राजधानीला परत जा. देवर्षि तिन्ही लोकांचा पुरोहितपणा करण्यास योग्य आहेत. आम्ही त्यांचा अपमान कसा करणार बरे?'

यानंतर यज्ञ करण्याबद्दलच्या आपल्या उद्देशाची सविस्तर माहिती त्रिशंकूने त्यांना सांगितली व तो त्यांना म्हणाला की, ''माझा धर्मगुरू व त्याचे मुलगे यांनी यज्ञ करण्याची माझी विनंती अमान्य केलेली आहे. म्हणून मी आता दुसरा मार्ग पाहतो.'' ही त्याची आत्मश्लाघापर वल्गना ऐकल्यानंतर त्या मुलांना फार राग आला व 'तू चांडाळ हो' असा त्याला त्यांनी शाप दिला. तो शाप ताबडतोब सफल झाल्यामुळे दुःखी त्रिशंकूच्या देहाचे स्वरूप बदलेले व त्याला गलिच्छ चांडाळाचे रूप प्राप्त झाले. त्यचवेळी विश्वामित्र दक्षिण दिशेला आपल्या तपोबळात व सद्गुणात भर टाकण्यासाठी तपश्चर्या करीत होता व गेल्या काळातील दुःखाचे शोकमय स्मरण करीत होता. चांडाळाचे रूप मिळाल्यानंतर त्रिशंकू विश्वामित्राकडे गेला. विश्वामित्राने त्याच्या परिस्थितीचे सिंहावलोकन केले व त्याच्या यज्ञात पुरोहित म्हणून काम करण्याचे त्याने त्रिशंकूला वचन दिले आणि त्याच्या पुरोहिताच्या शापामुळे त्याला जे चांडाळाचे रूप प्राप्त झालेले आहे त्याच रूपात त्याला स्वर्गात पाठविण्याबद्दल त्याला विश्वामित्राने हमी दिली. विश्वामित्र त्रिशंकूला म्हणाला. 'ज्या अर्थी तू कौशिकाच्या मुलाकडे याचना करण्यास आलास त्या अर्थी तू आता स्वर्गात गेलास असेच समज.' त्यानंतर यज्ञाची तयारी करण्यासाठी विश्वामित्राने त्रिशंकूला सांगितले. यज्ञाला उपस्थित राहण्यासाठी सर्व ऋषी व वसिष्ठांचे कुटुंब यांना आमंत्रणे पाठविण्याबद्दल विश्वामित्राने सांगितले.

विश्वामित्राचे शिष्य यज्ञाला उपस्थित राहण्याचे आमंत्रण देण्यास देशोदेशी गेले व परत आले तेव्हा त्यांनी गुरुला अशी हकिकत सांगितली की, ''तुमचा संदेश ऐकल्याबरोबर सर्व देशातील ब्राह्मण जमा होत आहेत व येथे आलेले आहेत. फक्त महोदय (वसिष्ठ) हे आलेले नाहीत. वसिष्ठाचे शंभर मुलगे रागाने संतप्त झाल्यामुळे त्यांचा आजाज बोलताना कापू लागला. ते कापऱ्या आवाजात भयंकर शब्द उच्चारू लागले. ते म्हणाले, यज्ञ करणारा माणूस चांडाळ, पुरोहितपणा करणारा माणूस क्षत्रिय. अशा यज्ञातील अर्ध्यांचा देव ऋषी कसा स्वीकार करणार? चांडाळाने यज्ञात दिलेले अन्न खाल्यानंतर आणि विश्वामित्राने त्यांचे आदरातिथ्य केल्यानंतर तेजस्वी ब्राह्मण स्वर्गात कसे जाऊ शकतील? हे क्रूर शब्द सर्व वसिश्ठ व महोदय यांनी एकत्र मिळून उच्चारले तेव्हा त्यांचे डोळे रागाने लालबुंद झालेले होते. ही हकिगत शिष्याकडून ऐकल्यानंतर विश्वामित्राला अनावर राग आला. वसिष्ठाच्या मुलांची राख होवो व ते गलिच्छ बहिष्कृत म्हणून पुनःपुनः सातशे जन्म जन्मोत, असा विश्वामित्राने त्यांना शाप दिला आणि महोदय निषाद होवो असा त्याने वसिष्ठाला शाप दिला.

हा शाप सफल झालेला पाहून विश्वामित्राने त्रिशंकूची स्तुती केली व यज्ञाला सुरुवात

करावी अशी जमलेल्या ऋषींना त्याने सूचना केली. त्या भयंकर ऋषीच्या शापाची भीती असल्यामुळे ऋषींनी यज्ञविधीला सुरुवात करण्याची संमती दिली. या यज्ञात याजक म्हणून विश्वामित्राने स्वतः काम केले आणि इतर ऋषींनी त्याच्या हाताखाली ऋत्विज म्हणून सर्व यज्ञविधी केले.''

वसिष्ठ व विश्वामित्र यांच्यामध्ये हे जे वितुष्ट चालू होते. त्यासंबंधी सुदास ह्याने महत्त्वाचा कार्यभाग केलेला होता असे दिसते. वसिष्ठ हा सुदासाचा कुलपुरोहित होता. सुदासाच्या राज्याभिषेकाचा विधी वसिष्ठाने केलेला होता. दहा राजांच्या विरुद्ध झालेल्या युद्धात सुदासाला जर मिळविण्याबद्दलचे साहाय्य केले ते वसिष्ठाने. इतके असून सुद्धा सुदासाने विश्वामित्राला त्या जागेवर ठेवले. दहा राज्यांच्या विरुद्ध झालेल्या युद्धात सुदासाला जय मिळविण्याबद्दलचे साहाय्य केले ते वसिष्ठाने. इतके असून सुद्धा सुदासाने विश्वामित्राला त्या जागेवर ठेवले. याला काही पुरावा नाही. ही गोष्ट परंपरेने रूढ झालेली आहे. तिला ऋग्वेदातील ३-५-३-९ या ऋचेचा आधार आहे असे वाटते. याला यास्काने पाठिंबा दिलेला आहे. तो निरुक्तात (२-२४) म्हणतो, ''ते नंतर गोष्ट सांगतात, ऋषी विश्वामित्र हा पिजवानाचा मुलगा सुदास याचा पुरोहित होता.'' विश्वामित्राने सुदासाचा यज्ञ केला. वसिष्ठ व विश्वामित्र यांच्यात वैर उत्पन्न होण्याला हे पहिले कारण झाले. त्या वैरात भर घालणारे व ते वैर जास्त वाढविणारे आणखी एक कृत्य सुदासाच्या हातून झाले. त्याने वसिष्ठाचा मुलगा शक्ती याला अग्नीत फेकून दिले व जिवंत जाळले. ही कथा सत्ययान ब्राह्मण या ग्रंथात सांगितलेली आहे. (ऋग्वेदाच्या ७-३२ या ऋचेचा उपोद्घात करताना सायण याने या गोष्टीचा संदर्भ दिलेला आहे. तो उपोद्घात अनुक्रमणिकेच्या आधारावर रचलेला आहे. ती अनुक्रमणिका म्यूर याने आपल्या ग्रंथात १, पान ३२८ वर उद्धृत केलेली आहे) सुदासाने शक्तीला जिवंत जाळण्याचे दुष्कृत्य का केले, याबद्दल सत्ययान ब्राह्मण या ग्रंथात काही कारण सांगितलेले नाही. कात्यायन याने ऋग्वेदाला अनुक्रमणिका लिहिलेली आहे, तिच्यावर सद्गुरुशिष्य या लेखकाने टीका लिहिलेली आहे. त्या टीकेत सदर दुष्कृत्यासंबंधी थोडासा खुलासा केलेला आढळतो. सद्गुरुशिष्य यांचे म्हणणे असे आहे की, सुदासाने यज्ञ सुरू केला तेव्हा विश्वामित्र व वसिष्ठाचा मुलगा शक्ती याचा काही गोष्टींबद्दल खडाजंगी वाद झाला. यासंबंधी सद्गुरुशिष्य याचे प्रत्यक्ष शब्द खाली दिलेले आहेत-

''वसिष्ठाचा मुलगा शक्ती याने विश्वामित्राचे सामर्थ्य व भाषण यांच्यावर ताण करून त्याला हरविले; आणि गधीचा मुलगा (विश्वामित्र) याचा असा हिरमोड झाला म्हणून तो निरुत्साही झाला.''

सुदासाने शक्तीला अग्नीत का फेकले याचे कारण वरील शब्दांनी व्यक्त केलेले आहे. शक्तीने विश्वामित्राचा जो अपमान केलेला होता व जी फजिती केलेली होती त्याबद्दल सूड उगविण्याच्या हेतूने सुदासाने शक्तीला अग्नीत फेकले होते हे उघड आहे. सुदास आणि वसिष्ठ यांच्यात जे वैर वाढत होते त्याला काही केले तरी आळा पडत नव्हता.

हे वैर फक्त सुदास व वसिष्ठ यांच्यात होते असे नव्हे. ते त्यांच्या मुलांमध्येही पसरलेले होते असे दिसते. याला तैत्तिरीय संहितेमध्ये पुरावा मिळतो, तो असा (Muir, Vol. I, p. 318)

''जेव्हा वसिष्ठाचा मुलगा ठार मारला गेला तेव्हा वसिष्ठाने अशी इच्छा केली की, ''मला संतती होवो! मी सुदासाचा पाडाव करीन असा समर्थ होवो!'' त्याने हा एकास्मन्नपंचस पाहिला, त्याने तो नेला व त्याचा यज्ञात बळी दिला. त्यानंतर त्याला संतती झाली आणि त्याने दासांचा पाडाव केला.''

या मुद्द्याला कौशितकी ब्राह्मण या ग्रंथा पाठिंबा मिळतो. तो असा (Muir, Vol. I, p. 328) –

''जेव्हा वसिष्ठाचा मुलगा ठार मारला गेला तेव्हा त्याने अशी इच्छा केली की, 'मला संतती व संपत्ती (गुरेढोरे) भरपूर मिळोत आणि सुदासाचा पाडाव करण्यास मी समर्थ होवो! त्याने यज्ञविधीचा हा प्रकार पाहिला. तो वसिष्ठ यज्ञ होय. तो केल्यानंतर त्याने सुदासाचा पाडाव केला.'' (वसिष्ठाचे वैर सुदासाबरोबर वाढत गेले की सुदासाच्या मुलांबरोबर वाढत गेले याबद्दल थोडी शंका आहे. ही शंका उत्पन्न होण्याचे कारण असे की, सत्ययान व कौशितकी ब्राह्मण हे ग्रंथ सुदासाच्याबद्दल उल्लेख करतात. याचा अर्थ असा की वसिष्ठाचे वैर सुदासांच्या म्हणजे सुधासाच्या मुलांबरोबर होते, सुदासाबरोबर नव्हते. उलटपक्षी नमूचे असे ठाम मत आहे की, या बाबतीत सुदास अपराधी होता. या बाबतीत सद्‌गुरुशिष्य सुदासांचा उल्लेख करतो, सुदासाचा नव्हे; आणि बृहदेवता हा ग्रंथा याच बाबतीत सुदासाचा उल्लेख करतो. याबाबतीत जो बिकटपणा उत्पन्न झालेला आहे तो सोडवावयाचे म्हटले तर सुदास हा शब्द जेथे जेथे अनेकवचनी वापरलेला आहे, तेथे तेथे त्याचा अर्थ सुदास–कूळ असा करावा. म्हणजे त्यात सुदास व त्याचे मुलगे या दोघांचाही समावेश होतो.)

## २

सुदास व वसिष्ठ यांच्यामधील झगडा वा राजे व ब्राह्मण यांच्यामधील झगडा एकच नाही. राजे व ब्राह्मण यांच्यामध्ये जे इतर झगडे झाले त्यांची माहिती येथे एकत्रपणे देणे इष्ट आहे. ब्राह्मणांच्या बरोबर झालेल्या झगड्यांची कहाणी निरनिराळ्या ग्रंथकारांनी सांगितलेली आहे. खालील कहाणी हरिवंशातून घेतलेली आहे. (Quoted from Muir, Vol. I, p. 302) –

''प्राचीन काळी प्रजापती पाणिमात्रांचा प्रभू हा अत्री कुळातील एक राजा होऊन गेला. तो अंग राजाप्रमाणे धर्मनिष्ठतेचा पाठीराखा होता. तो अंगाप्रमाणेच बलवान होता. त्याला प्रजापती वेन या नावाचा मुलगा होता. तो मृत्यूची मुलगी सुनीता हिच्यापासून झालेला होता. तो आपल्या कर्तव्यकर्माबद्दल फारशी काळजी वाहणारा नव्हता. काळाच्या (मृत्यूच्या) मुलीचा हा मुलगा आपल्या मातामहाच्या दुष्कीर्तीमुळे उदासीन झाला. त्याला उपभोगाची आसक्ती अनावर झाली. त्यामुळे त्याने आपली सर्व कर्तव्यकर्मे बाजूला सारून

उपभोगलोलुप असे आयुष्य घालविले. त्याने राज्याधिकार हातात आल्यानंतर अधर्मकारक रीतिरिवाज वहिवाटीला आणले. वेदादि धर्मशास्त्रांच्या आज्ञांचे उल्लंघन करून त्याने भ्रष्टाचारांना कवटाळले. त्याच्या राज्यात लोक पवित्र धर्मशास्त्रांचा अभ्यास करीनात, वशट्कार करीनात, कोणी यज्ञयागादि कर्मे न केल्यामुळे देवांना यज्ञात अर्पण केलेला सोमरस प्यायला मिळेना. त्याच्या नाशाची वेळ जवळ येत चालली होती. अधर्मी आयुष्य घालविण्याबद्दल त्या प्रजापतीचा निर्दय निर्धार झाला होता. कोणीही यज्ञ करू नये अगर अर्घ्य देऊ नये, अशी त्याने आपल्या प्रजेला सक्त ताकीद दिली होती. तो म्हणाला की, 'मी प्रजेच्या प्रार्थनेचा विषय आहे. मी यज्ञ करणारा आहे. मीच स्वतः यज्ञ आहे. म्हणून प्रजेने माझ्यासाठी यज्ञ करावेत व यज्ञातील अर्घ्य मला अर्पण करावे.' धर्मभ्रष्टाचार माजविणारा हा राजा अंगी काही लायकी नसता मोठेपणाच्या बाता मारून प्रजेशी अत्यंत गर्विष्ठपणे वागू लागला. तेव्हा मरीची ऋषीने सर्व मोठे ऋषी जमा केले व तो प्रजापतीकडे त्याचे शिष्टमंडळ घेऊन गेला. ते ऋषी त्याला म्हणाले, 'हे वेण! एक पवित्र विधी करण्यासाठी आम्ही सर्वजण पापक्षालनाचा ि वधी करणार आहोत. हा विधी पुष्कळ दिवस चालेल. तोपर्यंत तू धर्मभ्रष्ट आचार करू नकोस. तू जे आचार आचरीत आहेस ते शाश्वत सद्धर्माला अनुसरून नाहीत, तू कर्तृत्वाने अत्री कुळाचा प्रजापती आहेस, प्रजेचे संरक्षण करण्यात तू सार्थक मानावेस.' हे त्याचे भाषण ऐकून सत्य म्हणजे क ाय याबद्दल ज्ञान नसलेला तो मूर्ख वेण त्या थोर ऋषींना हसत हसत उतरला, 'कर्तव्यकर्माची रूपरेखा आखणारा माझ्याशिवाय दुसरा कोण आहे? मी कोणाची आज्ञा पाळावी? पवित्र शास्त्राचे ज्ञान, शक्ती, तपोनिष्ठा आणि सत्याचरण या बाबतीत माझी बरोबरी करणारा या जगात कोणी आहे काय? हे दिशाभूल झालेल्या आणि मूर्ख लोकांनो! सर्व प्राणिमात्र व कर्तव्यकर्मे यांची उत्पत्ती माझ्यापासून झालेली आहे हे तुम्हाला माहीत नाही काय? 'मी मनात आणले तर पृथ्वीलाजाळून भस्म करीन किंवा जलप्रलय उत्पन्न करून त्यात तिला बुडवीन अथवा स्वर्ग व पृथ्वी यांचा मिलाफ करीन, याबद्दल विश्वास ठेवावयास तुम्ही कचरू नका.'

वेणाची दिशाभूल झालेली असल्यामुळे आणि त्याच्या अंगात दंभाची धुंदी चढल्यामुळे अशा त्याला आटोक्यात आणणे शक्य नाही, हे त्या प्रबळ ऋषींनी ओळखले, तेव्हा त्यांचा राग अनावर झाला. त्यांनी सशक्त राजाला पकडले, तेव्हा तो आपली सुटका करून घेण्यास धडपडू लागला. पण ऋषींनी त्याची डावी मांडी रगडली. तेव्हा राजाच्या मांडीतून अगदी ठेंगणा व काळा माणूस उत्पन्न झाला. तो भीतीने घाबरलेला असल्यामुळे दोन्ही हात जोडून उभा राहिला. तो खूप चुळबूळ करीत आहे असे पाहून अत्री त्याला म्हणाला, 'खाली बैस.' (निषीद) तो काळा माणूस निषाद काळाचा आद्य पुरुष झाला. वेणाच्या स्वैराचरणापासून उत्पन्न झालेल्या धीवर (कोळी) लोकांचाही तो आद्यजनक झाला.

ब्राह्मणांच्या बरोबर झगडा करणारा दुसरा राजा पुरुरवस हा होय. पुरुरवस हा इलाचा मुलगा मनू वैवस्तवाचा नातू. ब्राह्मणांच्या बरोबर त्याने जो झगडा केला त्याची

सविस्तर माहिती महाभारताच्या आदिपर्वात दिलेली आहे. (Quoted by Muir, Vol. I, p. 309) –

''त्यानंतर शहाणा पुरुरवस इलापासून जन्माला आला. इला ही त्याचे आईबाप होते हे आपण ऐकलेले आहेच. तो समुद्राच्या तेरा बेटांवर राज्य करीत होता. त्याच्याभोवती जे लोक होते ते सर्व दैवी लोक होते. कारण तो स्वतः फार लौकिकवान राजा होता. परंतु त्याला आपल्या अधिकाराची धुंदी चढली तेव्हा तो ब्राह्मणांच्या बरोबर तंटे करू लागला. त्यांच्या आरडाओरडीकडे लक्ष न देता तो त्यांच्याकडून रत्ने हिरावून घेऊ लागला. सनत्कुमार ब्रह्मलोकातून त्याच्याकडे आला व त्याची कानउघाडणी करू लागला. परंतु त्याने सनत्कुमाराचा उपदेश मानला नाही. या लोभी व अधिकारमदाने विचारशून्य झालेल्या राजाला क्रोधाविष्ट ऋषींनी शाप दिला व त्यामुळे त्याचा सत्यानाश झाला.''

या मालेतील तिसरा राजा नहुष हा होय. ब्राह्मणांशी झगडा करणाऱ्या ज्या पुरुरवसाची कथा वर सांगितलेली आहे त्या पुरुरवसाचा नहुष हा नातू होय. नहुषाची व त्याने ब्राह्मणांच्या बरोबर केलेल्या झगड्याची कथा महाभारतात दोन ठिकाणी सांगितलेली आहे. एक वनपर्व व दुसरे उद्योगपर्व. खालील हकिगत उद्योगपर्वातून घेतलेली आहे. (Quoted by Muir, Vol. I, pp. 310-313) –

''वृत्र राक्षसाला ठार मारल्यानंतर इंद्राला असे वाटले की, आपण एका ब्राह्मणाचा (वृत्र याला ब्राह्मण समजण्यात येत होते) प्राण घेतला व या पापाबद्दल आपणाला शिक्षा भोगावी लागेल. मनात अशी भीती उत्पन्न झाल्यानंतर इंद्र पाण्यात लपला. देवांचा राजा अदृश्य झाल्यामुळे स्वर्गातील व इहलोकातील सर्व कामे स्थगित झाली व त्यामुळे मोठा घोटाळा उत्पन्न झाला. त्यानंतर ऋषी व देव यांनी नहुषाला विनंती केली की, त्याने त्यांचा राजा व्हावे. या पदाला आपण लायक नाही असे उत्तर देऊन नहुषाने प्रथम त्यांची विनंती अमान्य केली. परंतु त्यांचा फारच आग्रह पाहून नहुषाने शेवटी ते थोर पद स्वीकारले. देवांच्या राजपदावर स्थापन होईपर्यंत नहुषाने शुद्धाचरण करून आयुष्य घालविलेले होते. परंतु त्यानंतर तो ख्यालीखुशालीत आणि वैषयिक उपभोगात दंग झाला आणि इंद्राची पत्नी इंद्राणी ही त्याच्या दृष्टीस पडल्यानंतर 'ती आपल्याला वश व्हावी' अशीसुद्धा त्याला वासना झाली. इंद्राणीने ही हकिगत देवांचा गुरू अंगीरस बृहस्पती याला सांगून त्याला माझे संरक्षण करा अशी विनंती केली. ती त्याने मान्य केली. अंगीरस बृहस्पतीने मध्ये पडून ही केलेली लुडबूड पाहून नहुषाला फार संताप आला. परंतु देवांनी त्याला समजावून त्याचा राग शांत केला. दुसऱ्याची बायको बळकाविणे हे किती अनैतिक आहे याबद्दल त्यांनी त्याला उपदेश केला. परंतु देवांच्या या उपदेशाला व समजूत घालण्याच्या प्रकारांना नहुषाने काही महत्त्व दिले नाही. तो त्यांना म्हणाला की, अशाप्रकारची व्यभिचारी वासना धरण्याने तो इंद्रापेक्षा कमी दर्जाचा ठरत नाही. सुप्रसिद्ध अहल्या ही ऋषीची पत्नी होती. इंद्राने तिला तिचा पती जिवंत असता पूर्वी भ्रष्ट केले होते, तसे करण्यापासून तुम्ही त्याला परावृत्त का केले नाही?

तसेच इंद्राने पूर्वी पुष्कळ क्रूर कृत्ये आणि अधार्मिक कर्मे व फसवाफसवीची कामे कली होती, तसे करण्यापासून तुम्ही त्याला परावृत्त का केले नाही? तुम्ही इंद्राणीला आणलेच पाहिजे, असा नहुषाने देवांना आग्रह केल्यामुळे देव इंद्राणीला आणावयास गेले. परंतु बृहस्पती तिला देवांच्या ताब्यात देण्यास राजी नव्हता. यावर बृहस्पतीने अशी तोड सुचविली की, इंद्राणीने आपला नवरा जिवंत आहे की मेला आहे हे शोधून काढीपर्यंत नहुषाने दम धरावा व त्याप्रमाणे तसे करण्यास तिने नहुषाला विनंती केली. नहुषाने ती विनंती मान्य केली. त्यानंतर इंद्राणी आपल्या पतीच्या शोधार्थ निघाली. उपश्रुतीच्या (निशादेवी व गुप्त गोष्टीचा शोध लावणारी देवता) साहाय्याने तिने आपला पती शोधून काढला. हिमालयाच्या उत्तर दिशेकडे असलेल्या महासागराच्या खंडात एक तळे होते. त्या तळ्यातील एका कमळाच्या बुंध्याजवळ एक विक्षिप्त स्वरूपात तो बसलेला होता. आपल्याबद्दल नहुषाचे कसे काळेकुट्ट हेतू आहेत, याबद्दलची माहिती तिने इंद्राला सांगितली व तुम्ही जोम धरा व मला या संकटातून वाचवा आणि राज्याधिकाराचा पुनः स्वीकार करा, अशी तिने त्याला विनंती केली. नहुष आपल्यापेक्षा फार प्रबळ आहे, असे कारण पुढे करून इंद्राने याबाबतीत तोंड घालण्याचे नाकारले. परंतु जेणेकरून तो उपटसुंभ्या आपल्या पदावरून दूर फेकला जाईल अशी एक युक्ती त्याने तिला सुचविली. 'ऋषींनी ओढलेल्या देवरथात बसून तू माझ्या भेटीला येशील तर मी आनंदाने तुला वश होईन.' असे तू नहुषाला सांग, असे इंद्राने इंद्राणीला सुचविले.

देवांच्या राणीने नहुषाकडे जाऊन त्याला असे विनविले की, हे देवांच्या राजा! मी तुझ्यावर आसक्त झालेली आहे. आतापर्यंत कोणाला माहीत नव्हते, जे विष्णू किंवा रुद्र किंवा असुर लोक किंवा राक्षस यांनी पूर्वी वापरलेले नव्हते, असे वाहन तू तयार कर, व हे प्रभोः! त्यात तू बैस व सर्व प्रमुख ऋषी मिळून ते वाहन वाहू देत! ही कल्पना मला फार आनंद देते! इंद्राणीची ही विनंती नहुषाच्या बडेजावी स्वभावाला बरोबर पटली. तिला उत्तर देताना नहुषाने स्वतःभोवती दिवे ओवाळून घेतले. तो उत्तरला, 'मुनींना आपल्या वाहनाला जुंपणारा माणूस म्हणजे कमी शक्तीचा माणूस नव्हे! मी मोठ्या शक्तीचा एकनिष्ठ भक्त आहे. मी भूत, भविष्य व वर्तमानकाळाचा प्रशासक आहे. मी जर रागावलो तर जग एक क्षणभरही जिवंत राहणार नाही. सव गोष्टी मजवर अवलंबून आहेत. म्हणून हे देवते! तू जे सुचविलेले आहेस त्याची मी निःसंशयपणे अंमलबजावणी करीन. सप्तर्षी व सर्व ब्राह्मण ऋषी मला वाहनातून वाहून नेतील. हे सुंदर देवते, माझे प्रभुत्व व माझे ऐश्वर्य बघत रहा!''

ही कथा पुढे येणेप्रमाणे चालू राहते –

''याप्रमाणे या दुष्ट, धर्मभ्रष्ट, उन्मत्त, मूर्ख-शिरोमणी आणि हेकेखोर माणसाने सर्व ऋषींना रथाला जुंपून घेण्याची आज्ञा केली व ती त्यांनी मान्य केली. मग त्याने ऋषींना रथाला जुंपले व त्यात स्वतः बसून तो रथ ऋषींना ओढावयास लावला. हा प्रकार पाहून इंद्राणीला भीती पडली व ती बृहस्पतीकडे गेली. त्याने तिला असे आश्वासन दिले की,

नहुषाच्या या आततायी वर्तनाचा लौकरच सूड उगविला जाईल. त्याने तिला असेही सांगितले की छळ करणाऱ्या त्या दुष्टाचा नाश व्हावा म्हणून व इंद्राची गुप्त जागा उपलब्ध व्हावी म्हणून तो स्वतः एक यज्ञ करणार आहे. त्यानंतर इंद्राला शोधून बृहस्पतीकडे आणण्यासाठी अग्नीला पाठविले. इंद्र बृहस्पतीकडे आला तेव्हा बृहस्पतीने त्याला त्याच्या गैरहजेरीत जे काही झाले होते ते सर्व निवेदन केले. इंद्र, कुबेर, यम, सोम व वरुण हे नहुषाचा निःपात कसा करावा याबद्दल खल करीत होते. तेव्हा अगस्त्य ऋषी तेथे आला व तो इंद्राचा प्रतिस्पर्धी नहुष याचा निःपात झाला म्हणून इंद्राचे अभिनंदन करू लागला. तो निःपात कसा झाला याची हकिगत अगत्स्त्य ऋषी त्यांना सांगू लागला.''

''त्या पापी नहुषाला वाहून नेता नेता थकून गेलेले प्रमुख देवर्षी व निष्कलंक पावित्र्याचे ब्राह्मण ऋषी यांनी स्वतःला दैवी सामर्थ्य असल्याची घमेंड बाळगणाऱ्या नहुषाला एक अडचण सोडवावयास सांगितली. ते म्हणाले, 'हे वासना- यशस्वी वीरातील सर्वश्रेष्ठ वीरा! राजाच्या समाधीच्या वेळी ब्राह्मण ग्रंथातील जे मजकूर म्हटले जातात ते अधिकृत आहेत किंवा नाहीत, याबद्दल तुमचे काय मत आहे?' ज्याच्या सारासार विचाराला काळोखाने ग्रासलेले होते असा नहुष उत्तरला, 'ते अधिकृत नाहीत.' ऋषीने त्याला परत विचारले 'धर्मभ्रष्टाचार करण्यात तुझा सारा वेळ जातो तेव्हा तुला धर्माचार सुचणार नाही. हे मजकूर पूर्वी मोठमोठे ऋषी म्हणत असत. त्या मजकुरांना आम्ही अधिकृत मानतो?' अगस्त्य ऋषी पुढे कथा सांगत असता म्हणाला, मुनीच्या बरोबर या मुद्द्यावर वादविवाद करीत असता नहुषाला दुष्टपणाची लहर आली व त्याने माझ्या डोक्याला पायाने स्पर्श केला. याचा परिणाम असा झाला की, राजाची सत्ता हरपली व त्याचे वैभव लयाला गेले. इतक्यात तो भांबावून गेला व भीतीने घाबरा झाला. तेव्हा त्याला मी म्हणालो, 'हे मूर्खा! तू ज्या अर्थी पूर्वीच्या ऋषींनी रचलेल्या व सदैव पूज्य मानलेल्या आणि ब्राह्मण ऋषी वापरतात अशा धर्मग्रंथांतील पवित्र मजकुराचा धिक्कार करीत आहेस तू तुझ्या पायाने माझ्या झोक्याला स्पर्श केला आहेस आणि ब्रह्मदेवाप्रमाणे असलेले व परम वंदनीय अशा ऋषींना रथाला जुंपून त्यात तू बसून तो रथ त्यांना ओढावयास लावतोस, त्याअर्थी तुझे सर्व तेज विलयाला जावो आणि तुझा सर्व पुण्यसंचय संपो! हे पाप्या! स्वर्गातून तुझा अधःपात होवो व तू पृथ्वीवर पडून नीचपणाचे आयुष्य कंठ, भयंकर सापाचे रूप तुला प्राप्त होऊन त्या अवस्थेत तू दहा हजार वर्षे राहशील. हा काळ संपल्यानंतर तू पुनः स्वर्गाला जाशील. याप्रमाणे तो दुष्ट हलकट माणूस देवाच्या सम्राटपदापासून ढळला. हे इंद्रा! आता आपण आनंदात राहू व आपण आपली भरभराट करून घेऊ. कारण ब्राह्मणांचा शत्रू आता जमीनदोस्त झालेला आहे. हे शचीते (इंद्राणी) शचीपते मनोविकार ताब्यात ठेवून आणि नऊ शत्रूंना पराजित करून तू आता महाऋषींनी वर्णिलेल्या तिन्ही लोकांचा ताबा घे व त्यात राहाणाऱ्या लोकांचे संरक्षण कर.''

ब्राह्मणांच्या बरोबर झगडा करणारा चौथा राजा निमी हा होय. त्याच्या कथेची

तपशीलवार माहिती विष्णुपुराणात दिलेली आहे (Quoted by Muir, Vol. I, p. 316) ती खालीलप्रमाणे आहे –

"एक हजार वर्षे चालू राहणार असा एक यज्ञ निमी करणारा होता, त्या यज्ञात ब्राह्मण ऋषी वसिष्ठ याने पुरोहितपणा करावा अशी निमीने त्याला विनंती केली होती. इंद्राबरोबर पाचशे वर्षे आपले काम अगोदरच उरलेले आहे, असे निमीला वसिष्ठाने सांगितले. पण त्याने निमीला असे वचन दिले की, हा काळ संपला म्हणजे आपण त्याचे काम स्वीकारू. राजाने तोंडातून अवाक्षर काढले नाही. आपण सांगितलेल्या योजनेला राजाने संमती दिली असे समजून वशिष्ठ दुसरीकडे गेला. इंद्राचे काम संपवून आल्यानंतर वशिष्ठाला असे दिसून आले की, निमीने गौतम (हा ब्राह्मण ऋषी वसिष्ठाइतकाच तपोनिधी होता) व इतर ऋषींना ठेवून घेऊन त्यांच्या हस्ते यज्ञ चालू केला होता. पूर्वी ठरल्याप्रमाणे वसिष्ठाने तो यज्ञ करावयाचा होता, परंतु यज्ञ सुरू करण्याच्या अगोदर निमीने याबाबतीत वसिष्ठाला काहीच कळविलेले नव्हते, त्याची वसिष्ठाला चीड आली म्हणून त्याने राजा झोपलेला असताना असा शाप दिला की, तुझा मानवी देह अदृश्य होवो. आपल्याला काही कळू न देता वसिष्ठाने निद्रित अवस्थेत शाप दिला, हे जागा झाल्यानंतर राजास समजले तेव्हा त्यानेही उलट वसिष्ठाला तसलाच शाप दिला व तो नंतर मरण पावला. निमीचे शव एका पेटीत बंद करून ठेवले. यज्ञातील पुरोहितांनी विनविल्यावरून यज्ञसमाप्तीच्या वेळी राजाला जिवंत करण्यास वसिष्ठ तयार होते, परंतु निमीला ते पसंत पडले नाही, म्हणून त्याने ते नाकारले. त्याच्या इच्छेप्रमाणे देवतांनी त्याला सर्व सजीव प्राण्यांच्या डोळ्यांत ठेवले. या कारणामुळे सर्व सजीव प्राणी आपले डोळे बंद करतात, उघडतात. (निमिष म्हणजे डोळ्यांची उघडझाप."

ब्राह्मण व राजे यांच्यामधील वर सांगितलेले झगडे मनूने आपल्या स्मृतीत उल्लेखिलेले आहेत. (Max Mullar's 'Sacred Books of the East,' Vol. XXV, p. 222)–

"नम्रतेचा अभाव ज्या राजांच्या अंगात होता ते आपल्या धनदौलतीसह विनाश पावलेला आहेत. नम्रता अंगी बाणवल्यामुळे अरण्यात राहणाऱ्या ऋषींनी राज्ये मिळविली आहेत.

अंगात नम्रतेचा भाव नसल्यामुळे वेण नाश पावला, त्याचप्रमाणे राजा नहुष, सुदास, पिजवनाचा मुलगा, सुमुखा आणि निमी हे नाश पावले."

शूद्रांचा दर्जा ठरविण्याच्या दृष्टीने या उदाहरणांचा किती उपयोग होतो, याबद्दलची जाणीव जितकी व्हावयास पाहिजे होती तितकी ती दुर्दैवाने झालेली नाही. याचे कारण हे की, हा झगडा म्हणजे ब्राह्मण व शूद्र यांच्यामधील झगडा होय, याची कोणाला जाणीव झालेली नाही. सुदास शूद्र होता हे नक्की. या झगड्यात जे दुसरे राजे दिसतात त्यांना शूद्र म्हणून जरी स्पष्टपणे उल्लेखलेले नाही तरी ते इक्ष्वाकू कुळाचे वंशज होत असे त्यांचे वर्णन केलेले आहे. ते सर्वजण शूद्र होते असे म्हटले तर ते ओढूनताणून म्हटलेले आहे असे होणार नाही मनूला सुद्धा याबद्दलची कल्पना नाही. या उदाहरणातील झगडे सांगताना तो असेच

म्हणतो की हे झगडे ब्राह्मणव क्षत्रिय यांच्यामधील आहेत. सुदास हा शूद्र होता हे डॉ. म्युइर यांच्या लक्षात आले नाही. या बाबतीतील कथा सांगताना त्यांनी असे दाखविलेले आहे की या झगड्यात जे दोन पक्ष होते त्यांपैकी एक ब्राह्मणांचा पक्ष होता व दुसरा क्षत्रियांचा पक्ष होता. हा झगडा ब्राह्मण व क्षत्रिय यांच्यामधील होता हे एका अर्थी बरोबर आहे, कारण शूद्र लोकसुद्धा क्षत्रियांच्या एका शाखेचे अनुवंशज होते. तथापि, जे झगडे झाले ते ब्राह्मण व शूद्र यांच्यामध्ये झाले अशा स्पष्ट शब्दांनी त्या झगड्यांचे स्वरूप वर्णन केले असते तर ते अधिक तेजस्वी वाटले असते. या झगड्यांसंबंधी क्षत्रिय या शब्दाऐवजी शूद्र हा शब्द ब्राह्मणांच्या विरुद्ध न वापरल्यामुळे जो गैरसमज उत्पन्न झालेला आहे तो चालत चालत तसाच अद्याप टिकलेला आहे व त्यामुळे हिंदी-आर्य समाजाच्या इतिहासाच्या इतक्या महत्त्वाच्या भागाचे खरे स्वरूप काय आहे ते झाकले गेलेले आहे. हा गैरसमज दूर करण्यासाठीच या प्रकरणाचे नाव 'ब्राह्मण व शूद्र यांच्या झगडा' असे दिलेले आहे; 'ब्राह्मण व क्षत्रिय यांचा झगडा' असे ते नाव दिलेले नाही. ब्राह्मण व शूद्र यांच्यामधील झगड्यांचा इतिहास पूर्णपणे समजून घेतला तर शूद्रांना दुसऱ्या वर्णांतून काढून त्यांची चवथा वर्णात कशी गणना केली गेली याची जाणीव इतिहास कोणालाही करून देईल.

OOO

## प्रकरण १० वे

# ब्राह्मणांनी शूद्रांना अधोगतीस कसे नेले?

ब्राह्मणांनी शूद्रांना चातुर्वर्ण्यातील दुसऱ्या वर्णापासून खाली ओढून चौथ्या वर्णात ढकलले. ब्राह्मणांनी शूद्रांची अशी अधोगती करताना कोणते तत्त्व उपयोगात आणले होते?

या बाबतीत आतापर्यंत जे विवेचन केलेले आहे ते दोन प्रश्नांना अनुलक्षून केले आहे. शूद्र हा दुसरा वर्ण म्हणजे क्षत्रिय यांच्यापैकी आरंभापासून एक भाग होता किंवा नव्हता आणि शूद्रांनी ब्राह्मणांशी जे वैर धरले व त्यामुळे त्यांनी ब्राह्मणांना जे सतावून सोडले, हे शूद्रांची अधोगती घडवून आणण्यासब्राह्मणांना सबळ व भरपूर कारण मिळाले किंवा नाही, हेच ते दोन प्रश्न होत! याच्यापुढे तर्कशुद्ध रीतीने जो प्रश्न उपस्थित होतो त्याचा आता विचार करणे जरूर आहे. तो प्रश्न म्हणजे हा की, अधोगती घडविण्याचे कोणते तंत्र ब्राह्मणांनी वापरले?

या प्रश्नाला माझे असे उत्तर आहे की, ही अधोगती घडवून आणण्यासाठी ब्राह्मणांनी जे तंत्र वापरले ते म्हणजे शूद्रांचा उपनयनविधी करण्यासाठीचा नकार. या तंत्रामुळे ब्राह्मणांनी आपला हेतू साध्य केला व शूद्रांचा पुरा सूड उगवला, याबद्दल मला संशय नाही.

उपनयन म्हणजे काय व हिंदी-आर्य समाजात त्याचे काय महत्त्व होते, याचा खुलासा करणे मला इष्ट वाटते. उपनयनाबद्दल स्पष्ट कल्पना करून देण्याचा उत्कृष्ट मार्ग म्हणजे त्याच्या विधीचे वर्णन देणे हा होय.

उपनयनाचा विधी पहिल्यांदा फारच साधा विधी होता. एखादा मुलगा हातात समिधा (गवताची काडी) घेऊन गुरूकडे येई व 'मला ब्रह्मचारी (म्हणजे विद्यार्थी) व्हावयाचे आहे' असे तो गुरूला सांगे व विद्याभ्यासासाठी मला तुमच्या जवळ राहू द्या, अशी तो गुरूला विनंती करी. काही काळ लोटल्यानंतर हा विधी फार गुंतागुंतीचा विधी होऊन बसला. अश्वलायन गुह्यसूत्रात या विधीचे जे वर्णन दिलेले आहे त्यावरून तो विधी किती गुंतागुंतीचा झालेला होता, याची कल्पना येते. (Kane, History of Dharmashastra Vol. II, 1, pp. 281-283)-

''ज्या मुलाचा उपनयन विधी करावयाचा त्या मुलाला नटवून-थटवून ठेवावा. त्याच्या डोकीची हजामत करून शेंडीचे केस व्यवस्थितपणे बांधावेत. त्याच्या अंगावर नवे वस्त्र असावे किंवा तो मुलगा ब्राह्मण असेल तर त्याच्या अंगावर काळवीटाचे कातडे असावे. तो क्षत्रिय असेल तर त्याच्या अंगावर रूरूचे कातडे असावे. तो वैश्य असेल तर त्याच्या अंगावर बकऱ्याचे कातडे असावे. मुलांनी अंगावर कपडे घातले तर ते कपडे रंगीत असावेत. ब्राह्मण मुलाच्या अंगावर तांबडसर-पिवळे कपडे असावेत. क्षत्रिय मुलाच्या अंगावर तांबडे

कपडे असावेत. वैश्य मुलाच्या अंगावर पिवळे कपडे असावेत. त्यांनी मेखला व दंड धारण करावीत. त्याच्या रंग वर सांगितल्याप्रमाणे असावा. मुलगा आपल्या गुरूचा हात धरतो तेव्हा वर वर्णन केल्याप्रमाणे गुरू शुद्ध लोण्याचे अर्घ्य देऊन होम करतो व तो अग्नीला अर्पण करतो. तो स्वतः अग्नीच्या उत्तरेकडे बसतो व पूर्वेकडे तोंड करतो आणि मुलगा गुरूच्या समोर बसतो. त्याचे तोंड पश्चिमेकडे असते. नंतर गुरू व मुलगा हात जोडतात व गुरू स्वतःच्या व मुलाच्या जोडलेल्या हातात पाणी घेतो आणि 'आम्ही सवित्रीचे ते पसंत करतो' अशी ऋचा (ऋग्वेद ५-८२-१) म्हणत गुरू ओंजळीतील पाणी मुलाच्या ओंजळीतील पाण्यात वरून सोडतो. असे पाणी ओतल्यानंतर गुरूने आपल्या हाताने मुलाचा हात अंगठ्यासहित धरावा व असे करीत असता असा पाठ म्हणावा की, 'सवित्री देवाच्या आज्ञेने, दोन्ही अश्विनांच्या बाहूंनी, पुषन्‌च्या हातांनी मी तुझा हात धरीत आहे. हे अमक्या तमक्या!' सवित्रीने तुझा हात धरलेला आहे, हे अमक्या तमक्या!' असे शब्द उच्चारून गुरू मुलाचा दुसऱ्यांदा हात धरतो. 'अग्नी तुझा शिक्षक आहे हे अमक्या तमक्या' असे शब्द उच्चारून गुरू मुलाचे तिसऱ्यांदा हात धरतो. 'हे सावित्री देवा! हा तुझा ब्रह्मचारी आहे. तू त्याचे संरक्षण कर. त्याला मरू देऊ नकोस,' असा पाठ गुरू म्हणत असता त्याने मुलाला सूर्याकडे पहावयास लावावे. त्यानंतर गुरूने असे म्हणावे की, तू कोणाचा ब्रह्मचारी आहेस? तू प्राणाचा ब्रह्मचारी आहेस. तुझा उपनयन विधी कोण करीत आहे आणि तो कोणाचा उपनयन विधी करीत आहे? मी तुला का (प्रजापती) याच्या स्वाधीन करीत आहे? 'हा तरुण माणूस उत्तम नटूनथटून व पोशाख करून येथे आला,' या ऋग्वेदातील ३-८-४ या ऋचेचा पहिला भाग म्हणत म्हणत गुरूने मुलाला उजवीकडे फिरावयास सांगावे; आणि आपले दोन्ही हात मुलाच्या खांद्यावर ठेवून त्याने मुलाच्या छातीला स्पर्श करावा व असे करीत असता ऋचेच दुसरा भाग त्याने म्हणावा. ब्रह्मचारीने अग्नीच्या सभोवतीची जमीन साफसूफ करावी व मग अग्नीवर एक सर्पणाची काटकी हळूच ठेवावी. कारण श्रुतीवरून असे समजले जाते की, 'प्रजापतीचे जे काही आहे ते हळूच केले पाहिजे,' 'आणि ब्रह्मचारी हा प्रजापतीचा होतो. काहीजण हा विधी (अग्नीवर सर्पणाची काटकी ठेवणे) अग्नीला उद्देशून पुढील मंत्र म्हणत करतात-मोठ्या जातवेदासाठी मी सर्पणाची एक काटकी आणलेली आहे; हे अग्ने! या सर्पणाच्या काटकीमुळे तू वाढत जावेस आणि आम्ही ब्रह्मन् (प्रार्थना किंवा अध्यात्म विद्या) याच्यामुळे वाढत जावो! स्वतः अग्नीवर सर्पणाची काटकी ठेवल्यानंतर आणि अग्नीला स्पर्श केल्यानंतर ब्रह्मचारी आपले तोंड तीन वेळा पुसतो व त्यावेळी तो पुढील शब्द म्हणतो, 'मी माझ्या अंगावर प्रकाश चोपडतो.' श्रुतीवरून असे समजले जाते की अग्नी स्वतः प्रकाश चोपडून घेतो. 'अग्नी मला दिव्य दृष्टी, संतती आणि तेज देवो! हे अग्ने! तुझ्याजवळ जे तेज आहे त्या तेजामुळे मी तेजस्वी होवो; तुझ्याजवळ जे बळ आहे त्या बळामुळे मी बलवान होवो; तुझ्याजवळ जी भक्षणशक्ती आहे तिच्यामुळे मला भक्षणशक्ती प्राप्त होवो.' ब्रह्मचाऱ्याने हा पाठ म्हणून अग्नीची पूजा केल्यानंतर त्याने आपले गुडघे वाकवावेत व गुरूच्या चरणाला घट्ट मिटी मारावी व म्हणावे, 'महाराज! सवित्री म्हणा!

महाराज! सवित्री म्हणा!' ब्रह्मचारीचे उत्तरीय त्याच्या हातांसभोवती गुंडाळून गुरूने त्याचे हात धरावेत व मग सवित्री ऋचा पदापदाने, नंतर अर्धी अर्धी कडवी व शेवटी सर्व ऋचा म्हणावी. नंतर ब्रह्मचाऱ्याला जेवढी शक्य असेल तेवढी ऋचा गुरूने त्याला म्हणावयास लावावी. गुरूने ब्रह्मचाऱ्याच्या अंतःकरणावर आपला हात ठेवावा व त्या हाताची बोटे वर असावीत व नंतर त्याने पुढील पाठ म्हणावा, 'माझ्याबद्दल तुझे जे कर्तव्यकर्म आहे ते करण्यासाठी मी तुझे अंतःकरण त्या कर्तव्यकर्माकडे जावे असे करीत आहे. तुझे मन माझ्या मनाला अनुसरो! तू माझे शब्द एकाग्रतेने पाळोस, तू माझा सर्वस्वी होवोस, असे बृहस्पती करो!' गुरूने ब्रह्मचाऱ्याच्या कमरेभोवती मेखला बांधावी व त्याच्या हातात दंड द्यावा व मग त्याने ब्रह्मचाऱ्याचे वागण्याचे कोणते नियम आहेत व कसे पाळावेत, याबद्दल ब्रह्मचाऱ्याला माहिती देताना त्याने हे शब्द उच्चारावेत, तू ब्रह्मचारी आहेस, पाण्याचा घोट घे, सेवा कर, दिवसा झोपू नकोस आणि सर्वस्वी गुरूच्या आधाराने वेदाचा अभ्यास कर. ब्रह्मचाऱ्याने संध्याकाळी व सकाळी भीक मागून अन्न आणावे; त्याने संध्याकाळी व सकाळी अग्नीत सर्पणाची एक काटकी ठेवावी. त्याने भीक मागून जे काही आणलेले असेल ते त्याने गुरूला मोठ्यांदा सांगावे; त्याने दिवसाच्या बाकीच्या वेळी बसता कामा नये (परंतु उभे राहावे.)''

गायत्री मंत्र म्हणून ओळखला जाणारा जो वैदिक मंत्र आहे तो आचार्याने मुलाला शिकविला म्हणजे उपनयन विधी संपतो. गायत्री मंत्र शिकविण्याच्या अगोदर उपनयन विधी करणे जरूर आहे व त्याशिवाय तो मंत्र शिकविणे इष्ट समजण्यात येत नाही. गायत्री मंत्राबद्दल अशी का कल्पना करण्यात आली, हे सांगणे कठीण आहे.

उपनयन विधीचे जे वर वर्णन करण्यात आलेले आहे त्यावरून दोन गोष्टी स्पष्ट होतात. पहिली गोष्ट ही की उपनयनाचा हेतू हा की मुलाला वेदांचा अभ्यास करण्याची दीक्षा देणे. आचार्याने ब्रह्मचाऱ्याला गायत्री मंत्र शिकविला की ब्रह्मचाऱ्याला वेदांचा अभ्यास करण्याचा मार्ग मोकळा होत असे. दुसरी जी गोष्ट स्पष्ट होते ती ही की, उपनयन विधी करताना काही वस्तू उपयोगात आणणे हे अत्यंत जरुरीचे समजण्यात येत असे. त्या वस्तू म्हणजे (१) दोन वस्त्रे. शरीराचा भाग झाकण्यासाठी वापरण्यात येत असलेले वस्त्र, हे एक वस्त्र. याला पारिभाषिक शब्दात बस म्हणत असत आणि शरीराचा वरचा भाग झाकण्यासाठी वापरण्यात येत असलेले वस्त्र हे दुसरे वस्त्र. याला पारिभाषिक शब्दात उत्तरीय म्हणत असत. (२) दण्ड किंवा लाकडाचा दांडी (३) मेखला किंवा कमरेभोवती बांधलेली गवताची दोरी.

फार प्राचीन काळी जो उपनयन विधी करण्यात येत असे त्याचे वर केलेले वर्णन आणि त्यानंतरच्या काळात जो उपनयन विधी करण्यात येत होता त्याचे तपशीलवार वर्णन यांची कोणी जर तुलना करून पाहिली तर त्याला हे दिसून येईल की, या दोन्ही विधींमध्ये ब्रह्मचाऱ्याने आपल्या उपनयनाचा एक भाग म्हणून यज्ञोपवीत वापरले पाहिजे असे मुळीच आढळून येत नाही. हा प्रकार पाहून त्याला आश्चर्य वाटेल. आजकाल जे उपनयन विधी करण्यात येतात त्यात सुताचे दोरे ही मध्यवर्ती कल्पना समजली जाते आणि हे यज्ञोपवीत

वापरणे हाच सर्व उपनयनांचा हेतू आता होऊन बसलेला आहे (याज्ञवल्क्य १, १६ व १३३) याज्ञवल्क्य यज्ञोपवीताला ब्रह्मसूत्र म्हणतो. हे यज्ञोपवीत या उपनयनामध्ये इतके महत्त्वाचे होऊन बसलेले आहे की, ते कसे तयार करावे व कसे वापरावे याबद्दल अत्यंत सविस्तर व लांबलचक नियम तयार करण्यात आलेले आहेत.

यज्ञोपवीतात तीन दोरे असले पाहिजेत. प्रत्येक दोऱ्यात नऊ तंतू असले पाहिजेत. प्रत्येक तंतू उत्तम रीतीने विणलेला असला पाहिजे. एकेक तंतू एकेका देवतांचे प्रतीक समजण्यात येते.

बेंबीपर्यंत पोहोचेल इतके लांब यज्ञोपवीत असले पाहिजे. ते बेंबीच्या खाली जाईल किंवा छातीच्या वर राहील, अशी त्याची लांबी असू नयेय. (Kane, D.S. II (1) p. 292) ओंकार, अग्नी, नाग, सेम, पित्र, प्रजापती, वायू, सूर्य व विश्वदेव या नऊ देवतांचे नऊ तंतू प्रतीक होत, असे देवस्मृतीत म्हटलेले आहे. या मतात काही काळाने फरक घडून आला असावा असे दिसते. कारण मेधतिथी (काणे यांचा ग्रंथ पहा) म्हणतो की, इष्टी, पशुयज्ञ व सामयज्ञ यांच्यामध्ये जे यज्ञोपवीत वापरावयाचे असते त्याला तीन तंतूंचा फक्त एकच दोरा असला पाहिजे. परंतु अहिन्त, एकह व सत्र यज्ञ यांच्यामध्ये तीन प्रकारचे अग्नी वापरावे लागत असल्यामुळे या यज्ञात वापरावे लागत असलेले यज्ञोपवीत तीन दोऱ्यांचे असले पाहिजे. तीन सवर्णांच्या बाबतीत सात सोमसष्ठ यज्ञातसुद्धा सात दोऱ्यांचे यज्ञोपवीत वापरावे लागत असे. दोन संध्यांच्या बाबतीत पाच दोऱ्यांचे यज्ञोपवीत वापरावे लागत असे.

ब्रह्मचाऱ्याला फक्त एकच यज्ञोपवीत वापरावे लागत असे आणि संन्याशी जर यज्ञोपवीत वापरत असेल तर ते एकच असले पाहिजे. स्नातक (गुरूच्या घरून परत आलेला ब्रह्मचारी) व गृहस्थ यांनी दोन यज्ञोपवीते वापरावीत. ज्याला जास्त दिवस जगण्याची इच्छा आहे त्याने दोहोपेक्षा जास्त यज्ञोपवीते वापरावीत. स्नातकाने नेहमी दोन यज्ञोपवीते वापरावीत. गृहस्थाने दहापर्यंत कितीही यज्ञोपवीते वापरावीत.

एकापेक्षा जास्त यज्ञोपवीते वापरण्याची जर कोणाला इच्छा झाली तर तसे करण्याची त्याला मुभा होती.

माणसाने आपले यज्ञोपवीत नेहमी वापरले पाहिजे. यज्ञोपवीत न वापरता त्याने जर जेवण घेतले किंवा उजव्या कानावर न अडकविता त्याने जर देहधर्माचा एखादा विधी केला तर त्याने प्रायश्चित घेतले पाहिजे. स्नान करून प्रार्थना म्हणणे व उपोषण करणे हे ते प्रायश्चित होय. दुसऱ्यांच्या काही वस्तू (जोडे, दागिने, माळ, कमंडलू वगैरे) वापरणे, तसेच दुसऱ्यांचे यज्ञोपवीत वापरणे हे निषिद्ध मानलेले आहे.

यज्ञोपवीत तीन तऱ्हेने वापरले पाहिजे असे शास्त्रात सांगितलेले आहे. (१) निवीत, (२) प्राचीनवीत आणि (३) उपनवीत या त्या तीन तऱ्हा. जेव्हा यज्ञोपवीताचा दोरा मानेभोवती, दोन्ही भुजांवर व छातीवर ठेवला जातो आणि त्याला दोन्ही हाताच्या अंगठ्यांनी धरले तर त्याची लांबी अंतःकरणाच्या खालच्या भागापर्यंत व बेंबीच्या वर पोहोचते, अशाप्रकारच्या दोऱ्याला निवीत म्हटले जाते. यज्ञोपवीताचा दोरा डाव्या

खांद्यावरून अशा रीतीने ठेवावयाचा की, जो उजव्या बाजूला लोंबकळत राहील. अशा दोऱ्याला उपवीत म्हटले जाते. यज्ञोपवीताचा दोरा उजव्या खांद्यावरून अशा रीतीने ठेवावयाचा की तो डाव्या बाजूला लोंबकळत राहील, अशा दोऱ्याला प्राचीनवीत म्हटले जाते.

हे यज्ञोपवीत अस्तित्वात कसे आले? श्री. टिळक यांनी याबद्दल खुलासा केलेला आहे, तो येथे उद्धृत करण्यासारखा आहे. श्री. टिळक म्हणतात, (Orion, pp. 144-146)-

''ओरायन किंवा मृगशिरस याला वैदिक कार्यात म्हणजे यज्ञात प्रजापती म्हटलेले आहे. ओरायन किंवा यज्ञ याच्या कमरेभोवती कापडाचा जो पट्टा किंवा मेखला बांधलेली असते, त्या पट्ट्याला किंवा मेखलेला त्याच्या नावावरून यज्ञोपवीत, उपवीत किंवा यज्ञाचे कपडे असे नाव पडणे साहजिक आहे. तथापि यज्ञोपवीत या शब्दावरून ब्राह्मणाचे पवित्र जानवे हा अर्थ आता अभिप्रेत होतो. यावरून कोणीही असे साहजिकपणे विचारील की, जरी जानव्याची उत्पत्ती नसली तरी त्याची रूपसंपदा तरी ओरायनाच्या पट्ट्यापासून उत्पन्न झालेली आहे, असे मला वाटते. याची कारणे पुढीलप्रमाणे आहेत –

एतद्देशीय सर्व विद्वानांचे असे मत आहे की, यज्ञोपवीत हा शब्द यज्ञ+उपवीत या दोन शब्दांवरून झालेला आहे; परंतु या जोड शब्दाचा अर्थ उपवीत म्हणजे यज्ञ, म्हणजे यज्ञकार्यासाठी असा होतो की 'यज्ञाचे उपवीत' असा होतो असे आपण समजावे की काय, याबद्दल मतभेद आहे. पहिला अर्थ चुकीचा नाही. परंतु बऱ्याच विद्वानांचा पाठिंबा दुसऱ्या अर्थाला आहे, म्हणून प्रयोगाचे लेखक स्मृतीचा आधार घेऊन म्हणतात की, उच्च आत्मा म्हणजे यज्ञ असे होत्री मानतात; हे त्यांचे उपवीत म्हणून हे यज्ञ–उपवीत होय. पवित्र जानवे वापरण्याच्या प्रसंगी जो मंत्र म्हटला जातो त्याचा अर्थ असा की, मी यज्ञाच्या उपवीताने तुला बांधतो. या सर्वसाधारण पाठाचा पहिला भाग पुढीलप्रमाणे आहे. हा भाग म्हणत म्हणत पवित्र जानवे नेहमी घालतो –

*यज्ञोपवीतं परमं पवित्रम् ।*
*प्रजापतेर्यत्सहजं पुरस्तात् ।।*

अस्तित्वात असलेल्या एकाही संहितेमध्ये हा मंत्र आढळून येत नाही, परंतु तो ब्रह्मोपनिषदामध्ये आणि बौद्धायन याने दिलेला आहे. हा श्लोक हौम येष्टा यातील वर उद्धृत केलेल्या श्लोकांशी विलक्षणपणे जुळतो. या श्लोकाचा भावार्थ असा की, 'यज्ञोपवीत हे उच्च व पवित्र आहे; ते प्रजापतीपासून पूर्वी उत्पन्न झालेले होते. पुरस्तत हा शब्द अवेस्ताच्या श्लोकांतील पौर्वनाम या शब्दाचा समानार्थी शब्द आहे. डॉ. हॉग यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे तो प्रश्न याप्रमाणे सोडविला जातो. सहज या शब्दाचा अर्थ ''प्रजापतीचे अवयव घेऊन जन्माला आलेला–ली–ले'' असा होतो. अवेस्ताच्या श्लोकांतील मैन्यूतस्तेम या शब्दाचा अर्थ सहज या शब्दाप्रमाणेच होतो. या दोन श्लोकांतील जे साम्य आहे ते आपोआप जुळून आलेले असणे शक्य नाही आणि मला असे वाटते की, पवित्र जानवे याची

उत्पत्ती ओरायनच्या पट्ट्यापासून झाली होती. उपवीत या शब्दातील मूळ धातू वे म्हणजे विवणे हा होय. उपवीत याचा शब्दशः अर्थ कापडाचा तुकडा, (दोर नव्हे) असा होतो. यावरून असे दिसते की, कमरेभोवती जे कापड गुंडाळण्यात येते तेच यज्ञोपवीताचे फार प्राचीन काळाचे रूप होते आणि ते प्रजापतीच्या कमरेभोवती जे कापड किंवा जो पट्टा गुंडाळलेला असे त्याचे प्रतीक होय, असा सिद्धांत मांडून त्या यज्ञोपवीताला पावित्र्याची कल्पना चिकटविण्यात आली.

श्री. टिळक यांनी हा जो खुलासा मांडलेला आहे तो फार मनोरंजक आहे याबद्दल संशय नाही. परंतु या बाबतीत ज्या काही अडचणी आहेत त्या या खुलाशामुळे निवारण करता येत नाहीत. उपनयन विधी करताना उत्तरीय व वस ही दोन्ही वस्त्रे वापरणे अगत्याचे असते. यज्ञोपवीत व ही दोन वस्त्रे यांच्यामध्ये कोणता संबंध असतो याबद्दल या खुलाशाने काहीही स्पष्ट होत नाही. दोन्ही वस्त्रे धरून आणखी यज्ञोपवीत वापरावे लागत असे काय? असे जर असेल तर उपनयन विधीचे अगदी पहिल्या काळातील जे वर्णन आहे या वर्णनात याचा उल्लेख का केलेला नाही? दुसरी एक अडचण आहे, तिच्याबद्दल श्री. टिळकांचा खुलासा स्पष्ट स्पष्टीकरण करीत नाही. जानवे हे वस्त्राच्या जागी वापरण्याची दुसरी वस्तू होय असे समजले तर उपनयन विधीत वस्त्र वापरावे असे सांगितले आहे, ते कसे?

याबद्दल दुसरा खुलासा असावा असे दिसते. मी तो येथे देत आहे. त्याचे महत्त्व काय आहे ते वाचकांनी ठरवावे. यज्ञोपवीत वापरण्याचा संबंध गोत्र स्वीकारण्याशी होता, असा माझा खुलासा आहे. यज्ञोपवीत वापरण्याचा हेतू त्या माणसाला एखाद्या गोत्राला बांधून घेण्याचा होता. उपनयन विधी म्हणून जो असे त्याच्याशी यज्ञोपवीताचा काही एक संबंध नव्हता. कारण वेदांचा अभ्यास करण्यासाठी एखाद्या माणसाला दीक्षा देणे हा उपनयन विधीचा हेतू होता. प्राचीन काळी आर्य समाजाचा जो कायदा होता त्याप्रमाणे मुलाला आपल्या बापाचे गोत्र नैसर्गिक रीतीने मिळत नसे. याबद्दल कोणाला स्पष्ट कल्पना आलेली नाही. बापाला आपले गोत्र मुलाला द्यावयाचे असेल तर त्यासाठी त्याला एक खास विधी करावा लागत असे. हिंदी आर्य समाज जे दोन नियम पाळीत असे, ते या बाबतीत लक्षात घेतले पाहिजेत. एक नियम अस्वच्छतेबद्दलचा, दुसरा नियम दत्तक घेण्याबद्दलचा, माणसाच्या मृत्यूमुळे जी अस्वच्छता पाळली जात असे ती किती दिवस पाळली पाहिजे, हे मृत माणूस ज्या नात्याचा असे त्यावर अवलंबून असे. ते नाते जर फार जवळचे असेल तर अस्वच्छता पाळण्याचे दिवस (सुतक) जास्त असत व ते नाते जर लांबचे असेल तर अस्वच्छता पाळण्याचे दिवस त्यापेक्षा कमी असत. यज्ञोपवीत विधी केलेला नाही असा मुलगा मेला तर त्यामुळे जी अस्वच्छता निर्माण होते ती पाळण्याचे दिवस अगदी थोडे असत. (मनुस्मृती, अध्याय ५, श्लोक ६६-७० पहा) ज्या मुलाचा यज्ञोपवीत विधी केलेला असे तो दत्तक घेण्यास पात्र नसे. (श्री. काणे यांनी संपादन केलेल्या व्यवहार मयूरव या ग्रंथात उल्लेखित कलिकापुराण पान, ११४. काही कोर्ट खटल्यातही वादी व प्रतिवादी यांनी या मुद्द्याचा आधार घेतलेला आहे. श्री. काणे यांनी अशा खटल्याचा उल्लेख आपल्या ग्रंथात केलेला आहे.) या नियमाच्या

मागे कोणती कल्पना असावी? ती कल्पना अगदी स्पष्ट आहे असे दिसते. मृत झालेल्या मुलाला यज्ञोपवीत नव्हते म्हणून त्याला बापाचे गोत्र यथाक्रमाने मिळालेले नव्हते. त्याच्या मृत्यूमुळे उत्पन्न झालेली अस्वच्छता ही साधारण स्वरूपाची मानली जाते. दत्तक घेणे म्हणजे दत्तक बापाच्या गोत्रात दत्तक मुलाचा प्रवेश करणे. मुलाचा यज्ञोपवीत विधी एकदा कां झाला तर तो मुलगा दुसऱ्या गोत्रात कायमचाच गेला असे होते, म्हणून अशा मुलाला दत्तक घेण्यास वाव रहातच नाही. हे दोन्ही नियम असे दर्शवितात की, यज्ञोपवीताच्या विधीचा संबंध गोत्राशी होता, उपनयनाशी नव्हे.

यज्ञोपवीताचा संबंध गोत्राशी होता हा जो दृष्टिकोन आहे, त्याला जैन वाङ्मयात आधार मिळतो असे दिसते. आचार्य रविशेन यांनी रचलेल्या पद्मपुराणाच्या चौथ्या पर्वातील ८७ व्या श्लोकाचा भावार्थ खालीलप्रमाणे आहे –

"भगवान! क्षत्रिय, वैश्य व शूद्र यांची उत्पत्ती कशी झाली हे आपण आम्हाला सांगितले. जे आपल्या गळ्यात जानवे वापरतात त्यांची उत्पत्ती कशी झाली, हे जाणण्यास मी उत्सुक झालो आहे." (नथुराम प्रेमी यांचा हिंदी ग्रंथ 'जैन साहित्य और इतिहास' यात उद्धृत केलेला मजकूर पा. ५५ अ.)

या श्लोकातील 'जे आपल्या गळ्यात जानवे वापरतात' हे शब्द फार महत्त्वाचे आहेत. या शब्दातील वर्णन ब्राह्मणांचे आहे याबद्दल शंका नाही. यावरून असे स्पष्ट होते की, एकेकाळी फक्त ब्राह्मण लोक यज्ञोपवीत वापरीत होते, दुसऱ्या कोणताही वर्ग ते वापरीत नव्हता. हा मुद्दा आणि गोत्रासंबंधीचे नाते फक्त ब्राह्मण लोकांपुरतेच मर्यादित केलेले होते. म्हणजे गोत्रसंबंधीची नाती फक्त ब्राह्मण लोकांनीच पाळावीत असा अलिखित दंडक होता, हा दुसरा मुद्दा. हे दोन्ही मुद्दे एकत्र लक्षात घेतले तर असे स्पष्ट होते की, वडिलांच्या गोत्रात मुलाला आणण्याचा, त्या गोत्राशी मुलाला प्रत्यक्ष संलग्न करण्याचा यज्ञोपवीताच्या विधीचा हेतू होता. यज्ञोपवीताच्या विधीचा उपनयनाशी कोणत्याही प्रकारचा संबंध नव्हता. मुलाला वेदांचा अभ्यास करण्यासाठी जी दीक्षा द्यावी लागत असे तिच्याशी उपनयनाचा संबंध होता.

वर केलेले स्पष्टीकरण जर खरे धरले तर यज्ञोपवीताचा विधी आणि उपनयनाचा विधी यांचे भिन्न भिन्न हेतू होते असे सिद्ध होते. काही काळानंतर हे भिन्न भिन्न हेतू परस्परांशी मिसळून एकजीव झाले. या दोन हेतूंची अशी सरमिसळ का झाली असावी, याचे स्पष्टीकरण अगदी सहज रीतीने देता येईल. मुलाचा यज्ञोपवीताचा विधी केलेला नसता आचार्याने जर त्याचा उपनयन विधी केला तर त्या मुलाला आपल्या गोत्रात घेणे आचार्याला भाग पडत असे. हा धोका टाळण्यासाठी मुलाचा बाप प्रथम मुलाचा यज्ञोपवीत विधी उरकून घेत असे व नंतर मुलाला आचार्याच्या स्वाधीन करीत असे. मुलाचे यज्ञोपवीत विधी व उपनयन विधी हे एकाच वेळी का करण्यात येऊ लागले, याचे संभवनीय कारण वर सांगितलेले आहे.

ते कसेही असो, उपनयन याचा अर्थ वैदिक ब्राह्मणाने मुलाला वेद शिकविणे असा होतो हे खास.

खऱ्या गोष्टी लक्षात घेऊनच सोडविला पाहिजे असे प्रिव्ही कौन्सिलने आपले मत प्रदर्शित केले.

या विषयावरचा दुसरा खटला इंडियन लॉ रिपोर्ट १०, कलकत्ता ६८८ यामध्ये मिळतो. (राजकुमार लाल विरुद्ध विश्वेश्वर दयाळ) खटल्यात असा प्रश्न उपस्थित केला होता की, 'बिहार प्रांतातील कायस्थ लोक हे क्षत्रिय होते की शूद्र होते?' ते शूद्र होते असा हायकोर्टाने निकाल दिला. कायस्थांची बाजू घेणाऱ्या लोकांनी अशी भूमिका स्वीकारली की, बिहार प्रांतातील कायस्थ हे बंगाल, संयुक्त प्रांत व बनारस या प्रांतांतील कायस्थांहून निराळे होते. आणि संयुक्त प्रांत व बनारस या प्रांतातील कायस्थ शूद्र होते व बिहार प्रांतातील कायस्थ क्षत्रिय होते. कायस्थांच्या बाबतीत केलेला हा भेदभाव कोर्टाने मान्य करण्याचे नाकारले. त्याने असा निकाल दिला की, बिहार प्रांतातील कायस्थ सुद्धा शूद्र होते.

या निकालाची सत्यता अलाहाबाद हायकोर्टाने मान्य केली नाही. न्यायमूर्ती महमूद यांनी या बाबतीत जे विचार प्रदर्शित केलेले आहेत ते इंडियन लॉ रिपोर्ट १२, अलाहाबाद ३२८ याच्या ३३४ पानावर दिलेले आहेत. (तुळसीराम विरुद्ध बिहारीलाल). ते येणेप्रमाणे-

"हिंदुस्थानच्या या भागात लेखणीवर उपजीविका करणारी कायस्थ या नावाची जात अस्तित्वात आहे. या खटल्यातील दोन्ही पक्षाचे लोक या जातीचे आहेत. मनूने तयार केलेल्या जातिसंस्थेप्रमाणे किंवा हिंदुधर्माच्या कयद्याचे जे अधिकृत ग्रंथ आहेत त्यांच्यामध्ये कोठेतरी या जातिसंस्थेसंबंधी कायदेकानू नमूद केलेले आहेत, त्या कायदेकानूंप्रमाणे कायस्थ ही जात शूद्रांच्या वर्गात मोडली जाते अशाप्रकारचा दृष्टिकोन खालच्या दोन्ही कोर्टांनी स्वीकारला आहे, असे दिसते. हा दृष्टिकोन खरा आहे किंवा नाही याबद्दल मला जबरदस्त शंका वाटते. कायस्थ ही जात हिंदुसमाजाचा एक महत्त्वाचा घटक आहे. हिंदुधर्माच्या कायदेकानूंची अंमलबजावणी या जातीसंबंधी केली जाते. तिच्यामुळे जो प्रश्न उत्पन्न होतो तो केवळ मानव संशोधक शास्त्राच्या दृष्टीने नव्हे तर कायद्याच्या दृष्टीनेसुद्धा अत्यंत गहन वाटतो. हा प्रश्न प्रिव्ही कौन्सिलच्या लॉर्डस्नी श्री. सत्यनारायण मित्तर व श्री. मुट्टी किशेन सूनदूरी दास्सी (L.R.I.A. Sup Vol. 149) किंवा महाशोव शोसिनाथ घोस विरुद्ध श्रीमती कृष्णा सुंदरी दास्सी (L.R. 7, I.A. 250) या खटल्यात कायद्याच्या दृष्टीने निकालात लावलेला आहे असे मी समजत नाही. या दोन्ही खटल्यात जे पक्षकार होते ते दक्षिण बंगाल प्रांतात राहणारे कायस्थ होते. त्यांनी दत्तक घेण्यासंबंधीचा प्रश्न कोर्टात उपस्थित केलेला होता. उत्तर हिंदुस्थानातील सीमा प्रांत व औंध इत्यादी प्रांतात राहणाऱ्या कायस्थांच्या बारा जाती आहेत. दक्षिण बंगाल प्रांतात राहणारे कायस्थ या बारा जातींच्या कायस्थांहून वेगळे समजले तरी काही हरकत नाही. चौधरी हजारी लाला विरुद्ध विष्णू दयाल (१८८६ चे पहिले अपील नं. ११३ याचा निकाल १५ जून १८८७ रोजी देण्यात आला) या खटल्यात सुद्धा दत्तक घेण्यासंबंधीचा प्रश्न उपस्थित केलेला होता. या खटल्याचा निकाल विद्वान चीफ जस्टीस (मुख्य न्यायाधीश) व माझे व्यवसायबंधू टिरेल यांनी दिलेला आहे. तो निकाल लॉ

## ३

मी वर मांडलेला सिद्धांत भरभक्कम आहे याबद्दल माझी खात्री आहे. परंतु या सिद्धांताच्या विरुद्ध आक्षेप घेणारे कोणी नसणार अशी मी जर कल्पना केली तर मी जादा आत्मविश्वास बाळगत आहे असे होईल. माझ्या सिद्धांताच्या विरुद्ध जर कोणी आक्षेप घेतले तर ते खालील स्वरूपाचे असतील असा माझा अंदाज आहे -

(१) उपनयनांचे नास्तित्व ही शूद्रत्वाची कसोटी आहे काय?

(२) उपनयनासंबंधी शूद्राला कधी हक्क होता काय?

(३) उपनयनासंबंधीचा हक्क नष्ट झाल्यामुळे शूद्रांची सर्वसाधारण अधोगती झाली ती कशी?

(४) ब्राह्मणांच्या हातात इतकी सत्ता होती काय, की जिच्यामुळे उपनयनासंबंधीचा हक्क शूद्रांना देण्याचे त्यांना नाकारता आले?

माझ्या सिद्धांताविरुद्ध असे संभवनीय आक्षेप मी वर दिलेले आहेत. आता मी त्या आक्षेपांना उत्तर देतो -

## ४

पहिल्या आक्षेपापासून सुरुवात करू या. या आक्षेपाची विल्हेवाट लावण्याचा उत्तम मार्ग म्हणजे शूद्र कोणाला म्हणावे हे ठरविण्याचे सचोटीचे गमक कोणते, यासंबंधी हिंदुस्थानातील  कोर्टांनी त्यांच्यापुढे आलेल्या खटल्यांत जे कायदेशीर निकाल दिलेले आहेत त्या निकालांकडे बोट दाखविणे हा होय.

या बाबतीत उल्लेख करण्यासारखा खटला ७, एम.आय.ए. १८ यामध्ये मिळतो. (चुओहिर्य रणमुर्दन सिंडिकेट विरुद्ध साहुब पुरहुलाद सिंडिकेट). या खटल्याचा निकाल प्रिव्ही कौन्सिलने १८३७ मध्ये दिला. या खटल्यातील वादग्रस्त प्रश्न असा होता की, त्यावेळी हिंदुस्थानात खत्रिय लोक म्हणून कोणी लोक होते काय?' या खटल्यातील एका पक्षाचे असे म्हणणे होते की, हिंदुस्थानात क्षत्रिय लोक आहेत. दुसऱ्या पक्षाचे असे म्हणणे होते की, असे लोक कोणीच नाहीत. ब्राह्मण परशुराम याने सर्व क्षत्रिय ठार मारलेत आणि त्याच्या तडाक्यातून जे क्षत्रिय सुटले त्यांचे निर्दालन शूद्र राजा महापद्म नंद याने केले; म्हणून त्यानंतर जगात क्षत्रिय शिल्लक राहिला नाही आणि जगात फक्त ब्राह्मण व शूद्र हे दोनच वर्ण अस्तित्वात आहेत, अशाप्रकारचा जो सिद्धांत ब्राह्मणांनी तयार केलेला आहे, त्या सिद्धांताचा आधार दुसऱ्या पक्षाच्या लोकांनी घेतला. प्रिव्ही कौन्सिलने हा सिद्धांत मान्य केला नाही; कारण तो ब्राह्मणांनी मुद्दाम तयार केलेला आहे व त्यामुळे तो खोटा आहे असे प्रिव्ही कौन्सिलचे मत पडले. क्षत्रिय अद्याप हिंदुस्थानात अस्तित्वात आहेत असे मत प्रिव्ही कौन्सिलने प्रदर्शित केले. तथापि, क्षत्रिय हा शूद्रापेक्षा निराळा माणूस आहे हे ओळखून काढण्याचे एखादे गमक प्रिव्ही कौन्सिलने आपल्या निकालात नमूद केले नाही. हा प्रश्न प्रत्येक खटल्यातील

रिपोर्टमध्ये नमूद केलेला नाही. वर सांगितलेला प्रश्न या निकालात सोडविलेला आहे, असेही मला वाटत नाही. परंतु या विषयासंबंधी मी आणखी काही जास्त न बोलणे बरे.....

तिसरा खटला (1916-20 Cal W.N. 901) यामध्ये नमूद केलेला आहे. (असित मोहन घोष विरुद्ध निशेद मोहन घोष मौलिक). बंगाल प्रांतातील कायस्थ हे क्षत्रिय होते की शूद्र होते हा प्रश्न या खटल्यात उपस्थित केलेला होता. ते शूद्र आहेत असा बंगालच्या हायकोर्टाने निकाल दिला. या निकालाच्या विरुद्ध प्रिव्ही कौन्सिलकडे अपील करण्यात आले. प्रिव्ही कौन्सिलने या अपीलाचा जो निकाल दिलेला आहे तो (1926, 47.9.A.140) यामध्ये नमूद केलेला आहे. बंगाली कायस्थ हे शूद्र आहेत किंवा क्षत्रिय आहेत या प्रश्नाचा निकाल प्रिव्ही कौन्सिलने दिला नाही. प्रिव्ही कौन्सिलने या प्रश्नाला हात न लावता तो तसाच सोडून दिला. १९१५ आणि १९२६ या सालांच्या मध्यंतरीच्या काळात बंगालचे कायस्थ व तंती (१९२१) ४८ कलकत्ता ६२६-विश्वनाथ घोष विरुद्ध श्रीमती बालाई देसाई आणि डोम [(१९२४ ५१ कलकत्ता ७८७- भोलानाथ मित्तर विरुद्ध राजे बादशहा) या दोन तीन जाती यांच्यामध्ये जे मिश्र विवाह झाले त्यासंबंधी कलकत्ता हायकोर्टाने दोन निकाल दिले. कायस्थांचे तंती आणि डोम या जातीत मिश्रविवाह झाले ते कायदेशीर आहेत. कारण या तिन्ही जाती शूद्र वर्णाच्या उप-जाती आहेत असा तो निकाल होता.

वर सांगितलेल्या निकालांमुळे कायस्थांच्या सामाजिक दर्जाचा प्रश्न अधिक बिकट होऊन तसाच भिजत पडला. यानंतर दुसऱ्या एका खटल्याचा निकाल लागला. तो निकाल इंडियन लॉ रिपोर्ट ६, पाटणा ५०६ (१९२५, ईश्वरी प्रसाद विरुद्ध राई हरीप्रसाद लाल) यामध्ये नमूद केलेला आहे. ज्यांच्यामध्ये कायस्थांसंबंधी काही उल्लेख आहे असे प्रत्येक पुराणातील व प्रत्येक स्मृतीतील उतारे काढून व त्या उताऱ्यांची कायद्याच्या दृष्टीने छाननी करून श्री. न्यायमूर्ती ज्वालाप्रसाद यांनी या खटल्याचा ४८ पानांपेक्षा जास्त पानांचा असलेला अत्यंत सविस्तर निकाल लिहून काढला व तो कोर्टात वाचून दाखविला. कायस्थ शूद्र आहेत असा कलकत्ता हायकोर्टाने जो निकाल दिलेला होता त्याच्याहून निराळा निकाल श्री. न्यायमूर्ती ज्वालाप्रसाद यांनी दिला. तो असा की, बिहार प्रांतातील कायस्थ क्षत्रिय होते.

यानंतर अनुक्रमाने येणारे खटले म्हणजे, मराठे क्षत्रिय आहेत की शूद्र आहेत हा प्रश्न ज्यांच्यामध्ये नमूद झालेला होता, असे खटले होत. हा प्रश्न ज्या खटल्यांमध्ये उत्पन्न केलेला होता असा पहिलाखटला व त्यावरील निकाल ४८ मद्रास १ [(१९२४) कोल्पूरचे महाराज विरुद्ध सुंदरम् अय्यर] यामध्ये नमूद केलेले आहेत. तंजावरच्या राजाच्या इस्टेटीचे रिसीव्हर म्हणून जे गृहस्थ नेमण्यात आलेले होते, त्या गृहस्थाने या खटल्याची फिर्याद कोर्टात दाखल केली होती. राजाचे वंशज व जवळचे आणि दूरचे नातलग व आप्तसंबंध या सर्वांना या खटल्यात प्रतिवादी केलेले होते. मराठी साम्राज्याचे संस्थापक शिवाजी यांचे बंधू व्यंकोजी ऊर्फ एकोजी यांनी तंजावरचे राज्य स्थापन केलेले होते. अर्थात व्यंकोजी हा मराठा होता. या खटल्याचा निकाल २२९ पानांचा आहे आणि मराठे क्षत्रिय होते काय या प्रश्नाचा

उहापोह या निकालात अत्यंत विस्तारपूर्वक रीतीने केलेला होता. मद्रास हायकोर्टाचा हा निकाल असा होता की, मराठे शूद्र होते. या खटल्यातील प्रतवाद्यांचे म्हणणे होते की मराठे क्षत्रिय होते. हे म्हणणे निकालात मान्य केलेले नाही.

यानंतरचा मराठ्यांच्या संबंधीचा दुसरा खटला इंडियन लॉ रिपोर्ट (१९२७), ५२ मुंबई ४९७ (सुब्बराव हंबीरराव पाटील विरुद्ध राधा हंबीरराव पाटील) यात कोर्टाने खालीलप्रमाणे निकाल दिला.

"मुंबई इलाख्यातील मराठ्यांच्या मध्ये तीन वर्ग आहेत. (१) पाच कुले (२) शहाण्णव कुले आणि (३) बाकीचे कुले. यापैकी पहिले दोन वर्ग कायदेशीर रीतीने क्षत्रिय आहेत."

या बाबतीत उल्लेखनीय असा शेवटचा खटला व त्याचा निकाल हे इंडियन लॉ रिपोर्ट (१९२७), ५२ मद्रास १ (मोक्का कोने विरुद्ध अम्माकुट्टी) यामध्ये नमूद केलेले आहेत. मदुरेचे यादव क्षत्रिय होते काय असा प्रश्न या खटल्यात उत्पन्न झालेला होता. आपण क्षत्रिय आहोत असा दावा यादवांनी मांडलेला होता. परंतु मद्रास हायकोर्टाने हा दावा मानला नाही. यादव शूद्र आहेत असा निकाल कोर्टाने दिला.

क्षत्रिय कोण व शूद्र कोण हे ठरविण्याच्या प्रश्नासंबंधी कायद्याने जे निकाल दिलेले आहेत त्यांचे एकंदर स्वरूप वर दिल्याप्रमाणे आहे.

हे निकाल म्हणजे निरनिराळ्या मतांची मिळून केलेली खिचडी होय. या निकालांनी काहीच नक्की ठरवून टाकले नाही. पूर्वी या विषयासंबंधी ज्या कल्पना होत्या त्यांना तर त्यांनी मुळी स्पर्शही केलेला नाही. या कारणामुळे हे निकाल वाचून नक्की कोणती कल्पना ग्राह्य मानावी याबद्दल मोठा संभ्रम उत्पन्न होतो. बिहार प्रांतातील व संयुक्त प्रांतातील आणि बनारस येथील कायस्थ क्षत्रिय आणि बंगालचे कायस्थ शूद्र असे निकाल कोर्टाने दिलेले आहेत! मद्रास हायकोर्टाचे मत असे की मराठे शूद्र आहेत. परंतु मुंबई हायकोर्टाचे मत असे की, पाच कुळीचे व शहाण्णव कुळीचे मराठे हे क्षत्रिय आणि बाकीच्या कुळीचे मराठे शूद्र! कृष्ण यादव कुळात जन्मलेला होता व यादव हे क्षत्रिय होते अशी आतापर्यंतची लोकश्रद्धा. परंतु मद्रास हायकोर्टाचे मत असे की, यादव शूद्र आहेत!

आपल्या मुद्द्याच्या दृष्टीने उपरिनिर्दिष्ट खटल्यांतील निकाल महत्त्वाचे नाहीत. ते निकाल देतांना कोर्टाने कोणते गमक वापरलेले होते ते पाहणे, हे आपल्या मुद्द्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. कोर्टाने आपला निकाल देतांना जी गमके वापरली त्यांपैकी काही खालीलप्रमाणे असावीत –

(१) इंडियन लॉ रिपोर्ट, १० कलकत्ता ६८८ यामध्ये नमूद केलेल्या खटल्यातील निकाल देताना पुढील गमके वापरण्यात आली होती– (अ) दास हा शब्द आडनाव म्हणून वापरणे. (ब) पवित्र यज्ञोपवीत वापरणे. (क) होम करण्याबद्दल अधिकार असणे. (ड) सुतक पाळण्याबद्दलचा काळ. (इ) बिनऔरस मुलाला आपल्या बापाचे हक्क मिळण्याचे अधिकार किंवा अनधिकार.

(२) इंडियन लॉ रिपोर्ट ६, पाटणा ६०६ यामध्ये नमूद केलेल्या खटल्याचा निकाल देताना 'सर्वसाधारण लौकिक' हे गमक वापरले आहे. जर एखादी जात सर्वसाधारण लौकिकाने क्षत्रिय असेल तर ती जात क्षत्रिय जात म्हणून समजण्यात यावी.

(३) ४८ मद्रास १ यामध्ये नमूद केलेल्या खटल्याचा निकाल देताना निरनिराळी गमके वापरण्यात आली होती. जातीबद्दलची जागृती हे एक गमक होते. पवित्र यज्ञोपवीत वापरण्याव्यतिरिक्त उपनयन विधी करणे हे दुसरे गमक होते. आपण क्षत्रिय किंवा वैश्य आहोत असे जर ब्राह्मणेतरांनी सिद्ध करून दाखविले नाही तर ते सर्व ब्राह्मणेतर शूद्र होत असे समजणे हे तिसरे गमक होते.

(४) इंडियन लॉ रिपोर्ट, मुंबई ४९८ यामध्ये नमूद केलेल्या खटल्यात पुढील गमके वापरण्यात आली होती, (अ) जातीबद्दलची जागृती (ब) जातीचे रीतीरिवाज आणि (क) जातीबद्दलच्या असलेल्या जागृतीला इतर जातींची मान्यता.

याविषयाची ज्याला काहीतरी माहिती आहे, तो असे म्हणू शकणार नाही की, निरनिराळ्या कोर्टांनी जी गमके वापरली ती बरोबर आहेत. सुतक पाळण्याचा काळ हे गमक व यासारखी इतर गमके हा प्रश्न सोडविण्याच्या कामात कुचकामाची आहेत. याबाबतीत अशा गमकांना काही किंमत नाही. होम करण्याचा अधिकार हे गमक व सारखी इतर गमके या बाबतीत उपयुक्त ठरतात, परंतु ती ग्राह्य वाटत नाहीत. असल्या प्रकारचे गमक कारणाला कार्य समजण्याची चूक करते. जातीच्या जागृतीबद्दलचे जे गमक आहे ते चांगल्या तऱ्हेचे गमक क्वचितच होईल. जरुरीचे धार्मिक विधी पुष्कळ काळ न केल्यामुळे एखाद्या जातीची जातीबद्दलची जागृती नष्ट झाली असेल. असली जागृती नष्ट होण्याला काही कारणे उपलब्ध झाली असतील व या कारणांवर त्या जातीला काही ताबा चालविता आला नसेल. उपनयनाबद्दलच्या गमकाची पूर्ण माहिती करून घेतली व त्याचा योग्य तो परामर्श घेतला तर ते गमक योग्य व ग्राह्य आहे, याबद्दल शंका नाही. तात्त्विक व व्यावहारिक दृष्टीने जातीची अवस्था उपनयनाच्या संबंधात कशी हाते याबद्दलची नीट फोड कोर्टांनी केलेली नाही. जसे व्यावहारिक दृष्टीने या बाबतीत खरे वाटते तसेच तात्त्विक दृष्टीनेही असले पाहिजे अशी समजूत करून घेऊन कोर्टानी या गमकांचा उपयोग केलेला आहे. उपनयनाच्या गमकाचा उपयोग करताना कोर्टानी अशी चूक केली म्हणून त्यांच्या निवाड्यात विसंगती आणि भंपकपणा उत्पन्न झाला. ह्याची उदाहरणे द्यावयाची तर ती ही की, कोर्टानी एका प्रदेशातील जातीला एक दर्जा आपल्या निकालात दिला व दुसऱ्या प्रदेशात राहणाऱ्या त्याच जातीला दुसरा दर्जा दिला. भामटेगिरीचा अवलंब करून यज्ञोपवीत वापरण्याचा अधिकार सांगणाऱ्या जातीला कोर्टांनी यज्ञोपवीत वापरण्याचा अधिकार दिला व यज्ञोपवीत वापरण्याची पुष्कळ दिवसांची वहिवाट झाल्यानंतर तो अधिकार त्या जातीला कोर्टानी कायमचाच दिला. याच्या उलट, एखादी जात प्रत्यक्षपणे यज्ञोपवीत वापरत नाही म्हणून तिला यज्ञोपवीत वापरण्याचा तात्त्विक दृष्टीने मुळीच अधिकार नाही असा निकाल देऊन कोर्टाने त्या जातीला जबरदस्त शासन दिले. पवित्र यज्ञोपवीत वापरणे हे खरे गमक नाही, तर पवित्र यज्ञोपवीत वापरण्याचा

अधिकार असणे हे खरे गमक आहे. उपनयनाचा अधिकार म्हणजे काय याचा पुरा बोध झाला तर विरोधाची भीती न बाळगता असे म्हणता येईल की, उपनयनाचा अधिकार हीच अशी खरी कसोटी आहे की, जिच्या साहाय्याने एखादा माणूस शूद्र आहे असा त्याचा सामाजिक दर्जा पडताळून पहाता येतो.

५

दुसरा आक्षेप अगदी अग्राह्य आहे. या आक्षेपात असे समजण्यात आलेले आहे की, अगदी प्रारंभापासून हिंदी आर्य समाज आपल्यातील निरनिराळ्या वर्गांना उपनयनाच्या बाबतीत निरनिराळ्या रीतींनी वागवीत असे. हा समज माझ्या मते अगदी अनैसर्गिक आहे. वन्यावस्थेत राहणाऱ्या समाजात अगदी प्रथमतःच भेदभाव उत्पन्न होत नसतात. अशा समाजाची सुरुवात एकोप्यात होत असते व त्याचा शेवट दुहीत होत असतो. प्राचीन काळचा आर्य समाज आपल्यातील सर्व वर्गांना उपनयनाच्या बाबतीत समानतेने वागवीत होता असा समज करून घेतला तर ते नैसर्गिक होईल. उलटअंशी याबाबतीत असेही म्हणता येईल की प्राचीन समाजाची एकोप्याची सद्भावना सर्व बाबतीत दृग्गोचर होत होती असे धरून चालणे ठीक नाही. कारण प्राचीन आर्य समाजाने शूद्र व स्त्रिया यांना उपनयनाचा अधिकार दिलेला नव्हता. केवळ तर्कावर अवलंबून राहण्याची मला गरज नाही, पण माझ्या सुदैवाने तर्क माझ्या बाजूने कौल देत आहे, अशी माझी खात्री आहे. कारण शूद्र आणि स्त्रिया यांना एकेकाळी पवित्र यज्ञोपवीत वापरण्याचा अधिकार होता हे सिद्ध करण्यासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष असा भरपूर पुरावा अस्तित्वात आहे.

खाली दिलेल्या गोष्टी ध्यानात धरल्या म्हणजे हे स्पष्टपणे कळून येईल की, उपनयन हे सर्वांना अगत्याचे आहे असे प्राचीन आर्य समाज मानीत असे.

जे लोक बहिरे, मुके असत त्यांना उपनयनाचा अधिकार दिलेला होता. जे लोक नपुंसक होते त्यांनासुद्धा हा अधिकार दिलेला होता. बहिऱ्या व मुक्या लोकांसाठी जो उपनयन विधी करावयाचा तो एका विशिष्ट पद्धतीने करावा, म्हणून ती विशिष्ट पद्धती शास्त्रात सांगितलेली होती. तशा लोकांचा उपनयन विधी आणि इतर चांगल्या लोकांचा उपनयन विधीयांच्यामध्ये काही प्रमुख बाबतीत भेद ठेवण्यात आलेला होता. बहिरे, मुके व नपुंसक मुलांच्या बाबतीत जो विधी करावयाचा त्यात समिधा अर्पण करणे, दगडावर चालणे, वस्त्र वापरणे, मेखला बांधणे, हरिणाचे कातडे व दंडाही देणे हे सर्व प्रकार काही शब्द न उच्चारता करावे लागत असत. अशा विधीत मुलगा आपले नाव सांगत नसतो. शिजविलेले अन्न किंवा शुद्ध लोणी यांचे अर्घ्य द्यावयाचे ते आचार्याने दिले पाहिजे. या विधीत म्हणावयाचे सर्व मंत्र स्वतः आचार्याला हळूहळू पुटपुटत म्हणावे लागत असत. नपुंसक, आंधळे, वेडे असे लोक आणि फेफरे, पांढरे कोड किंवा महरोग अशाप्रकारच्या रोगांनी पछाडलेले लोक यांचा जो,उपनयन विधी करावयाचा तो वरील प्रकाराप्रमाणेच करावा लागत असे.

सहा प्रकारच्या अनुलोम जातीतील लोकांनाही उपनयनाचा अधिकार होता. क्षत्रिय,

वैश्य आणि रथकार, अंबष्ठ वगैरे ज्या मिश्र जाती आहेत, त्यावरून ही गोष्ट स्पष्ट होते. (बौद्ध गुह्य सूत्र (२-८) काणे : धर्मशास्त्राचा इतिहास (१) पा. २९९) पतितसवित्रिक म्हणून जे लोक होते त्यांना उपनयन करण्याची मुभा होती. ब्राह्मण मुलाचे उपनयन करावयाचे योग्य वय म्हणजे त्याच्या जन्मापासून ८ वे वर्ष, क्षत्रिय मुलाचे ११ वे वर्ष आणि वैश्य मुलाचे १२ वे. पण काही कारणांमुळे या वर्षांपर्यंत अगर त्यानंतर काही दिवसांनी उपनयन करता आले नाही तर उपनयनाचा काळ संपला असे होऊ नये म्हणून या बाबतीत सवड ठेवण्यात आली आहे. या सवडीप्रमाणे ब्राह्मण मुलाचे १६ व्या वर्षापर्यंत, क्षत्रिय मुलाचे २२ व्या वर्षापर्यंत आणि वैश्य मुलाचे २४ व्या वर्षापर्यंत उपनयन करता येत असे. जर मुलाचे उपनयन या वर्षाच्या आत करण्यात आले नाही तर त्यानंतर तो मुलगा सवित्री (पवित्र गायत्री मंत्र) शिकण्यास अपात्र समजला जात असे. अशा माणसांना पतितसवित्रिक किंवा सवित्र-पतित असे मानण्यात येई. उपनयनासंबंधी जे नियम आहेत त्याबरहुकूम बघावयाचे म्हटले तर अशा लोकांचे उपनयन सवलतीचा काळ संपल्यानंतर करता येत नसे. त्यांना वेद शिकविता येत नसे किंवा त्यांच्या घरी होम केला तर त्यात कोणी पुरोहित म्हणून काम करीत नसत आणि त्यांच्याशी कोणी सामाजिक व्यवहार (लग्नसंबंधी वगैरे) करीत नसत. परंतु अशा लोकांनी काही प्रायश्चित्ते घेतली तर त्यांच्या बाबतीत वरील निर्बंध ढिले करण्याची मोकळीक सदर नियमात ठेवण्यात आलेली आहे. (आपस्तंब धर्मसूत्र १-१-१-२८-३१) यामध्ये असा नियम सांगितलेला आहे की, ज्यांचे उपनयन झालेले आहे व जे तीन वेदांचा अभ्यास करण्यास लागले आहेत व ब्रह्मचाऱ्याचे आयुष्य घालवीत आहेत, पण त्यांचे उपनयन योग्यवेळी झालेले नाही अशा मुलांनी १६ व्या किंवा २४ व्या वर्षानंतर ब्रह्मचाऱ्याचे आयुष्य पुढे दोन महिनेपर्यंत घालवावे. (उदा. भिक्षा मागून अन्न आणणे वगैरे) त्यानंतर त्याचे उपनयन करावे. त्यानंतर त्याने प्रत्येक दिवशी अंघोळ करावी. (शक्य असल्यास दिवसातून तीन वेळा आंघोळ करावी) त्यानंतर त्याला वेद शिकवावा. हे प्रायश्चित काहीसे सोपे आहे. परंतु दुसऱ्या प्रायश्चित्तात यापेक्षा घोर कर्मे करण्याबद्दल सांगितलेले आहे. वसिष्ठ धर्मसूत्र ११-७६-७९ आणि वैक स्मार्त, ११-३ यात असे सांगितलेले आहे की, जो माणूस पतित सवित्रिक आहे त्याने उद्दालक व्रत तरी करावे किंवा अश्वमेध करणाऱ्या माणसाबरोबर स्नान करावे अथवा त्याने व्रात्यस्तोम यज्ञ तरी करावा. (काणे, पहा-धर्मशास्त्राचा इतिहास २ (१) पा. ३७७).

ब्रह्मघ्न लोकांना उपनयन करण्याची मुभा होती. ज्याच्या बापाने किंवा आज्याने उपनयन केलेले नाही अशा माणसाला ब्रह्मघ्न समजत असत. या बाबतीत प्रथमतः असा नियम होता की, एखाद्याचा बाप व आजा या दोघांनीही जर स्वतःचे उपनयन केलेले नसेल, तर त्यांना (तीन पिढ्यांना) ब्रह्माचे (पवित्र प्रार्थना किंवा विद्या) मारेकरी म्हणून समजले जाई. इतर लोकांनी अशा माणसांच्या बरोबर सामाजिक व्यवहार करू नये, त्यांचे अन्न सेवन करू नये व त्यांच्याशी विवाहसंबंध करू नयेत. (आपस्तंब धर्मसूत्र, १-१-१ ३२, २-४) या बाबतीत असे प्रायश्चित सांगितलेले आहे की, त्या पिढीतील माणसांनी एक वर्षभर ब्रह्मचाऱ्याचे जीवन घालवावे व त्यानंतर त्यांनी दररोज (तीनदा किंवा एकदा) अंघोळ

करावी व त्यावेळी काही मंत्र म्हणावेत. हे मंत्र म्हणजे ऋग्वेदातील सात पवमनि ऋचा – 'यद अंति यक्क दुरके' अशी सुरुवात झालेल्या ऋचा आणि यजुस् पवित्र (तैत्तिरीय सूत्र, १-२-१-१ = ऋग्वेद १०-१७-१०), तसेच संपवित्र व अंगीरस मंत्र (ऋग्वेद ४-४०-५) ही सर्व मिळून म्हणावीत किंवा व्याहृतीमधून पाणी ओतावे. हे सर्व विधी जो माणूस करील त्याला वेद शिकविणे किंवा न शिकविणे हे ठरविले जाईल. (काणे, पहा पा. ३७८) परंतु अशाप्रकारच्या लोकांच्या बाबतीतसुद्धा हा नियम ढिला करण्यात आला आणि या लोकांनी विहित प्रायश्चित्ते घेतली, तर त्यांना, त्यांची इच्छा आसेल तर, उपनयन करण्याची मोकळीक देण्यात आली.

आजपासून ज्याच्या पिढीत कोणत्याही माणसाचे उपनयन करण्यात आलेले नाही, अशा माणसाच्या बाबतीत आणखी दुसरी सवलत देण्यात आली होती. (आपस्तंब धर्मसूत्र, १-१-२, ५-१०) अशा लोकांना उपनयन करण्याची इच्छा झाली तर त्या लोकांनी प्रायश्चित घ्यावे म्हणजे त्यांना उपनयन करण्याची मुभा दिली जात असे. ते प्रायश्चित्त म्हणजे बारा वर्षे ब्रह्मचाऱ्याचे जीवन जगताना कठीण आणि पवमनि व इतर ऋचा म्हणत स्नान करणे. अशा माणसाने उपनयन केल्यानंतर त्याला गृहस्थाश्रमाची कर्तव्ये कोणती याबद्दल शिक्षण देण्यात येई, त्याला वेद शिकता येत नसत. असा माणूस व पतितसविर्त्रित एकाच दर्जाचे असत. मात्र त्याच्या मुलाला वेद शिकण्याच्या अगोदरचे संस्कार करण्यात येत असत व तो मुलगा त्यानंतर वेद शिकत असे व एखाद्या आर्याप्रमाणे त्याला दर्जा प्राप्त होत असे.

व्रात्य म्हणून ज्या लोकांना समजले जात असे त्यांना उपनयन करण्याची मुभा होती. व्रात्य लोक मूळचे कोण हे नक्की सांगणे कठीण आहे. तीन पिढ्यांत उपनयन न करणारे ते आर्य होते किंवा आर्यत्वाच्या कक्षेबाहेर राहणारे ते आर्येतर होते व ब्राह्मण त्यांना आर्यत्वाची दीक्षा देऊन आर्य-धर्म स्वीकारण्यास लावीत होते हे सांगता येत नाही. कदाचित ते लोक दोन्ही प्रकारचे असावेत. ते काही का असेना, व्रात्यस्तोम नावाचा यज्ञ केला तर व्रात्य लोकांना उपनयनाची मुभा होती याबद्दल संदेह नाही. व्रात्य लोक म्हणजे ब्रह्मचाऱ्याचे आयुष्य पाळण्यास तयार नसलेले, शेती करून किंवा व्यापार-उद्योग करून नीचतम प्रतीचे असे जीवन कंठणारे लोक म्हणजे व्रात्य लोक. अशा लोकांसाठी या चार प्रकारच्या व्रात्यस्तोमांपैकी प्रत्येक प्रकारात शोडसस्तोम यज्ञ नेहमी करावा लागत असे. काणे यांनी "धर्मशास्त्राचा इतिहास," पा. ३८५ यामध्ये ताड्य ब्राह्मण १७-१-१ याचा उल्लेख केलेला आहे. या उल्लेखात अशी कथा आहे की, देव जेव्हा इहलोकापासून स्वर्गलोकी गेले तेव्हा जे काही आश्रित होते की, ज्यांनी इहलोकात व्रात्य जीवन व्यतीत केलेले होते, ते लोक स्वर्गलोकी जाऊ न शकल्यामुळे पृथ्वीतलावर अडकून पडले. हा शोडसस्तोम यज्ञ केला तरच व्रात्य लोकांना वरचा सामाजिक दर्जा मिळू शकत असे. व्रात्य लोकांच्या अंगातील मालिन्य नष्ट करण्याची शक्ती शोडसस्तोमात होती, असे समजले जात असे. व्रात्य लोकांनी व्रात्यस्तोम यज्ञ केला तर ते व्रात्य म्हणून न रहाता उच्च दर्जाला जात व कर्मठ आर्यांच्या बरोबर सामाजिक व्यवहार करण्यास पात्र होत. त्यांचे उपनयन करण्यात येई व नंतर ते

वेदाभ्यासाला पात्र होत.

बारा पिढ्या गेल्यानंतरसुद्धा योग्य ती प्रायश्चित्ते घेऊन व्रात्य लोकांना शुद्ध करून घेण्याबद्दलची तरतूद व्रात्य शुद्धिसंग्रह यामध्ये केलेली आहे. (काणे 'धर्मशास्त्राच्या इतिहस' पा. ३८७).

उपनयनाला इतके महत्त्व देण्यात आले होते की, बौद्धायन (२-१०) यात अश्वत्थ (वड) झाडालासुद्धा उपनयन करण्याबद्दल मुभा दिली होती.

वर सांगितलेल्या सर्व गोष्टी लक्षात घेतल्या तर आर्य समाजाने अगदी प्रारंभापासून स्त्रिया व शूद्र यांना उपनयनाचा अधिकार दिला नव्हता, या म्हणण्यावर विश्वास ठेवणे कठीण आहे. हिंदी-इराणी व हिंदी-आर्य यांच्यात संस्कृती व धर्म यांचे बाबतीत परस्परांशी फारच जवळचे नाते होते. हिंदी-इराणी लोकात एक रिवाज चालू होता, तो या बाबतीत लक्षात घेणे जरूर आहे. हिंदी-इराणी समाजात जेवढे वर्ग अस्तित्वात होते त्या सर्व वर्गातील पुरुष व स्त्रिया यांना पवित्र यज्ञोपवीत देण्यात येत असे. अशाप्रकारची पद्धत हिंदी-आर्य समाजात रूढ न होता निराळीच पद्धत रूढ का झाली, याची कारणे सांगण्याची जबाबदारी मी मांडलेले सिद्धांत खोडून काढण्याची ज्यांची इच्छा आहे अशा लोकांची आहे.

तथापि, परिस्थित्यनुरूप उत्पन्न झालेल्या पुराव्यांवर भिस्त ठेवणे अगदी जरूरीचे नाही. स्त्रियाा व पुरुष या दोघांनाही उपनयनाचा अधिकार एकेकाळी होता व उपनयनाचा विधी त्या दोघांच्याही बाबतीत करण्यात येत असे हे सिद्ध करण्यास प्रत्यक्ष भरपूर पुरावा अस्तित्वात आहे.

स्त्रियांचे उपनयन करण्याच्या बाबतीत हिंदुधर्मशास्त्रांची मते सर्वश्रुत आहेत. (पुरुषार्थ या मासिकाच्या सप्टेंबर १९४० च्या अंकात या मुद्द्यासंबंधी शास्त्रातील सर्व आधार एकत्र दिलेले आहेत) - जो त्या मतांची छाननी करून पाहील त्याला हे आढळून येईल की, स्त्रियांना उपनयन करण्याची मुभा होती. स्त्रियांनी वेदाभ्यास केलेला होता, एवढेच नव्हे तर वेद शिकविण्याच्या शाळा स्त्रिया चालवीत असत आणि स्त्रियांनी पूर्वमीमांसा यावर टीकाही लिहिलेल्या होत्या, असे समजले जाते.

शूद्रांचे उपनयन करण्यात येत होते किंवा नाही या बाबतीत सुद्धा भरपूर पुरावा अस्तित्वात आहे. जर सुदास राजा होता, जर सुदास शूद्र होता, जर त्याचा राज्याभिषेक विधी वसिष्ठाने केला होता आणि जर त्याने राजसूय यज्ञ केलेला होता, तर मग शूद्र एकेकाळी यज्ञोपवीत वापरीत होते याबद्दल शंकाच रहात नाही. परिस्थित्यनुरूप उत्पन्न झालेले पुरावे व धर्मशास्त्रातील पुरावे वर सांगितलेले आहेत. यांच्याशिवाय 'संस्कार गणपती' या ग्रंथात पुरावा सापडतो. शूद्र लोक उपनयनाला पात्र होते अशी स्पष्ट तरतूद या ग्रंथात केलेली आहे. याबद्दल मॅक्स मुल्लर यांनी उल्लेख केलेला आहे. (History of Ancient Sanskrit Literature 1860, p.207).

स्त्रिया व शूद्र यांच्यात उपनयनाच्या बाबतीत एक फरक आहे. स्त्रियांचे उपनयन बंद का करण्यात आले. याबद्दल तर्काला पटणारे असे काहीतरी स्पष्टीकरण देण्यात आलेले

आहे. परंतु शूद्रांचे उपनयन बंद का करण्यात आले याबद्दल मात्र कसल्याही प्रकारचे स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही. उपनयनाचे वय व स्त्रियांचे लग्न करण्याचे वय ही जोपर्यंत निरनिराळी होती तोपर्यंत स्त्रियांचे उपनयन करण्यात येत असे, असा युक्तिवाद करण्यात येतो. या बाबतीत असे सांगण्यात येते की, प्राचीन काळी उपनयन ठरलेल्या वर्षी करण्यात येई व लग्नाची वयोमर्यादा त्याच्यापुढे बरीचशी असे. परंतु काही काळ लोटल्यानंतर लग्नाची वयोमर्यादा ८ व्या वर्षावर आणून सोडली व त्यामुळे असा परिणाम झाला की, स्त्रियांच्या बाबतीत उपनयनविधी जो तोपर्यंत एक स्वतंत्र विधी होता, तो त्यानंतर लग्नाच्या समारंभात उरकून घ्यावा लागल्यामुळे त्याचे स्वतंत्र अस्तित्व नष्ट झाले. स्त्रियांचे उपनयन बंद करण्यात का आले याबद्दलचा हा खुलासा बरोबर आहे की चुकीचा आहे ही गोष्ट अलाहिदा आहे. येथे मुख्य मुद्दा असा आहे की, शूद्रांना एकेकाळी उपनयन खुले होते. परंतु काही काळानंतर ते बंद करण्यात आले आणि त्यामुळे जो हा फरक झाला तो का झाला याच्याबद्दल मात्र कसलाही खुलासा अस्तित्वात नाही.

मी वर जो पुरावा दिलेला आहे तो लक्षात घेऊनसुद्धा शूद्रांना उपनयनाचा कधी काळी अधिकार होता काय, हा आक्षेप खरा मानण्याबद्दल जे लोक अट्टाहास करतात त्यांची बाजू लंगडी पडली आहे. शूद्रांना उपनयनाचा अधिकार मिळालेला नव्हता असे मानले तरी या लोकांच्या पुढे असा प्रश्न उभा राहतो. की, शूद्रांना उपनयनाचा अधिकार नाही, एवढेच केवळ जीर्णमताभिमान्यांचा सिद्धांत निवेदन करतो. परंतु शूद्रांचा उपनयन विधी का केला जात नाही, याबद्दल तो सिद्धांत काही खुलासा करीत नाही. शूद्र हा अनार्य होता. म्हणून त्याला उपनयनाचा अधिकार नव्हता. असा जे एक खुलासा पुढे करण्यात येतो तो अगदी अलीकडच्या काळात तयार केलेला आहे. शूद्रांना एकेकाळी उपनयनाचा अधिकार होता असे तरी एक म्हणावे लागेल किंवा शूद्रांना अगदी प्रारंभापासून उपनयनाचा अधिकार दिलेला नव्हता असे तरी म्हणावे लागेल. कदाचित् या दोन्ही गोष्टी खऱ्या असतील. परंतु यापैकी खरी गोष्ट कोणती हे ठरविण्याच्या अगोदर ती खरी कशी हे सिद्ध करण्यास कारणे दिली पाहिजेत. शूद्रांना उपनयनाचा अधिकार का देण्यात आला नाही, या मुद्द्यावर एकही कारण सांगण्यात येत नाही अशी वस्तुस्थिती आहे. म्हणून शूद्रांना उपनयनाचा अधिकार होता. परंतु तो त्यांच्याकडून हिरावून घेण्यात आला, असा जो सिद्धांत आहे तोच खरा मानावा लागतो. शूद्रांचा उपनयनासंबंधीचा अधिकार का हिरावून घेण्यात आला याबद्दल मी कारणे दिलेली आहेत.

## ६

तिसरा आक्षेप हा मुळी आक्षेपच नव्हे. ज्या माणसाला उपनयनाच्या सर्व खाचाखोचा संपूर्णपणे माहीत नाहीत तोच हा खरा असे समजून त्याला उचलून धरण्याचा आग्रह करील.

आर्य समाज काही विधींना संस्कार समजत असे, असले संस्कार चाळीस आहेत असे गौतम धर्मसूत्र (७-१४-२४) निवेदन करते. ते संस्कार येणेप्रमाणे -

गर्भधान पुंसवन, सीमंतोन्नयन, जातकर्म, नामकर्मन, अन्नप्राशन, कौल, उपनयन, वेदांचे चार व्रत, स्नान (किंवा समवर्तन), विवाह, दररोजचे पाच महायज्ञ (देव, पितृ, मनुष्य, भूत आणि ब्रह्म यांच्याकरिता); सात पाकयज्ञ (आस्तक, पर्वणस्थालिपराक, श्राद्ध, श्रावणी, अगृहयाणी, कैत्री, अश्वयुजी), सात हविर्यज्ञ (ज्यात अर्घ्य जाळतात पण सोम अर्पण करीत नाहीत त्यांची नावे-अग्न्यध्येय, अग्निहोत्र, दर्शपूर्णमस, अग्रयान, कतुर्मास्व, निरुधपशुबंध व सौत्रमणि); सात सोमयज्ञ (अग्निस्तोम, अत्याग्निस्तोम, उक्थ्य, सोडसिन, वाजपेय, अतिरात्र, आप्तोर्यम).

काही काळ लोटल्यानंतर संकुचित अर्थाने संस्कार म्हणजे काय व व्यापक अर्थाने संस्कार म्हणजे काय असा संस्कारामध्ये फरक केलेला असावा असे दिसते. व्यापक अर्थाने जे संस्कार 'संस्कार' म्हणून समजले जात होते ते खरोखर यज्ञ होत आणि म्हणून त्यांची संस्कार या खऱ्या अर्थाने गणना करण्यात आलेली नव्हती. खऱ्याखुऱ्या अर्थाने जे संस्कार समजले जात होते त्यांची संख्या सोळावर आणून सोडण्यात आली होती.

संस्कारासंबंधी विचित्रपणा असा काहीच बघावयास मिळत नाही. प्रत्येक समाज संस्काराला महत्त्व देतो. उदाहरणार्थ, बास्टिझम, कन्फर्मेशन, विवाह, एक्स्ट्रीम ॲक्शन, युकॅरिस्ट, दी लॉर्डस् सपर आणि होली कम्युनियन यांना ख्रिस्ती लोक संस्कार मानतात. तथापि संस्कारांच्या बाबतीत, हिंदी-आर्य व ख्रिस्ती लोक यांच्यात मतभेद आहे, असे दिसते. ख्रिस्ती लोकांच्या कल्पनेप्रमाणे संस्कार म्हणजे काही विशिष्ट विधी केल्यानंतर परमेश्वराच्या कृपेने प्राप्त होणारी शुद्ध आध्यात्मिक अवस्था. तिला सामाजिक महत्त्व नाही. हिंदी-आर्य समाजात संस्कारांना प्रथमतः शुद्ध आध्यात्मिक महत्त्व होते. पूर्वमीमांसेचा कर्ता जैमिनी याने संस्काराबद्दल जे म्हटलेले आहे त्यावरून हे स्पष्ट होते. त्यांच्या मताप्रमाणे असा सर्वसाधारण सिद्धांत दिसतो की, संस्कार माणसाला दर्जा प्राप्त करून देतात. त्यांचे दोन परिणाम दिसून येतात. ते अंगातील मालिन्य दूर करतात आणि नवे सद्गुण उत्पन्न करतात. एखाद्याच्या अंगात संस्कार नसतील तर तो यज्ञ करण्यास पात्र होत नाही व संस्कार नसताना जर त्याने यज्ञ केला तर त्याला यज्ञाचे फळ मिळणार नाही. उपनयन हा एक संस्कार होता व इतर संस्कारांप्रमाणे याचे महत्त्व केवळ आध्यात्मिक होते. शूद्रांना उपनयन नाकारले त्यामुळे साहजिकच उपनयनाच्या महत्त्वात फरक घडवून आणला गेला. प्रथम त्याला आध्यात्मिक महत्त्व होते, त्यात पुढे सामाजिक महत्त्वाची भर पडली. पूर्वी त्याला सामाजिक महत्त्व मुळीच नव्हते. जेव्हा उपनयनाचा अधिकार प्रत्येकाला, आर्याला व अनार्याला, होता तेव्हा त्याला सामाजिक महत्त्व नव्हते. तो अधिकार सर्वसाधारण सर्व लोकांचा होता. तो अधिकार काही थोड्या विवाक्षित लोकांचा नव्हता. जेव्हा तो अधिकार शूद्रांपासून हिरावून घेतला, तेव्हा या अधिकाराचे महत्त्व मोठे होते. हा अधिकार धारण करणारा माणूस मोठा मानमरातब मिळवीत असे. उलट हा अधिकार नसलेला माणूस हीन दर्जाचा समजला जाऊ लागला. शूद्रांना उपनयनाचा अधिकार न दिल्यामुळे हिंदी-आर्य समाजात एक नवी प्रथा सुरू झाली. या प्रथेने शूद्रांना आपल्या वरील वर्गाकडे श्रेष्ठतम वर्ग

म्हणून पहाण्याची दृष्टी आली व शूद्र हे कनिष्ठ आहेत अशी अहंगंडाची दृष्टी वरिष्ठ वर्गामध्ये आली. उपनयन नष्ट झाल्यामुळे शूद्रांची जी अधोगती झाली ती ही अशी!

उपनयनाची दुसरी उदाहरणे आहेत. पूर्वमीमांसाचे जे नियम आहेत त्यांचा विचार केला तर कोणालाही याबद्दल थोडी कल्पना येईल. (See Garganath Jha-Purva Mimansa pp. 368-369 & 171-172) यापैकी एक नियम असा आहे की, एखाद्याची इस्टेट आहे ती प्रायः यज्ञकार्यासाठी तिचा उपयोग व्हावा, अशासाठी आहे. इस्टेटीवरचा हक्क हा यज्ञ करणाऱ्या पात्रतेवर अवलंबून असतो. (मनुस्मृती व इतर स्मृती यांनी स्त्रिया व शूद्र यांना इस्टेट करण्याचा व वेद शिकण्याचा अधिकार का दिलेला नाही हे फार थोड्या लोकांना समजते. हे निर्बंध पूर्वमीमांसेतील नियमांचे नैसर्गिक परिणाम आहेत ही गोष्ट लक्षात ठेवली तर या बाबतीतील गूढ आपोआप सुटते. स्त्रिया व शूद्र यांना केवळ त्या स्त्रिया व शूद्र आहेत म्हणून इस्टेट करता येत नाही व म्हणून त्यांना यज्ञ करण्याचा अधिकार नाही) हेच दुसऱ्या शब्दात सांगावयाचे म्हटले तर ज्याला यज्ञ करण्याचा अधिकार नाही त्याला इस्टेट करण्याचा अधिकार नाही. यज्ञ करण्याचा अधिकार उपनयनावर अवलंबून आहे. याचा अर्थ असा की, उपनयनाचा अधिकार आहे त्यांनाच फक्त इस्टेट करण्याचा अधिकार आहे.

पूर्वमीमांसेचा नियम असा आहे की, यज्ञात वैदिक मंत्र म्हटले पाहिजेत. म्हणजेच यज्ञ करणाराने वेदांचा अभ्यास केलेला असला पाहिजे. ज्याने वेदांचा अभ्यास केलेला नाही तो यज्ञ करण्यास योग्य नाही. ज्यांचा उपनयन विधी झालेला आहे त्यांनाच वेदांचा अभ्यास करता येतो, हेच दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे म्हटले तर, ज्ञानार्जन व विद्यार्जन म्हणजेच वेदाभ्यास करणे हे उपनयनावर अवलंबून आहे. ज्याचे उपनयन झालेले नसेल त्याचा ज्ञानाकडील मार्ग बंद. उपनयन हा दिसतो इतका साधा विधी नाही. इस्टेटीचा अधिकार व ज्ञानाचा अधिकार या उपनयनाच्या दोन अत्यंत महत्त्वाच्या पायऱ्या आहेत.

उपनयन नष्ट झाल्याने शूद्रांची अधोगती झाली हे ज्यांना आकलन करता येत नाही त्यांनी वर सांगितलेले पूर्वमीमांसेतील नियम लक्षात ठेवले तर, त्यांना हा मुद्दा समजण्यास जड जाणार नाही. उपनयन व शिक्षण यांचे नाते काय आहे याची एकदा जाणीव झाली तर केवळ उपनयन नष्ट झाल्यामुळे शूद्रांची अधोगती झाली हा सिद्धांत समजण्याच्या बाबतीत जी अडचण भासते ती दूर झालीच पाहिजे.

वर केलेल्या विवेचनावरून हे दिसून येईल की, प्राचीन आर्य समाजात उपनयनाच्या संस्काराला किती प्राधान्य देण्यात येत होते आणि त्याच्यावर माणसांचा सामाजिक दर्जा आणि माणसाचे वैयक्तिक हक्क कसे अवलंबून होते. ज्याला उपनयन नसेल त्या माणसाला सामाजिक अधोगतीच्या, अज्ञानाच्या आणि दारिद्र्याच्या गर्तेत लोटण्यात येत असे. उपनयन विधी करण्याचे बंद करणे हे भयंकर शस्त्र ब्राह्मणांनी शूद्रांच्या विरुद्ध सूड उगविण्यासाठी शोधून काढले. ॲटम बॉंबप्रमाणे त्याचा परिणाम झाला. ब्राह्मणांच्याच शब्दांत सांगावयाचे तर त्या शस्त्राने शूद्रांची स्मशानभूमी केली.

शूद्रांना उपनयन नाकारण्याचे सामर्थ्य ब्राह्मणांच्या अंगात होते त्याबद्दल वाद नाही. परंतु ब्राह्मणांच्या अंगात अशाप्रकारची शक्ती होती, याबद्दल कोठेही उल्लेख केलेला आढळत नाही. म्हणून या शक्तीबद्दल शंका घेण्यास वाव राहतो. ते काही असो, ज्यांना हिंदी–आर्य समाजाच्या धार्मिक शासनपद्धतीची माहिती नाही त्यांच्या मनात जर वरील प्रकारची शंका उत्पन्न झाली असेल तर ती पुढील दोन गोष्टी लक्षात घेतल्या तर नष्ट होईल – (१) उपनयनाच्या वेळी पुरोहितपणा करण्याचा ब्राह्मणाचा एकमेव हक्क आणि (२) अनधिकृत उपनयनाच्या वेळी पुरोहितपणा करणाऱ्या ब्राह्मणाला सांगितलेल्या शिक्षा.

अगदी प्राचीन काळी बाप मुलाला गायत्री मंत्र शिकवीत असावा व त्यानंतर त्या मुलाला वेदाभ्यास करता येत असावा. काही काळ लोटल्यानंतर उपनयन विधीचा समारंभ शोधून काढण्यात आला व त्याचा उपयोग करण्यात आला हे शक्य आहे. परंतु मुलाचा उपनयन विधी गुरूने म्हणजे आचार्याने केला पाहिजे व मुलाने आचार्याच्या घरी जाऊन राहिले पाहिजे ही रूढी फार पुरातन कालापासून रूढ झालेली होती याबद्दल वाद नाही.

आचार्य कोण असावा व त्याचे गुणधर्म व त्याची लायकी काय असावी या प्रश्नाबद्दल फार प्राचीन काळापासून उहापोह होत आलेला आहे.

आचार्य वेदाभ्यासात पारंगत असले पाहिजेत. आपस्तंब धर्मसूत्र (१–१–१–११), काणे, २ (१) पा. ३२४ म्हणते, "ज्या ब्रह्मचाऱ्याचे उपनयन विद्याहीन आचार्य करतो तो ब्रह्मचारी एका काळोखातून दुसऱ्या काळोखात प्रवेश करतो, त्याचप्रमाणे तो विद्याहीन आचार्य एका काळोखातून दुसऱ्या काळोखात प्रवेश करते."

आपस्तंब धर्मसूत्र (१–१–१२–१३) म्हणते की, उपनयन करण्यासाठी आचार्य असा शोधून काढावा की, जो अत्यंत विद्वान आहे, याचे कुटुंब वंशपरंपरागत विद्वत्तेत प्रवीण आहे, जो मनाने गंभीर आहे आणि अशाच आचार्याच्या हाताखाली ब्रह्मचर्य संपेपर्यंत मुलाने वेदांचा अभ्यास संपवावा; मात्र हा अभ्यास संपवताना ते आचार्य धर्मपंथापासून यत्किंचितही च्युत झालेला नाही हे मुलाने व त्याच्या बापाने पाहिले पाहिजे. [(या बाबतीत (Quoted in Sam. p. 408) व्यासाचे मत असे आहे की, आचार्याने वेदाभ्यासाला सर्वस्वी वाहून घेतलेले असले पाहिजे, त्याला धर्माची उत्तम माहिती पाहिजे, त्याचा जन्म चांगल्या कुटुंबात झालेला असला पाहिजे, तो स्वतः आचरणाने शुद्ध असला पाहिजे, वेदशाखेचा अभ्यास करून त्याने क्षोत्रीय हे उपपद मिळविलेले असले पाहिजे आणि तो स्वतः आळखी नसला पाहिजे. ज्याने वेदाच्या एका शाखेचा अभ्यास केलेला आहे त्याला क्षोत्रीय म्हणावे, अशी श्रोत्रीय या शब्दाची व्याख्या करण्यात येते.]

परंतु आचार्यांची पहिली आणि सर्वात अधिक श्रेष्ठ लायकी म्हणजे तो ब्राह्मण असला पाहिजे. एखाद्या अडचणीच्यावेळी म्हणजे आचार्य उपलब्ध नसेल तर क्षत्रिय किंवा वैश्य आचार्य कामाला चालत असे. या बाबतीत विशेष विचित्र अशी गोष्ट म्हणजे क्षत्रिय

किंवा वैश्य आचार्यांचे जे ब्राह्मण विद्यार्थी ब्रह्मचारी असत, त्यांना आचार्यांची सेवा करावी लागे. आचार्यांच्या मागे ब्राह्मण विद्यार्थ्यांनी फिरले की ही सेवा घडतअसे. आचार्यांचे अंग रगडणे, पाय धुणे वगैरे गोष्टी विद्यार्थ्यांना कराव्या लागत नसत. (आपस्तंब धर्मसूत्र २, ३, ४, २५-२८, गौतम ७, १-३, बौध, स. १, २, ४०-४२; मनू २, २४१ पहा) याशिवाय असाही एक प्रघात रूढ होता की, ब्राह्मणाने क्षत्रिय किंवा वैश्य आचार्यांकडे शिकण्याची इच्छा प्रदर्शित केली तरच त्या क्षत्रिय किंवा वैश्य आचार्याला ब्राह्मणाला शिकविता येत असे. केवळ क्षत्रिय किंवा वैश्य आचार्याला इच्छा असूनही ब्राह्मणाला शिकवता येत नसे. वेद शिकणे आणि वेद शिकविणे यांच्यामध्ये जेव्हा फरक मानण्यात आलेला नव्हता, तेव्हा हा अपवाद अस्तित्वात राहू दिला होता. हा फरक फार प्राचीन काळात मानण्यात आला.याच मुद्द्यावर वसिष्ठ आणि विश्वामित्र यांच्यामध्ये झगडा सुरू झाला आणि उपनयनाच्या विधीमध्ये पुरोहितपणा करण्याची पात्रता फक्त ब्राह्मण लोकांनाच प्राप्त झाली.

म्हणून एक गोष्ट ठाम झालेली होती, हे धरून चालले पाहिजे. ती गोष्ट म्हणजे ब्राह्मणाशिवाय इतर कोणीही उपनयन विधी करू शकत नसत. कोणी तसा उपनयन विधी केलेला असला तरी तो विधी शास्त्रशुद्ध समजला जात नसे व ते खरे उपनयन समजले जात नसे.

कोणतेही धार्मिक स्वरूपाचे अनधिकृत कृत्य करावयाचे नाही हा हिंदी-आर्य समाजाच्या धार्मिक पद्धतीतील दुसरा शासनदंडक होता व ब्राह्मणाचे कर्तव्यकर्म म्हणून याला विहित करण्यात आलेले होते. या कर्तव्यकर्माप्रमाणे ब्राह्मणाने जर वर्तन केले नाही तर त्याला शिक्षा भोगावी लागत असे किंवा प्रायश्चित घ्यावे लागत असे. अशाप्रकारच्या पुष्कळ शिक्षा प्राचीन काळच्या (धर्मशास्त्र) कायद्याच्या ग्रंथात मिळतात. मनू व पराशर यांचा येथे उल्लेख करणे आवश्यक आहे.

कोणत्या वर्गाचे ब्राह्मण देवांना व पितरांना अर्घ्य देण्यास अपात्र समजले पाहिजेत याबद्दल मनूने (३-१५) यादी दिलेली आहे. याने या यादीत खालील ब्राह्मणांचा समावेश केलेला आहे -

३-१५६, "जो ठराविक वेतन घेऊन शिकवितो आणि जो त्याच अटीवर शिक्षण घेतो. जो शूद्र विद्यार्थ्यांना शिकवितो व ज्यांचा शिक्षक शूद्र आहे, जो उन्मत्तपणे बोलतो, जो व्यभिचारी स्त्रीचा मुलगा आहे वा जो विधवेचा मुलगा आहे."

पराशर म्हणतो (Quoted by Vyavahar Mayurav edited by Kane p. 115),

जो ब्राह्मण दक्षिणा, मिळण्याच्या आशेने शूद्राच्या तर्फे अग्नीमध्ये अर्घ्य अर्पण करतो तो शूद्र होईल आणि ज्या शूद्रातर्फे तो ब्रह्मण अर्घ्य अर्पण करतो तो शूद्र ब्राह्मण होईल. माधवाच्या मताप्रमाणे त्या विधीचे श्रेय शूद्रालाच जाते व पाप ब्राह्मणाला लागते.

उपनयनाचा अधिकार शूद्रांच्या कडून हिरावून घेण्याइतके ब्राह्मणांच्या हातात अधिकार होते काय असे जे विचारतील त्यांनी पुढील दोन गोष्टींचा संमिश्र परिणाम काय होतो, याचा विचार करावा - (१) उपनयनाच्या वेळी ब्राह्मणांना पुरोहितपणा करण्याचा

एकमेव अधिकार होता आणि (२) अनधिकृत उपनयन केले तर ब्राह्मणाला शिक्षा भोगाव्या लागत असत. उपनयन करण्याचे नाकारणे हे अधिकार ब्राह्मणांना मिळाले व उपरिनिर्दिष्ट दोन गोष्टींचाच हा संश्रिम परिणाम झाला याबद्दल मुळीच संशय नाही. असल्या तऱ्हेचा अधिकार ब्राह्मणांना प्रत्यक्ष मिळालेला नाही किंवा तो कोणी स्वखुशीने त्यांना दिलेला नाही हे खरे आहे. परंतु असला अधिकार त्यांना अप्रत्यक्ष रीतीने पण जास्त परिणामकारक उपायांनी आपोआप आस्ते आस्ते मिळत गेला, म्हणून तो त्यांना कोणी राजरोसपणे देण्याची मुळीच जरुरी राहिली नाही.

उपनयन नाकारण्याची आपणास सत्ता आहे, याची ब्राह्मणांना जाणीव आहे याबद्दल सुद्धा वाद नाही. या बाबतीत जी ऐतिहासिक कागदपत्रे उपलब्ध आहेत त्यांच्यावरून असे दिसते की, अनेक जातींच्या विरुद्ध ब्राह्मणांनी या सत्तेचा उपयोग केलेला आहे व त्यापैकी १६ खटले कोर्टात गेले होते. नऊ खटल्यांत ब्राह्मणांनी कायस्थांचे उपनयन करण्याचे नाकारलेले होते. एका खटल्यात ब्राह्मणांनी पळशे ब्राह्मणांचे उपनयन करण्याची नाकारले होते. विशेष महत्त्वाचे हे की, ब्राह्मणांनी खुद्द दोन मराठे राजांचे उपनयन करण्याचे नाकारले होते. ही उदाहरणे इ.स. ५५६ ते १९०४ च्या दरम्यान घडून आलेली आहेत. ही उदाहरणे पुरातन काळची नाहीत ही गोष्ट खरी. तथापि ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, ही उदाहरणे म्हणजे उपनयन नाकारण्याची ब्राह्मणांनी जी शिरजोरी केली तिचे पुरावे आहेत. ब्राह्मणांनी ही शक्ती फार पुरातन काळी कमविलेली असली पाहिजे, हे सामर्थ्य त्यांनी प्राचीन काळी कमावून घेतले असले पाहिजे हे म्हणणे काही वावगे नाही, त्याला आधार आहे. सत्यकाम जाबालीचे उदाहरण फारच प्राचीन काळचे आहे. एखाद्याचा वर्ण त्याच्या गुणांवरून (मानसिक व नैतिक सद्गुण) ओळखता येतो, जन्मावरून नव्हे हे दाखविण्यासाठी त्या उदाहरणाचा दाखला बहुधा घेतला जातो ही गोष्ट खरी आहे. त्याचप्रमाणे जाबालीच्या उदाहरणावरून हेच सिद्ध होते की, फार प्राचीन काळीसुद्धा ब्राह्मणांनी उपनयन नाकारण्याचा अधिकार प्राप्त करून घेतलेला होता.

आपल्या उद्दिष्टाला अनुरूप अशा बऱ्याच गोष्टी आतापर्यंत सांगितल्या. परंतु त्या गोष्टींवरून कोणते सारांश निघतात याची जाणीव जरी आपणाला होत नसेल तर त्या गोष्टींचा आपल्या उद्दिष्टाला काय उपयोग? हे सारांश काढण्यासाठी प्रत्येक गोष्टीचा तपशील माहीत करून घेतला पाहिजे. दुर्दैवाने, बहुधा या सर्व गोष्टींचा शेवट माहीत आहे, परंतु त्यांच्या तपशीलासंबंधी सविस्तर माहिती उपलब्ध नसल्यामुळे त्या गोष्टींमधून कोणत्याही प्रकारचे सारांश काढण्यास वाव राहात नाही. परंतु एक गोष्ट अशी आहे की, जिच्यासंबंधी तपशील परिपूर्ण आणि जगजाहीर आहे. ती गोष्ट म्हणजे शिवाजी विरुद्ध ब्राह्मण ही कहाणी फार महत्त्वाची आहे आणि म्हणून तिचे सविस्तर विवेचन करणे योग्य आहे. तिच्यापासून जे सारांश निघतात ते नुसते मनोरंजक आणि मार्गदर्शक नाहीत, तर ते आपल्या विवाद्य मुद्द्यावर प्रकाशाचा झोत फेकतात.

हे सर्वांना माहीतच आहे की, महाराष्ट्राच्या पश्चिम भागात स्वतंत्र राज्य स्थापन केल्यानंतर शिवाजीने स्वतःचा राज्याभिषेक करवून घेऊन स्वतःला राजा म्हणून जाहीर करण्याचा विचार केला. राज्याभिषेकाचा विधी विशेष महत्त्वाचा असावयाचा तर तो वैदिक पद्धतीने केला पाहिजे, ही गोष्ट शिवाजी व त्याचे मित्र यांना पटलेली होती. परंतु ही आपली इच्छा सफल करण्यात बऱ्याच अडचणी आहेत याची जाणीव शिवाजीला होती. आपला राज्याभिषेक वैदिक पद्धतीने केला जाईल किंवा नाही ही बाब सर्वस्वी ब्राह्मणांच्या मर्जीवर अवलंबून आहे, याची त्याला खात्री होती. हा विधी धार्मिक दृष्टीने करण्यासाठी ब्राह्मणाशिवाय असला विधी होणे शक्य नव्हते. दुसरे कारण असे की, तो स्वतः क्षत्रिय आहे हे सिद्ध करून दाखविल्याशिवाय असा विधी होणे शक्य नव्हते. तिसरी एक अडचण होती ती ही की, तो जरी क्षत्रिय आहे असे मानण्यात आले तरी उपनयन करण्याचे त्याचे वय निघून गेलेले होते आणि उपनयनाशिवाय राज्याभिषेक होणे शक्य नव्हते. तिसरी अडचण मामुली स्वरूपाची होती, कारण ती व्रात्यस्तोम विधी करून दूर करता येण्यासारखी होती. पहिली अडचण मात्र शिवाजीच्या मार्गातील मोठी धोंड होती. ती शिवाजीचा सामाजिक दर्जा दर्शवत होती. तेव्हा जो प्रश्न उपस्थित झाला तो हा की, शिवाजी क्षत्रिय होता काय? हा प्रश्न सोडविला तर बाकीचे सारे प्रश्न सोपे आहेत. 'मी क्षत्रिय आहे' असे शिवाजीचे म्हणणे होते. याला पुष्कळांचा विरोध होता. त्याचे मुख्य विरोधी ब्राह्मण लोक होते. त्या ब्राह्मणांचा पुढारी होता शिवाजीचाच मुख्य प्रधान मोरोपंत पिंगळे. शिवाजीच्या दुर्दैवाने त्याचे मराठे सरदार त्याला आपल्यापेक्षा जास्त उच्च सामाजिक दर्जा द्यावयास तयार नव्हते. उलटअंशी ते त्याच्या क्षत्रियत्वाच्या हक्काला विरोध करण्यासाठी त्याच्याविरुद्ध एकजूट करून उभे राहिले. राज्याभिषेकाची कल्पना कशी उद्धृत झाली यासंबंधी किकेड यांनी काही मनोरंजक विचार प्रदर्शित केलेले आहेत. तो म्हणतो –

"कारण जरी अत्यंत बाणेदार दक्षिणी सरदार रणक्षेत्रात शिवाजीच्या खांद्याला खांदा लावून लढले तरी ते खाजगी आयुष्यात शिवाजीला आपल्यापेक्षा श्रेष्ठ मानावयास तयार नव्हते. दरबारी खाने होत त्यात भोसल्याचे ताट मोहिते, निंबाळकर, सावंत व घोरपडे यांच्या ताटांच्या आसनापेक्षा जास्त उंचीच्या आसनावर मांडलेले असे, हे पाहून मोहिते, निंबाळकर, सावंत व घोरपडे याबद्दल नापसंती प्रदर्शित करीत. शिवाजीने आपल्या राज्याभिषेकासंबंधी आपला चिटणीस बाळाजी आवजी चिटणीस याच्याशी बोलणे काढले तेव्हा चिटणीसाने त्याला असा आग्रह केला की, राज्यमुगुट घ्यावयाचा तर तो मोंगल बादशहाच्या हातून न घेता काशीच्या पुरोहिताकडून घ्यावा. राजाने आपली माता जिजाबाई, साधु रामदास आणि आराध्य देवता भवानी यांचा सल्ला घेतला व त्या सर्वांनी चिटणीसाच्या म्हणण्याला दुजोरा दिला." (History of Maharashtra p. 244) –

यावरून असे दिसते की, वैदिक राज्याभिषेकाच्या पाठीमागे जी कल्पना आहे ती

सामाजिक दर्जा प्राप्त करून घेण्याची; ती कायदेशीर किंवा राजकीय राजशाही मिळविण्याची नाही.

त्यांच्या मते तो शूद्र होता. आपण क्षत्रिय आहोत हे शिवाजीचे म्हणणेसुद्धा 'कलियुगात क्षत्रिय नाहीत' हा ब्राह्मणांनी प्राचीन काळापासून रूढ केलेला जो सिद्धांत आहे. त्याच्याविरुद्ध जाणारे होते. शिवाजी कलियुगात रहात होता. अर्थात तो क्षत्रिय असणे शक्य नव्हते. क्षत्रियत्वाच्या विरुद्ध असणारा हा आरोप पुढील गोष्टीमुळे द्विगुणित होत होता. त्याने योग्य वयात उपनयन विधी केलेला नव्हता. शास्त्राप्रमाणे क्षत्रियाने ११ व्या वर्षी हा विधी केला पहिजे. हा विधी करण्याचे त्याचे वय निघून गेलेले होते. त्याचा हा विधी झालेला नव्हता म्हणून हा पुरावा त्याचे उपद्रव सिद्ध करणारा आहे असे मानण्यात आले. तथापि त्याच्या सुदैवाने त्याला गागाभटाची मदत मिळाली. गागाभट हा बनारसचा (काशीचा) रहिवासी. प्रसिद्ध ब्राह्मण वेद व शास्त्रे यात पारंगत असलेला असा होता. गागाभटाने सर्व अडचणी दूर करून तारीख ६ जून १६७४ रोजी रायगड येथे शिवाजीचा राज्याभिषेक केला. प्रथम त्याने शिवाजीचा व्रात्यस्तोम केला व नंतर उपनयन केले व त्यानंतर राज्याभिषेक विधी केला. शूद्र राजांचा राज्याभिषेक अवैदिक पद्धतीने म्हणजे पुराणातील विधी करून करण्याची पद्धत होती. या पद्धतीप्रमाणे शिवाजीचा राज्याभिषेक करण्यास काही ब्राह्मण तयार होते. असे दिसते. वैदिक पद्धतीने शिवाजीने आपला राज्याभिषेक करवून घेतला तर कोणत्या प्रकारचे घोर अनर्थ होतील याबद्दलचे भविष्य वर्तविण्यास त्यांना मुर्वत वाटली नाही. दुर्दैवाने हे अनर्थ घडले; आणि शिवाजी जोतिषशकुनांवर, धर्मसमजुतीवर नितांत विश्वास ठेवणारा असल्यामुळे त्याने आपला दुसरा राज्याभिषेक अवैदिक पद्धतीने करून घेतला. या राज्याभिषेकाचा पुढील मनोरंजक वृत्तांत श्री. चिंतामणराव वि. वैद्य यांच्या Shivaji The Founder of Maratha Swaraj pp. 252-253 या ग्रंथातून घेतलेला आहे.

निरर्थक अडथळे उत्पन्न करणारे आणि समाधान न मानणारे नेहमीप्रमाणे तेव्हाही ब्राह्मण होते. हा विधी साऱ्या महाराष्ट्राला आवडला तरी त्या ब्राह्मणांना तो समाधानकारक वाटत नाही. कोण्या एका कवीने या समारंभासंबंधी 'राज्याभिषेक कल्पतरू' या नावाचे काव्य लिहिले होते. त्या काव्याची एक प्रत बेंगॉल रॉयल एशियाटिक सोसायटीच्या लायब्ररीत होती. त्या प्रतीवरून ते काव्य पुण्याच्या इतिहास संशोधक मंडळाने आपल्या त्रैमासिकात (Vol. x-i) छापले होते. या राज्याभिषेक विधीच्या विरुद्ध असलेले काही आक्षेप या काव्यात ग्रथित केलेले होते. शिवभारत या कवीने शिवाजीला विष्णूचा अवतार मानून त्याच्यावर कविता फार पूर्वी केलेल्या होत्या. राज्याभिषेक कल्पतरू या काव्यात शिवाजीला शिवाचा अवतार मानलेले आहे. शिवाजी शिवाचा अवतार ही कल्पना राजाराम महाराजांच्या कारकीर्दीत लोकप्रिय झालेली होती. यावरून असे दिसते की, शिवाजीचा दुसरा राज्याभिषेक झाल्यानंतर थोड्याच काळात राज्याभिषेक कल्पतरू हे काव्य लिहिण्यात आलेले होते. ते राजाराम महाराजांच्या कारकीर्दीत लिहिले गेले असले पाहिजे. काशीचा विद्वान ब्राह्मण

यति आणि गागाभटाच्या विरोधी निश्चलपुरी याचे आणि गोविंदभट बर्वे यांचे कोकणामध्ये संभाषण चालले आहे अशी कल्पना या काव्यात मांडलेली आहे. शिवाजीच्या दुसऱ्या राज्याभिषेकाच्या अगोदर तसेच नंतर कोणते अपशकुन, अपघात झाले याची माहिती निश्चलपुरी व बर्वे यांच्या संभाषणाच्या द्वारे या काव्यात दिलेली आहे. उदाहरणार्थ, प्रतापराव गुजर यांचा मृत्यु, शिवाजीची पत्नी काशीबाई हिचा मृत्यू, मंडपाचा वासा पडून खुद्द गागाभट याच्या नाकाला झालेली जखम वगैरे. जे ब्राह्मण गागाभटाचे वर्चस्व मान्य करीत होते तेवढ्यांनाच राज्याभिषेक विधीमध्ये गागाभटाने कामाला लावले आणि ज्या ब्राह्मणांना कामाला लावा अशी गागाभटाकडे निश्चलपुरीने शिफारस केली त्या ब्राह्मणांना कामावर ठेवण्याचे गागाभटाने साफ नाकारले, असा या काव्यात स्पष्ट खुलासा आहे. विधीच्या बाबतीत पुष्कळ दोष राहिले असा उल्लेख नंतर या काव्यात केलेला आहे. उदाहरणार्थ, सिंहासनावर बसण्याचा विधी संपल्यानंतर रथात बसण्याचा विधी व्हावयाचा होता. शिवाजी रथात चढण्याच्य अगोदरच गागाभट रथात चढला व बसला; त्यानंतर शिवाजी रथात चढला व बसला. निश्चलपुरीने राज्याभिषेकाचा विधी सुरुवातीपासून शेवटपर्यंत पाहिला व नंतर तो रायगड सोडून गेला. परंतु जाण्यापूर्वी त्याने शिवाजीला असे सांगितले की, १३ व्या, २२ व्या आणि ५५ व्या दिवशी काही अशुभ गोष्टी घडतील. निश्चलपुरीच्या भविष्याप्रमाणे १३ व्या दिवशी शिवाजीची मातोश्री वारली. त्यानंतर प्रतापगडावर घोड्यांची पाग जळाली व बरेच घोडे जळून मेले. सिंहगडावर हत्ती मेला. या अशुभ घटना पाहून शिवाजीचा निश्चलपुरीवर विश्वास बसला. त्याने त्याला व त्याच्या ब्राह्मण अनुयायांना बोलावून आणले आणि त्यांच्या सहय्याने दुसरा राज्याभिषेक करवून घेतला. यावेळी वैदिक विधी वापरले नव्हते, तर तांत्रिक म्हणजे जादूटोण्याचे विधी वापरले. या समारंभाचे सुद्धा सविस्तर वर्णन सदर काव्यात दिलेले आहे. सामवेदातील काही मंत्र या काव्यात दिलेले आहेत. परंतु या समारंभाचा एकंदर विधी वैदिक नव्हता. हा समारंभ अश्विन शुद्ध पंचमीला (ललिता पंचमी संवत १५९६) झाला असे या काव्यात म्हटलेले आहे. या समारंभाचा उल्लेख यदुनाथ सरकार यांनीही केलेला आहे. निश्चलपुरी यांचे नावे मुसलमानी ऐतिहासिक कागदपत्रांतही सापडते.

शिवाजीचे उदाहरण अनेक कारणांसाठी महत्त्वाचे आहे. ब्राह्मणाशिवाय इतर कोणालाही उपनयन करण्याचा हक्क नाही आणि ब्राह्मणाने एखाद्याचे उपनयन करण्याची सक्ती करण्याची कोणाला शक्ती नाही, या गोष्टी शिवाजीच्या उदाहरणावरून सिद्ध झालेल्या आहेत, म्हणून ते उदाहरण महत्त्वाचे आहे. शिवाजी एका स्वतंत्र राज्याचा राज्यकर्ता होता व त्याने स्वतःला महाराजा व छत्रपती हे किताब घेतलेले होते. त्याच्या प्रजेपैकी बरेचसे ब्राह्मण होते. अशी परिस्थिती होती तरीसुद्धा आपला राज्याभिषेक विधी करवून घेण्याच्या बाबतीत शिवाजीला एकाही ब्राह्मणावर सत्ता गाजविता आली नाही.

राज्याभिषेकाचा विधी कायदेशीर ठरावयाचा असेल तर तो ब्राह्मणाच्याच हातून झाला पाहिजे ही गोष्ट शिवाजीच्या उदाहरणावरून सिद्ध झालेली आहे, म्हणून ते उदाहरण महत्त्वाचे आहे. राज्याभिषेकाचा विधी जर ब्राह्मणेतराच्या हातून करण्यात आला तर तो

विधी सफल होत नसतो. म्हणजे तो वांझ ठरतो. ब्राह्मणेतरांच्या हातून विधी उरकून घेण्याचा मार्ग शिवाजीच्या पुढे होता. परंतु तो मार्ग चोखाळण्याची त्याची छाती नव्हती. (कायस्थांचा सामाजिक दर्जा हिंदुसमाजात उच्च आहे, असा प्रश्न जेव्हा जेव्हा कायस्थांनी मांडला तेव्हा तेव्हा ब्राह्मणांनी त्यांना विरोध केला. ब्राह्मणांच्या या वृत्तीबद्दल धिक्कार प्रदर्शित करण्यासाठी कायस्थांनी ब्राह्मणांवर बहिष्कार घातला व आपल्या जातीचे सर्व धार्मिक विधी कायस्थांतील लोकच करतील अशी घोषणा त्यांनी जाहीर केली. परंतु ही घोषणा कायस्थांनी अंमलात आणली नाही, याचेही कारण तेच असावे.) कारण शिवाजीराजे जाणून होते की, ब्राह्मणेतराकडून जर हा विधी केला तर त्या विधीपासून सामाजिक किंवा आध्यात्मिक इष्ट फळ प्राप्त होणार नाही.

तिसरे कारण असे की, एखाद्या हिंदूचा दर्जा कोणता आहे हे ठरविण्याचा सर्वाधिकार सर्वस्वी ब्राह्मणांचा आहे, ही गोष्ट शिवाजीच्या उदाहरणावरून सिद्ध होते. म्हणून ते उदाहरण महत्त्वाचे आहे. मारवाडच्या सिसोदिया घराण्याची वंशावळ मिळवून असे सिद्ध करून दाखविले की, शिवाजीच्या पूर्वजांचा या घराण्याशी धागादोरा लागतो व म्हणून शिवाजी क्षत्रिय ठरतो. या बाबतीत असे म्हणण्यात येते की, केवळ शिवाजीचा राज्याभिषेक निर्विघ्नपणे पार पाडावा म्हणून ही बनावट वंशावळ तयार करून आणलेली होती ती वंशावळ बनावट नव्हती असे समजले तरी त्यावरून शिवाजीचा क्षत्रियत्वाचा हक्क असा सिद्ध केला जातो? मेवाडचे सिसोदिया कुळ दोन कारणांनी महत्त्वाचे होते (१) रामायणाचा नायक राम, त्याचा वडील पुत्र लव आणि लवाच्या कुळात जन्मले ते उदेपूरचे सिसोदिया. मेवाडचे सिसोदिया हे उदेपूरच्या सिसोदियाची एक शाखा (२) मेवाडच्या सिसोदियाने आपल्या कुळात रक्तशुद्धी ठेवलेली होती. कारण, त्यांनी आपल्या घरातील स्त्रियांना मोगल बादशहांना देण्याचे नाकारले होते. जयपूर व जोधपूर येथील रजपूत कुटुंबांनी आपल्या घरातील स्त्रिया मोगल बादशहांना दिल्या होत्या, म्हणून अशा रजपूत घराण्याशी बेटीव्यवहार करण्याचे मेवाडच्या सिसोदियांनी नाकारलेले होते. शिवाजी सिसोदिया घराण्यातील वंशज आहे हे सिद्ध करण्याचा खटाटोप जो करण्यात आला तो एका याच गोष्टीमुळे काय? या वंशावळीमुळे शिवाजी क्षत्रिय होता हे ठरविण्याचे दूरच राहिले, उलटअंशी सिसोदिया हे क्षत्रिय होते काय, हा नसता प्रश्न या वंशावळीमुळे उपस्थित झाला. सिसोदिया रजपूत होते. प्राचीन काळची जी आर्य जमात होती तीमध्ये दुसऱ्या वर्णाचे क्षत्रिय होते. रजपूत हे या प्रारंभीच्या क्षत्रियांचे वंशज आहेत की काय, याबद्दल जबरदस्त शंका आहे. हूण या परकीय लोकांनी हिंदुस्थानावर स्वारी केली व त्यातील बरेच लोक राजपुतान्यमध्ये स्थायिक झाले. त्यावेळी हिंदुस्थानात बुद्धधर्माची चांगली चलती होती. त्या धर्माचा मध्य हिंदुस्थानात पाडाव करण्यासाठी ब्राह्मणांनी या हूण लोकांना क्षत्रियांचा दर्जा दिला, म्हणून ते अग्निकुल क्षत्रिय या नावाने ओळखले जातात. हूण लोक क्षत्रिय झाल्यानंतर त्यांनी ब्राह्मणी धर्माच्या संरक्षणार्थ तलवार उपसली व ती बुद्ध धर्मानुयायांची मुंडली तोडण्यासाठी वापरली. याप्रमाणे ब्राह्मणांनी रजपुतांच्या करवी बुद्ध धर्म रसातळाला नेला. म्हणजे रजपूत हे हूण लोकांचे वंशज म्हणजे परदेशी लोक होत. वरील मत काही

विद्वानांचे आहे. या विषयावर अधिकारवाणीने बोलण्याची ज्यांची शक्ती आहे अशा बऱ्याच महापंडितांचा वरील मताला दुजोरा आहे. याबाबतीत व्हिन्शंट स्मिथ म्हणतो, (Quoted by C. V. Vaidya in his History of Mediaeval India, Vol. II, p. 8) -

"या ठिकाणी एका गोष्टीकडे मी लक्ष वेधू इच्छितो. ती गोष्ट ही की, राजपुतान्यात आणि गंगेच्यावरच्या भागात परकीय लोक आले व त्यांनी एतद्देशीय राजे लोकांशी निकराचे झगडे केले. हे परकीय लोक म्हणजे हूण होत. एतद्देशीय राजांनी या परक्या लोकांची संपूर्णपणे कत्तल करून त्यांना नामशेष केले होते की काय, याबद्दल पुष्कळ काळ शंका होती परंतु या बाबतीत भरपूर पुरावे उपलब्ध झालेले आहेत व त्या पुराव्यांवरून आता असे सिद्ध झालेले आहे की, हे परकीय लोक या झगड्यांमध्ये नामशेष झालेले नव्हते. अर्थात या परक्या लोकांपैकी बरेच लोक या युद्धात खतम झालेले होते; परंतु त्यांच्यापैकी बरेच लोक वाचलेले होते. या युद्धातून जिवंत सुटलेले परके लोक राजपुतान्यात वसती करून राहिले व ते एतद्देशीय लोकांमध्ये मिळून मिसळून वागू लागले. राजपुतान्यांची सर्वसाधारण जी लोकसंख्या आहे तिचा बराचसा भाग या परक्या लोकांच्या वंशजांचा आहे. हूण लोकांच्या अगोदर शक आणि यूचि लोक हिंदुस्थानात आले होते. शकांनी एतद्देशीयांशी लढाया केल्या आणि शेवटी हिंदुधर्माच्या विश्वव्यापक स्वरूपाने आणि दिव्य प्रभावाने दिपून जाऊन त्यांनी हिंदुधर्माचा स्वीकार केला आणि ते अल्प काळातच हिंदुमय झाले. हूण लोकांची अशीच अवस्था झाली. राजपुतान्यात स्थायिक झाल्यानंतर त्यांनी हिंदुधर्म स्वीकारला व अगदी थोड्या काळात ते हिंदुमय झाले. ज्या जमातीच्या किंवा कुळांच्या लोकांनी राज्ये स्थापन केली त्या लोकांना ब्राह्मणांनी हिंदुधर्मात सहजासहजी घेतले व त्यांना क्षत्रिय किंवा रजपूत हे नाव दिले. परझार आणि उत्तरेकडील दुसऱ्या पुष्कळ रजपूत जमाती यांची उत्पत्ती पाचव्या व साहाव्या शतकात हिंदुस्थानात टोळ्याटोळ्यांनी प्रवेश करणाऱ्या रानटी लोकांच्यापासून झाली असावी याबद्दल संदेह नाही. या परकीय लोकांच्या बरोबर जे सामान्य प्रतीचे लोक हिंदुस्थानात आले होते ते पुढे गुजर या नावाने मिरवू लागले. यांचा सामाजिक दर्जा रजपुतांच्या खालचा ठेवण्यात आला. दक्षिणेच्या बाजूलासुद्धा असलीच परिस्थिती आढळून येते. या प्रदेशात डोंगराळ भागात पुष्कळ रानटी टोळ्या होत्या. ब्राह्मणांनी त्यांना हिंदुधर्माची दीक्षा देऊन त्यांचा सामाजिक दर्जा उंचावून ठेवला. हिंदुधर्म स्वीकारल्यानंतर गोंड लोकांना चंडेल, बहार लोकांना राठोर व खाखा लोकांना महखार अशी नावे ब्राह्मणांनी दिली. अशा रानटी टोळ्यांचे आणि इतर प्रसिद्ध रजपूत जमातीचे स्थित्यंतर ब्राह्मणांनी केले. कोणाचा मूळपुरुष सूर्य तर कोणाचा मूळपुरुष चंद्र असेही ब्राह्मणांनी त्या सर्व रानटी टोळ्यांना व रजपूत जमातींना सांगून ठेवले."

याबाबतीत वुईल्यम क्रूक म्हणतो, (Quoted by Vaidya in his History of Mediaeval India, Vol. I, p.8) -

"अलीकडच्या काळात जे संशोधन करण्यात आलेले आहे त्यामुळे बरीच माहिती हातात आलेली आहे. ही माहिती रजपुतांच्या उत्पत्तीवर पुष्कळ प्रकाश टाकते. वैदिक

क्षत्रिय आणि मध्ययुगातील रजपूत यांच्यामध्ये जमीन-अस्मानाचा फरक आहे; आणि हा फरक नाहीसा करणे आता अशक्य आहे. आता एवढी गोष्ट खरी की, रजपुताच्या बऱ्याच जमातींची उत्पत्ती, ज्यांनी हिंदुस्थानावर स्वाऱ्या केल्या त्या शक किंवा हूण लोकांपासून अथवा यापेक्षाही जास्त काटेकोरपणाने सांगावयाचे तर ज्यांनी इ. स. ४८० च्या सुमारास गुप्तांचे साम्राज्य धुळीस मिळविले त्या श्वेत हूण लोकांपासून झाली. गुजर नावाची टोळी पुढील काळातील लोकांशी निगडीत झाली. तिने हिंदुधर्म स्वीकारला. त्या टोळीचे जे प्रमुख पुढारी होते ते या टोळीचे आधारस्तंभ होते. त्यांच्यापासून पुढे वरिष्ठ दर्जाची रजपूत घराणी उत्पन्न झाली. या घराण्यांना राज्यपदाचे अधिकार नवीन मिळाल्यामुळे या घराण्यातील लोकांनी हिंदुधर्माचा स्वीकार केला व ब्राह्मणांचे धार्मिक वर्चस्व मान्य केले. या कारणाने या घराण्यातील थोर पुरुषांच्या वंशांचा संबंध महाभारत व रामायण यातील नायकांशी भिडविण्याचा साहजिकपणे प्रयत्न करण्यात आला. या रजपूत घराण्यांपैकी काही घराण्यांची उत्पत्ती सूर्यापासून झाली व काही घराण्यांची उत्पत्ती चंद्रापासून झाली, अशा अद्‌भुतरम्य कल्पना ब्राह्मणांनी ग्रंथांमध्ये रचल्या; यामुळेच या ग्रंथांत रजपुतांसंबंधी अनेक दंतकथा पहावयास मिळतात. क्षत्रिय किंवा रजपूत या नावाने ओळखली जाणारी जी जमात होती तिने लढाया जिंकून आपला दरारा बसविला होता. आपल्या सामाजिक दर्जाला ती जास्त महत्त्व देत होती. त्या काळात जातिबंधने फारशी पाळली जात नसत. अशा परिस्थितीत परकीय देशातून येऊन येथे कायमची वसती करून राहिलेल्या लोकांना अशा टोळ्यांमध्ये (क्षत्रिय किंवा रजपूत) सहजपणे ढकलणे ब्राह्मणांना शक्य झालेले होते. परंतु परकीय लोकांचा हा टोळ्यांमधील प्रवेश योग्य ती युक्ती योजन छपविणे ब्राह्मणांना भाग पडले. याबाबतीत ब्राह्मणांनी अशा कपोलकल्पित कथा रचल्या की, बुद्धधर्माचा व इतर पाखंडी मतांचा जगात फार बुजबुजाट झाला व त्यामुळे पाप फार वाढले. म्हणून परमेश्वराने ब्राह्मणांना आदेश दिला की, तुम्ही बुद्ध धर्म व पाखंडी मते यांचा सत्यानाश करा. याबाबतीत ब्राह्मणांना सहाय्य करण्यासाठी परमेश्वराने प्राचीन वैदिक ऋषींच्या नेतृत्वाखाली शुद्धीच्या गंभीर विधीने किंवा दीक्षेने काही लोक अग्नीतून उत्पन्न केले. ही अद्‌भुतरम्य कथा परमार, परिहार, चालुक्य व चौहान या ज्या चार जमाती कुल म्हणून मानल्या जातात त्यांच्या उत्पत्तीसभोवती गुंफलेल्या आहेत.''

डॉ. डी. आर. भांडारकर यांचेसुद्धा असेच मत आहे. त्यांच्या मताप्रमाणे रजपूत हे गुजर लोकांचे वंशज आहेत. गुजर हे परक्या देशातून येऊन येथे राहिलेले लोक आहेत, म्हणून रजपूत हे परकीय लोकांचे वंशज ठरतात. (Quoted by Mr. Vaidya, History of Mediaeval India, p. 10) वैद्य हे या मताला विरोध करतात. रजपूत हे परके नाहीत तर ते अगदी प्रारंभीच्या आर्य-क्षत्रियांचे वंशज आहेत, असे सिद्ध करण्याचा श्री. वैद्य यांनी प्रयत्न केलेला आहे.

शिवाजीच्या राज्याभिषेकविधीच्या वेळी ज्या ब्राह्मणांना कामावर लावले होते त्यांना रजपुतांची उत्पत्ती कशी झालेली होती व रजपूत लोक आपण क्षत्रियांचे वंशज आहोत असे

जे म्हणतात त्यात कितपत तथ्य आहे, या गोष्टीबद्दल माहिती असली पाहिजे. परंतु असली माहिती नव्हती असे समजले तरी कलियुगात क्षत्रिय नाहीत, हा ब्राह्मणांनी जो निर्णय दिलेला होता त्याबद्दल त्यांना माहिती असलीच पाहिजे. हा निर्णय फार जुन्या काळचा असून तो वंशपरंपरेने सर्वांना माहीत झालेला होता आणि पूर्वपरंपरेला आदर द्यावयाचे जर ब्राह्मणांच्या मनात असते तर आपण क्षत्रिय आहोत अशी घोषणा सिसोदिया त्याचप्रमाणे शिवाजीने जेव्हा केली तेव्हाच ती ब्राह्मणांनी त्याज्य मानावयाला हवी होती. ब्राह्मणांनी असे केले असते तर त्यांना कोणी दोष दिला नसता. परंतु परंपरा ब्राह्मणांना बंधनकारक आहे असे त्यांनी कधीच मान्य केलेले नाही.

शिवाजीचे उदाहरण महत्त्वाचे आहे याचे चौथे कारण असे की, सामाजिक दर्जा ठरविण्याच्या बाबतीत ब्राह्मण जे निर्णय देत असत ते कोणत्या पक्षाकडून किती पैसा मिळेल याकडे दृष्टी ठेवून ते कमी-जास्त अनुकूल निर्णय देत असत. रोमन कॅथोलिक पंथातील पाद्री लोक लोकांच्याकडून पैसे घेऊन त्यांच्या पापांचे क्षालन करीत असत. त्याचप्रमाणे ब्राह्मण लोक आपले निर्णय विकीत असत. शिवाजी क्षत्रिय होता, असा जो निर्णय गागाभटाने दिला होता तो प्रामाणिकपणाने दिलेला निर्णय नव्हता. शिवाजीच्या राज्याभिषेकविधीच्या प्रसंगी पुरोहितपणा करण्यासाठी म्हणून गागाभट आणि त्याच्या बाजूचे ब्राह्मण यांना जी रक्कम शिवाजीने दिली होती ती रक्कम लक्षात घेतली तर तो निर्णय प्रामाणिकपणाने दिलेला नव्हता हा मुद्दा स्पष्ट होतो. शिवाजीच्या राज्याभिषेकविधीसाठी किती पैसा खर्च झाला व त्यापैकी गागाभट व त्याचे ब्राह्मण यांच्या हातात किती गेला याची तपशीलवार माहिती श्री. वैद्य यांनी गोळा केलेली आहे, ती खालीलप्रमाणे आहे. (Shivaji, The Founder of Maratha Swaraj, pp. 248 and 252) -

"या प्रधानांपैकी प्रत्येकाला एक लक्ष होन, एक हत्ती, एक घोडा, कपडे व दागिने यांचा नजराणा देण्यात आला. सर्व समारंभावर देखरेख करण्याकरिता गागाभटाला एक लक्ष रुपये दिले. समारंभाच्या निरनिराळ्या वेळी त्या त्या वेगळ्या योग्यतेप्रमाणे शिवाजीने ब्राह्मणांना दक्षिणा दिल्या. सभासदाने असे लिहून ठेवलेले आहे की, समारंभाचा एकंदर खर्च एक कोटी बेचाळीस लक्ष होन अथवा ४२६ लक्ष रुपये झाला होता. सभासद असे म्हणतो की, शिवाजीच्या राज्याभिषेकाच्या समारंभाला ५०,००० वैदिक ब्राह्मण उपस्थित झाले होते. (श्री. वैद्य म्हणतात की ५०,००० हा आकडा ५०० या आकड्याच्या ऐवजी चुकून पडला असावा. परंतु या बाबतीत त्यांनी काही साधकबाधक पुरावा पुढे ठेवलेला नाही.) याशिवाय जोगी, संन्यासी, वगैरे हजारोंच्या संख्येने हजर राहिलेले होते. या लोकांना किल्ल्याच्या खाली जेवू घालण्यात आले किंवा त्यांना शिधा देण्यात आला. त्यावेळच्या कागदोपत्री असा उल्लेख सापडतो की, राज्याभिषेक करण्याच्या अगोदर शिवाजीची सोन्याने आणि इतर सर्व धातूंनी त्याचप्रमाणे शुभ्र वस्तूंनी तुला केली होती. डच लेखकांनी समारंभाचे सविस्तर वर्णन केलेले आहे. ते लेखक म्हणतात की, हा समारंभ ३ ऑक्टोबर पी.एस. १६८४ रोजी झाला; शिवाजीचे वजन १७,००० होन किंवा १६० पौंड झाले. रुपे, तांबे,

लोखंड वगैरे धातू आणि कापूर, मीठ, साखर, लोणी, निरनिराळ्या प्रकारची फळे, सुपारी वगैरे वस्तूंच्या बरोबर शिवाजीला पृथकपणे तोलण्यात आले व त्या सर्व धातूंची जी किंमत झाली तेवढी रक्कम ब्राह्मणांना दक्षिणा म्हणून वाटण्यात आली. तारीख ७ जून म्हणजे राज्याभिषेक विधी झाल्यानंतरच्या दुसऱ्या दिवशी सर्वसमान्य ब्राह्मणांना दक्षिणा देण्यात आली. तेव्हा प्रत्येक ब्राह्मणाला तीन ते पाच रुपये मिळाले आणि बाकीच्यांना, स्त्रिया आणि लहान मुले यांना अनुक्रमे दोन रुपये व एक रुपया अशी दक्षिणा मिळाली. एकंदर जी दक्षिणा वाटण्यात आली तिची किंमत दीड लक्ष होन (एक होन म्हणजे ३ रुपये) झाली होती.

१३ मे ते १३ जून या काळात ऑक्झेन्डेन यांनी जी आपली रोजनिशी लिहिली होती तीत तोसुद्धा असे म्हणतो की, शिवाजीचे सोन्याबरोबर वजन केले तेव्हा ते वजन १६,००० होनांचे झाले; हे १६००० होन व दुसरे एक लक्ष होन यांची दक्षिणा ब्राह्मणांमध्ये वाटण्यात आली.

ऑक्झेन्डेन पुढे लिहितो की, "व्रात्यस्तोमाचा विधी करण्यासाठी गागाभटाला ७,००० होन आणि त्याच्या बाजूच्या ब्राह्मणांना १७,००० होन देण्यात आले. ५ जूनला शिवाजीने पवित्र गंगेच्या पाण्याची आंघोळ केली, तेव्हा जे ब्राह्मण आंघोळीच्या ठिकाणी हजर होते. त्यांना प्रत्येकी १०० होन देण्यात आले."

गागाभटाला जी रक्कम देण्यात आली होती ती रक्कम म्हणजे पुरोहिताला देण्याला योग्य अशी दक्षिणा होती. यापेक्षा त्या रकमेला दुसरा अर्थ नाही, असे होते काय? दुसरा एक असा मुद्दा आहे की ज्याच्या आधारावर असाही अर्थ काढता येईल की गागाभटाला पाहिजे तितका पैसा दिलेला नव्हता. तो मुद्दा हा की शिवाजीच्या प्रधानांना जी रक्कम मिळाली होती तिच्या मानाने गागाभटाला मिळालेली रक्कम फार कमी होती. या गोष्टीपासून सारांश काढण्याच्या अगोदर दुसऱ्या दोन गोष्टींचे महत्त्व विरुद्ध बाजूला काय होते, हे समजावून घेतले पाहिजे. त्या दोन गोष्टींपैकी एक गोष्ट ही की, प्रधानांनी स्वतः राज्याभिषेकाच्या वेळी शिवाजीला नजराणे दिलेले होते. Vaidya Shivaji the Founder of Maratha Swaraj, p. 247) शिवाजीचा पेशवा किंवा मुख्य प्रधान मोरोपंत पिंगळे याने ७,००० होने आणि दुसरे दोन प्रधान यांनी प्रत्येकी ५,००० होन शिवाजीला नजर केले हेते. शिवाजीने यांना ज्या रकमा नजर केल्या होत्या त्यातून वरील रकमा जर वजा केल्या तर प्रधानांच्या हाती शिवाजीकडून मिळालेल्या ज्या रकमा शिल्लक राहतात, त्या बऱ्याच अल्प राहतात.

दुसरी गोष्ट ही की, शिवाजीचे हे प्रधान त्यांच्या राज्यभिषेकाला कसून विरोध करणारे होते. शिवाजी शूद्र आहे आणि म्हणून त्याला राज्याभिषेक करून घेण्याचा अधिकार नाही; कारण, हा अधिकार फक्त क्षत्रियांचा आहे अशी त्या प्रधानांची ठाम समजूत झालेली होती. त्यांचा विरोध बंद करण्यासाठी आणि त्यांना आपल्या बाजूचे कायमचे करण्यासाठी शिवाजीने त्या प्रधानांना मोठमोठे नजराणे दिले यात आश्चर्य काही नाही. म्हणून शिवाजीने प्रधानांना जी रक्कम दिली तिच्याबरोबर गागाभटाला दिलेल्या रकमेची तुलना करणे योग्य

ठरत नाही. त्याचप्रमाणे गागाभटाला दिलेली रक्कम ही त्याच्या पुरोहितपणाची अपुरी बिदागी होती असाही सारांश वरील गोष्टीवरून काढणे योग्य ठरत नाही. खरोखर, शिवाजीच्या राज्याभिषेकाला संमती दिण्याच्या अगोदर गागाभटाने इतके आढेवेढे घेतलेले होते की, त्याला जी रक्कम शिवाजीने दिली होती तीत त्याच्या पुरोहितपणाची बिदागी म्हणून एक रक्कम होतीच; परंतु गागाभटाची संमती मिळविण्यासाठी त्याला जी लाच शिवाजीने दिलेली होती त्या रकमेचाही तीत समावेश होत होता असा कोणीही निष्कर्ष काढील.

या राज्याभिषेकाच्या बाबतीत प्रारंभापासून शेवटपर्यंत ज्याने प्रामुख्याने भाग घेतला व तो समारंभ साजरा करून दाखविला, तो गृहस्थ महाराष्ट्राचा कायस्थ बाळाजी आवजी हा होता. हा गृहस्थ शिवाजीचा खाजगी चिटणीस होता. याने पहिले काम असे केले की, त्याने काशीहून गागाभटाला आणण्यासाठी (१) केशव भट (२) भालचंद्र भट आणि (३) सोमनाथ भट हे तीन ब्राह्मण काशीला पाठविले. शिवाजीच्या एकंदर घराण्याची व पुढे होणाऱ्या राज्याभिषेकाची संपूर्ण हकिगत या ब्राह्मणांजवळ गागाभटाला पाठविण्यात आली होती. गागाभटाने काय केले? शिवाजी हा शूद्र आहे म्हणून तो राज्याभिषेकाला पात्र नाही आणि म्हणून त्याचे आमंत्रण स्वीकारण्यास आपण तयार नाही, अशा अर्थाचे पत्र लिहून ते पत्र त्या तीन ब्राह्मण जासूदांच्या हवाली करून गागाभटाने त्यांना काशीहून परत पाठविले. यानंतर जे दुसरे कृत्य बाळाजीने केले ते शिवाजी क्षत्रिय आहे हे सिद्ध करणारे पुरावे गोळा करणे. एक वंशावळ मिळविण्यात बाळाजीला यश आले. मेवाडचे राज्यकर्ते सिसोदिया रजपूत यांच्या वंशजांपासून शिवाजीचे वंशज जन्मलेले आहेत, म्हणून शिवाजी क्षत्रिय ठरतो असे या वंशावळीवरून सिद्ध होते. बाळाजीने ही वंशावळ दुसऱ्या जासुदांबरोबर गागाभटाकडे पाठवून दिली. (या जासुदाचे नाव निळो येसाजी होते. तो कायस्थ होता. गागाभटाला काशीहून आणण्यासाठी प्रथम जे तीन ब्राह्मण पाठविण्यात आले होते त्यांना ज्याप्रमाणे सूचना दिलेल्या होत्या त्याप्रमाणे त्यांनी काही केले नव्हते; ते ब्राह्मण असल्यामुळे त्यांना शिवाजीच्या हिताची गोष्ट पटत नसे; त्यामुळे त्यांनी काहीतरी कपट नाटक तयार करून शिवाजीच्या हितावर विस्तव ठेवला असावा अशी पुढे शंका घेण्यात आली. काशीहून त्या तीन ब्राह्मणांनी गागाभटाचे म्हणून जे पत्र आणले होते ते गागाभटाला भलत्या सलत्या गोष्टी सांगून लिहवून आणलेले असावे असे बाळाजीला वाटले असेल हे शक्य आहे. म्हणूनच बाळाजीने यावेळी आपल्या कायस्थ जातीचा एक माणूस गागाभटाकडे पाठविला.) हा वंशावळीचा पुरावा पाहून गागाभटाची खात्री झाली की शिवाजी क्षत्रिय आहे. कारण तो शिवाजीचा राज्याभिषेक विधी करण्यासाठी रायगडला यावयास तयार झाला. आल्यानंतर गागाभटाने काय केले? 'मी वंशावळीच्या पुराव्याची कसून पाहणी केल्यानंतर असा सारांश काढला की, शिवाजी शूद्र आहे' आणि म्हणून राज्याभिषेक करून घेण्यास तो अपात्र आहे असे तो म्हणाला.

या बाबतीत ही एवढीच कोलांटउडी गागाभटाने मारलेली नाही. या बाबीला गागाभटाने अशी काही चमत्कारिक कलाटणी केली की सांगता सोय नाही. ही त्याची

दुसरी कोलांटउडी होय. बाळाजी आवजी हा कायस्थ आहे म्हणजे तो क्षत्रिय आहे, म्हणून त्याचा राज्याभिषेक विधी करावयास आपण तयार आहोत; पण शिवाजीचा राज्याभिषेक विधी करण्यास आपण मुळीच तयार नाही, कारण तो शूद्र आहे असे गागाभटाने आपले मत प्रदर्शित केले. एवढेच करून गागाभट थांबला नाही. पुनः त्याने आपली पगडी फिरविली व असे मत सांगितले की, शिवाजी हा क्षत्रिय आहे व त्याचा राज्याभिषेक करावयास आपण तयार आहोत. या बाबतीत त्याची मजल इथपर्यंत गेली की, कायस्थ हे अक्करमासे आहेत हे सिद्ध करण्यासाठी त्याने एक प्रबंध लिहिण्याचा खटाटोप केला. हा प्रबंध 'गागाभट्टी' या नावाने ओळखला जातो.

गागाभटाने वेळोवेळी सरड्याप्रमाणे जे रंग पालटले व ज्या कोलांटउड्या मारल्या त्या काय दर्शवितात? राज्याभिषेक विधी करण्यास तो तयार नव्हता. व त्याला तयार करण्यासाठी त्याच्यापुढे पैशाच्या राशी उभ्या कराव्या लागल्या, हे यावरून दिसत नाही काय? ही कारणमीमांसा जर बरोबर असेल तर शिवाजी हा क्षत्रिय होता, हा गागाभटाने जो निर्णय दिला तो लाच घेतल्यानंतरच मारल्या याबद्दल संशय नाही. (गागाभटाने जे पगडीपलट केले व ज्या कोलांटउड्या मारल्या याबद्दल जो वर उल्लेख केलेला आहे तो श्री. के. सी. ठाकरे यांच्या 'ग्रमण्यांचा साद्यंत इतिहास' या पुस्तकात दिलेल्या माहितीवर आधारलेला आहे. श्री. ठाकरे यांनी ही माहिती बखरी व इतिहास यांच्यामधून गोळा केलेली आहे. ही माहिती कितपत विश्वसनीय आहे हे सांगणे कठीण आहे. तथापि, हे मात्र कबूल केले पाहिजे की, गागाभटाने वेळोवेळी आपली पगडी फिरवून निरनिराळ्या वेळी निरनिराळी मते प्रदर्शित केली होती. हे जर मान्य केले नाही तर शिवाजीच्या राज्याभिषेकाला जी विघ्ने उपस्थित झाली होती, ती कोणामुळे या मुद्द्याचा खुलासा होणे इष्ट आहे. उदाहरणार्थ पुढील प्रश्न घ्या. काशीहून रायगडला येऊन पोहोचल्यानंतर गागाभटाने आपले मत बदलले की नाही आणि बदलले असेल तर ते कोणत्या कारणामुळे? रायगडला आल्यानंतर गागाभटाला कळून आले की खुद्द शिवाजीचा मुख्य प्रधान मोरोपंत पिंगळे हा ब्राह्मण शिवाजीला क्षत्रिय मानावयास तयार नाही. मोरोपंत पिंगळे याने शिवाजीच्या राज्याभिषेकाच्या विरुद्ध वातावरण उत्पन्न केलेले होते ते पाहून गागाभटाने आपली पगडी फिरवून मोरोपंत पिंगळे यांच्या सुरात आपला सूर मिळविला. या बाबतीत गागाभट व मारोपंत पिंगळे यांनी बैठकी भरवून या प्रश्नावर खूप चर्चा केली असेल व गागाभटाला मोरोपंत पिंगळे याचे मत जास्त ग्राह्य वाटले असेल हे शक्य आहे. मोरोपंत पिंगळे शिवाजीच्या राज्याभिषेकाला प्रथम कसून विरोध करीत होता, पण थोड्याच दिवसांत त्याने आपले मत बदलले व तो शिवाजीच्या राज्याभिषेकाला उचलून धरू लागला. मोरोपंताचे हे जे मतांतर झाले ते कशामुळे? बाळाजीला राजा म्हणून जाहीर करावे असे गागाभटाने सुचविलेले होते. ही गोष्ट जर खरी असेल तर मोरोपंतामध्ये मतांतर का घडून आले याचा खुलासा त्या गोष्टीवरून होतो. बाळाजी हा कायस्थ होता. कायस्थ हे त्यावेळी ब्राह्मणांचे हाडवैरी होते. गागाभटाने बाळाजीला राजा करण्याची सूचना केली तेव्हा मोरोपंताच्या डोळ्यात झणझणीत अंजन घातले गेले.

बाळाजीला राजा मानण्यापेक्षा शिवाजीला राजा मानणे बरे, असा मनात हिशेब करून मोरोपंताने शिवाजीच्या राज्याभिषेकाला टेकू दिला.)

शिवाजीचे उदाहरण महत्त्वाचे आहे याचे शेवटचे कारण हे की, दर्जा ठरविण्याच्या बाबतीत पूर्वीचे निर्णय स्वतःला बंधनकारक आहेत असे ब्राह्मण मानीत नसत, हे या उदाहरणावरून सिद्ध होते. त्यांनी एकदा खटला निकालात काढला तरी तो खटला पुनः उपस्थित करून त्याच्यावर निराळा निर्णय देण्याचा अधिकार आहे असे ब्राह्मण समजत असत. कारण, शिवाजी हा क्षत्रिय आहे, हा जो निर्णय ब्राह्मणांनी दिला, तो त्यांनी किती काळ पाळला?

६ जून १६७४ या दिवशी शिवाजीचा राज्याभिषेक झाला तेव्हापासून त्याने नवे शक सुरू केले. ते राज्याभिषेक शक या नावाने ओळखले जाते. ते शक किती काळ पाळले गेले? जोपर्यंत शिवाजी आणि त्याचे वंशज गादीवर बसून स्वतः राज्यकारभार पाहात होते तोपर्यंत हे शक पाळले गेले. जेव्हा राज्यकारभाराचे सर्व अधिकार ब्राह्मण पेशव्यांच्या हातात गेले त्या क्षणाला शिवाजीचे वंशज क्षत्रिय नव्हते, असा गलगलाट करण्यास ब्राह्मणांना रस्ता मोकळा झाला. शाहूचा दत्तकपुत्र रामजी राजे हा शाहूनंतर गादीवर आला. तो अल्पवयीन होता. तोपर्यंत ब्राह्मण पेशवे त्याचे पालक होते. रामजी राजे याचे उपनयन केलेले होते की नव्हते, केले असेल तर ते वैदिक पद्धतीने केलेले होते काय, या प्रश्नांची समर्पक उत्तरे देण्यास काही पुरावा उपलब्ध नाही. रामजी राजे यांच्यानंतर दुसरा शाहू गादीवर आला. दुसरा शाहू याला १७७७ मध्ये दत्तक घेतलेले होते. दुसरा शाहू याचे उपनयन पेशव्यांच्या हुकुमान्वये पौराणिक विधीने करण्यात आले होते. (डोंगरे प्रस्तावना, पा. ६) दुसऱ्या शाहूचे उपनयन पौराणिक विधीने केले याचा अर्थ असा की, पेशवे दुसऱ्या शाहूला शूद्र मानीत होते. कारण फक्त शूद्रांच्या बाबतीत सर्व विधी पौराणिक पद्धतीने करण्यात येतात. दुसऱ्या शहूनंतर महाराजा प्रतापसिंह हा १८०८ साली गादीवर आला. त्याचे उपनयन केले होते काय? केले असेल तर ते वैदिक पद्धतीने की पौराणिक पद्धतीने याबद्दल ठाम मत देणे अशक्य आहे. तथापि, एक गोष्ट मात्र नक्की माहितीची आहे की, सांगलीच्या कायस्थांचा सामाजिक दर्जा काय आहे यासंबंधी १८१७ च्या सुमारास फकीरचे शंकराचार्य यांनी असा निर्णय दिला होता की, "कलियुगात क्षत्रिय अस्तित्वात नाहीत आणि शिवाजी, संभाजी किंवा शाहू हे क्षत्रिय होते याबद्लचा पुरावा दाखविणारे कागदपत्र त्यांच्या दप्तरात नाहीत." (डोंगरे प्रस्तावना, पा. ९) या निर्णयासंबंधी असे म्हणण्यात येते की, हा निर्णय शंकराचार्यांचा मूळचा नाहीत तर तो शंकराचार्यांच्या मूळच्या निर्णयात सांगलीच्या ब्राह्मण राजाने घुसडून दिलेला भाग आहे. ते काही का असेना, तो निर्णय म्हणजे शिवाजीचा वंशज म्हणून प्रतापसिंहाचा जो सामाजिक दर्जा होता त्या दर्जाला रोखठोक आव्हान होते. या निर्णयाचा विचार करण्याकरिता प्रतापसिंहाने सातारा येथे १८३० साली ब्राह्मणांची परिषद भरविली. या परिषदेतील ब्राह्मणांचे मताधिक्य असे पडले की, प्रतापसिंह क्षत्रिय होता. या निर्णयामुळे प्रतापसिंहाला शूद्राचे स्थान देण्याची जी आपत्ती आली होती ती टळली.

शिवाजीच्या वंशजांची दोन घराणी राज्य करीत होती – एक साताऱ्याला, दुसरे कोल्हापूरला. साताऱ्च्या घराण्याला शूद्रपदी नेण्याचा ब्राह्मणांचा प्रयत्न फसला हे पाहून त्यांनी आपला मोर्चा कोल्हापूरच्या घराण्याकडे वळविला. बाबासाहेब महाराज हे कोल्हापूरचे एक राजे होते. त्यांच्या कारकीर्दीत रघुनाथशास्त्री पर्वते या नावाचा राजवाड्यातील पुरोहित होता. राजवाड्यातील सर्व विधी पौराणिक पद्धतीने करावेत असा विचार या पुरोहिताच्या डोक्यात शिरला. असे सांगण्यात येते की, पौराणिक पद्धतीने विधी न करण्याची सक्ती त्या पुरोहितावर केली. बाबासाहेब १८८६ मध्ये वारले. १८८६ ते १८९४ पर्यंत जे राजे झाले ते सर्व अल्पवयी होते म्हणून राज्यकारभाराची सत्ता ब्रिटिशांच्या हातात होती. मध्यंतरीच्या काळात राजवाड्यातील पुरोहिताने नक्की कोणत्या तऱ्हेनी व पद्धतीनी राजवाड्यातील सर्व विधी केले हे सांगण्याला योग्य तो पुरावा उपलब्ध नाही. परलोकवासी शाहू महाराज यांनी १९०२ मध्ये पुरोहितावर असा हुकूम बजवला की, त्याने राजवाड्यातील सर्व विधी वैदिक पद्धतीने केले पाहिजेत. हा हुकूम मान्य करण्याचे पुरोहिताने नाकारले. उलटअंशी हे विधी पौराणिक पद्धतीनेच केले गेले पाहिजेत असा त्याने आग्रह धरला. पुरोहिताच्या या आग्रहाचा गर्भित अर्थ असा होता की, कोल्हापूरचे राज्यकर्ते क्षत्रिय नसून शूद्र होते. या प्रकरणात करवीर मठाचे शंकराचार्य यांनी जो भाग घेतलेला होता तो विशेष महत्त्वाचा होता. हे प्रकरण चालू होते तेव्हा मठाच्या गुरूने म्हणजे शंकराचार्याने शिष्य दत्तक घेतला होता. त्या शिष्याचे नाव ब्रह्मनाळकर होते. गुरूने शिष्याला मठाधीशाचे सर्व हक्क दिलेले होते. प्रथमतः गुरू व शिष्य या दोघांनीही राजवाड्यातील पुरोहिताची बाजू घेतली व महाराजांच्या क्षत्रियत्वाला त्याने मान्यता दिली. गुरू पुरोहिताच्या बाजूला चिकटून राहिला होता. त्याने शिष्यावर बाळीत पुकारले. त्यानंतर काही दिवसांनी महाराजांनी स्वतःचा शंकराचार्य निर्माण (आता ते डॉ. कुर्तकोटी म्हणून ओळखले जातात) करण्याचा प्रयत्न केला; परंतु त्यानेही महाराजांना दगा दिला.

शिवाजी क्षत्रिय होता हे मान्य करण्यात आले होते. त्याच्या वैयक्तिक मोठेपणाकडे पाहून क्षत्रियाचा दर्जा शिवाजीला देण्यात आलेला नव्हता हे उघड आहे. हा त्याला जो दर्जा दिला तो त्याच्या घराण्यात वंशपरंपरेने चालणारा होता. त्या दर्जाबद्दल शंका प्रदर्शित करण्याची कोणाची छाती नव्हती. त्याच्या घराण्यातील एखाद्या वंशजाने त्या दर्जाला न शोभणारे असे काही अनिष्ट कृत्य केले असल्यामुळे तो दर्जा त्या घराण्यातून नष्ट होऊ शकत होता. सामान्यतः तो दर्जा नष्ट होऊ शकत नव्हता– क्षत्रियाच्या दर्जाला न शोभणारे एखादे कृष्णकृत्य शिवाजीच्या एखाद्या वंशजाने केलेले होते असा आरोप कोणीही केलेला नव्हता. असे असताही शिवाजी व त्याचे वंशज क्षत्रिय होते असा ब्राह्मणांनी पूर्वी जो निर्णय दिलेला होता तो निर्णय धुडकावून लावण्यासाठी ब्राह्मण पुनः पुढे सरसावले.

असे होण्याचे कारण हेच की, एखाद्या हिंदू माणसाचा सामाजिक दर्जा ठरविताना वाटेल तेव्हा वाटेल तो निर्णय देण्याचा किंवा दिलेला निर्णय बदलण्याचा आपणाला अधिकार आहे, अशी ब्राह्मणांची भावना होऊन बसलेली आहे. ब्राह्मण लोक एखाद्या शूद्र माणसाला

क्षत्रिय बनवतील. ते एखाद्या क्षत्रिय माणसाला शूद्र ठरवून त्याला अधोगतीला नेतील. सामाजिक दर्जा ठरविण्याच्या बाबतीत ब्राह्मणांचे अधिकार अमर्यादित आणि निरंकुश अशा स्वरूपाचे आहेत.

वर दिलेली उदाहरणे मुंबई प्रांतातून घेतलेली आहेत याबद्दल वाद नाही. (या उदाहरणांतील प्रत्येकाची तपशीलवार माहिती श्री. के. सी. ठाकरे यांच्या 'ग्रामण्यांचा साद्यंत इतिहास' या पुस्तकात आहे, ती पहावी. हे पुस्तक १९१९ मध्ये प्रसिद्ध झाले होते.) परंतु त्यातून जी तत्त्वे वेचून काढता येतात ती स्पष्ट आहेत व ती इतर प्रांतांतील उदाहरणांमध्येही पहावयास मिळतील. ती तत्त्वे येणेप्रमाणे–

(१) उपनयन करण्याचा अधिकार फक्त ब्राह्मणांनाच आहे. शिवाजी, प्रतापसिंह, कायस्थ, पांचाळ आणि पवशे यांच्यापैकी कोणालाही आपले उपनयन ब्राह्मणेतराकडून व्हावे असे वाटत नव्हते.

(२) ब्राह्मण कोणाचे उपनयन करील व कोणाचे करणार नाहीत हे सांगण्याचा अधिकार ब्राह्मणांचा आहे. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे तर असे की, एखाद्या जातीला उपनयनाचा अधिकार आहे किंवा नाही, हे सांगण्याचा अधिकार ब्राह्मणांचा आहे.

(३) एखाद्याला उपनयनाचा अधिकार देण्याचा निर्णय ब्राह्मणाने प्रामाणिकपणाने दिला असे समजू नये. तो निर्णय पैसे देऊन विकत घेता येतो. शिवाजीने गागाभटाचा निर्णय गागाभटाला पैसे देऊन विकत घेतला होता.

(४) ब्राह्मणाने एखाद्याला उपनयन नाकारले तर ते काही कायदेशीर किंवा धार्मिक कारणामुळे नाकारले असे समजू नये. असा नकार देण्यात ब्राह्मणांना काही राजकारणाचे कुटील डावपेच टाकावयाचे असतात. ब्राह्मणांनी खत्रियांना उपनयन नाकारले याचे कारण हेच होते की, राजकीय सत्ता आपल्या हातात ठेवण्यासाठी ब्राह्मण व क्षत्रिय हे परस्परांचे प्रतिस्पर्धी म्हणून झगडत होते.

(५) उपनयन नाकारण्याबद्दलचा निर्णय दिला गेला तर, त्याच्या विरुद्ध फेरतपासणी करावयाची असेल तर ती विद्वत्त परिषदेने नकारावयाची आणि या परिषदेचे सर्व सभासद फक्त ब्राह्मणच असले पाहिजेत.

वरच्या स्तंभात जो उहापोह केलेला आहे, त्यावरून सर्वांना हे स्पष्ट दिसून येईल की, उपनयन नाकारण्याचा अधिकार ब्राह्मणांच्या हातात होता. असला अधिकार हातात असता आणि सर्व ब्राह्मणेतरांच्या डोक्यांवर मिऱ्या वाटण्याची जबरदस्ती हौस मनात असता ब्राह्मणांनी त्या सत्तेचा उपयोग शूद्रांच्या विरुद्ध केला यात आश्चर्य मानण्यासारखे काही नाही.

OOO

## प्रकरण ११ वे

# समेटाची हकीगत

मी आतापर्यंत पुढील विधाने सिद्ध करण्याचा प्रयत्न केलेला आहे -

(१) शूद्रांचे हिंदी-आर्य समाजात मूळचे स्थान दुसऱ्या वर्णात होते. त्या दुसऱ्या वर्णातून त्यांना काढून त्यांची गणना चवथ्या वर्णात जी केली ती ब्राह्मणांनी.

(२) शूद्रांना अधोगतीस पोहोचविण्यासाठी ब्राह्मणांनी जे तंत्र वापरले ते म्हणजे उपनयनाचा अधिकार शूद्रांना न देणे.

(३) शूद्र राजांनी पूर्वी ब्राह्मणांवर बरेच अत्याचार केले होते व त्यांची विटंबना केली होती. याबद्दल सूड उगविण्याच्या ईर्षेने ब्राह्मणांनी शूद्रांना दुसऱ्या वर्णातून काढून चौथ्या वर्णत ढकलून दिले, त्यांना अधोगतीस मिळविले.

ही सर्व विधाने आरशाप्रमाणे स्वच्छ आहेत. तथापि त्याच्या विरुद्ध काही प्रश्न उपस्थित कारणारा जर कोणी असू शकेल, तर त्याचे प्रश्न खालीलप्रमाणे असतील -

(अ) काही थोड्या शूद्र राजांबरोबर ब्राह्मणांचे झगडे झाले असतील. पण त्यावरून ब्राह्मण सर्व शूद्र जातीचे शत्रू कसे झाले असतील?

(ब) शूद्र राजांनी ब्राह्मणांना इतके सतावले होते काय, की ज्यामुळे ब्राह्मणांमध्ये शूद्रांच्या विरुद्ध तिरस्काराची भावना आणि सूडाची इच्छा उत्पन्न झाली?

(क) ब्राह्मण आणि शूद्र यांच्यात समेट झाला नव्हता काय? समेट झाला होता तर शूद्रांना अधोगतीस पोहोचविण्याचे ब्राह्मणांना काही प्रयोजन नव्हते.

(ड) शूद्रांनी आपली ही अधोगती कशी होऊ दिली?

हे प्रश्न महत्त्वाचे व मुद्देसूद आहेत व त्यांचा गंभीरपणे विचार केला पाहिजे हे मी कबूल करतो. या प्रश्नांना उत्तरे देणे हे योग्य आहे.

### १

ब्राह्मणांचे काही थोड्या राजंच्या बरोबर भांडण झाले होते. एवढ्या कारणाने ब्राह्मणांनी सर्व शूद्र जातीला अधोगतीस नेण्याचा चंग बांधला, तो का? हा प्रश्न योग्य व महत्त्वाचा आहे. तथापि जर दोन गोष्टी लक्षात ठेवल्या तर या प्रश्नाचे उत्तर देणे कठीण नाही.

प्रथम हे लक्षात घेतले पाहिजे की ९ व्या प्रकरणात वर्णन केलेले ब्राह्मण आणि शूद्र राजे यांच्यामधील झगडे हे वैयक्तिक स्वार्थाचे दिसतात तसे नव्हते. ते सामाजिक म्हणजे सार्वजनिक स्वार्थाचे होते. या झगड्यांमध्ये ज्या कथा दिल्या आहेत, त्या सर्व ब्राह्मणांना उद्देशून आहेत. त्यात फक्त एकच कथा वसिष्ठाला उद्देशून आहे. राजांच्या तर्फे पाहिले तर

असे दिसते की, या कथेतील राजे व्यक्तिशः ब्राह्मणांच्या बरोबर झगडत आहेत, परंतु हे सर्व राजे सुदासाच्या वंशाशी संबंध असलेल्या वंशाचे होते, ही गोष्ट विसरता कामा नये.

सुदासासंबंधी सांगावयाचे तर ते असे की, तो ज्या झगड्यात अडकलेला होता, तो झगडा ब्राह्मण आणि क्षत्रियांपैकीच शूद्र जमात यांच्यामधला होता, यासंबंधी तिळमात्र संशय नाही. इतर दुसऱ्या झगड्यात सापडलेले जे राजे होते तेसुद्धा या शूद्र जमातीचे होते असे म्हणावयास आपणापुढे प्रत्यक्ष पुरावा नाही. पण आपणाजवळ दुसरा पुरावा आहे व त्यावरून आपण असा निष्कर्ष काढू शकतो की, सुदास ज्या वंशात जन्मला होता, त्या वंशाची धागेदोरे असलेल्या वंशामध्ये ते राजे जन्मलेले होते.

या बाबतीत खालील वंशवृक्ष पहा. हा महाभारताच्या आदिपर्वारून तयार केलेला आहे. (Muir, Vol. I, p. 126)

मरीची

↓

मरीची = दाक्षायणी (दक्ष प्रजापतीची एक कन्या)

↓

आदित्य | विवस्वत

विवस्वत ↓

मनू (१० पुत्र) | यम

मनू ↓

वेण | ध्रिष्णु | नौशौत | नभग | इक्ष्वाकू | करुष | शर्यती | इला | प्रिशद्र | नभगौश्ला

जे क्षत्रिय राजे ब्राह्मणांबरोबर झगडे खेळले ते सर्व राजे आप्तनातेवाईकपणाच्या धाग्याने एकत्र बांधलेले होते हे प्रस्तुतच्या मुद्द्यावर चांगला प्रकाश पाडते. प्रमुख हा इलाचा मुलगा आणि मनू वैवास्वत याचा नातू आहे. (Muir, Vol. I, p. 307). निमी हा इक्ष्वाकूच्या अनेक मुलांपैकी एक मुलगा आहे. इक्ष्वाकू हा मनू विवास्वत याचा मुलगा आहे. (Muir, Vol. I, p. 361) त्रिशंकू हा इक्ष्वाकूचा २८ वा वंशज आहे. (Muir, Vol. I, p. 362) सुदास हाही इक्ष्वाकूचा वंशज आहे. (Muir, Vol. I, p. 362) वेणू हा मनू वैवास्वताचा मुलगा आहे. (सुदासाचा बाप दिवोदास हा पुरूचा राजा होता आणि पुरू लोक हे इक्ष्वाकू वंशाचे होते, असे वर्णन ऋग्वेदात केलेले आहे.) आपला वंश इक्ष्वाकू आहे असे काही राजे म्हणत असत. ते सर्व राजे मनू व इक्ष्वाकूचे वंशज असल्यामुळे, ते सर्व सुदासांचे नातेवाईक ठरतात असे म्हणावयास काही हरकत नाही. सुदास शूद्र होता ही गोष्ट जर मान्य केली तर हे सर्व राजे शूद्र जमातीचे होते हे ओघाने सिद्ध होते.

२

या बाबतीत जरी प्रत्यक्ष पुरावा उपलब्ध नाही, तरी हे झगडे काही शूद्र राजे व ब्राह्मण लोक यांच्यात झालेले नसून ते सर्व ब्राह्मण जमात यांच्यामध्ये झालेले होते अशी कल्पना केली, तर ती अनैसर्गिक वाटणार नाही. हिंदी-आर्य समाज वन्यावस्थेत होता आणि एका जमातीच्या एका व्यक्तीने जे कृत्य केले असेल ते कृत्य सर्व जमातीने केले अशी त्यावेळची भावना रूढ झालेली होती. अशा पुरातन काळात हे झगडे ब्राह्मण व शूद्र राजे यांच्यामध्ये झालेले होते ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. एका राजाने केलेला झगडा त्या त्या लोकांच्या जमातीला बंधनकारक समजला जात होता हे उघड आहे. जुन्या काळच्या सर्व समाजाची अशी अवस्था होती की, टोळी किंवा जमात यांना घटक समजले जात असे; एका व्यक्तीला घटक समजले जात नसे. याचा परिणाम असा झाला की, एका व्यक्तीचा अपराध हा सर्व टोळीचा किंवा जमातीचा अपराध मानला जात असे. त्याचप्रमाणे टोळीचा किंवा जमातीचा जो अपराध असेल तो त्या टोळीच्या किंवा जमातीच्या प्रत्येक व्यक्तीचा अपराध मानला जात असे. ही गोष्ट लक्षात ठेवली तर असे म्हणावयास काही हरकत नाही की, आपणाशी विरोध करणाऱ्या राजाचा फक्त ब्राह्मणांनी द्वेष केला नाही, तर सर्व शूद्र जमातीचा द्वेष त्यांनी केला. म्हणूनच शूद्रांचे उपनयन करू नये असा निर्बंध ब्राह्मणांनी घातला.

शूद्र राजांनी ब्राह्मणांना फार सतावले होते काय या मुद्द्याबद्दल शंका घेण्याचे कारण नाही. काही गोष्टी राजांच्या हातून झाल्या असतील, काही ब्राह्मणांच्या हातून झाल्या असतील आणि या बाबतीत दोन पक्षात क्रोधाग्नीचा स्फोट घडवून आणण्याइतके स्फोटक साहित्य दोन्ही पक्षांच्या हातात होते.

ब्राह्मण पक्षाच्या हातात कोणते स्फोटक साहित्य होते ते पहा- समाजातील आपला दर्जा सर्वांपेक्षा श्रेष्ठ आहे आणि समाजात आपणासाठी खास हक्क, अधिकार व सवलती ही राखून ठेवलेली आहेत, असे ब्राह्मणांचे म्हणणे होते. श्रेष्ठ दर्जा, खास हक्क, अधिकार व सवलती यांच्यासंबंधी जेव्हा ब्राह्मण तंटे उपस्थित करीत असत तेव्हा तेव्हा त्यांचे वर्तन इतरांना अत्यंत त्रासदायक आणि असह्य होऊ लागले.

ब्राह्मणांचा श्रेष्ठ दर्जा, खास हक्क, अधिकार आणि सवलती दर्शविणारी यादी खाली दिली आहे. (यादीतील सारांशरूप माहिती काणे यांचे धर्मशास्त्र भाग २ (१) पान १३८-१५३ या पुस्तकात दिलेल्या जंत्रीवरून तयार केलेली आहे.)

(१) ब्राह्मण माणूस ब्राह्मण जातीत जन्मला केवळ एवढ्याच कारणासाठी सर्वांनी त्या ब्राह्मणाला सर्व वर्गांचा गुरू असे मानले पाहिजे.

(२) सर्व वर्गांची कर्तव्यकर्मे कोणती, त्या वर्गांनी योग्य कसे रहावे व वागावे आणि त्यांच्या उपजीविकेची साधने कोणती असावीत हे सर्व ठरविण्याचा खास हक्क ब्राह्मणाचा आहे. ब्राह्मण जसा उपदेश करतील त्याप्रमाणे वागणे हे सर्व वर्गांचे कर्तव्यकर्म आहे. ब्राह्मण

जशी सल्लामसलत देतील त्याप्रमाणे राज्यकारभाराचा गाडा राजाने चालविला पाहिजे.

(३) राजाचे वर्चस्व ब्राह्मणावर चालू शकत नाही. ब्राह्मण लोक वगळून बाकीच्या सर्व लोकांवर राजाचे वर्चस्व चालू शकते.

(४) (अ) फटके मारण्याची शिक्षा (ब) हातापायात बेड्या घालणे, (क) दंड करणे, (ड) हद्दपार करणे, (इ) निंदा करणे आणि (फ) त्याग करणे या शिक्षा ब्राह्मणांना माफ आहेत.

(५) जो ब्राह्मण क्षोत्रीय वेदांमध्ये पारंगत आहे त्याला कर माफ आहेत.

(६) ब्राह्मणाला भूमीत जो पैसा सापडेल त्या सर्व पैशावर त्याचा मालकी हक्क ठरतो. असला पैसा राजाला सापडला तर त्याने त्यातील अर्धा हिस्सा ब्राह्मणाला द्यावा.

(७) मालमत्ता राजाकडे देऊ नये. ती मालमत्ता क्षत्रियांमध्ये किंवा ब्राह्मणांमध्ये वाटावी.

(८) रस्त्याने राजा जात असताना त्याला श्रोत्रीय किंवा ब्राह्मण भेटला तर राजाने त्यांना प्रथम वाट द्यावी.

(९) सर्वांनी ब्राह्मणांना प्रथम नमस्कार करावा.

(१०) ब्राह्मणाला मारण्याची धमकी देणे किंवा त्याला मारणे किंवा त्याच्या शरीरातून रक्त बाहेर काढणे हे गुन्हे समजले पाहिजेत.

(११) ब्राह्मण व्यक्ती पवित्र आहे. ब्राह्मणाने जरी खून केलेला असला तरी त्याला फाशीची शिक्षा देऊ नये.

(१२) काही गुन्ह्यांच्या बाबतीत, त्या गुन्ह्यांसाठी इतर वर्गातील गुन्हेगारांना जी शिक्षा देतात, त्या शिक्षेपेक्षा कमी शिक्षा ब्राह्मणांना दिली पाहिजे.

(१३) ज्या खटल्यात ब्राह्मण पक्षकार नाही, त्या खटल्यात राजाने ब्राह्मण साक्षीदार म्हणून बोलावू नये.

(१४) एखाद्या स्त्रीला पूर्वीचे काही ब्राह्मणेत्तर नवरे जरी असले तरी अशा स्त्रीबरोबर जर ब्राह्मणाने लग्न केले तर फक्त तो ब्राह्मण त्या स्त्रीचा नवरा ठरतो. तिचा पूर्वीचा क्षत्रिय, वैश्य किंवा शूद्र नवरा हा ब्राह्मणाने तिच्याशी विवाह केल्यानंतर नवरा ठरू शकत नाही. (हा क्रमांक काणे यांनी उल्लेखलेला नाही. परंतु तो अथर्ववेद ५-१७, ८-९ यामध्ये सापडतो.)

वर सांगितलेले ब्राह्मणाचे खास हक्क व सवलती यांचे विवेचन केल्यानंतर श्री. काणे यांनी आपले विचार खालीलप्रमाणे प्रदर्शित केलेले आहेत. (काणे धर्मशास्त्र, भाग २, पा.१५३-५४) -

"ब्राह्मणांना जे आणखी सवलती हक्क देण्यात आलेले होते ते म्हणजे भिक्षा मागण्यासाठी दुसऱ्याच्या घरात निर्वेधपणे प्रवेश, सर्पण व फुले गोळा करणे, पाणी आणणे आणि यासारखी इतर कामे जर ब्राह्मणांनी केली तर ती कामे चोरीच्या सदरात मानू नयेत. दुसऱ्यांच्या बायकांबरोबर संभाषण करण्याचा ब्राह्मणांना हक्क आहे आणि स्त्रियांशी ब्राह्मण संभाषण करीत असता ब्राह्मणांना कोणी दुसऱ्यांनी मध्येच अडथळा उत्पन्न करू नये. नावेत

मोफत बसून नदीपार इतरांच्या अगोदर होणे हा ब्राह्मणांचा हक्क आहे. ब्राह्मण व्यापारासाठी नावेचा उपयोग करीत असतील तर त्यांना त्या नावेसाठी कर माफ असावा. जो ब्राह्मण प्रवासाला चालला आहे व थकला-भागलेला आहे आणि त्याच्याजवळ खाण्यास काही नाही अशा ब्राह्मणाने जर उसाच्या मळ्यातून दोन ऊस घेतले किंवा शेतात काही कादं किंवा भुईमुगाच्या शोंगांच्या डहाळ्या उपटून घेतल्या तर ब्राह्मणाच्या हातून काही अपराध होत नसतो.''

या सवलती - हक्कांची संख्या कालमानाने वाढत वाढत गेली. ब्राह्मण आणि शूद्र राजे यांच्यात जेव्हा झगडे चालू होते तेव्हा कोणते सवलती-हक्क रूढ झालेले होते हे सांगणे कठीण आहे. परंतु या सवलती-हक्कांपैकी बरेच त्रासदायक सवलती-हक्क, उदाहरणार्थ क्रमांक (१), (२), (३), (७) आणि (१४) हे त्यावेळी रूढ झालेले होते याबद्दल शंका नाही. असले सवलती हक्क सच्छील, स्वाभिमानी असलेल्या कोणत्याही माणसाचे डोके भडकून टाकतील याबद्दल तिळमात्र संशय नाही.

क्षत्रिय राजांच्या पक्षातर्फे बोलावयाचे तर असे म्हणता येईल की, ब्राह्मणांचे मगरूरीचे वर्चस्व पाहून राजे लोक भडकून गेले असतील व ते ब्राह्मणांचे हे वर्चस्व सहन करण्यास राजी नसतील. ते राजी होणे शक्य होते काय? ब्राह्मणांच्या बरोबर ज्या क्षत्रिय राजांनी झगडे केले त्यांच्यापैकी बरेच राजे सूर्यवंशाचे होते ही गोष्ट विसरता कामा नये. फक्त पुरुरव आणि नहुष हे राजे सोमवंशाचे होते ही गोष्ट पुढील वंशवृक्षावरून दिसून येईल.

| | | |
|---|---|---|
| सोम | - | तारा |
| बुध | - | इला |
| पुरुरवा | - | उर्वशी |
| आयुस | | |
| नद्रुप | - | नहुष |

पुरुरवाची आई इला ही मनू वैवस्वत याची मुलगी होती ही गोष्ट लक्षात धरली तर सोमवंशाचे राजे आणि ब्राह्मणांशी झगडे खेळणारे सूर्यवंशाचे क्षत्रिय राजे हे एकमेकांचे आप्त ठरतात. हे सूर्यवंशाचे राजे विद्या, घमेंड आणि क्षात्रतेज या बाबतीत सोमवंशीय राजांच्याहून निराळे होते. सूर्यवंशाचे जे क्षत्रिय होते, ते तडफदार व बाणेदार होते. सोमवंशाचे जे क्षत्रिय होते ते स्वाभिमानशून्य व दळभद्र होते. सोमवंशाच्या क्षत्रियांनी ब्राह्मणांपुढे लोटांगणे घातली व ते ब्राह्मणांचे गुलाम होऊन राहिले, हे व्हावे तसेच झाले. याचे कारण असे की, सोमवंशाचे क्षत्रिय लोक अक्षरशत्रू होते. सूर्यवंशाचे क्षत्रिय लोक विद्येच्या बाबतीत ब्राह्मणांइतके विद्वान होते, एवढेच नव्हे तर ब्राह्मणांपेक्षा ते उच्च दर्जाचे विद्वान राजर्षी म्हणून समजले जात असत. जे क्षत्रिय विद्वान ब्राह्मणांच्या झगड्यात पडले, विशेषतः त्यांची ही सत्यकथा आहे.

ऋग्वेदाची अनुक्रमणिका हिच्यावरून आणि आजपर्यंत परंपरेने जी माहिती सांगण्यात आलेली आहे. तिच्यावरून असे मानण्यात येते की, वेदांतील ऋचांचे कर्ते सूर्यवंशी राजे पुढे

दाखविल्याप्रमाणे आहेत. (Muir, Vol. I, p. 268)

| | |
|---|---|
| "६-१५ | वीतहव्य (किंवा भारद्वाज) |
| १०-९ | सिंधुद्वीप, अंबरीषाचा मुलगा (किंवा त्रिशिरसत्वष्ट्रींचा मुलगा) |
| १०-७५ | सिंधुक्षित - प्रियमेधाचा मुलगा. |
| १०-१३३ | सुदास - पिजवनाचा मुलगा. |
| १०-१३४ | मंधत्री - युवानश्वाचा मुलगा. |
| १०-१७९ | सिबी - उसीनराचा मुलगा. प्रतोदन - दिवोदासाचा मुलगा व काशीचा मुलगा आणि वसुमन - रोहिदासाचा मुलगा. |
| १०-१४८ | प्रिथी वैन्य." |

ऋग्वेदातील ऋचा कोणी रचलेल्या आहेत याबद्दलची माहिती मत्स्य पुराणात एका ठिकाणी दिलेली आहे. ती खालीलप्रमाणे - (Muir, Vol. I, p. 279)

"भृगु, काश्यप, प्रचेतस, दधीची, आत्मवत, और्व, जमदग्नी, कृप, शरद्वत, अर्ष्टिशेन, पुधाजित, वितहव्य, सुवर्चस, वैन, पृथ, दिवोदास, ब्रह्मस्व, ग्रित्स, शौनक हे ऋचा रचणारे भृगुवंशातील १९ जण होत.

"अंगीरस, वेधस, भारद्वाज, भालंदन. ऋतुबद्ध, गर्ग, सिती, संस्कृती, गुरुधिर, मंधत्री, अंबरीष, युवनास्व, पुरुकुत्स, प्रद्युम्न, श्रावणात्य, अजामिध, हर्याश्व, तक्षण, कवि पृशादाश्व, विरूप, कण्व, मुद्‍गल, उतथ्य, शारद्वत, वजस्तवस, अपस्य, सुवित्त, वामदेव, अजित, बुहदक्थ, दीघतमस, कक्षींवत हे ३३ प्रमुख अंगीरस वंशाचे होते. या सर्वांनी ऋचा रचलेल्या होत्या.

"आता कश्यप वंशजांकडे वळूया. गधीचा मुलगा विश्वामित्र, देवराज, बळू, शद्राम, मधुचनदास, ऋषभ, अद्यमर्षझ, अष्टक, लोद्रित, भृतकिल, वेदास्त्रवत, देवरन, मुणदाश्व, धनंजय, कीर्तिवंत, मिथिल, सलनकायन हे १३ कौन्सिल मोठे भक्तिमान, अंमळ श्रेष्ठ समजले जात होते."

"या प्रेमाने ज्यांनी ऋचांना जन्मास घातले असे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य यांच्यापैकी ९१ लोका हेते असे समजले जाते."

वैदिक ऋचा रचणाऱ्यांची जी वर यादी दिलेली आहे, तीमध्ये क्षत्रियांची नावे आहेतच, पण ज्या क्षत्रियांनी ब्राह्मणांशी झगडे केले अशाही क्षत्रियांची नावे त्या यादीत आहेत. वैदिक ऋचा रचणारे जे लोक होते, त्यांच्यात क्षत्रिय लोक अग्रगण्य होते. सर्व वैदिक ऋचांमध्ये अत्यंत प्रसिद्ध असलेली ऋचा म्हणजे गायत्री मंत्र ही ऋचा विश्वामित्राने रचलेली होती आणि विश्वामित्र क्षत्रिय होता. अशा श्रेष्ठ दर्जाच्या क्षत्रियांनी ब्राह्मणांच्या झगड्याचे आव्हान न स्वीकारणे ही गोष्ट त्रिकाळ अशक्य होती.

क्षत्रियांनी राज्याधिकार गाजविलेले होते व त्यामुळे त्यांच्यात अभिमान उत्पन्न झालेला होता. शिवाय ते विद्यार्जनातही पारंगत होते. अशा क्षत्रियांनी आपल्या पायावर लोटांगण घालावे म्हणून ब्राह्मणांनी चळवळ सुरू केली. क्षत्रियांना त्याचा जबरदस्त धक्का बसला

असेल. म्हणून ब्राह्मणांचे आव्हान त्यांनी जेव्हा स्वीकारले असेल तेव्हा ते अगदी निर्दय वृत्तीने स्वीकारले असेल. हे आव्हान स्वीकारून त्यांनी ब्राह्मणांना पुरे झोडपून काढले; वेण राजाने ब्राह्मणांना आपली पूजा करावयास लावली; कोणत्याही इतर देवाची पूजा ब्राह्मणांनी करावयाची नाही असा त्याने ब्राह्मणांवर कडक निर्बंध घातला. पुरुरवसाने ब्राह्मणांची मालमत्ता लुटली. नहुषाने ब्राह्मणांना आपल्या रथाला घोड्याप्रमाणे जुंपले व त्या रथात स्वतः बसून त्याने तो रथ ब्राह्मणांना शहरामधून ओढावयास लावला. राजघराण्यातील सर्व विधी करण्याची वहिवाट एका ब्राह्मण कुटुंबात वंशपरंपरेने चालत आली होती, ती वहिवाट निमीने बंद केली. आणि सुदासाने तर इतकी मजल मारली की, वसिष्ठ त्याच्या घराण्याचा एकदा पुरोहित होता तरी सुदासाने वसिष्ठाच्या मुलाला जिवंत जाळले. या गोष्टी लक्षात घेतल्या म्हणजे ब्राह्मण जातीला सर्व शूद्र जातीवर सूड उगवण्याची का ईर्ष्या उत्पन्न झाली असावी या प्रश्नाचे उत्तर मिळते. खरोखर, शूद्र जातीचा सूड घेण्यासाठी ब्राह्मणांचा मनःक्षोम व्हायला यापेक्षा बलवत्तर कारणे असणे असणे शक्य नाही.

## ३

ब्राह्मण आणि शूद्र यांच्यात समेट झाला असावा या मुद्द्याला अनुकूल असा काही पुरावा अस्तित्वात आहे, याबद्दल शंका नाही. या पुराव्यावर काही लोक विश्वास ठेवतील हेही शक्य आहे. हा पुरावा कितपत विश्वसनीय आहे याबद्दल माझे विचार सांगण्याच्या अगोदर त्या पुराव्याकडे प्रथम वाचकांचे लक्ष वेधणे इष्ट आहे. ब्राह्मण आणि शूद्र यांच्यामध्ये जे समेट घडून आले, त्यांच्यासंबंधीच्या कथा महाभारत आणि पुराणे यांच्यामध्ये हा पुरावा आहे.

समेटाची पहिली कथा दोन टोळ्यांसंबंधीची आहे. त्या टोळ्या म्हणजे भारत आणि त्रिस्तू या होत. विश्वामित्र भारत टोळीचा होता, वसिष्ठ त्रित्सू टोळीचा होता. भारत टोळीचे लोक वसिष्ठाचे किंवा त्रित्सू टोळीच्या लोकांचे शत्रू होते ही गोष्ट ऋग्वेदावरून सिद्ध होते. ऋग्वेदातील तो मजकूर खालीलप्रमाणे आहे. (Muir, Vol. I, P. 354)

३-५३-२४ – ''हे इंद्र! भारताचे हे पुत्र वसिष्ठाच्या लोकांना भेटण्यास टाळतात. ते त्यांच्या जवळ जाण्यास इच्छीत नाहीत.''

या दोन प्रकारच्या लोकांमध्ये कसा समेट घडून आला याची हकिगत महाभारताच्या आदिपर्वात सांगितलेली आहे. ती खालीलप्रमाणे (Muir, Vol. I, P. 361) –

''आणि त्यांच्या शत्रूंचे थवे भारतावर तुटून पडले व त्यांनी भारतांना खूप मार दिला. पांचाल्य राज्याच्या चतुरंग सेनेने पृथ्वीला थरथर कापावयास लावले. त्या राजाने पृथ्वीला वेगाने पादाक्रांत केले आणि त्याच्यावर स्वारी करून त्याच्या सैन्याचे दहा थवे उद्ध्वस्त केले व त्यालाही जिंकले. नंतर राजा संवरण हा आपल्या पत्नीना, प्रधानांना, पुत्रांना आणि मित्रांना बरोबर घेऊन त्या भीतिदायक महासंकटापासून पळत सुटला अणि सिंधू नदीच्या तीरावर असलेल्या प्रदेशात दाट जंगले व डोंगर यांचा आश्रय करून राहिला.

त्या ठिकाणी त्या भारत लोकांनी किल्ला बांधला व त्यामध्ये ते फार दिवस राहिले. भारत लोक तेथे राहून एक हजार वर्षे झाल्यानंतर वंदनीय ऋषी वसिष्ठ त्यांच्याकडे आला. वसिष्ठ येत असलेला पाहून भारत लोक त्याला सामोरे गेले व त्याला आदराने अभिवंदन करून त्यांनी त्याला अर्घ्य अर्पण केले व त्यांनी त्या तेजस्वी ऋषीचा आदरसत्कार परोपरीने केला. त्याला आसनावर बसविल्यानंतर खुद्द राजाने त्याला विनंती केली की, "तुम्ही आमचे 'पुरोहित व्हा. माझे राज्य परत मिळविण्यासाठी आपण एकत्र प्रयत्न करूया." भारत लोकांचा पुरोहित होण्याचे वसिष्ठाने कबूल केले आणि आपण ऐकलेच आहे की वसिष्ठाने त्या पुरूच्या वंशजांचे सर्व क्षत्रिय जमातीचे संपूर्ण सम्राटपद दिले; सर्व पृथ्वीवर त्याची एकट्याची सत्ता चालावी असेही वसिष्ठाने केले. ज्या सुंदर शहरात भारत लोक पूर्वी रहात होते त्या शहरात तो राजा होऊन राहिला व त्याने पूर्वीच्या सर्व राजांना पुनः आपले मांडलिक केले."

दुसरी कथा भृगू लोक आणि क्षत्रिय राजा कृतवीर्य यांच्यामध्ये झालेला झगडा व त्यानंतर त्यांच्यात झालेला समेट यासंबंधीची आहे. ही कथा महाभारताच्या आदिपर्वात आहे. ती येणेप्रमाणे (Muir, Vol, I, p. 448-449) -

कृतवीर्य या नावाचा एक राजा होता. तो फार उदार होता. वेदांमध्ये प्रवीण असलेले भृगू लोक त्याचे पुरोहित हाते. कृतवीर्याच्या औदार्यामुळे भृगू लोकांच्या घरात गाई व संपत्ती भरपूर आलेली असल्यामुळे ते फार श्रीमंत झाले होते. तो स्वर्गाला गेल्यानंतर त्याच्या वंशाजांजवळ पैसा अडका राहिला नाही. भृगू लोकांजवळ खूप संपत्ती आहे अशी त्यांना माहिती होती. म्हणून ते भृगू लोकांकडे पैशाची याचना करण्यास आले. काही भृगू लोकांनी आपली संपत्ती जमिनीत पुरून दडविली, तर काहींनी ब्राह्मणांना दानदेऊन टाकली. कारण त्यांना क्षत्रियांच्या उपद्रवाची भीती वाटत होती. काहींनी मात्र क्षत्रियांना जितका पैसा त्यांच्याकडून पाहिजे होता तितका दिला. एकदा असे झाले की, एक क्षत्रिय एका भृगू ब्राह्मणाच्या घरातील जमीन खणीत असता त्याला जमिनीत पुरून ठेवलेला काही पैसा सापडला. ही बातमी चोहोकडे पसरल्यावर क्षत्रिय लोक तेथे गोळा झाले व त्यांनी हा सापडलेला ठेवा पाहिला. त्या गोष्टीचा क्षत्रियांना राग आला. ते अगोदरच भृगूंना तिरस्काराने पहात होते. त्यांनी भृगूंची सर्रास कत्तल केली. त्यांनी गर्भवती भृगू स्त्रियांना सुद्धा ठार केले. तथापि, भृगूंच्या विधवा स्त्रिया हिमालय पर्वतामध्ये पळून गेल्या. त्यापैकी एका विधवा बाईने आपल्या गर्भातील न जन्मलेले मूल आपल्या मांडीत लपवून ठेवले. या मुलच्या अस्तित्वाची बातमी एका ब्राह्मण बाईने क्षत्रियांना सांगितली. तेव्हा क्षत्रिय या मुलाला मारण्यासाठी गेले. परंतु ते मुल आईच्या मांडीतून बाहेर पडले तेव्हा त्याचे तेज इतके दिव्य की त्यामुळे त्याला मारावयास आलेल्या क्षत्रियांचे डोळे दिपून गेले व ते क्षत्रिय आंधळे झाले. आंधळे झालेले ते क्षत्रिय गोंधळून गेले व काही दिवस पर्वतामध्ये चाचपडत फिरल्यानंतर त्यांनी त्या मुलाच्या आईची करुणा भाकली की, तू आम्हाला दृष्टी दे. पण तिने आपले बालक और्व याच्याकडे तुम्ही करुणा भाका, असे त्यांना सांगितले. और्व याच्या अंगात सर्व

वेद व सहा वेदांगे शिरलेली होती. आपल्यानातलगांची कत्तल केल्याबद्दल सूड उगविण्यासाठी और्वाने त्या क्षत्रियांना आंधळे केले होते व त्यांना दृष्टी परत देण्याचे सामर्थ्य त्याच्याच अंगात होते. त्याप्रमाणे ते आंधळे क्षत्रिय और्वाकडे गेले व त्यांची दृष्टी त्यांना परत मिळाली. तथापि भृगूंची कत्तल केल्याबद्दल सूड उगविण्याचा विचार और्वाने केला. म्हणून त्याने निरनिराळ्या घोर तपश्चर्या केल्या. तो तपश्चर्या करीत होता तेव्हा त्याच्या प्रभावाबद्दल देव, असुर आणि मानवलोक यांना फार भीती वाटू लागली. परंतु त्याचे वाडवडील (पित्र) त्याच्या समोर उपस्थित झाले व त्याला या सूडाच्या भावनेपासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करू लागले. ते त्याला म्हणाले की, आम्हाला क्षत्रियांचा सूड घेण्याची इच्छा नाही. प्राणघातक क्षत्रियांनी जी भगवान भृगूंची कत्तल केली होती, तिच्याकडे भृगूंनी कानाडोळा केला होता तो त्यांच्या दौर्बल्यामुळे नव्हे. ते पित्र म्हणाले, ''आम्हाला म्हातारपणाची दुःखे सहन करवेनात, म्हणून आमची क्षत्रियांनी कत्तल करावी अशी आम्ही इच्छा प्रदर्शित केली. भृगूच्या घरात जो पैसा पुरण्यात आलेला होतातो ज्यांना भृगूच्या विरुद्ध क्षत्रियांना चिथावून देण्याची इच्छा झाली अशा लोकांच्या उत्तेजनाने, कोणी माणसाने तो पैसा तेथे मुद्दाम पुरून ठेवला होता. कारण स्वर्गप्राप्तीची इच्छा धरणाऱ्या आम्हा लोकांना पैशाशी काय करावयाचे होते!'' इतके बोलून ते म्हणाले की, आम्ही जी ही हकिगत सांगत आहे ती एवढ्याचसाठी की मनुष्यवधाचे पाप तुझ्या माथी बसू नये. शेवटी ते और्वाला म्हणाले की, तू आपला राग आवर आणि जे पाप करण्याचे तू योजलेले आहेस ते करू नकोस. ते म्हणाले, ''हे पुत्रा! क्षत्रियांचा किंवा सात जगांचा विध्वंस करू नकोस, तुझा तप्त झालेला राग आवर. कारण तो राग अनावर झाला तर तपश्चर्येने प्राप्त झालेली तुझी दिव्यशक्ती निष्फळ होईल.' तथापि, और्वाने उत्तर दिले की, आपण केलेली प्रतिज्ञा अपुरी राहू देणार नाही. माझ्या अंतःकरणात जो क्रोधाग्नी भडकलेला आहे तो दुसऱ्या कोणत्यातरी वस्तूवर सोडला नाही तर तो क्रोधाग्नी मलाच भस्म करील. न्याय, काळ आणि कर्तव्यकर्म यांचा विचार केला तर क्षत्रियांना दया दाखवून सूड न घेता सोडून द्यावे, असा जो सल्ला तुम्ही मुला देता तो मला स्वीकरता येत नाही, असे और्वाने त्यांना सांगितले. तथापि तू आपला क्रोध समुद्रात फेकून दे अशी पित्रांनी त्याला गळ घातली. क्रोध समुद्रात पडला तर तो पाण्यातील जीवजंतूंचा संहार करील व मग तुझी प्रतिज्ञा पुरी झाली असेही होईल, असा त्यांनी और्वाला सल्ला दिला. और्वाने आपला राग समुद्रात फेकून दिला, तेव्हा त्यातून हयसिरस उत्पन्न झाला. हयसिरस तोंडातून अग्नी बाहेर फेकतो व समुद्राचे पाणी पितो. वेदाशी परिचय असणाऱ्यांना हे माहीत आहे.''

कृतवीर्याचा मुलगा व हैहय लोकांचा राजा अर्जुन व परशुराम यांच्यामध्ये जो झगडा झालेला होता व त्यानंतर त्यांच्यात जो समेट झाला होता, त्यासंबंधीची कथा ही तिसरी कथा होय. ती महाभारताच्या वनपर्वात निवेदन केलेली आहे. ती येणेप्रमाणे (Muir, Vol. I, pp. 449-354) –

''आम्हाला असे सांगण्यात आलेले आहे की, कृतवीर्याचा मुलगा व हैहय लोकांचा

राजा अर्जुन याला एक हजार हात होते. त्याने दत्तात्रयापासून सोन्याचे विमान मिळविलेले होते. या विमानाची गती कोणालाही रोधता येत नव्हती, म्हणून त्याने देव, यज्ञ व ऋषी यांना पदतळी तुडविले आणि सर्व प्राण्यांना त्रास देऊन हैराण केले. देव व ऋषी यांनी विष्णूची मदत मागितली. अर्जुनाने इंद्राचा एकदा अपमान केलेला होता. अर्जुनाचा सत्यानाश कोणत्या मार्गाने करावा, याबद्दलचा विचार विष्णू व इंद्र या दोघांनी मिळून केला. यावेळी कन्याकुब्जा या देशात गधी या नावाचा राजा राज्य करीत होता. त्याला सत्यवती या नावाची मुलगी होती. या राजकन्येचा ऋषी रिचिक याच्याबरोबर झालेला विवाह आणि त्याच्यापासून जमदग्नीचा झालेला जन्म, याबद्दलची हकिगत वर जशा रीतीने सांगितलेली आहे, जवळ जवळ तशाच रीतीने सांगण्यात आलेली आहे. जमदग्नी व सत्यवती यांना पाच मुलगे झाले. त्यातील सर्वात लहान मुलगा प्रसिद्ध परशुराम हा होता. त्याने बापाच्या आज्ञेने आईला ठार मारले. कारण ती दुष्ट भावनेला बळी पडून पावित्र्यभ्रष्ट झालेली होती. त्याच्या चार वडील भावांनी आईला मारण्याची आपल्या बापाची आज्ञा पाळली नव्हती. त्यामुळे बापाने त्या चार भावांना शाप दिला होता की तुम्ही मतिमंद व्हा. तथापि, परशुरामाच्या इच्छेने त्याच्या बापाने त्याची आई जिवंत केली व त्याच्या भावांना बुद्धिवंत केले आणि याला स्वतःला मातृहत्येच्या पापापासून मुक्त केले. शिवाय तो अजिंक्य राहील आणि चिरायू होईल, असा वर त्याला बापापासून मिळालेला होता. त्याचा इतिहास राजा अर्जुन किंवा कृतवीर्य याच्या कथेशी आता जुळवून पुढे सांगावयाचा आहे. राजा अर्जुन किंवा कृतवीर्य जमदग्नीच्या आश्रमाला आला असता त्याचे आदरातिथ्य जमदग्नीच्या बायकोने फार आदराने केले. परंतु राजाने त्या आदरातिथ्याचे ऋण ऋषींच्या यज्ञात बलिदान द्यावयाच्या गाईचे वासरू बळजबरीने नेऊन आश्रमातील उंच झाड खाली पाडून फेडले. या अत्याचाराचा वृत्तांत जेव्हा परशुरामाला कळला तेव्हा त्याच्या तळपायाची आग मस्तकाला जाऊन भिडली व त्याने अर्जुनावर हल्ला करून त्याचे हजार हात तोडले व त्याला ठार मारले. याचा सूड म्हणून अर्जुनाच्या मुलाने परशुराम नाही असे पाहून शांतिप्रिय ऋषी जमदग्नी याला ठार केले. आपल्या पित्याला मारलेले पाहून परशुरामाचा क्रोधाग्नी भडकला. त्याने अशी प्रतिज्ञा केली की, मी या पृथ्वीच्या तळावरील सर्व क्षत्रिय ठार करीन. प्रतिज्ञा केल्यावर त्याने आपली हत्यारे हातात घेतली आणि मग त्याने अर्जुनाने सर्व मुलगे व नातू आणि हजारो हैहव लोक यांची कत्तल केली, परशुरामाने इतके लोक ठार मारले की त्यांच्या रक्ताने व मांसाने सर्व पृथ्वी चिखलाचा गोळा होऊन बसली. पृथ्वीवरील सर्व क्षत्रियांचा याप्रमाणे निःपात केल्यानंतर त्याच्या अंतःकरणात दयेची भावना जागृत झाली व तो वनात तपश्चर्येला निघून गेला. हजारो वर्षे लोटल्यानंतर तप्त डोक्याचा परशुराम एका जाहीर सभेला हजर राहिला. रैभ्य याचा मुलगा आणि विश्वामित्राचा नातू परवसु हा या सभेत परशुरामाला टोचून बोलला की, 'प्रतर्दन आणि इतर लोक या ययाती शहरात यज्ञासाठी जमा झालेले आहेत, हे सत्पुरुष क्षत्रिय नाहीत काय? तू आपली प्रतिज्ञा पुरी करण्यात चुकलेला आहेस आणि तू सभेत भलत्या-सलत्या बढाया मारीत आहेस. या शूर क्षत्रियांच्या भीतीमुळे तू डोंगरात

पळून गेलास व नंतर या पृथ्वीवर क्षत्रिय कुळांचा चोहोकडे सुळसुळाट झाला.' हे शब्द ऐकून परशुरामाने आपली शस्त्रे हातात घेतली. जे शेकडो क्षत्रिय पूर्वी परशुरामाच्या तडाख्यातून सुटले होते ते बलाढ्य राजे झालेले होते. तथापि, परशुरामाने या क्षत्रियांना, त्यांच्या मुलांना आणि गरोदर स्त्रियांना ठार मारले. काही गरोदर स्त्रियांनी, आपली गर्भातील मुले उघडकीस येऊ दिली नाहीत. एकवीस वेळा पृथ्वीला निःक्षत्रिय केल्यानंतर त्याने अश्वमेध केला व तो संपताना यज्ञाची दक्षिणा म्हणून परशुरामाने कश्यपाला पृथ्वी नजर केली.''

महाभारतकर्त्याने वरीलप्रमाणे झगड्याची कहाणी सांगितल्यानंतर त्या झगड्याचा समेट कसा झाला, याबद्दलची कथा पुढीलप्रमाणे सांगितलेली आहे. (Muir, Vol. I, pp. 451-452)-

''पृथ्वीला एकवीस वेळा निःक्षत्रिय केल्यानंतर जमदग्नीचा मुलगा सर्व डोंगरांमध्ये अत्यंत उत्कृष्ट असलेल्या महेंद्र डोंगरावर तपश्चर्या करू लागला. पृथ्वी निःक्षत्रिय झाल्यानंतर मृत क्षत्रियांच्या विधवा बायका ब्राह्मणांच्याकडे येऊन 'संतती द्या' अशी त्यांची प्रार्थना करू लागल्या. जे धार्मिक ब्राह्मण होते व ज्यांच्या मनात विषयवासना लवमात्र नव्हती, अशा ब्राह्मणांनी या विधवा स्त्रियांबरोबर योग्यकाळी समागम केला; त्यामुळे क्षत्रिय जमातीचा वंश पुढे चालू झाला. याप्रमाणे ब्राह्मणांनी क्षत्रिय स्त्रियांच्यामधून क्षत्रिय जातीची मोठ्या उत्साहाने उत्पत्ती केली व ती जात पुढे संख्येने वाढत गेली व चिरंजीव झाली. त्यामुळे ब्राह्मणांपेक्षा कनिष्ठ अशा चार जाती उत्पन्न झाल्या.''

ब्राह्मण व क्षत्रिय यांच्यामध्ये जे झगडे झाले व त्यानंतर त्यांच्यामध्ये जो समेट झाला, त्यांच्यासंबंधी वर जी उदाहरणे दिली आहेत ती उदाहरणे ज्या क्षत्रिय राजांनी ब्राह्मणांच्या विरुद्ध युद्ध पुकारले होते, त्या राजांच्या संबंधीची नाहीत. ज्या राजांनी ब्राह्मणांच्या विरुद्ध युद्ध पुकारलेले होते त्या राजांनी ब्राह्मणांच्या बरोबर समेट केला, हे दाखविणारी उदाहरणे आता घेऊया. यापैकी पाहिले उदाहरण कल्मषपद याचे आहे. पुढे दिलेल्या कथेमध्ये जे राजे दिसतात ते राजे ९ प्रकरणात ज्यांचा नामनिर्देश केला आहे तेच होत याबद्दल माझी खात्री नाही. ते राजे इक्ष्वाकू कुळाचे आहेत म्हणून मी त्यांचा उल्लेख करीत आहे. कल्मषपद हा सुदासाचा मुलगा होता असे समजले जाते. (हा कोणता सुदास याबद्दल मला नक्की सांगता येत नाही. त्याच्याबद्दल जी सविस्तर माहिती दिलेली आहे. तीवरून असे दिसते की तो पैजवन सुदास असावा.) ही कथा महाभारताच्या आदिपर्वात दिलेली आहे. (Muir, Vol. I, pp. 415-418) कल्मषपद आणि वसिष्ठ यांच्यात जे वैर होते त्याबद्दलच्या कथेचा भाग ९ व्या प्रकरणात दिलेला आहे. त्यांच्यात समेट कसा झाला त्याबद्दलचा कथेचा भाग खाली दिलेला आहे.

पुष्कळ डोंगर व प्रदेश पायाखाली घातल्यानंतर वसिष्ठ घरी आला व त्याच्या पाठोपाठ त्याची विधवा सून अद्रिस्यांती ही आली. ती मृत शक्त्रीची पत्नी होती. (शक्त्री हा शब्द शक्ती या शब्दाबद्दल चुकून पडलेला असावा) ती गरोदर होती. तिच्या उदरातून वेदांचा घोष, होत आहे, असा आवाज वसिष्ठाने ऐकला. तिच्या गर्भाशयातील मूल जन्मले, तेव्हा

त्याचे नाव पाराशर असे ठेवले. अद्रिस्यांतीच्या तोंडून जेव्हा वसिष्ठाने ऐकले की आपला वंश पुढे चालू होण्याची अजून आशा आहे, तेव्हा त्याने आत्महत्या करण्याचा ठरलेला विचार सोडून दिला. तथापि वसिष्ठ आणि त्याची सून हे वनात फिरत होते, तेव्हा त्यांना राजा कल्मपद हा भेटला व तो त्यांना गिळंकृत करण्याचा प्रयत्न करू लागला. कारण शापवाणीने तो मनुष्यभक्षक झालेला होता. परंतु तो त्यांना खावयास पुढे सरसावला तेव्हा वसिष्ठाने जोराने फुंकर मारून त्याला जागच्या जागी स्थिर केले. त्याच्या अंगावर पाणी शिंपडून व काही पवित्र मंत्र म्हणून वसिष्ठाने राजाला बारा वर्षे भोगलेल्या शापातून मुक्त केले. नंतर राजा वसिष्ठाला म्हणाला, हे सर्वश्रेष्ठ मुने! ज्याचा तू पुरोहित आहेस तो मी सौदास आहे– मी तुझे उपकार फेडण्यासाठी काय करावे? वसिष्ठ उत्तरला, 'हे जे काही घडलेले आहे ते दैवाच्या जोरामुळे. तू जा आणि तुझ्या राज्यावर राज्य कर. परंतु हे राजा, तू ब्राह्मणांचा कधीही धिक्कार करू नकोस.' राजा उत्तरला, मी सर्वोत्कृष्ट ब्राह्मणांचा कधीही तिरस्कार करणार नाही. मी तुमच्या सर्व आज्ञा शिरसावंद्य मानेन व तुमच्याबद्दल मनात आदरभाव बाळगेन आणि इक्ष्वाकू कुळाचे जे ऋण माझ्यावर आहे ते फेडण्याचे साधन मी तुम्हापासून घेतले पाहिजे. मला संतती व्हावी अशी माझी इच्छा आहे. तर ती तुम्ही मला दिली पाहिजे. त्याची विनंती पार पाडण्याचे वसिष्ठाने त्याला वचन दिले. नंतर ते अयोध्येला परतले आणि गादीला वारस तुम्ही उत्पन्न करा अशी राजाने वसिष्ठाला विनंती केल्यावरून वसिष्ठाकडून राणी गरोदर झाली आणि बारा वर्षांच्या शेवटी तिने मुलाला जन्म दिला. ''राणीचे नाव मदयंती होते.'' ती मित्रसह उर्फ कल्मषपद याची पत्नी म्हणून तिचा अनुशासन पर्वामध्ये उल्लेख केलेला आहे. (Muir, Vol. I, p. 418, 423 and 514)–

दुसरे उदाहरण महाभारताच्या अनुशासन पर्वातील आहे. ते खालीलप्रमाणे (Muir, Vol. I, pp. 374) –

''त्यावेळी फार बोलणारा आणि इक्ष्वाकू कुळात जन्मलेला राजा सौदास याने चिरंजीव साधु ऋषीमधील सर्वोत्कृष्ट ऋषी, सर्व विश्वात संचार करण्यास समर्थ आणि पवित्र विद्येचे भांडार असा त्याचा कुलपुरोहित वसिष्ठ याला साष्टांग नमस्कार करून विचारले की, 'हे पूज्य व पापरहित माणसा! सर्वांपेक्षा शुद्ध अशी तिन्ही लोकांमध्ये कोणती गोष्ट आहे की, एखाद्याने तिचे एकसारखे समारंभपूर्वक पालन केले तर त्याला सर्वोत्कृष्ट तऱ्हेचे पुण्य प्राप्त होईल? गाईंचे दान केल्याने केवढे मोठे पुण्य प्राप्त होते, गाईंच्यामध्ये कोणकोणते आश्चर्यकारक सद्गुण आहेत, त्या सद्गुणांमुळे गाई सर्व प्राणिमात्रांच्या जीवनपोषक, सध्याच्या काळी व भविष्यकाळात कशा झालेल्या आहेत? गाई विश्वव्यापक आहेत, त्या भूतकाळाच्या व भविष्यकाळाच्या माता आहेत, याबद्दल वसिष्ठाने आपल्या उत्तरात सौदासाला संपूर्ण माहिती सांगितली. स्वयंप्रेरणेने नम्रता धारण करणाऱ्या त्या राजाने ऋषीचे हे शब्द फार महत्त्वाचे व फार मोलाचे आहेत असे मनात उमजून गाईच्या रूपाने ब्राह्मणांना अपार संपत्ती देऊन टाकली व त्यामुळे त्याला सर्व लोक प्राप्त झाले. म्हणून या ठिकाणी सौदासाच्या मुलाला संताची पदवी देऊन त्याचा गौरव केलेला आपणाला पहावयास मिळतो.''

समेटाचे तिसरे उदाहरण जे आहे त्यात सुदासाच्या वंशजाचा उल्लेख केलेला आढळतो. ते महाभारताच्या शांतिपर्वात पहावयास मिळते. (Muir, Vol. I, pp. 455-456)

पृथ्वीतलावर वस्ती करण्यास जागा प्राप्त करून घेतल्यानंतर तीमध्ये कश्यपाने ब्राह्मणांची वसाहत उघडली व स्वतः अरण्यात निघून गेला. नंतर शूद्र व वैश्य ब्राह्मणांच्या बायकांशी गैरवर्तन करू लागले आणि बलवान लोक दीनदुबळ्या लोकांवर अत्याचार करू लागले. कोणाला आपली धनदौलत सुरक्षितपणे आपल्या ताब्यात राहील अशी खात्री राहिली नाही. अशा परिस्थितीमुळे चोहोकडे अंदाधुंदी सुरू झाली व पृथ्वी दुष्टांच्या कचाट्यात सापडली. तरी तिचे क्षात्रधर्माप्रमाणे दुष्टांपासून संरक्षण करण्यास कोणी क्षत्रिय राहिला नाही. अशा समयी न्यायाचे पालक स्वर्गातून पाताळावर उतरले. भीतीने संत्रस्त झालेली पृथ्वी इकडे तिकडे संरक्षणासाठी धावत सुटली. तेव्हा तिला पाहून कश्यपाने तिला आपल्या मांडीवर (ऊरु) घेऊन वर उचलली. यामुळे पृथ्वीला उर्वी हे नाव मिळाले. नंतर पृथ्वीदेवीने कश्यपाची करुणा भाकली आणि 'माझे संरक्षण करा' अशी तिने त्याला विनंती केली. ती राजाला म्हणाली, मी पुष्कळ स्त्रियांच्यामध्ये क्षत्रियांना जिवंत ठेवले; ते क्षत्रिय नंतर हैहव कुळात जन्मले. ते क्षत्रिय माझे संरक्षक होवोत. पौरवांचा वारस व विंदुरथाचा मुलगा याला रिक्षावत पर्वतावर अस्वलांनी वाढविले, तो आहे; तो माझे संरक्षण करो. त्याचप्रमाणे, कोमल अंतःकरणाचा व तेजस्वी पुरोहित पराशर हा ब्राह्मण असूनसुद्धा त्याने शूद्राप्रमाणे सौदासाच्या वारसाची हाताने कामे करून सेवाचाकरी केली व त्या वारसाला वाढविले, यामुळे त्या वारसाला सर्वकर्मन हे नाव प्राप्त झाले. तो वारस आहे, तो सुद्धा माझे संरक्षण करो. ज्या राजांना संकटकाळातून वाचविण्यात आले हाते अशा राजांची नावे सांगून पृथ्वी पुढे म्हणाली, 'या सर्व क्षत्रिय वंशाच्या लोकांना द्योकर व सोनार लोकांमध्ये राहावयास लाववून त्यांना निरनिराळ्या ठिकाणी जगविलेले आहे, ते माझे संरक्षण करतील, तर न डगमगता मी अशीच पुढे वाचेन. माझ्यामुळे त्यांच्या बापांची व आज्यांची कोणतेही कृत्य करण्यात उत्साही असलेल्या रामाने कत्तल केली होती, त्या कृत्याचे ऋण फेडणे हे माझे कर्तव्य आहे. कारण, माझे संरक्षण (कश्यपासारख्या) एखाद्या असामान्य माणसाकडून केले जावे, अशी माझी इच्छा नाही. मला एखादा सामान्य शास्ता मिळाला तरी माझे समाधान होईल, हे लौकर होऊ द्या.' पृथ्वीने ज्या क्षत्रियांचा नामनिर्देश केलेला होता, त्यांना कश्यपाने बोलावणे पाठविले आणि त्यांची गादीवर स्थापना केली.'' ब्राह्मण व शूद्र यांच्यामध्ये झालेले समेट दर्शविणारे पुरावे हे अशा स्वरूपाचे आहेत. असले पुरावे मान्य करण्यापेक्षा त्यांना दोन हाताच्या अंतरावर ठेवणे योग्य असे माझे मत आहे.

याचे पहिले कारण असे की, या सर्व कथांचा शेवट क्षत्रियांशी शांततामय समेट प्रस्थापित करण्यात आलेला आहे; पण तो समेट क्षत्रियांना सन्माननीय नव्हता. क्षत्रिय ब्राह्मणांना हीनपणाने शरण गेले असे प्रत्येक कथेत दाखविलेले आहे. भारत हे वसिष्ठाचे शत्रू होते. त्यांच्या देशात एकाएकी दुष्काळ पडतो. ते देशत्याग करतात व राज्य गमावतात. त्यांच्या पिढ्यान् पिढ्यांचा शत्रू वसिष्ठ याला ते विनंती करतात व प्रार्थना करतात की,

तुम्ही आमचे पुरोहित व्हा व आम्हालाया संकटापासून मुक्त करा. लढणे हे आमच्या ब्रीदाला शोभत नाही, असा हेका ब्राह्मणांनी धरला, ही गोष्ट भृगू लोक व क्षत्रिय यांच्या कथेमध्ये स्पष्टपणे दाखविण्यात आलेली आहे. म्हणजे युद्ध टाळण्याचे श्रेय ब्राह्मणांना दिलेले आहे. हैहव, क्षत्रिय आणि कल्मषपदासारखे सौदास लोक यांच्या कथेत असे दाखविलेले आहे की, विजयी बाह्मणांना जित क्षत्रिय शरण गेले व ब्राह्मणांनी आपली शरणागती स्वीकारावी म्हणून क्षत्रियांनी आपल्या बायका ब्राह्मणांना देऊन ती शरणागती ब्राह्मणांकडून विकत घेतली. ब्राह्मणांचा उदो उदो करावा आणि क्षत्रियांची मानहानी करावी या हेतूने या कथा मुद्दाम रचलेल्या आहेत. या असल्या घाणेरड्या, गलिच्छ, हिडीस व दंभोक्तीपूर्ण कथा खऱ्या ऐतिहासिक घटना आहेत असे कोण समजेल? जो कोणी ब्राह्मण्याचा भक्त असेल तोच फक्त या कथांना महत्त्व देईल.

ब्राह्मण व शूद्र यांच्यामध्ये समेट झाला हे दर्शविणारे जे पुरावे मिळतात, त्यांचे स्वरूप हे असे आहे. ब्राह्मण व शूद्र यांच्यामध्ये समेट झाला होता हे दर्शविणारे एखादे उदाहरण घेऊन पाहूया. हे उदाहरण सुदासाच्या पुत्रपौत्रादी वंशजाचे घ्या. त्यावरून असे दिसते की, असल्या प्रकारचा समेट झालेला नव्हता, याबद्दल भरपूर पुरावा त्या उदाहरणावरून मिळतो. याचे एक कारण असे की, वशिष्ठाचा मुलगा शक्ती किंवा शक्ति याचा मुलगा पाराशर याने जेव्हा ऐकले की आपल्या बापाला सुदासाने जिवंत जाळले; तेव्हा सर्व प्राणिमात्रांची सर्रास हत्या करण्याची त्याने प्रतिज्ञा केली, असे समजणे हे चमत्कारिक आहे. सर्रास कत्तल हा शब्दप्रयोग अलंकारिक रीतीने वापरलेला आहे हे उघड आहे. यात सांगण्याचा हेतू हा आहे की, सुदासाच्या वंशजांवर म्हणजे शूद्रांवर सर्रासपणे सूड उगविण्याची शपथ वसिष्ठाने (?) (पाराशराने) घेतली होती. भृगू लोक व क्षत्रिय यांच्यामध्ये झगडे कसे झाले व अहिंसेचा अवलंब करून ब्राह्मण त्या झगड्यात कसे यशस्वी झाले, याबद्दलचा वृत्तांत पाराशराला सांगून सूडाचे कृत्य तू करू नकोस, असे विनवून त्याला विश्वामित्राने सूडापासून परावृत्त केले असे महाभारतात म्हटलेले आहे, याबद्दल शंका नाही. परंतु ही कथा खरी असणे शक्य नाही. कारण इतर कथांप्रमाणे ही कथासुद्धा ब्राह्मणांचे वर्चस्व दाखविण्याच्या हेतूने मुद्दाम रचलेली आहे.

असले पुरावे ग्राह्य मानता ये तनाहीत याचे दुसरे कारण असे की, ब्राह्मण व शूद्र यांच्यामध्ये समेट झालेला नव्हता हे दाखविणारा एक पुरावा आहे. शूद्रांच्या विरुद्ध कोणते कायदे अस्तित्वात होते याबद्दल मागे सांगितलेले आहे. त्या कायद्यांमध्ये वेळोवेळी कशी भर पडत गेली व त्या कायद्यांचे 'असामान्य' स्वरूप कसे आहे, हे पूर्वी दाखविण्यात आलेले आहे. सांगावयाचे बाकी जे राहिलेले होते ते एवढेच की पूर्वीची सांगितलेली पार्श्वभूमी लक्षात घेता ब्राह्मण व शूद्र यांच्यामध्ये समेट झाला होता, ही सूचना मान्य करणे त्रिकाळ अशक्य आहे. ब्राह्मणांनी शूद्रांना क्षमा केली नाही, एवढेच नव्हे तर शूद्रांची संतती वाढू नये म्हणून ब्राह्मणांनी शूद्र पुरुषांना ठार केले आणि गरोदर स्त्रियांनासुद्धा त्यांनी तितक्याच निर्दयपणाने ठार मारले. बऱ्याच लोकांना याबद्दल काही कल्पना नाही. म्हणून चांडाळ व

निषाद या लोकांसंबंधी काही गोष्टी सांगणे इष्ट आहे.

चांडाळ व निषाद हे लोक मिश्र विवाहापासून जन्मलेले प्रजा होत. निषाद हा अनुलोम विवाहापासून जन्मलेला असतो आणि चांडाळ हा प्रतिलोम विवाहापासून जन्मलेला असतो. अनुलोम करण्याचा अधिकार आहे असे मानले जाते. (अनुलोम सहा प्रकारचे आहेत. ते खालील कोष्टकात दिलेले आहेत.)

| बाप | आई | संतानाचे नाव |
|---|---|---|
| ब्राह्मण | क्षत्रिय | मुर्धावसिक्त |
| ब्राह्मण | वैश्य | अंबष्ठ |
| ब्राह्मण | शूद्र | निषाद |
| क्षत्रिय | वैश्य | महिष्य |
| क्षत्रिय | शूद्र | उर्ग |
| वैश्य | शूद्र | करण |

परंतु आश्चर्याची गोष्ट ही की, या नियमाला एक अपवाद निर्माण केलेला आहे. निषाद हा ब्राह्मण व शूद्र स्त्री यांच्यापासून उत्पन्न झालेला माणूस म्हणजे अनुलोमाचे जरी संतान आहे तरी त्याला उपनयनाचा अधिकार नाही असे मानले जाते. हा अपवाद का केला, हे समजावून घेणे मनोरंजक आहे. याचे एकच स्पष्टीकरण असे दिसते की, हे अरेरावीचे कृत्य आपल्या शत्रूच्या संततीविरुद्ध सूड घेण्याच्या बुद्धीने करण्यात आलेले आहे.

आता प्रतिलोमाचा विचार करू या. प्रतिलोमामुळे उत्पन्न झालेल्या सर्व संततीला नीचातले नीच लोक असे मनू म्हणतो, याबद्दल वाद नाही. (गौतम धर्मसूत्र, ४-२१ काणे यांच्या पुस्तकातील, उल्लेख, पा. २२९)

| बाप | आई | संतानाचे नाव |
|---|---|---|
| शूद्र | ब्राह्मण | चांडाळ |
| शूद्र | क्षत्रिय | क्षत्तर |
| शूद्र | वैश्य | अयोगव |
| वैश्य | ब्राह्मण | सूत |
| वैश्य | क्षत्रिय | वेदेहक |
| क्षत्रिय | ब्राह्मण | मागध |

त्याप्रमाणे, प्रतिलोमाचा डाग या सर्वांमध्ये समान वाटला गेलेला नाही. हक्क व अधिकार यांच्या बाबतीत अयोगव आणि क्षत्तर यांना फार सवलती दिलेल्या आहेत आणि चांडाळाला अर्वाच्य शब्दांमध्ये धिक्कारलेले आहे. हा जो पंक्तिप्रपंच करण्यात आलेला आहे त्याचे उदाहरण म्हणून मनुस्मृतीतील पुढील उतारे कोणालाही दाखविता येतील -

अयोगव यांच्याबद्दल मनुस्मृती फक्त एवढेच म्हणते की, "सुतारकाम हा अयोगवाचा धंदा असला पाहिजे." (१०-४६)

क्षत्तर यांच्याबद्दल मनुस्मृती म्हणते की, "बिळात जी जनावरे रहातात त्यांना पकडणे व ठार मारणे हा क्षत्तर यांचा धंदा असला पाहिजे." (१०-४९)

या लोकांना फक्त नीच धंदे देण्यात आलेले आहेत.

मनुस्मृतीतील वरील उतारे व चांडाळासंबंधी त्या स्मृतीत जे म्हटलेले आहेत त्यांची तुलना करून पहा. ती स्मृती चांडाळासंबंधी म्हणते –

"चांडाळ आणि डुक्कर, कोंबडा आणि कुत्रा, विटाळशी स्त्री व नपुंसक माणूस यांनी ब्राह्मण जेवत असताना त्यांना पाहू नये." (३-२-९)

"बहिष्कृत जातीतील लोक, चांडाळ, पुक्कस, मूर्ख, गर्विष्ठ, हीनपणाने जन्मलेले आणि अंत्यवासीन लोक यांच्यापैकी एकाबरोबरही कोणी राहू नये." (४-७९)

"चांडाळ, विटाळशी स्त्री, बहिष्कृत केलेला माणूस, बाळंतीण स्त्री, प्रेत व प्रेताला ज्याने स्पर्श केलेला आहे असा माणूस यांपैकी कोणत्याही माणसाला जर एखाद्याने स्पर्श केला असेल तर त्याने स्नान केले की त्याचा विटाळ जातो." (५-८५)

"जे जनावर कुत्र्याने ठार मारलेले असते, त्याचप्रमाणे जे जनावर इतर दुसऱ्या हिंस्र पशुंकडून किंवा चांडाळाकडून आणि इतर दस्यूंकडून ठार मारले गेलेले असते त्याचे मांस शुद्ध असते असे मनूने सांगितले." (५-१३१)

"एका वर्षाच्या आत शिक्षा भोगलेला गुन्हेगार, व्रात्य स्त्री किंवा चांडाळ स्त्री हिच्याबरोबर संभोग करणारा माणूस यांना दुहेरी शिक्षा करावी." (८-३७३)

"जो माणूस आपल्या जातीतील स्त्रीशिवाय दुसऱ्या स्त्रीला तो जवळ असता असे करण्याची मूर्खपणाने सवड देतो तो चांडाळापेक्षा काही जास्त चांगला समजू नये, असे प्राचीन काळापासून समजले जाते." (९-८७)

"चांडाळ आणि श्वपच यांची वस्ती गावाच्या बाहेर असावी. त्यांना सुग्रास अन्न खाऊ देऊ नये. कुत्री व गाढवे हीच त्यांची मालमत्ता असली पाहिजे." (१०-५१)

"दुसरे असे की, विश्वामित्राला बरे काय व वाईट काय याचे उत्तम ज्ञान होते, तरी तो भुकेने जेव्हा व्याकुळ झाला तेव्हा त्याने चांडाळाच्या हातातून कुत्र्याची तंगडी मागून घेऊन खाल्ली." (१०-१०८)

"ब्राह्मणाने यज्ञाच्या कामासाठी म्हणून शूद्रापासून कधीही मालमत्ता घेऊ नये. कारण शूद्राने भीक मागून आणलेल्या मालमत्तेपासून यज्ञात अर्घ्य अर्पण केले तर त्या ब्राह्मणाला मेल्यानंतर चांडाळाचा जन्म प्राप्त होतो." (११-२४)

"जर ब्राह्मणाने वैषयिक भावना तृप्त करण्यासाठी चांडाळ स्त्रीबरोबर किंवा हीन कुळात जन्मलेल्या स्त्रीबरोबर संभोग केला किंवा त्यांच्या हातचे अन्न खाल्ले किंवा त्यांच्याकडून नजराणे घेतले आणि ही कृत्ये त्याने जर अजाणतेपणाने केली असतील तर तो ब्राह्मण पतित होतो; परंतु त्याने ही कृत्ये जर जाणूनबुजून केली असतील तर तो त्या स्त्रियांच्या दर्जाला पोहोचतो." (११-१७५)

"जो ब्राह्मणांची हत्या करतो त्याला कुत्री, डुक्करे, गाढवे, उंट, कावळे, बोकड, मेंढ्या, जंगली जनावरे, पक्षी, चांडाळ व पुक्कस यांच्या योनीत जन्म मिळतो." (११-५५)

चांडाळ आणि अयोगव आणि क्षत्रिय हे प्रतिलोमाचे संतान असले तरी अयोगव व क्षत्तर यांच्याकडे मनुस्मृतीने ज्या रीतीने पाहिलेले आहे त्यापेक्षा कितीतरी वाईट रीतीने चांडाळाकडे पाहिलेले आहे, हे स्पष्ट होत नाही काय? प्रतिलोमाच्या सर्व संतानांमधून चांडाळाला निवडून काढून तो अत्यंत दुष्ट तऱ्हेचा माणूस आहे असे मनुस्मृतीने का भासवावे बरे? याचे कारण हेच की, ब्राह्मणांनी तिरस्कृत केलेल्या शूद्राचा तो वंशज आहे. आपल्या शत्रूच्या मुलांवर सूड उगविणारे हे कृत्य आहे, हेच खरे.

ब्राह्मण व शूद्र यांच्यात समेट झालेला नव्हता ही गोष्ट वरील विवेचनावरून सिद्ध होते. याबद्दल तिळमात्र संशय राहात नाही.

४

शूद्रांनी आपली ही अधोगती कशी होऊ दिली, हा शेवटाचा आक्षेप आपण आता पाहू या. हा आक्षेप घेणाऱ्याच्या मनात प्रथम ही भावना जागृत झालेली असावीसे दिसते की, हिंदी-आर्य समाजात शूद्र लोकांचीच लोकसंख्या इतर वर्गापेक्षा जास्त असली पाहिजे. एवढी मोठी लोकसंख्या असूनसुद्धा शूद्रांनी उपनयनाबद्दलचा नकार व यासारखी इतर अन्याय्य बंधने आपणावर निमूटपणे लादू दिली हे जरा विचित्र दिसते, असे या भावनेवरून वाटावयास लागते. कारण, सध्याच्या हिंदी समाजाची जी लोकसंख्या आहे तीत जास्त भरणा शूद्रांचा आहे. यावरून कुणी असे अनुमान काढले की पूर्वीच्या आर्य-हिंदी समाजाच्या लोकसंख्येत शूद्रांचाच जास्त भरणा असला पाहिजे, तर ते अनुमान या भावनेला पोषक असेच आहे. परंतु असे अनुमान काढावयास मुळीच वाव नाही; कारण की, हिंदी-आर्य समाजातील शूद्र हे आजच्या हिंदू समाजातील शूद्रांहून वांशिक दृष्टीने अगदी वेगळे आहेत. आजच्या हिंदू समाजातील शूद्र हे पूर्वीच्या हिंदी-आर्य समाजातील शूद्रांच्या वंशात जन्मलेले नाहीत. 'शूद्र' या शब्दाचा अर्थ वेगवेगळ्या काळी काय होता याबद्दल पुरा उमज न पडल्यामुळे वरील प्रकारचा गोंधळ उत्पन्न झालेला आहे. हिंदी-आर्य समाजातील शूद्र यांचे अर्थ परस्पराहून वेगवेगळे आहेत. हिंदी-आर्यांच्या काळी हा शब्द एका जमातीचे विशेष नाम म्हणजेच नाव होते. त्या जमातीचे जे लोक होते त्यांचे नाव शूद्र असे मानले जात होते. आजच्या हिंदू समाजात शूद्र हा शब्द ज्या अर्थाने वापरला जातो त्या अर्थाने तो विशेष नाम होत नाही. कनिष्ठ दर्जाच्या व असंस्कृत स्थितीत राहणाऱ्या माणसांच्या वर्गाचे विशेषण म्हणून तो शब्द वापरला जातो. निरनिराळ्या प्रकारच्या व परस्परांपासून भिन्न असलेल्या टोळ्या व जमाती यांचे जे अनेक वर्ग आहेत ते मिळून जो समाज आज झालेला आहे, त्या समाजाच्या लाकांमध्ये साधर्म्य कोणत्याही बाबतीत नसते. ते सर्व लोक संस्कृतीच्या अगदी खालच्या पायरीवर उभे आहेत, एवढेच त्यांच्यामध्ये साधर्म्य आहे. अशा लोकांना शूद्र या नावाने संबोधणे चुकीचे आहे. हिंदी-आर्य समाजातील जे शूद्र होते त्यांनी आपल्यावर

ब्राह्मणांचा राग ओढवून घेतलेला होता. या शूद्रांशी आजच्या हिंदू-समाजातील शूद्रांचे काहीच सोयरसुतक नाही. अलीकडील काळात शूद्र म्हणून समजले गेलेले लोक निरपराधी व मागासलेले आहेत. या शूद्रांची वैदिक काळातील शूद्रांशी गल्लत करून त्यांच्याकडून काही अपराध झालेला नसताही वैदिक शूद्रांवर लादलेले निर्बंध व देहदंड त्यांच्यावर लादण्यात आलेले आहेत, ही शोचनीय गोष्ट आहे.

हिंदी-आर्य समाजाचे शूद्र आणि हिंदू समाजाचे शूद्र हे दोन निराळे व परस्परांपासून भिन्न स्वरूपाचे लोक आहेत, हे सत्य आहे आणि याची जाणीव एकेकाळी धर्मशास्त्रकारांच्या मनाला होती हे अगदी उघड आहे. सत्छूद्र आणि असत्छूद्र या दोन वर्गांमध्ये व अनिर्वासित शूद्र आणि निर्वासित शूद्र या दोन वर्गांमध्ये धर्मशास्त्रकारांनी जो भेदभाव करून ठेवलेला आहे, त्यावरून या गोष्टींची सत्यता पटते. सत्छूद्र म्हणजे सुसंस्कृत शूद्र आणि असत्छूद्र म्हणजे असंस्कृत शूद्र. निर्वासित शूद्र म्हणजे खेड्यातील जमातीत राहणारा शूद्र, अनिर्वासित शूद्र म्हणजे खेडयातील जमातीच्या बाहेर राहणारा शूद्र. अशा प्रकारच्या केलेल्या भेदावरून काही लोक असे मानतात की, धर्मशास्त्रकारांच्या दृष्टीने शूद्रांची परिस्थिती सुधारत चालली होती; कारण, काही शूद्रांना समाजात राहावयास देऊन त्यांना सामाजिक व्यवहारात भाग घेण्यास मुक्तद्वार केले गेले; ही सवलत पूर्वीच्या काळात शूद्रांना मुळीच देण्यात आलेली नव्हती. परंतु जे लोक वरीलप्रमाणे समज करून घेतात तो चुकीचा आहे. (काणे, १ (१) पान १२३. काणे यांचे मत असे आहे की, धर्मशास्त्रकारांनी शूद्रांमध्ये जे भेद केले त्यावरून हे दिसून येते की, शूद्रांना त्यांच्या पूर्वीच्या अवनत परिस्थितीतून क्रमाक्रमाने वरच्या दर्जाला चढविण्यात येत होते हे मत चुकीचे आहे.) पण या भेदाचे खरे स्पष्टीकरण असे आहे की, सच्छूद्र आणि निर्वासित शूद्र हे शब्द हिंदी-आर्य समाजातील शूद्रांना उद्देशून वापरलेले आहेत आणि असत्छूद्र व अनिर्वासित शूद्र हे शब्द हिंदू समाजाचा एक घटक म्हणून रहावयास या शूद्रांनी सुरुवात केली, त्या शूद्रांना विशेष म्हणून वापरलेले आहेत. आपला विषय हिंदी-आर्य समाजातील शूद्रांसंबंधीचा आहे. त्या शूद्रांची हिंदू समाजातील लोकसंख्या फार आहे. एवढ्यावरून हिंदी-आर्य समाजातील शूद्रांची सुद्धा संख्या फार असली पाहिजे, असे अनुमान काढणे बरोबर होऊ शकत नाही. शूद्रांची सामाजिक संघटना कोणत्या प्रकारची होती; ते टोळ्याटोळ्याने, जमातीजमातीने किंवा अनेक जमातींच्या समूहाने अथवा अनेक कुटुंबांचा समूह करून रहात होते की काय, याची आपणाला नक्की कल्पना नाही. परंतु टोळ्याटोळ्यांनी राहण्याइतकी जरी शूद्रांची पूर्वी संख्या असेल तरी ती संख्या काही हजारांच्या वर गेलेली नसावी. भारत लोकसंख्येने फार लहान होता, असा ऋग्वेदात स्पष्ट उल्लेख केलेला आहे. (७-६६-३) पांचालाचा राजा सोन सत्रसह याने अश्वमेध केलेला होता. त्याचा उल्लेख शतपथ ब्राह्मणामध्ये केलेला आहे तो असा (Quoted by Oldenberg-Life of Lord Buddha, pp. 404) -

''जेव्हा सत्रसह अश्वमेध करतो तेव्हा शस्त्रांनी सज्ज असे सहा हजार सहाशे तीस तौर्वस लोक उभे राहतात.

तौर्वस लोकांच्या टोळीत सहा हजारापेक्षा जास्त माणसे नव्हती, हे जर खरे मानले

तर शूद्रांची संख्या फारशी असणे शक्य नाही.''

पूर्वी शूद्रांची लोकसंख्या जास्त असली काय किंवा कमी असली काय शूद्रांवर जी बंधनांची संकटपरंपरा कोसळली होती ती येऊ न देण्यासाठी शूद्रांना काही करता आले असते काय? शूद्रांनी काही ब्राह्मणांना संत्रस्त केल्यामुळे त्या ब्राह्मणांनी शूद्रांचे उपनयन करण्याचे नाकारले; परंतु ज्या ब्राह्मणांना ज्यांनी अजिबात दुखविलेले नव्हते अशा ब्राह्मणांकडून शूद्रांना उपनयन करून घेणे शक्य होते काय? हे संभवनीय होते हे खरे, पण अर्थात ते इतर अनेक प्रकारच्या परिस्थितीवर अवलंबून होते. सर्व ब्राह्मणांनी मिळून शूद्रांच्या विरुद्ध एकजूट उभारून आघाडी उघडली होती की काय आणि ती आघाडी जमीनदोस्त करणे शूद्रांना शक्य होते की काय, याची अगोदर आपणाला माहिती नाही. ब्राह्मणांनी शूद्रांचे उपनयन करण्याचे नाकारले तेव्हा या विषयाबद्दल जी चळवळ झाली असेल ती त्या काळात ब्राह्मण लोकांची स्वतःची जात निर्माण झालेली होती की काय, हे आपणाला माहीत नाही. परंतु ऋग्वेदाच्या काळातसुद्धा ब्राह्मण लोकांचा एक स्वतंत्र वर्ग निर्माण झालेला होता, त्यांच्यामध्ये वर्गजागृतीची भावना निर्माण झालेली होती आणि आपल्या वर्गाचे हितसंरक्षण व्हावे म्हणून ते डोळ्यात तेल घालून बसलेले होते हे स्पष्ट आहे. (काणे, भाग २ (१), पा. २९). ब्राह्मणांचा शूद्रांविरुद्ध असलेला व्यूह अशा परिस्थितीत ढासळून टाकणे शूद्रांना कठीण गेले असते. दुसरे असे की, उपनयन करणे हा फक्त कुलपुरोहितांचाच खास हक्क त्यावेळी होऊन बसलेला असेल. राजा निमीची कथा हेच दाखविते की, यज्ञविधी करणे हा कुलपुरोहितांचाच खास हक्क होऊन बसलेला होता. (काणे, भाग २ (१), पा. १७५). वर जे विचार प्रदर्शित केलेले आहेत त्यांच्यामध्ये जर काही तथ्य असेल, तर ब्राह्मणांनी शूद्रांच्या विरुद्ध जी संहारक एकजूट आघाडी उभारलेली होती ती आघाडी टाळण्यासाठी शूद्रांना काहीही करता आले नसते हे उघड आहे.

या बाबतीत अशी एक शक्यता होती की, क्षत्रियांना अशी आपल्यामध्ये मजबूत एकी करून क्षत्रियांची आघाडी ब्राह्मणांच्या विरुद्ध उघडता आली असती व त्यामुळे क्षत्रियांच्या विरुद्ध असलेल्या ब्राह्मणांच्या आघाडीचा काही पाड चालला नसता. परंतु ही गोष्ट होणे शक्य होते काय, हे फक्त अंदाजाने ठरवावे लागते. शूद्रांना उपनयनाचा अधिकार ब्राह्मणांनी नाकारला, याचा परिणाम आपल्या भावी सामाजिक दर्जावर कसा घडून येईल. याचा शूद्रांनी अगोदर विचार केलेला होता काय? असा विचार त्यांनी केलेला नव्हता याची मला खात्री आहे. दुसरे असे की क्षत्रिय हे संघटित झालेले लोक होते काय? ते संघटित झालेले लोक होते याची मला शंका वाटते. तिसरे असे की, इतर क्षत्रिय राजांना शूद्रांसंबंधी काहीतरी सहानुभूती वाटत होती काय? दशवंज्ञ युद्ध याची ऋग्वेदात सांगितलेली कथा जरा खरी मनली तर तीवरून असे स्पष्ट दिसते की, शूद्र आणि इतर शूद्रेतर क्षत्रिय हे परस्परांचा तिरस्कार करीत असत.

या सर्व गोष्टी लक्षात घेतल्यानंतर ब्राह्मणांनी शूद्रांना उपनयन नाकारले हे सत्य आहे, असे समजले तर त्यात आश्चर्य वाटल्यासारखे काही नाही.

OOO

प्रकरण १२ वे

# सिद्धांताची कसोटी

१

शूद्रांची उत्पत्ती कशी झाली आणि त्यांची अधोगती कोणत्या कारणामुळे घडून आली याचा शोध लावणे, हा या प्रबंधाचा हेतू होता. या बाबतीत जी ऐतिहासिक माहिती उपलब्ध आहे तिचा आणि या बाबतीत प्राचीन व अर्वाचीन कालातील ग्रंथकारांनी जे जुन्या पद्धतीचे व नव्या पद्धतीचे सिद्धांत सुचविलेले आहेत, त्यांच्या सांगोपांग विचार केल्यानंतर मी माझा स्वतःचा या बाबतीतील सिद्धांत तयार करून तो या प्रबंधात मांडलेला आहे. मी या सिद्धांताचे वेगवेगळे भाग पूर्वीच्या प्रकरणांमध्ये वेगवेगळे मांडलेले आहेत. प्रत्येक भागाची भूमिका तयार करता यावी या उद्देशाने मी या भागांची वेगवेगळी मांडणी केलेली आहे. ते वेगवेगळे भाग एकत्रित करून त्यांचा एक समूह केला तर तो सिद्धांत कोणत्या स्वरूपाचा होतो, याची आता माहिती मिळते. त्या सिद्धांताचा सारांश खालीलप्रमाणे आहे –

(१) सूर्यवंशाच्या ज्या आर्य जमाती होत्या त्यातील एका जमातीचे शूद्र लोक होते.

(२) क्षत्रिय वर्ण असा शूद्रांचा हिंदी-आर्य समाजात दर्जा होता.

(३) एक काळ असा होता की, ज्यावेळी आर्य समाज फक्त तीन वर्ण म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य मानीत होता. तेव्हा शूद्र हा स्वतंत्र वर्ण समजला जात नव्हता; तर उपभाग समजण्यात येत होते.

(४) शूद्र राजे आणि ब्राह्मण लोक यांच्यामध्ये एकसारखे झगडे चालू असत. त्या झगड्यांमध्ये ब्राह्मणांवर पुष्कळ अत्याचार व अपमानास्पद जुलूम-जबरदस्ती करण्यात आलेली होती.

(५) शूद्रांनी आपल्यावर जुलूम-जबरदस्ती व अत्याचार केले, म्हणून ब्राह्मण शूद्रांचा द्वेष करू लागले; व नंतर ब्राह्मणांनी शूद्रांचा यज्ञोपवीत विधी करण्याचे नाकारले.

(६) यज्ञोपवीत वापरण्याचा हक्क नष्ट झाल्यामुळे शूद्रांचे समाजातील स्थान खालच्या दर्जाचे झाले... ते वैश्यांच्या दर्जाच्या खालचे झाले व त्यामुळे चौथा वर्ण अस्तित्वात आला.

हा सिद्धांत कसोटीला कितपत टिकतो हे पाहू या. हे ठरविण्याचे कार्य ग्रंथकार बहुदा दुसऱ्यावर सोपवितो. या नेहमीच्या शिरस्त्याला बाजूला सारून हा सिद्धांत कसोटीला लावून पाहण्याचे कार्य मी स्वतः अंगावर घेत आहे. असे केल्यामुळे माझ्या सिद्धांताची सचोटी पटवून देण्याची संधी मला मिळते.

महाभारतातील ज्या एका भागात पैजवन हा शूद्र आहे असे विधान केलेले आहे, त्या एका विधानावर माझ्या सिद्धांताची उभारणी झालेली आहे. पैजवन म्हणजेच सुदास असे निःसंशयपणे सिद्ध करून दाखविलेले नाही. पैजवन हा शूद्र आहे असे त्याचे वर्णन महाभारतातील फक्त एक ठिकाणी आढळून येते, इतर ठिकाणी ते आढळून येत नाही. असे आक्षेप माझे टीकाकार माझ्या सिद्धांताविरुद्ध उत्पन्न करतील याबद्दलची मला चांगली कल्पना आहे. अशा कच्च्या पायावर उभारलेला सिद्धांत कसा ग्राह्य धरला जाईल? साखळी ही तिच्यातील मोडकळीस आलेल्या दुव्यापेक्षा जास्त मजबूत नसते, या नेहमी वापरण्यात येत असलेल्या वचनाकडे बोट दाखवून ते टीकाकार आपले म्हणणे कसे संयुक्तिक आहे, असे पर्यायाने सुचवतील. माझ्या सिद्धांताची अशाप्रकारे नापत करून त्याची विल्हेवाट इतक्या सहज रीतीने लावता येणार नाही, याबद्दल माझी खात्री आहे.

या बाबतीत प्रथमतःच मी हे सांगतो की, एका पुराव्याच्या तुकड्यावर एखादा सिद्धांत उभारता येत नाही, हे मी कबूल करीत नाही. साक्षीदारांना तोलून जोखून पहावे लागते. त्यांच्या संख्येची गणना करावयाची नसते, हे पुराव्याच्या कायद्याचे सुप्रसिद्ध तत्त्व आहे. साक्षीदारांची संख्या किती झाली ही बाब मुळीच महत्त्वाची नाही. प्रत्येक साक्षीदाराने जी साक्ष दिलेली असेल तिचे मूल्यमापन करणे किंवा सर्व साक्षीदारांच्या साक्षी एकत्र करून त्यांचे सामुदायिक मूल्यमापन करणे ही बाब फार महत्त्वाची आहे. पैजवन शूद्र होता या विधानाच्या सत्यतेबद्दल शंका घेण्याचे काही कारण नाही. पैजवनाचे खोटे वर्णन करण्याचे महाभारतकाराला काही कारण नव्हते. पैजवन होऊन गेल्यानंतर बऱ्याच काळाने महाभारत लिहिले गेले आहे. म्हणून या बाबतीत महाभारतकाराच्या मनात काही दुष्ट हेतू होता किंवा त्याला काही पंक्तिप्रपंच करावयाचा होता असे दिसत नाही. या सर्व गोष्टींवरून एवढाच निष्कर्ष काढता येतो की, महाभारतकार परंपरेने चालत आलेल्या एका सत्यकथेची कहाणी महाभारतात ग्रथित करीत होता.

ऋग्वेदात पैजवनाचे वर्णन शूद्र म्हणून केलेले आहे. यावरून त्याचे जे महाभारतात शूद्र म्हणून वर्णन केलेले आहे, त्याच्या सत्तेला बाधा येत नाही. ऋग्वेदात पैजवन याचे जेथे जेथे वर्णन केलेले आहे तेथे तेथे शूद्र हा शब्द का वापरण्यात आलेला नाही, याबद्दल पुष्कळ स्पष्टीकरणे देता येतील. अशाप्रकारचे वर्णन ऋग्वेदात आले असते तर बरे झाले असते अशी अपेक्षा करणे चुकीचे आहे. हे पहिले स्पष्टीकरण होय. ऋग्वेद हा धार्मिक ग्रंथ आहे. धार्मिक ग्रंथात शूद्र म्हणून पैजवनाचे वर्णन असावयास पाहिजे होते अशी अपेक्षा करवत नाही. असले वर्णन असल्या ग्रंथात खपण्यासारखे नव्हते, परंतु असले वर्णन महाभारतासारख्या एखाद्या ऐतिहासिक ग्रंथात असावे अशी अपेक्षा करणे शक्य आहे. तसले वर्णन महाभारतात आहेच की!

सुदासाच्या बाबतीत शूद्र शब्द वेळोवेळी का वापरलेला नाही, याचे दुसरे स्पष्टीकरण

माझ्या मते हे आहे की, तो शब्द पुनः पुनः वापरण्याची जरुरी नव्हती. कुळ, गोत्र, टोळी इत्यादी शब्दांनी एखाद्याचे वर्णन करणे म्हणजे खरोखर त्या माणसाची ओळख पटविणाऱ्या बोलक्या खुणा सुचविण्यासारखे आहे. कमी महत्त्वाचे जे लोक आहेत त्यांच्या बाबतीत ओळख पटविणाऱ्या खुणा सुचविणे जरूर आहे, प्रसिद्ध माणसांच्या बाबतीत असल्या खुणा वापरण्याची जरुरी नाही. आपल्या काळात सुदास फारच प्रसिद्ध माणूस होता, याबद्दल संशय नाही. लोकांना त्याची ओळख पटावी म्हणून त्याचे शूद्र म्हणून वर्णन करण्याची जरुरी नव्हती. ही केवळ अनुमानधपक्याची बाब आहे असे सर्वस्वी नव्हे. या बाबतीत ऐतिहासिक उदाहरणांचे दाखले घेता येतील. बिंबिसार आणि पसेनदी हे दोन राजे बुद्धांच्या काळात होऊन गेले, त्यांचे उदाहरण घ्या. या राजांचे इतर समकालीन राजे होते, त्यांचे तत्कालीन वाङ्मयात जे वर्णन केलेले आहे ते त्यांच्या गोत्र-नावावरून. परंतु या दोन राजांची वर्णने फक्त वैयक्तिक नावे घेऊन केली आहेत. प्रो. ओल्डेनबर्ग याच्या लक्षात ही गोष्ट आली तेव्हा त्याने तिचे असे स्पष्टीकरण केलेले आहे की, ते राजे सुप्रसिद्ध होते आणि म्हणून त्यांचे वर्णन गोत्र-नावाने करण्याची त्यावेळी जरुरी भासली नव्हती. (Life of Buddha, p. 414) -

३

महाभारतातील एकुलत्या एका मजकुरावर किंवा पैजवन म्हणजेच सुदास असे ठरविण्यावर माझा सिद्धांत उभारलेला आहे, असे समजणे खराखर चुकीचे आहे. माझा सिद्धांत तशा प्रकारचा नाही. त्याला साखळीतील फक्त एका दुव्याचा आधार नाही, तर सर्व दुव्यांचा आधार आहे; म्हणून साखळी ही तिच्यातील जास्त मोडकळीस आलेल्या दुव्यापेक्षा जास्त मजबूत नसते, हे वचन माझ्या सिद्धांताला लागू पडत नाही. पुराव्याच्या साखळीतील एखादा दुवा मजबूत नसेल तर त्यावरून ती सर्व साखळी मजबूत नाही असे म्हणता येत नाही. एक दुवा मजबूत नसला तर सारा भार इतर दुव्यांवर टाकावा लागतो. हे इतर दुवे सिद्धांताचे ओझे सहन करण्याइतके भरीव व मजबूत नाहीत, हे अगोदर सिद्ध केले तरच माझा सिद्धांत कुचकामाचा आहे असे टीकाकारांना म्हणता येईल. माझा सिद्धांत खतम झाला, अशी घोषणा करण्याच्या अगोदर टीकाकारांनी वरील मार्ग चोखाळणे जरूर आहे.

पैजवन याचे शूद्र म्हणून केलेले वर्णन आणि पैजवन म्हणजे ऋग्वेदातील सुदास होय. अशी त्याची करून दिलेली ओळख, हा एवढा एकच दुवा माझ्या सिद्धांताचा आधार आहे असे नाही. माझ्या सिद्धांताचे आधारभूत असलेले इतरही दुवे आहेत. फक्त तीन वर्ण अस्तित्वात होते आणि शूद्रांच्यामुळे स्वतंत्र वर्ण उत्पन्न झाला नाही, असा कबुलीजबाब शतपथ ब्राह्मण व तैत्तिरीय ब्राह्मण यांच्यामध्ये देण्यात आलेला आहे. हा कबुलीजबाब म्हणजेच आणखी एक दुवा होय. शूद्र लोक राजे व प्रधान होते असे पुरावे उपलब्ध आहेत. हे पुरावे म्हणजेच दुसरा दुवा होय. शूद्रांना एकेकाळी उपनयनाचा अधिकार नव्हता, असा

जो पुरावा उपलब्ध आहे, तो तिसरा दुवा होय. अगदी पहिल्या प्रथम उल्लेखिलेला दुवा माझ्या सिद्धांताच्या भाराखाली कदाचित तुटू लागला तर त्या दुव्यावर पडणारा भार इतर दुव्यांवर लादला तर ते इतर दुवे जादा भार सोसण्यास प्रबळ आहेत.

पुराव्यासंबंधी बोलावयाचे तर असे की पुराव्याचा अचूकपणा इतक्या कसोटीचा असला पाहिजे की, तो इतरांना पटवून देता आला पाहिजे. परंतु असे कदाचित होऊ शकते. माझ्या सिद्धांताचा अचूकपणा कोणत्याही प्रकारच्या कसोटीला उतरू शकेल असे मी मानीत नाही. परंतु मी असे मानतो की माझ्या सिद्धांताला आधारभूत म्हणून जो पुरावा मी मांडलेला आहे, तो सरळ, त्याचप्रमाणे परिस्थित्यनुरूप उत्पन्न झालेला अशा दोन्ही प्रकारचा आहे आणि जेथे जेथे तो पुरावा लंगडा पडतो आहे असे वाटते, तेथे तेथे सिद्धांताला अनुकूल अशा संभाव्य प्रबळ गोष्टींचा पाठिंबा त्या पुराव्याला मिळालेला आहे, हा मुद्दा दृष्टिआड करता कामा नये.

## ४

माझा सिद्धांत कितपत बळकट व प्रभावी आहे हे मी दाखविलेले आहे. माझा सिद्धांत खरा आहे हे मी आता दाखवितो. सिद्धांताची सचोटी पारखण्याची एक सच्ची कसोटी आहे. त्या कसोटीला ग्राह्य मानण्यात आलेले आहे. जो सिद्धांत ग्राह्य मानावयाचा त्या सिद्धांताने तो ज्या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी रचला गेलेला आहे त्या प्रश्नाचे उत्तर दिले पाहिजे व ते उत्तर देता देता त्या प्रश्नासभोवती जे कूटप्रश्न उपस्थित झालेले असतील त्या प्रश्नांचीही उत्तरे त्या सिद्धांताने दिली पाहिजेत, ही ती सच्ची कसोटी मी माझ्या सिद्धांताला आता लावतो, ते पहा –

शूद्रासंबंधी जे कूटप्रश्न उत्पन्न होतात त्याची जंत्री एका ठिकाणी देऊन मी त्या कामाला हात घालतो. त्या कूटप्रश्नांपैकी पुढील कूटप्रश्न फक्त महत्त्वाचे आहेत.

(१) आतापर्यंत असे समजण्यात आले होते की, शूद्र हे अनार्य होते व आर्यांशी झगडणारे होते आणि आर्यांनी त्यांना जिंकून आपले गुलाम केले. हे जर खरे मानले तर यजुर्वेद व अ थर्ववेद यातील ऋषींनी शूद्रांची भरभराट होवो असे म्हटलेले आहे व शूद्रांची मर्जी संपादन करण्याची इच्छा व्यक्त केलेली आहे, याची वाट काय?

(२) शूद्रांना वेदाभ्यास करण्याचा हक्क नाही, असे मानण्यात येते हे जर खरे मानले तर शूद्र सुदास याने ऋग्वेदातील ऋचा रचलेल्या होत्या, त्याची वाट काय?

(३) शूद्रांना यज्ञ करण्याचा अधिकार नाही, असे मानण्यात येते. सुदासाने अश्वमेध यज्ञ केलेला होता, हे कसे काय? शूद्र हे यज्ञ करणारे आहेत असे सांगून पुरोहितांनी यज्ञाच्या वेळी शूद्र यजमानांशी कसे बोलावे, याबद्दल सविस्तर माहिती शतपथ ब्राह्मणात दिलेली आहे, ती काय म्हणून?

(४) शूद्रांना उपनयनाचा हक्क नाही, असे समजण्यात येते ही परिस्थिती अगदी प्रारंभापासून अस्तित्वात होती असे समजले, तर मग या मुद्द्याबद्दल वादविवाद माजण्याचे

कारण काय? बदरी व संस्कार गणपती या ग्रंथांनी शूद्राला उपनयनाचा अधिकार आहे, असे म्हटलेले आहे, ते का?

(५) शूद्राला स्वतःची मालमत्ता करू देण्यात येत नाही, हे जर खरे समजावयाचे तर मैत्रयाणी व कथक संहिता या ग्रंथात असे म्हटलेले आहे की, शूद्र हे श्रीमंत व धनाढ्य होते, त्याची वाट काय?

(६) शूद्र राज्यकारभारतील एखादा अधिकारी होण्यास अपात्र आहे असे समजण्यात येते, हे जर खरे समजावयाचे तर शूद्र लोक राजांचे प्रधान होते, असे महाभारतात म्हटलेले आहे, त्याची वाट काय?

(७) शिपाई किंवा गडी म्हणून तीन वर्णांची सेवा करणे, हे शूद्रांचे कर्तव्य आहे असे समजण्यात येते. सुदासासारखे शूद्र राजे होते व त्याचप्रमाणे सायणाचार्य याने सांगितल्याप्रमाणे इतर शूद्र राजे बरेच होते, त्याची वाट काय?

(८) जर शूद्राला वेदाभ्यासाचा, उपनयनाचा आणि यज्ञाचा अधिकार नव्हता, तर वेद वाचण्यास, उपनयन करण्यास आणि यज्ञ करण्यास त्याला का अधिकार दिला नाही?

(९) शूद्राचे उपनयन करणे, वेद वाचण्याइतके त्याला शिक्षण असणे आणि त्याने यज्ञ करणे, या गोष्टी शूद्राच्या काही हिताच्या होत्या किंवा नाही, हे सांगता येत नाही. परंतु एवढे खास की या गोष्टी ब्राह्मणांच्या फायद्याच्या होत्या. याचे कारण हे की, विधीमध्ये पुरोहितपणा करणे आणि वेद शिकविणे या बाबतीत ब्राह्मणाकडे सर्व अधिकार होते. शूद्राला उपनयन करावयास लावणे, त्याला यज्ञ करावयास लावणे आणि त्याला वेद शिकावयास लावणे या गोष्टी जर ब्राह्मणांनी केल्या असल्या तर त्यांना त्यापासून शूद्रांकडून बरेच वेतन मिळाले असते. ब्राह्मणांनी शूद्रांना या सवलती दिल्या असत्या तर त्यापासून त्यांना कोणताही अपाय झाला नसता; उलटअंशी, त्यामुळे त्यांच्या उत्पन्नात भर पडली असती असे असताही ब्राह्मणांनी शूद्रांना या सवलती दिल्या नाहीत? ब्राह्मणांनी हे जाणूनबुजून का के ले असेल बरे?

(१०) शूद्रांना उपनयन करण्याचा यज्ञ करण्याचा व वेद शिकण्याचा जरी हक्क नव्हता, तरी ते हक्क त्यांना देणे ब्राह्मणांच्या हातात होते. हे प्रश्न प्रत्येक ब्राह्मणाने आपापल्या मगदुराप्रमाणे हाताळावेत, असले काम प्रत्येक ब्राह्मणाच्या स्वाधीन का केले नाही? जो ब्राह्मण उपनयन करील, त्याचा यज्ञ करील किंवा त्याला वेद शिकवील त्याला जबर शिक्षा भोगाव्या लागतील. असे निर्बंध ब्राह्मणांवर का घातले बरे?

या कूटप्रश्नांचे स्पष्टीकरण पूर्णपणे कसे करता येईल बरे? जीर्णमतवादी हिंदू किंवा अलीकडील काळातील एखादा विद्वान यांपैकी एकानेही या कूटप्रश्नांचे स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न केलेला नाही. असले कूटप्रश्न अस्तित्वात आहेत की नाहीत, याबद्दल खरोखर त्यांना गंधवार्ताही नाही. जीर्णमतवादी हिंदू त्या प्रश्नांबद्दल आपल्या डोक्याला कधीच शीण देणार नाही. शूद्र हा पुरुषाच्या पायांपासून उत्पन्न झालेला आहे हे पुरुषसूक्तात जे ईश्वरदत्त स्पष्टीकरण दिलेले आहे, त्याच्यावर जीर्णमतवादी हिंदू विसंबून राहिलेला आहे. शूद्रांची

उत्पत्ती अनार्य रानटी टोळीपासून झालेली आहे आणि म्हणून आर्यांनी त्यांच्यासाठी स्वतंत्र निराळे कायदे तयार केले. हे साहजिकपणे आले अशी स्वतःची समजूत करून घेऊन अलीकडच्या काळातील विद्वान त्या समजुतीत दंग झालेला आहे. शूद्रांच्या प्रश्नाभोवती जे कूट प्रश्न उभे राहिलेले आहेत, त्याची तोंडओळख करून घेण्याचा प्रयत्न यापैकी एकाही वर्गातील विद्वानांनी केलेला नाही. मग शूद्रांच्या उत्पत्तीबद्दलची अवस्था कशी आहे, याबद्दल एखादा सिद्धांत तयार करण्याची व त्या सिद्धांतावरून त्याच्या सभोवतीचे कूटप्रश्न सोडविण्याची गोष्ट दूरच राहो.

माझ्या सिद्धांताबद्दल सांगावयाचे तर हेच की, या कूटप्रश्नांतील एकूणेक कूटप्रश्नांचे स्पष्टीकरण माझा सिद्धांत करीत आहे हे दिसून येईल. मी मागील स्तंभात जी १० गृहीतपदे मांडलेली आहेत, त्यातील (१) ते (४) ही गृहीतपदे असे स्पष्ट दर्शवितात की, शूद्र लोक राजे व प्रधान कसे होऊ शकले आणि ऋषींनी शूद्रांची स्तुती का केली व त्यांनी शूद्रांची मर्जी संपादन करण्याची इच्छा का धरली. गृहीतपदे (५) व (६) हे स्पष्ट करून दाखवितात की, शूद्रांना उपनयनाचा अधिकार आहे किंवा नाही याबद्दल वितंडवाद का माजला होता. आणि शूद्रांचे उपनयन करू नये व त्यांनी ते केले तर ते शिक्षेस मात्र होतील, असे निर्बंध कायद्याने का घातले. माझ्या सिद्धांताने एखादा कूटप्रश्न सोडवून दाखविलेला नाही असा एकही कूटप्रश्न खरोखर शिल्लक राहिलेला नाही. माझा सिद्धांत सर्वांगपरिपूर्ण आणि निश्चल आहे, असे मी म्हटले तर ती अतिशयोक्ती होणार नाही, असे मला वाटते. म्हणून माझ्या सिद्धांताला मी जे नाव दिलेले आहे त्याच्यापेक्षा सरस नाव धारण करण्यास योग्य असे सिद्धांत अद्याप जन्माला यावयाचे आहेत.

OOO

# संदर्भ सूची

**आचार्य** : उपनयनाच्या वेळी पुरोहितपणाचा एकमेव अधिकार. १८६-१८७.

**ऐतरेय ब्राह्मण** : मनू हा हिंदी आर्य समाजाचा आदिपुरुष - २९, शूद्रांवर लादलेली अपात्रतादर्शक बंधने - ४३, वैश्यांच्या यज्ञ करण्याविषयी अपात्रता- ५५-५६-५७ राज्याभिषेकाच्या राजांची यादी आणि पुरोहितपणाचा अधिकार १२३-१२४.

**अल्पाईन वंश** : विशेष लक्षण ६८, प्रो. रिपे १००-१०१, आर्य वंशाची भाषा १०२.

**अंबरीश** : १५३-१५४.

**आपस्तंब धर्मसूत्र** : २१, ४५, ४७, ५१ शूद्रांची अपात्रता ४९, ५०, ५१, ५२ आचार्य १८४, १८६.

**अर्जुन** : २११-२१२.

**आर्य** : वंश, हिंदुस्थानावर स्वारी - ६७, वंशाचे प्रकार आणि त्यांची लक्षणे ६६, प्रो. मॅक्स मुलरनुसार लक्षणे ६८-६९, आर्यांच्या मूळ स्थानाचा शोध - मानववंशीय प्राथमिक भाषेवरून - ६९, कॉकेशस आर्यांचे मूळस्थान नाही- ७०-७१, आर्यांचे मूळस्थान आर्क्टिक प्रदेशात होते - श्री. टिळक यांचा सिद्धांत ७२-७३, 'हिंदुस्थानचा शोध' या सिद्धांताविरुद्ध आधार ७४-७५, दास आणि दस्यू यांना वश केले ७५-७६, ८७-८८, अभिन्नता - दास आणि दस्यू यांच्यापासून वंशसिद्धांत आणि त्यांचे अपयश ७६-७८, त्यांचे हिंदुस्थानी संदर्भ ७८-७९, वर्ण या शब्दाचा अर्थ - ८०-८२, वैदिक काळात रंगभेद नव्हता - ८०, दोन वर्ग : चातुर्वर्ण्यावर विश्वास ठेवणारे आणि विश्वास न ठेवणारे ९८-९९, १०२-१०३, इतरांना आर्यांचा गुलाम बनविण्याचा अधिकार - ११७, वैदिक सामाजिक संघटना - १३६-१३७, दत्तक घेणे आणि अपवित्रता याविषयी कायदा - १७२-१७३.

**आश्वलायन गृहसूत्र** : उपनयन विधीचा खुलासा १६७-१७०.

**अश्विन** : शूद्र पवित्र सोमरस पिण्यापासून वंचित ११३-११४.

**अथर्ववेद** : पाच टोळ्यांचा हिंदी आर्य समाज २९-३०, वर्णाच्या उत्पत्तीविषयी त्याचे चार स्पष्टीकरणे ४०-४१, ऋग्वेद आणि अथर्ववेद यांना समसमान पावित्र्य ८६-८७ शूद्र अनार्य होते काय? याविषयी स्पष्टीकरण ११०-१११, शूद्र आणि ब्राह्मण यांच्यात साम्य दर्शविणारी विधाने ११२-११४.

**बाळाजी आवजी** : शिवाजीच्या राज्याभिषेकात त्यांची भूमिका १९०-१९१, १९३-१९४.

**बौद्धयान** : अश्वत्थ (वड) झाडाला उपनयन करण्याची मुभा १८२.

**बेलवलकर प्रो.** : वैदिक वाङ्मयातील संलग्नता एक सिद्धांत १४४-१४५.

**बेनफे डॉ.** : आर्यांचे मुळस्थान याविषयी त्यांचे विचार ६९-७०.

**भांडारकार डॉ. डी. आर** : त्यांच्या मते रजपूत हे गुजर लोकांचे वंशज होते- १९४.

**भांडारकर शोध संस्थान** : श्लोकाकरिता गोळा केलेली यादी, पैजवन - २०.

**भीष्म** : चार वर्णांचे मंत्री - १८८.

**भारद्वाज सूत्र** : शूद्रांच्या यज्ञविषयीचा अधिकार ११४-११५.

**भारत** : १३५-१३७, २०६-२०७.

**बोंड दस्तुर** : ८२-८३.

**डॉ. बाप** : हिंदी आर्यांचा पूर्व इतिहास आणि हिंदी जर्मनिक भाषेवर त्यांचा सिद्धांत- ७७.

**ब्राह्मण** : उत्पत्तीविषयी पूर्ण आख्यायिका – ३७–४२, आख्यायिकेचे विश्लेषण – ४२, शूद्रांच्या उत्पत्तीविषयी सिद्धांत – ६४–६५, वाङ्मय आणि त्याचे दोन सिद्धांत जे उत्पत्तीशी संबंधित आहेत. ८७–८८ धर्मोपदेश आणि धर्मनिरपेक्षता या दोन विचारप्रणालीची तुलना ९८–९९, खोट्या व्युत्पत्तीविषयी समाजशास्त्राचे आविष्कार – १०६–१०७, पुरुषसूक्त आणि स्मृतींची घालघुसडी – १४३–१४४.

**ब्राह्मण** : पुरुषसुक्तानुसार उगम, २०–२१, द्विज आहेत – २२, संपूर्ण दर्जापेक्षा उच्च दर्जाचे २४–२५, सवर्ण द्विज आणि त्रीवर्ण म्हणून ३४. शूद्रांविरुद्ध त्यांचे विशेष अधिकार आणि सवलती ५४, शूद्रांविषयी त्यांच्या क्षमायाचक दृष्टिकोन ५४–५५, रोमन कायद्याच्या तुलनेत त्यांचा कायदा Comunal (वर्णाचा) आणि Orbitory भ्रमण करणारा आहे. ६२–६३, युरोपियन देशांशी आपले प्रेमळ संबंध स्थापित करण्याकरिता भारताला पादाक्रांत करण्याचा स्वीकारात्मक सिद्धांत ७८–७९, ऋग्वेदात वेगळे १६ वर्ण – १३९, शूद्रांच्या मानहानिकरिता तंत्रे आणि उपनयनाला नकार – १६७, २२६, उपनयनाच्या वेळी पुरोहितपणा करण्याचा एकमेव अधिकार १८५, १९८–१९९, १९१, अकायदेशीर उपनयन करण्याची शिक्षा – १९४–१९५, २२५, इतर वर्णाला उपनयनाचा नकार देणाऱ्या घटना – १८४. शिवाजी विरुद्ध १८६–१९१, त्यांचा सिद्धांत : क्षत्रिय कलियुगात आढळत नाही – १८९, एकटा ब्राह्मण हिंदूचा दर्जा निश्चित करू शकतो – १९१, १९९, पूर्वीचा/जुना कायदा स्वीकारण्यास नकार – १९८, शिवाजीच्या राज्याभिषेकाच्यावेळी पन्नास हजार लोकांनी दक्षिणा घेतली – १९५, सातारा आणि कोल्हापूरच्या महाराजांच्या क्षत्रिय दर्जाविषयी समस्या – १९८, शूद्रराजांच्या विरुद्ध बदल्याच्या भावनेने शूद्र समजाची अवनती २००–२०१, त्यशांच्या शूद्रासोबत समेटाच्या कथा २०६–२१२, गौरवाच्या कथा – २१३, ऋग्वेदाच्या काळात वर्ग जागृतीची भावना – २१७.

**बृहस्पती धर्मसूत्र** : शूद्रांची अपात्रता – ४७.

**बृहस्पती स्मृती** : शूद्रांची अपात्रता – ४८.

**डॉ. व्हुलर** : शूद्रांची ब्राह्मण बनण्याची क्षमता – ११५–२१६.

**चांडाळ** : प्रतिलोम २१५, मनूचा कायदा २१६, आणि त्याच्या अत्यंत साधेपणाची कारणे २१७.

**छांदोग्य उपनिषद** : निरनिराळ्या देवतांपासून वेदांची उत्पत्ती झाली याविषयी स्पष्टीकरण – ३१, ३२, ऋषी जनस्त्रुती यांच्या कथेवरून शूद्रांना वेदाध्ययनाचा अधिकार होता – ११२.

**चातुर्वर्ण्य** : हिंदी–आर्य समाजाचा आदर्श २१–२२, बुद्धाचे परिणामशून्य.

**आव्हान** : २१–२२, मनू देवाशी गुंतला – २३, असमानतेच्या उतार–चढावाचा दर्जा. – २३, राजनीतिक जादूगिरी – २९–३१, नंतर त्याचा विकास, पाचव्या वर्णाची क्रियाशीलता आणि त्रैवर्णिकांपासून शूद्रांना वेगळं करणं – ३३–३४, एक आर्य चातुर्वण्याला मानणारा आणि दुसरा चातुर्वर्ण्याला न मानणारा – ९८–९९, (See also) (४१–४२) ८१ वर्ण, आर्य, शूद्र, मनू.

**चित्तराव शास्त्री** : सुदासाच्या प्रतिवाद्यांची यादी–१३३.

**ख्रिस्ती** : राज्यकर्ते, रोमन कायद्याअंतर्गत त्यांची अपात्रता–५७–५८, धार्मिक विधी (Sacrement) आणि ब्राह्मणी संस्कार – १८४.

**मि. ए. सी. दास** : नंतरच्या काळात दास व दस्यू हे शूद्र होते.

**दास आणि दस्यू** : युरोपियन ग्रंथकारांच्यानुसार, (१) आर्यांचा रंग गोरा होता, दास आणि दस्यू काळे होते. (२) आर्यांनी दास व दस्यू यांना अंकित केले व त्यांना शूद्र हे नाव दिले – ६४, दस्यू हे आर्यांचे शत्रू आहेत–७३. आर्यांचा संघर्ष (धार्मिक, वंशवाचक नव्हे) –

७३-७४, दस्यू शब्दांचा वंशवाचक दृष्टीने वापर होत नाही - ७५, दस्यू हे आर्यांच्या वंशवाचक भेदाप्रमाणे कृष्णयोनी नव्हते - ७६, ऋग्वेदात वर्ण या शब्दाचे फायदे - ८२-८३, वर्ण आणि वंश या बाबतीत दस्यू हे आर्यांपेक्षा वेगळे नाहीत - ८४, दस्यू हे एका आर्य समाजाचे सोबती होते आणि इतरांचे शत्रू होते - ८४, दस्यू यांचा झेंद् अवेस्ताच्या अझही दाहक यांचेशी संबंध आहे. - १०७-१०८, असुधारित लोक - १०८-१०९, त्यांचा शूद्रांशी संबंध नाही - १०९, दास व दस्यूही नावे पुढील वैदिक वाङ्मयातून अजिबाद आत्मसात केले - १०९-११०, दास हे गुलाम होते असे ऋग्वेदात पाच वेळा वर्णन आलेले आहे- ११५.

**दशराजन युद्ध** : १२९-१३१, शूद्र आणि अशूद्र-क्षत्रिय यांच्यातील युद्ध - २२०

**दस्यू** : दास आणि दस्यू यांचा आर्यांशी झगडा हा वंशवाचक नसून धार्मिक होता - ७३-७४, मृध्रवाक् आणि अनस या विशेषनाचे योग्य स्पष्टीकरण - ७५, आर्यांपासून धर्माने नव्हे तर वंशाने वेगळे - १०६-१०७ महाभारतानुसार सर्व वर्णात आणि आश्रमात दस्यू लोकांचे अस्तित्व आढळून येते - १०७, हिंदी आर्य लोकांनी दस्यू हा शब्द हिंदी इराणी लोकांना शिवी म्हणून वापरलेला होता.-१०७, आर्यांपेक्षा शक्तीशाली होते - १०८, (दास आणि आर्य सुद्धा बघावे).

**धर्मसूत्र** : धर्मसूत्रात शूद्रांविषयी भाष्य - १११-११२, सोमरस पिण्यास, उपनयन आणि वैदिक विधियज्ञ यापासून मज्जाव - ११२-११३, लाकांचा सिद्धांत - १९, त्यांच्यातील वर्ण - २१, धर्माचा ज्ञानकोष आणि नीतिशास्त्र- १९.

**डॉ. फॉस बॉल** : च्यवनाची कथा - ११३-११४, प्रो. मायकल फॉस्टर यांचा गृहीत प्रमेय-७९.

**गागाभट्ट** : शिवाजीच्या राज्यभिषेकाच्या उपनयनाचा अधिकार, शिवाजीकडून घेतलेली अमाप दक्षिणा - १९६, त्याचे रंग बदलणे व कोलांटउड्या मारणे - १९९, क्षत्रियांना निम्न दर्जाचे सिद्ध करण्याचा प्रयत्न-२००.

**गंगानाथ झा** : पूर्व मीमांसा, १८४-१८५.

**गौतम धर्मसूत्र** : ४९, ५१, ५३, ५४, चाळीस संस्कारांची मोजणी-१८३-१८४.

**गीगर** : त्यांच्या दृष्टिकोनातून आर्यांचे मूळस्थान यावर भाष्य - ६९.

**गीगर** : त्यांच्या दृष्टिकोनातून आर्यांचे मूळस्थान यावर भाष्य - ६९.

**ग्रीक** : वर्ण पद्धतीशी तुलना करून त्याच्या समाजाचे वर्ग धारक-२४.

**ग्रिफियस** : त्रित्सुना-अनार्य समजणे याला विरोध-१३५-१३६.

**डॉ. गुहा** : हिंदुस्थानातील लोक आणि त्यांची विभागणी-९९-१००.

**हरिश्चंद्र** : १४८-१५०.

**हरिवंश** : वेदांची उत्पत्ती परमेश्वराच्या डोळे, जिव्हा, डोके यापासून कशी झाली याविषयी स्पश्टीकरण - ३२-३३, हरि या परमेश्वराच्या पायापासून पुरोहित वर्गाची उत्पत्ती झाली याविषयी स्पष्टीकरण - ३३-३४, त्रिशंकूची कथा - १४८-१५१, वर्णावरून ब्राह्मणांशी झगडा - १६१-१६२.

**हर्न डब्लू. इ.** : आर्यांमध्ये उमेदपणाची/अरेरावीची भावना - ११४.

**भारतातील उच्च** : कलकत्ता न्यायालयाचा निकाल बिहारचे कायस्थ हे शूद्र होते - न्यायालय १७४, अलाहाबाद न्यायालयाने कलकत्ता न्यायालयाचा निकाल फेटाळला - १७५, बंगालचे कायस्थ शूद्र होते याविषयी कलकत्ता न्यायालयाचा निकाल/निर्णय (१९१६-१९२६) - १७५, पटणा (१९२६) उच्च न्यायालयाचा निर्णय-बिहारचे कायस्थ क्षत्रिय होते - १७५-१७६, मद्रास (१९२४) उच्च न्यायालयाचा निर्णय मराठ्याची पाच कुळे शूद्र होती - १७६, मद्रास (१९२७) न्यायालयाचा निकाल-यादव हे शूद्र होते-१७६, शूद्र आणि त्यांची समर्पकता

याविषयी कसोटी-१७७, तात्त्विक आणि व्यवहारिक दृष्टीने जातीची अवस्था उपनयनाच्या संबंधात कशी होते. याविषयी खुलासा न्यायालय करू शकले नाही- १७७-१७८.

**भारत** : वैदिक काळानंतर दौष्यंती भारत ऐवजी भारतभूमी हे नाव देण्यात आले - पहा - १३५.

**हिंदी आर्य** : मनू, आर्य, चातुर्वर्ण्य, अथर्ववेद, औपमन्य, डॉ. भोप दास-दस्यू, डॉ. गुहा, पुरुष सुक्त.

**हिंदी इराणी** : त्यांच्या समाजात तीन वर्ग आहेत. - २४, त्यांच्या वाङ्मयात वर्ण या शब्दाचा अर्थ - ८१-८४, अझही-दाहक आणि दास यांचेतील संबंध - १०७-१०८.

**जबाली, सत्यकाम** : त्याची कथा आणि त्यापासून काही अनुमान - १८८.

**जैमिनी** : बट्टीने पुरस्कार केला - शूद्रांना वैदिक यज्ञ करण्याचा अधिकार आहे - ११२, संस्काराचे आध्यात्मिक महत्त्व - १८४.

**डॉ. जैस्वाल** : ११५-११६.

**ज्यू** : निरनिराळ्या वर्गाची उत्पत्ती - २५, रोमन कायद्यांतर्गत त्यांची अपात्रतादर्शक बंधने- ५८, दर्शक निर्बंध लोकांचे वंश - ६५. त्यांना खालच्या दर्जाचे सिद्ध करण्याचा गागाभट्टचा प्रयत्न-१९७.

**जसनियन** : गुलामगिरीतून मुक्त केलेला गुलाम - ५९.

**श्री. काणे** : अलिकडच्या वैदिक वाङ्मयात दास आणि दस्यू यांचा शूद्र म्हणून परिचय - १०४, आर्य आणि शूद्र यांच्यातील दृश्य दाखविणारी रेषा - १०५, १०४, १६७, १०७-१७२, १८५-१८६, २०१, २२०.

**कथक संहिता** : शूद्रांवर अपात्रतादर्शक बंधने - ४२, शूद्र आणि आर्य यांच्यातील भेदभावाविषयी स्पष्टीकरण - ११३.

**कौशितकी ब्राह्मण** : सुदास आणि वशिष्ठ यांच्यातील झगडा - ९९.

**कौटिल्य** : गुलामगिरीच्या कायद्याअंतर्गत शूद्र हे आर्य होते याविषयी त्यांचे स्पष्टीकरण - ११४.

**कायस्थ** : बिहार आणि बंगाल प्रांतातील कायस्थांचा दर्जा १६३-१६६, ब्राह्मणांच्या आव्हानाविषयी प्रतिक्रिया. १२१, त्यांना खालच्या दर्जाचे सिद्ध करणारा गागाभट्टचा प्रयत्न-१९६.

**ख्नुमु** : इजिप्तच्या लोकांचा जगाच्या उत्पत्तीसंबंधी सिद्धांत - १९२०.

**कोल्हापूर** : राजवाड्याच्या पुरोहिताने महाराजाच्या नकाराला फेटाळून पौराणिक पद्धतीने विधी केला. २००-२०१.

**कालमाषपद** : १५४-१५५.

**कृतवीर्य** : २०९.

**क्षत्रिय** : पुरुष सुक्तानुसार उत्पत्ती - २०, द्विज जाती-२१, ब्राह्मणापेक्षा निम्न दर्जाचे आणि इतर जातीपेक्षा उच्च दर्जाचे - २३, ३०, सवर्ण द्विज आणि त्रैवर्णिक म्हणून - ३४, त्रैवर्णिक असून शूद्रांच्या विरुद्ध त्यांचे अधिकार नाहीच्या बरोबर होते - ५६-५७, क्षत्रिय हा वेगळा आहे या अर्थाने क्षत्रिय हा शब्द ऋग्वेदात नऊ वेळा वापरलेला आढळतो - १३९, ब्राह्मणांसोबत झगडा - १४६-१६६, शूद्र समाजातील राजांच्या ब्राह्मणासोबत झगडा - १६५-१६६, २०४, सूर्यवंशी हे शौर्य आणि अध्ययन याबाबतीत ब्राहामणापेक्षा वरचढ होते - २०६, २०७, वैदिक ऋचांचे कर्ते - २०६, चंद्रवंशीय लोक हे संकुचित विचाराचे होते - २०५, त्यांचे ब्राह्मणांशी संबंध याविषयी कथा - २०९-२१४, शूद्र आणि अशूद्र यांच्यातील शत्रुत्व-२१९-२२०.

**डॉ. कूर्तकोटी** : १९९-२००.

**लैसेन** : सोदरी लोक आणि पूर्वीचे शूद्र याविषयी त्यांचा अभिप्राय - १०६.

**डॉ. बी.सी. लॉ** : १०६.

**महाभारत** : विश्वोत्पत्तीसंबंधी सिद्धांत - ९३-९४, सर्व वर्णात दस्यू लोकांचे अस्तित्व आढळून येते. - १०७,, युधिष्ठिरच्या

राज्याभिषेकाचे शूद्रांना आमंत्रण - ११५, शूद्र हे चार वर्णाचे मंत्री होते ११६, पैजवनाशी संबंधित श्लोक - ११७,, त्याच्या आवृत्तीचे स्वरू - ११८, श्लोकांची तुलना करून त्याचा परिणाम - १२०, कालमाषपदाची कथा - १५४ - १५५, २१२-२१३, पुरुवासाच्या ब्राह्मणांशी झगडा - १६२, भारताचा वशिष्ठाशी समेट - २०९-२१२, भृगलोक आणि कृतवीर्य यांच्यातील झगडा आणि समेट - २१०-२१२, परशुरामासोबत वाद २११-२१२, सुदासाचा वशिष्ठ आणि ब्राह्मणांशी सगडा आणि समेट - २१४-२१५, परंपरेने चालत आलेल्या पैजवनाविषयी त्यांचे मत - २२२.

**महाराष्ट्र ज्ञानकोष** : वर्णाचा अर्थ - ८१, अझहीदाहक यांचेशी दासांचा संबंध - १०८.

**मैत्रायणी संहिता** : शूद्रांवर लादलेली बंधने - २२, शूद्रांच्या दारिद्र्याविषयी-११६.

**मनू** : तर्कावरून चार वर्णाची उत्पत्ती - २३-२४, शूद्रांवरील अपात्रतादर्शक बंधने - ४३-४४, ४५, ५५, शूद्रांची ब्राह्मणवादाची योग्यता - १४३-१११, शूद्र राज्यांविरुद्धचे ब्राह्मणांचे कायदे - ११५-११६, राजा आणि ब्राह्मण यांचेतील झगडा - १६५-१६६, चांडाळाच्या विरुद्ध कायदा - २१७.

**मनू** : हिंदी आर्य समाजाचा मूळ पुरुष - २८.

**मत्स्य पुराण** : मनू हा आर्यांचा आदी पुरुष, क्षत्रियांची यादी, ऋग्वेदीक ऋचाचा रचेता - २०७-२०८.

**मेडिटरॅनियन वंश** : लक्षण - ६८ याविषयी पुरावे - १००-१०१.

**डॉ. म्यूर** : ब्राह्मण आणि क्षत्रिय यांच्यातील झगडा, क्षत्रिय आणि ब्राह्मण यांच्यातील झगडा समान आहे याची जाणीव करून देऊ शकले नाही. - २०९. (बघा २८-२९, ३१-३२, ३७-४१, ८६, ८७-१०२, १०५.)

**प्रो. मॅक्स मूलर** : ब्राह्मण हे शैक्षणिक उत्पादन होय, असे स्वरूप सिद्ध केले - ४१. आर्यांचा अर्थ - ६७-६८, अनस या शब्दाविषयी त्यांचे स्पष्टीकरण- ७५-७६, ब्राह्मणी व्युत्पत्ती - १०६-११२.

**नहुष** : १६३-१६५, २०७-२०८.

**निमी** : १६५, २०८.

**निषाद** : अनुलोम - २१६, त्याची उपनयनाची पात्रता - २१७, सूडबुद्धीने केलेला अपवाद - २१७.

**जुना करार** : विश्वोत्पत्ती-२०-२१, पुरुषसुक्तासोबत विश्वोत्पत्तीची तुलना २६-२७.

**प्रो. ओल्डेनबर्ग** : सुप्रसिद्ध व्यक्तीच्या वर्णनात गोत्र-नावाचा अभाव- २२०, २२३.

**दम्मपुराण** : १६२-१६३.

**धर्महीन लोक** : रोमन कायद्याअंतर्गत अपात्रता - ४१, शूद्रांचे दारिद्र्य - ११६.

**पुरोहिताची घालघुसडी** : १४३-१४४.

**तितसावित्रीक** : १६९.

**पेशवे** : अनियमित राज्यभिषेक - १९८, शाहू महाराजांचा दुसरा उपनयनविधी पौराणिक पद्धतीने झाला - १९८-१९९.

**मोरोपंत पिंगळे** : मुख्यप्रधान, शिवाजीच्या राज्याभिषेकाचा विरोधी-१९७-१९८. राज्याभिषेकाला ह्यूग उपस्थित होता - १९४.

**प्लेटो** : निरनिराळ्या वर्गांनी समाज तयार करणे हाच समाज घटनेचा आदर्श- २५.

**प्रतापसिंह (द्वितीय)** : त्यांच्या क्षत्रिय दर्जाला ब्राह्मणांद्वारे आव्हान-१९८-१९९.

**प्रतिलोम** : प्रतिलोमी कोण होते-२१६-२१७.

**नथुराम प्रेमी** : १७३.

**प्रिव्ही कौन्सिल** : आधुनिक काळात क्षत्रियांचे अस्तित्व यावर निर्णय-१७४.

**पुरुरवस** : १६२, २०७, २०८.

**पुरू** : १३४.

**पुरुषसूत्र** : १८, १९, हिंदी आर्य समाजाच्या उत्पत्तीविषयी आणि हिंदी आर्य समाजात चातुर्वर्ण्य कसे उत्पन्न झाले- १९-

२०, हिंदी आर्य समाजावर त्याचा प्रभाव – २०, अद्वितीय आणि असाधारण म्हणून त्याच्या दाव्याची छाननी- २२-२४. वर्गाच्या उत्पत्तीविषयी स्पष्टीकरण-इतर विश्वोत्पत्तीशी ऋग्वेदाचा धर्मभावना विरहित सिद्धांत- २५-२७, राष्ट्रवादापेक्षा वर्णवादाला त्यांचे प्राधान्य – २९. चातुर्वर्ण्य ही एक पवित्र प्रथा बनविण्याची त्यांची राजनीती- २९-३१, ब्राह्मणांद्वारे फसवेगिरी – १४४, प्रक्षिप्त करणे – interpolation १३८ – १४३, ऋग्वेदात बऱ्याच काळानंतर पुरुषसुक्त घुसविण्यात आले – १४३-१४७, वंश, ज्यू लोकांकडून ओळखण्यात आलेली चूक – ६७, जनतेच्या शरीरात काही विशिष्ट अनुवांशिक गुणधर्म असतात – ६७-६९, शीर्षसूची आणि वदनसूची – ६८-६९, युरोपियन वंशांच्या 'वंश दिग्दर्शक पद्धतीचे' फायदे – ६९-७० तक्ता ६८, तिथे आर्य आहे. ६८, मेडिटरॅनियन – १०१ – १०६, अल्पाईन – १०५-१०६.

**रामायण** : विश्वोत्पत्ती संबंधी विचारप्रणाली २००-२०१, त्रिशंकूची कथा – १५८-१५९.

**प्रो. रानडे** : वैदिक वाङ्मयातील बरेचशे भाग एकमेकांशी संलग्न आहेत – १४४.

**ऋग्वेद** : पुरुषसूक्त १८-१९. पुरुषसुक्ताव्यतिरिक्त विश्वोत्पत्तीविषयी – २६-२५. त्यांच्या दोन विश्वोत्पत्तीतील तुलना – २७-२६, श्रमविभागाची कल्पना – २७-२६, हिंदी आर्य यांच्या पाच टोळ्या. २६-२९, आर्य या शब्दाचा वंशिक अर्थाने वापर होत नाही – ६८, दास आणि दस्यू हे त्यांच्या समान शत्रूंशी एकजुटीने लढत – ७४. दस्यू लोक धर्मविषयक तत्त्वप्रणालीत आर्यांपेक्षा भिन्न आहेत. याविषयी वर्णन, ७५-७६, अनस मृध्रवाक आणि कृष्णयोनी या शब्दांचा वापर. ७५-७६. दास – दस्यू आणि आर्य यांच्यातील भेद वंशसूचक नव्हता – ७६. आर्यांमध्ये वर्णभेदाचा भाव उत्पन्न झाला नव्हता – ८०-८१. वर्ण हा शब्द आढळला – ८०-८२. आर्यांचे दोन वेगवेगळे वर्ण अस्तित्वात होते – ८६. दोन वेद समान होते – ८६. दास्यांचे वर्णन – १०८-१०९. दशराजन युद्ध – १२९-१३३. टोळ्या आणि त्याचे सुदासाशी संबंध – १३४. भारत आणि त्रित्सु यांच्यातील शत्रुत्व. २०८, शूद्र या शब्दाचा पैजवनच्या वर्णनात अभाव याची कारणे – २२२.

**प्रो. डब्ल्यू. ई. रिप्ले** : वंश आणि लोक यांत्यातील फरक – ६५, युरोपियन लोकांच्या वंश प्रकाराचा त्यांचा तक्ता – ६६, कॉकेशियन लोक हे आर्य वंशाचे उपज आहेत या सिद्धांताचे खंडण – ७०-७१.

**सर हर्बट रिसले** : मानववंशशोधक शास्त्राच्या दृष्टिकोनातून हिंदुस्थानातील लोकांची पाहणी केल्यास हिंदुस्थानातील लोक म्हणजे चार भिन्न वंशीय लोकांचे मिश्रण होय – १०४.

**रोमन** : त्याच्या समाजाचे वर्ग – २५. त्याच्याशी ब्राह्मणी कायद्याची तुलना करणे अगत्याचे – ६०. त्याच्या कायद्याअंतर्गत वर्ग आणि लोक – ६१. अपात्रतादर्शक बंधने व पात्रतादर्शक हक्क यांचा पाया (१) मनुष्याचा सामाजिक दर्जा, (२) मनुष्याचा कायद्याच्या दृष्टीने असणारा नावलौकिक – ६०-६१. त्याचा कायदा जातीत भावनेने गुंफलेला नव्हता – ६०-६२. रोमन लोकांतील कनिष्ठ जातीच्या लोकांची सामाजिक आणि राजकीय अपात्रता दर्शक बंधने नष्ट करण्याविषयी – ६०-६२.

**मि. रॉय** : त्यांच्या महाभारताच्या आवृत्तीतील ग्वाही, ११७-११८.

**सद्‌गुरूशिष्य** : शक्तीनुसार.

**सुदासाच्या क्रूरतेचे कारण** : १६०.

**सोमवेद** : ऋग्वेदापासून वेगळे – ८६.

**संस्कार गणपती** : शूद्रांचा उपनयना-विषयीच्या पात्रतेविषयी त्याची स्वीकृती, १८१.

**संस्कार** : चाळीस संस्कारावरची नावे, १८२-१८३. जैमिनी आवश्यकतेच्या दृष्टिकोनातून, १८३-१८४. अव्यापक दृष्टिकोनातून केवळ १६ संस्कार आहेत, १८३.

सुरुवातीच्या काळात त्याला आध्यात्मिक महत्त्व होते, १८३. खिश्चन संस्कार १७१.

**शतपथ ब्राह्मण :** चार वर्णांचे स्पष्टीकरण, ३९–४०, शूद्रांची अपात्रतादर्शक बंधने, ४२–४३, उत्पत्तीशी संबंधित विचारप्रणाली, ८७–८८, यज्ञ करताना स्त्रिया व शूद्र वर्णाच्या व्यक्तीला योगा–योग्य भेद याविषयीची कुवत, १३७, २२४–२२५. फक्त तीन वर्णाच्या उत्पत्तीविषयी स्पष्टीकरण, १३४. त्रैवर्स लोकांची संख्या – २२०.

**सवर्ण :** डी ज्युरीचा सूचीत अर्थ – ३३. सवर्ण कोण होते? – ३३.

**सायनाचार्य :** अनस या शब्दाविषयीचे त्यांचे स्पष्टीकरण – ७५, ऋग्वेदाच्या ऋचा रचणाऱ्या, राजांची नावे – १३१–१३२.

**प्रो. सेनार्ट :** वैदिक काळच्या सामाजिक संघटना – १३६–१३७.

**शाहू महाराज :** राजवाड्यातील पुरोहिताशी मतभेद आणि शंकराचार्यांच्या वैदिक अधिकाराची पात्रता – १९८–१९९.

**शाहू महाराज :** राजवाड्यातील पुरोहिताशी मतभेद आणि शंकराचार्यांच्या वैदिक अधिकाराची पात्रता – १९८–१९९.

**शंकराचार्य करवीर :** कायस्थांना क्षत्रियांचा दर्जा देण्यास नकार – १९९, वि. कोल्हापूरच्या राजवाड्यातील वैदिक विधीची पात्रता – १९८–२००.

**शिवाजी :** ब्राह्मणाविरुद्ध – १८६–१८७, वैदिक अधिकाराने राज्याभिषेक ब्राह्मणाद्वारे क्षत्रिय दर्जाच्या स्वीकारावर विसंबून – १८७. ब्राह्मणाद्वारे व मराठे सरदारद्वारे त्यांना शूद्र पवी देण्यात आली – १८७–१९५. ब्राह्मणांच्या दयेत राजा – १९०. त्याचे दोन राज्याभिषेक – १८९–१९०. वंशावळानुसार शिवाजी सिसोदिया राजपूत होता – १९०–१९१, १९५, पेशव्यांनी त्याच्या राज्याभिषेक कार्यात बाधा आणली – १९७.

**श्री. पी.टी. श्रीनिवास अय्यंगार :** आर्य हा शब्द ऋग्वेदात क्वचित आढळतो. हिंदुस्थानचा शोध आर्यांनी लावला या सिद्धांताविरुद्ध पुरावा – ७३. संदर्भ – ७४, दस्यूचे नागरिकत्व – १०८–१०९.

**शूद्र :** पुरुषसुक्तानुसार उत्पत्ती – १९–२०. अपस्तंभ दर्मसूत्रानुसार स्थान २०–२१. वशिष्ठ धर्मसूत्र – २१ आणि मनुस्मृती – २१–२२. त्यांचा दर्जा – २४, २५, ३१, ३३. पाच टोळ्यांचा ऋग्वेदात समावेश – २९. सवर्ण परंतु द्विज आणि त्रैवर्णिक नाही – ३४. संबंधित ब्राह्मण शूद्र, स्मृती अंतर्गत अपात्रतादर्शक बंधने आणि शिक्षा ४२–५७, शूद्रांच्या विरुद्ध कायदेकानूचा सारांश – ५५–५६. ब्राह्मण आणि त्याच्या विशेषाधिकाराची तुलना – ५६–५७. अपात्रतेची असमानता आणि कायमत्व – ६१.वेदांत आणि वायुपुराणात शूद्र शब्दांची व्युत्पत्ती – १०६. लॉसेनचा अभिप्राय–सोदरी जमातीचा पाडाव अॅलेक्झांडरने केला – १०६. पतंजलीनुसार शूद्र व अभर हे एकच होते – १०६. विष्णु, मार्कंडेय आणि ब्राह्मण पुराणनुसार शूद्रांची स्वतंत्र टोळी होती – १०६. प्राचीन वैदिक वाङ्मयात काहीच उल्लेख आढळत नाही, परंतु पुढील वैथदक वाङ्मयात आढळेल – १०९. वादविवादाच्या आधारावर शूद्र अनार्य होते – ११० आणि आर्य – ११०–१११, ब्राह्मणांशी समानता दर्शविणारी विधाने – १०६, ब्राह्मण बनण्याची पात्रता – १११–११३. कौटिल्यानुसार जन्माने आर्य होते – ११४, गुलाम नव्हते – ११५. ब्राह्मणांच्या काळात राजांचा राज्याभिषेकात सहभाग – ११५, राजकीय अधिवेशनाचे सदस्य राजाचे मंत्री होत असत – ११६, २१८, राजा आणि मंत्री म्हणून – ११५. त्यांचे दारिद्र्य – ११६–२०९. त्यांना गुलाम करण्याच्या उत्सुकतेचा प्रश्न – ११६, आर्य क्षत्रिय वर्गाचे होते? – ११७, १३७, १४५, मूळचे रानटी रहिवाशी – १३६, ब्राह्मणांशी झगडा – १४६–१६६. ऋग्वेदात वेगळ्या वर्णांचे स्थान नाही – १४५. ब्राह्मणांशी झगड्यामुळे चवथ्या वर्णात स्थान नाही – १४६–२२०. उपनयनाचा अधिकार – १७७.

उपनयनाच्या नकारामुळे मालमत्ता आणि ज्ञानाचा तोटा – १८२–१८४. अधोगतीकरिता ब्राह्मणांचे बल–१८२–१८३, २२३. शिवाजी शूद्र म्हणून – १८०. टोळीचा राजा – २०१–२०२. त्यांच्या समेटाच्या कथा – २०८–२१७. ब्राह्मणांशी समेट झालेला नव्हता हे नाकारण्याचा कायदा निशाद आणि चांडाळाला मिळालेली वागणूक – २१६–२१७. उपनयनाच्या नकारामुळे ते त्रस्त झाले? – २१७–२१८, हिंदी आर्य समाजातील उत्पत्तीचे विशेष नाम – २१८–२१९, हिंदू समाजातील असुस्कृत लोकांना दिलेली विशेषणे – २१९ – २२०, हिंदू समाजापासून हिंदी आर्य समाज वेगळा – २१९–२२०, 'निरवासित', 'अनिरवासित', 'सत्छूद्र' आणि 'असत्छूद्र' – २१९, हिंदी आर्य समाजाची संख्या थोडी होती – २१९–२२०, उपनयनाचा नकार आणि ब्राह्मणांचे महत्त्व मोडण्याची त्यांची अपात्रता – २२०, दहा कूट प्रश्न २२४–२२५.

**राजपुत्र सिसोदिया** : ते हिंदी आर्य समाजातील क्षत्रिय होते? – १९१–१९३.

**व्हीशंट स्मिथ** : गुर्जरचे राजपुतांमध्ये परिवर्तन १९१.

**सामाजिक संघटना** : पुरुषसुक्तानुसार – २२–२३, २८–२९, प्राचीन समाज – १३६, वैदिक आर्य – १२९–१३०.

**सुदास पैजवन** : महाभारताचे वर्णन : शूद्र पैजवन – ११७, १२०–१२१, २२२, यास्कने लावलेला अर्थ – १२१–१२२, ऋग्वेदात त्याच्या कुटुंबाची सविस्तर माहिती – १२२, १२६–१२७, विष्णुपुराणात दोन सुदास – १२२. (१) सागराचा वंशज आणि त्याचा वंशवृक्ष (२) पुरुचे वंशज आणि त्याचा वंशवृक्ष – १२३, तीन सुदासाच्या वंशवृक्षाचा तक्ता – १२५–१२६, ऋग्वेदातील सुदास पुराणातील सुदासपेक्षा भिन्न होता – १२५–१२६, महाभारतातील पैजवन हा ऋग्वेदातील होता – १२५–१२६. प्रो. मॅक्स वेबर यांच्या मताचे आकलन – १२६, दशराजन युद्धाचा नायक – १२९, ऋग्वेदातील ऋचांचा रचेता – १३१, अश्वमेधाचा यज्ञ केला होता – १३१, दानधर्माकरिता प्रसिद्ध – १३१–१३२, भारत पुरु किंवा त्रित्सु टोळीचा – १३३, मुख्य पुरोहित म्हणून वशिष्ठाशी वितुष्ट – १६०–१६१, २१४, त्याच्या वंशजांच्या ब्राह्मणासोबत समेटाच्या कथा – २१४–२१५, ऋग्वेदात प्रसिद्ध व्यक्ती म्हणून वर्णन केले नाही – २०८–२०९.

**प्रो. सुकठणकर** : श्री. रॉय यांच्या महाभारताच्या आवृत्तीच्या खरेपणाविषयी – ११९, Memorial Vol. 1 ११९–१२०.

**तैत्तरीय आरण्यक** : विश्वोत्पत्तीशी संबंधित खुलासा – ९२–९३.

**तैत्तरीय ब्राह्मण** : शूद्रांच्या उत्पत्तीविषयी खुलासा – ३९, विश्वोत्पत्तीविषयी खुलासा – ९२–९३, केवळ तीन वर्णांच्या उत्पत्तीचे वर्णन – १३९–२२३.

**तैत्तिरीय संहिता** : चार वर्णांच्या उत्पत्तीविषयी स्पष्टीकरण, ३६–३९. विश्वोत्पत्तीशी संबंधित तत्त्वप्रणाली, ९२–९३. वशिष्ठ आणि सुदास यांच्यातील झगडा १६१–१९२.

**प्रा. आयझॅक टेलर** : आर्यांच्या मूळस्थानाविषयी प्रो. बनफे यांच्या दृष्टिकोनातून संक्षिप्त अहवाल, त्यांच्या शब्दात, ६९.

**श्री. के. सी. ठाकरे** : गागाभटाने पगडी पालट केले व ज्या कोलांटउड्या मारल्या आणि मोरोपंताच्या सुरात सूर मिळविला, १९७.

**ग्रंथाचा सिद्धांत** : संक्षिप्त अहवाल, २२१. त्याच्या पुराव्याचा भक्कमपणा २२२–२२१. त्याच्या पुराव्याचा भक्कमपणा, २२२–२२३, शूद्रांचे उपस्थित हा कूटप्रश्न २२४–२२५.

**श्री. बी. जी. टिळक** : लक्षणावरून पोलर ध्रुव व उत्तर ध्रुव व आर्टिक्ट वर्तुळ प्रदेश, ७०–७१. लक्षणांच्या साम्यावरून वेदांतातील अलौकिक कथा आणि दंतकथा, ७१–७२. त्याचा अनुमान, आर्टिक्ट आर्यांचे मूळस्थान होते, ७१–७२. यज्ञोपवितेचा उगम, १७०–१७१.

त्याच्या स्पष्टीकरणातील त्रुटी १७१-१७२.

**त्रैवर्णिक** : कोण होते, ३४. त्यांच्यातील अधिकाराच्या एकीकरणाचा अभाव, ५६-५७.

**त्रिशंकु** : १४६, १४७, १५८-१५९.

**त्रित्सू** : १३४-१३५.

**प्रो. डी. एस. त्रिवेदी** : आर्यांनी हिंदूस्थानचा शोध लावला या पुराव्याच्या विरुद्ध ७३-७४.

**अस्पृश्य** : अतिशूद्र आहेत अवर्ण आणि अद्वीज, ३३-३४.

**उपनयन** : कोणाला अधिकार आहे - १६७-१६९. वेदांचा अभ्यास करण्याची दीक्षा - १६९. आधुनिक विधीकरिता यज्ञोपवीत आवश्यक १६९. यज्ञोपवीत वापरण्याचा विधीचे एकीकरण, यज्ञोपवीत आणि उपनयन विधीचे एकीकरण, १७२. यज्ञोपवीताच्या अभावी धोका, १७३. खरा अर्थ १७३, १७८-१७९, शूद्रांचा अधिकार १७८-१७९, १८२-१८३. मुका, बहिरा, आंधळा 'अनुलोम' - १७९. ज्यांनी वयोमर्यादा पार केली ते - १८०, त्यांची मुले आणि व्रात्य - १८०-१८१., हिंदी-इराणी लोकात स्त्रियांच्या उपनयनाला मज्जाव - १८२. संस्कार गणपतीनुसार शुद्रांकरिता मोकळे - १८२. शुद्रांना उपनयनाच्या अभावाची कारणे स्पष्ट नाही - १८२-१८३. प्रथम अध्यात्मिक महत्त्व - १८४. शूद्रांना उपनयन नाकारल्यानंतर सामाजिक महत्त्वाचे संपादन - १८४. मालमत्ता आणि ज्ञानाचा अधिकार - १८५. उपनयन विधी पार पाडण्याकरिता आर्यांची निवड - १८६, शिवाजीचा अधिकार - १८८-१८९.

**श्री. सी. व्ही. वैद्य** : भागवत पुराणापासून भारतभूमीवर सारांश, १८५-१८६, शिवाजीच्या राज्यभिषेकाच्या वेळी ब्राह्मणाला दक्षिणा देण्यात पैशाचा खर्च - १९४.

**वैश्य पुराण** : पुरोहिताच्या वर्गाची उत्पत्ती - ३२-३३.

**वैश्य** : पुरुषसुक्तानुसर उत्पत्ती, १९. द्विज जन्मी (द्विज) आहेत - २१, दर्जाने केवळ शूद्रांपेक्षा श्रेष्ठ - २३, ३०-३१. सवर्ण द्विज आणि त्रैवर्णिक म्हणून - ३४. हिंदी आर्य समाजात छळ झालेला समाज - ५६. त्यांच्या विरुद्ध संताप नंतर शूद्रांकडे वळला - ५६. त्रैवर्णिक म्हणून त्यांचा शूद्राविरुद्ध अधिकार नाहीच्या बरोबर होता - ५६-५७.

**वाजसनेयी संहिता** : वर्णाच्या उत्पत्तीचे दोन सिद्धांत, ३६-३७. शूद्र आणि आर्य यांच्यात भेद दर्शविणारी विधाने, ११०. ब्राह्मण आणि शूद्रांमध्ये समानता दर्शविणारी विधाने, ११०-१११.

**वर्ण** : रंगावरून आर्य व सिद्धांत, ८०. ऋग्वेदात आढळणारे शब्द आणि त्याचा सुचित अर्थ, ८०-८१. ऋग्वेदात तीन वर्णाची पद्धती, १३८-१३९, १४५ (पहा-पुरुषसुक्त) आणि चातुर्वर्ण्य)

**वशिष्ठ** : त्याचा विश्वामित्रासोबत झगडा, १४६-१६६. कालमाषपद सुदासास आणि भारतसोबत त्याच्या समेटाच्या कथा-२०८-२०९, २११-२१२. (पहा-सुदास आणि विश्वामित्र).

**वशिष्ठ धर्मसूत्र** : पुरुष सुक्तास त्याचा आधार २४ या अंतर्गत शूद्रांवरील अपात्रतादर्शक बंधने, ४३-४५, ५२.

**वायु पुराण** : १०५-१०६.

**वैदिक वाङ्मय** : उत्पत्ती आणि ब्राह्मणांचा दृष्टिकोन - ३०-३२. मॅक्समुलरचा या मते वैदिक वाङ्मयाच्या क्रमाची रचना - १४४. (पहा - ऋग्वेद, अथर्ववेद, यजुर्वेद आणि वेद).

**बेना** : १६१-१६२.

**विष्णु पुराण** : मनू हिंदी आर्य समाजाचा २५, वेदाच्या उत्पत्तीविषयी वेगवेगळ्या ब्राह्मणाकडून वेगवेगळी स्पष्टीकरणे - ३२-३३. विश्वोत्पत्तीशी संबंधित तत्त्वज्ञान - ९७-९९. हरिश्चंद्राची कथा - १४८-१५२. निमीचा ब्राह्मणांशी झगडा - १६५.

**विष्णु स्मृती** : या अंतर्गत शूद्रांवरील

अपात्रतादर्शक बंधने.

**विश्वामित्र** : वशिष्ठाशी त्याचा झगडा - १४६-१४७. त्रिशंकुच्या घटनेत त्याची मध्यस्थी - १४८. हरिश्चंद्र - १४८-१५२. अंबरिश - १५२-१५३ आणि कालमाषपद - १५३-१५४. वशिष्ठास ठार मारण्याचा प्रयत्न - १५५-१५६. त्याच्या चारित्र्याविषयी बारकावे - १५६-१५७. त्रिशंकुच्या कथेत विशिष्ट अधिकारासाठी वशिष्ठाशी लढाई - १५७-१५८. सुदासद्वारे सूड घेण्यास धिक्कार - १६०-१६१.

**व्रात्य** : ३७, कोण होते. १८१-१८२. व्रात्याच्या शुद्धीकरणाकरिता शुद्धीग्रहाची तरतूद - १८१-१८२.

**प्रो. वेबर** : महाभारतातील सुदास हा ऋग्वेदातील सुदास होय - १२७. शूद्र ही आर्यांपैकीच एक टोळी होती व ती इतर टोळ्याच्या अगोदर बाहेरून हिंदुस्थानात आली - १३७.

**युरोपियन ग्रंथकार** : दास आणि दस्यूपासून शूद्रांची उत्पत्तीबद्दल सिद्धांत - ६५, त्यांच्या सिद्धांतावर आधारित डॉ. बॉप यांच्या सिद्धांवरून मूळ भाषेविषयी काढलेले अनुमान, ६९-७०, अनुमान : (१) आर्यांचे मूळस्थान आणि सामाजिक वंशावळ - ८०. (२) आर्यांद्वारे हिंदुस्थानात पादक्रांत - ७९-८०. (३) आर्यांना ताब्यात केले - ७९-८०. त्यांच्या सिद्धांताच्या अपयशाचे कारण - ७८-७९. त्यांच्या सिद्धांताची छाननी - ७९-८५. त्यांच्या सिद्धांताच्या ऋग्वेदाशी झगडा - १०३-१०३. त्याच्या त्रुटी - २०६-१०७.

**डॉ. विल्सन** : ऋग्वेदाच्या त्याच्या भाषांतरातून काढलेले सिद्धांत २४-२५, १२२-१२३.

**यज्ञोपवित** : त्याचे महत्त्व, १६९-१७०. त्याला बनविण्याचे आणि त्याच्या वापराचे नियम, १६९-१७०. यज्ञोपविताच्या उत्पत्तीविषयी श्री. टिळक यांचा खुलासा - १७०-१७१. त्याचा मुख्य उद्देश गोत्र जोडण्याचा होता, १७२-१७३. केवळ ब्राह्मण घालू शकत होता - १७३. उपनयनासोबत विलिनीकरण - १७३.

**यज्ञावलक्य** : यज्ञोपवितावरून - १६९.

**यजुर्वेद** : त्याचे दोन भाग - ३५, अश्वमेध यज्ञ, ७२, ऋग्वेदापेक्षा वेगळे - ८५.

**यास्क** : हिंदी आर्य समाजाच्या पाच टोळ्या - ३०. पैजवनचा अर्थ - १२१-१२३.

**झेंद् अवस्ता** : वर्ण हा शब्द या भावनेने आढळतो - ८१-८४. अस्त्रही दाहक - १०७-१०८.

ooo

शूद्रांची उत्पत्ती कशी झाली आणि त्यांची अधोगती कोणत्या कारणामुळे घडून आली याचा शोध लावणे, हा या प्रबंधाचा हेतू होता. या बाबतीत जी ऐतिहासिक माहिती उपलब्ध आहे तिचा आणि या बाबतीत प्राचीन व अर्वाचीन कालातील ग्रंथकारांनी जे जुन्या पद्धतीचे व नव्या पद्धतीचे सिद्धांत सुचविलेले आहेत, त्यांच्या सांगोपांग विचार केल्यानंतर मी माझा स्वतःचा या बाबतीतील सिद्धांत तयार करून तो या प्रबंधात मांडलेला आहे. मी या सिद्धांताचे वेगवेगळे भाग पूर्वीच्या प्रकरणांमध्ये वेगवेगळे मांडलेले आहेत. प्रत्येक भागाची भूमिका तयार करता यावी या उद्देशाने मी या भागांची वेगवेगळी मांडणी केलेली आहे. ते वेगवेगळे भाग एकत्रित करून त्यांचा एक समूह केला तर तो सिद्धांत कोणत्या स्वरूपाचा होतो, याची आता माहिती मिळते.

प्रबुद्धभारत प्रकाशन

पंचशिल नगर, बुद्धविहारा मागे, नागपुर-17.
मो. 09850332296